APR/ KGS/ MMP/ 12:00

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

(सर्व सन्माननीय सदस्य माननीय सभापतींचे अभिनंदन करतात.)

**सभापती** : धन्यवाद. प्रश्नोत्तरे.

**शासकीय आश्रम शाळेतील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करतांना केलेला भेदभाव**

**(1) * 37376 श्री. व्ही. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. विनोद तावडे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. नितीन गडकरी , श्री. मधुकर चव्हाण , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. जगदीश गुप्ता , श्री. गुरुमुख जगवानी , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दिपक सावंत , श्री. किसनचंद तनवाणी , श्री. गोपीकिसन बाजोरिया : दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 20 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या यादीमधील प्रश्न क्रमांक 34354 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आदिवासी विभागाकडील शासकीय आश्रम शाळातील शिक्षकांना शालेय व ग्रामविकास विभागाकडील शिक्षकांप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक 1 मार्च, 2000 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या विचाराधीन बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(2) असल्यास, केव्हा व शासन निर्णयाचे स्वरुन काय आहे,
(3) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावित** : (1) नाही.
(2) व (3) ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा प्रश्न आदिवासी विकास विभागाशी संबंधित असून शासकीय आश्रमशाळेतील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संदर्भातील आहे. सदनामध्ये हा प्रश्न अनेक वेळेला उपस्थित करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रामध्ये एकंदर 64 कनिष्ठ महाविद्यालये आहेत आणि फक्त 387 प्राध्यापक आहेत. यासंदर्भात पूर्वी प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना असे सांगितले होते की, याबाबतीत फायनान्स विभागाकडे जाऊन पाठपुरावा करु. यासंदर्भात आतापर्यंत दोन-तीन वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे, पण कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, शालेय शिक्षण विभगाने दि. 3 जून 2000 रोजी याबाबतीत निर्णय घेऊन 42 हजार कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना न्याय दिला. जिल्हा परिषदेने सुध्दा दि.19 नोव्हेंबर 2005 मध्ये त्या परिसरातील शासकीय आश्रमशाळेतील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी ....

ता.प्र.क्र.37376 . . . .

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे . . . .

निर्णय घेतला.तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुध्दा दि.17 जानेवारी 2004 रोजी.आर.काढून दि.1 मार्च 2005 पासून या शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी दिली.पण आदिवासी विकास विभागाने अजूनही कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू केलेली नाही. त्यामुळे आता माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत केवळ "बघू" "पाहू" अशा प्रकारची उत्तरे देऊ नयेत. माझा असा प्रश्न आहे की, आदिवासी विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना त्रिस्तरीय सुधारित वेतनश्रेणी एक महिन्यामध्ये किंवा दोन महिन्यामध्ये देणार आहात काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, हे खरे आहे की, शालेय शिक्षण विभागाने, ग्रामविकास विभागाने, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतीत निर्णय घेतला. सुरुवातीला शालेय शिक्षण विभागाने दि. 3 जून 2000 मध्ये त्रिस्तरीय वेतनश्रेणी देण्यासाठी मान्यता दिली. त्यानंतर बाकीच्या विभागांनी सुध्दा दि. 1 मार्च 2000 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू केली. त्याप्रमाणे आदिवासी विकास विभागामार्फत सुध्दा मंत्रिमंडळापुढे ही बाब नेण्यात आली होती. याबाबतीत तेथे चर्चा झाली. तेव्हा असे लक्षात आले की, याबाबतीत अजून काही विभागांना निर्णय घ्यावयाचा आहे.

यानंतर श्री.बरवड . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37376 ..... डॉ. विजयकुमार गावित ....

त्यामुळे एकत्रितपणे सर्व विभागाच्या बाबतीतील विषय मंत्रिमंडळासमोर आणावा मग त्याला मंजुरी देऊ अशा पध्दतीची चर्चा झाली. त्यानंतर बाकीच्या विभागांना विचारले होते. आता ती माहिती आलेली आहे. मी सांगू इच्छितो की, शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर मंत्रिमंडळासमोर जाऊन ही बाब मंजूर करुन घेण्याचा प्रयत्न करु.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, 13 डिसेंबरला यासंदर्भात चर्चा झाली होती तसेच 28 नोव्हेंबरला नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने चर्चा झाली होती. खरे म्हणजे, यासंदर्भात शासनाला डिस्क्रिमिनेटरी ॲप्रोच घेता येणार नाही असा याचिका क्रमांक 3303/99 च्या संदर्भात 14 ऑगस्ट, 2006 ला न्यायालयाचा निकाल लागलेला आहे. न्यायालयाने शासनाला निर्देश दिले आहेत की, शालेय शिक्षण विभागाने निर्णय घेतलेला आहे तो आश्रमशाळांना सुध्दा लागू होतो. या सर्व शिक्षकांना 1 मार्च, 2000 पासून ही सुधारित वेतनश्रेणी देण्याचे ठरविले तर शासनावर साधारणत: वर्षाला किती आर्थिक बोजा पडणार आहे ? न्यायालयाच्या निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागाप्रमाणे 1 मार्च, 2000 पासून यांना तातडीने वेतनश्रेणी लागू करणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे 75 महिन्यांच्या वेतनाच्या थकबाकीपोटी 1,76,77,871 रुपये खर्च अपेक्षित आहे. मी सांगितले आहे की, शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर याचा निर्णय घेण्यात येईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, 40 ते 50 हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वेतनश्रेणी लागू केली त्या शिक्षकांची अशी तक्रार आहे की, इतर शिक्षकांना आपण 1 मार्च 1997 पासून वेतनश्रेणी दिली आणि त्यांना 1 मार्च, 2000 पासून दिली. 1 मार्च 2000 पासून जिल्हा परिषदेमध्ये वेतनश्रेणी लागू केली. मात्र आश्रमशाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना अडवून ठेवले. आता माननीय मंत्रिमहोदय अनुकूल उत्तर देत आहेत. त्यांनी सांगितले की, आम्ही मंत्रिमंडळासमोर गेलो होतो आणि मंत्रिमंडळाने अनुकूलता दाखवली परंतु तत्सम काही विभागांचा प्रश्न आहे काय याबाबत विचारले. आता मंत्रिमंडळासमोर जाण्याच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी शेवटी उत्तर दिले. शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी याचा शासन निर्णय निर्गमित केला जाईल काय ?

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

ता. प्र. क्र. 37376 ....

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी शैक्षणिक वर्ष असा उल्लेख केला आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी याबाबतचा शासन निर्णय निर्गमित होईल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर उचित निर्णय घेतला जाईल. मंत्रिमंडळासमोर जाऊन निर्णय घेतला जाईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : उचित निर्णय म्हणजे काय ? आपल्या सोयीचा सुध्दा उचित निर्णय होऊ शकतो. शालेय शिक्षण विभागाकडे त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू केली आहे. तशाचा तसा निर्णय घेणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, तशाच पध्दतीचा निर्णय घेण्यासंबंधी मंत्रिमंडळासमोर गेलो होतो. त्यावेळी काही मंत्रिमहोदयांनी प्रश्न उपस्थित केला की आमचे सुध्दा राहिले आहे. त्यामुळे एकत्रितपणे विषय निर्णय घेतला जाईल अशी चर्चा झाली. दुसऱ्यांना दिलेले आहे त्यामुळे निश्चितपणे शासन यांना सुध्दा देईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हा भेदभावाचा विषय आहे. या ठिकाणी हायकोर्टाचा निर्णय तपशीलवार वाचून दाखवावयाचा काय ? प्रत्येकाने हायकोर्टात जावयाचे काय ? अन्याय झाला हे आपण मान्य केले आहे. 40-50 हजार लोकांवर अन्याय झाला. त्यांना 1996 मध्ये लागू न करता 2000 मध्ये वेतनश्रेणी लागू केली. आपण आदिवासी विभागाचे प्रतिनिधित्व करता. आपण आता करेक्ट लाईनवर उत्तर दिलेले आहे पण शेवटची वाक्यरचना बरोबर नाही. शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, होय.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, जी सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी देणार आहात त्या वेतनश्रेणीचे स्वरुप काय आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : या सुधारित वेतनश्रेणीमध्ये प्रथम श्रेणी रु. 7225 ची आहे. व्दितीय श्रेणी रुपये 8000 ची आहे आणि निवड श्रेणी रुपये 9125 ची आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37376..... डॉ.विजयकुमार गावित.....

निवडश्रेणी व वरिष्ठ श्रेणी यामध्ये 12 वर्षांचा अनुभव असावा लागतो. काम समाधानकारक केले किंवा नाही, प्रशिक्षणाचा भाग असतो. तसेच शैक्षणिक अर्हता पाहिली जाते, पीएचडी असेल आणि समाधानकारक काम केले असेल तर वेगळी वेतनश्रेणी दिली जाते.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

## डोंगरगाव (ता.हवेली जि.पुणे) येथील गट नंबर 382 मधील दगडखाण व क्रशरच्या प्रदूषणाचा स्थानिक ग्रामस्थाना होत असलेला त्रास

**(2) * 41015** **श्री. अरविंद सावंत** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) डोंगरगाव (ता.हवेली जि.पुणे) येथील गट नं.382 मधील दगडखाण व स्टोन क्रशरच्या संभाव्य प्रदुषणाच्या प्रादुर्भावाच्या तेथील स्थानिक ग्रामस्थांच्या तक्रारीवरुन दिनांक 4 ऑक्टोबर, 2007 रोजी आदेश क्र.खनिकर्म-1037/2007 च्या नोटीसीद्वारे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या सहीने उत्खनन व क्रशर उभारणीचे काम पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ बंद करण्याचे आदेश देऊनही आजपर्यंत सदरहू उत्खनन व क्रशरचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(3) तसेच त्यांनी नगररचना व मूल्यनिर्धारण शाखेच्या अटींचा भंग केला, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे**, **श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) ते (4) मौ. डोंगरगाव येथील गट नं. 382 मधील 2 हेक्टर क्षेत्राचा 5 वर्षे मुदतीसाठी खनिपट्टा दिनांक 17 मे, 2007 च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आला होता. तथापि, सदर खनिपट्टयास व खडी मशीन उभारणीस ग्रामस्थांनी हरकत घेतल्यामुळे सदर ठिकाणी मंजूर केलेला खनिपट्टा दिनांक 21 जानेवारी, 2008च्या आदेशान्वये रद्द करण्यात आलेला आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, दिनांक 4 ऑक्टोबर, 2007 रोजी आदेश क्र.खनिकर्म-1037/2007 च्या नोटीसीद्वारे अपर जिल्हाधिका-यांच्या सहीने उत्खनन व क्रशर उभारणीचे काम पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ बंद करण्याचे आदेश देऊनही आजपर्यंत सदरहू उत्खनन व क्रशरचे काम सुरु आहे काय, या प्रश्नाला उत्तरच दिलेले नाही. दिनांक 21.1.2008 रोजी घेण्यात आलेला निर्णय कळविला आहे. माझ्याकडे ग्रामपंचायतीचे पत्र आहे. दिनांक 28.1.2008 रोजी ग्रामपंचायतीने पुन्हा पत्र दिले आहे. त्यानंतर शासनाने आदेश दिल्यानंतरही सध्या तेथे उत्खनन सुरु आहे. मी स्वत: तेथे जाऊन आलो आहे. गावक-यांची किंवा ग्रामपंचायतीची एनओसी न घेता हे उत्खनन सुरु आहे. आता हा खनिपट्टा रद्द करण्यात आलेला आहे, असे उत्तरात नमूद केलेले आहे. पण आजही तेथे खनिकर्माचे काम सुरु असेल तर संबंधित अधिका-यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच खनिकर्म करणा-या कंपनीचे नाव काय आणि त्या कंपनीचे मालक कोण आहेत ?

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

ता.प्र.क्र.41015....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे दिनांक 21.1.2008 रोजी हा परवाना रद्द केला आहे ही वस्तुस्थिती आहे. सद्य:स्थितीमध्ये तेथे क्रशरचे काम चालू नाही. सन्माननीय सदस्यांनी कंपनीचे व मालकाचे नाव विचारलेले आहे. त्या कंपनीचे नाव सुमित स्टोन क्रशर असे असून भोसरीचे श्री.लांडे हे मालक आहेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, त्याठिकाणी आजही काम सुरु आहे. पोलीस अधिकारी गावक-यांना दमदाटी करतात. तेथे रस्ता नाही, पोल्ट्री व्यवसायिकांच्या कोंबडया मेल्या आहेत, शेतीचे नुकसान होत आहे. त्यामुळे हे काम ताबडतोब बंद करणार काय आणि आदेश दिल्यानंतरही ज्यांनी काम सुरु ठेवले आहे त्यांच्याविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला सन्माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे. परंतु सन्माननीय सदस्यांना मी अधिकची माहिती देऊ इच्छितो. दिनांक 17.5.2007 रोजी या कंपनीला परवाना दिलेला आहे. त्यानंतर दिनांक 17.5.2007 आणि दिनांक 27.5.2007 अशा दोन वेळा तक्रारी प्राप्त झाल्या. त्यानंतर दिनांक 4.11.2007 रोजी कंपनीला कारणे दाखवा नोटीस इश्यू करण्यात आली. दिनांक 17.5.2007 रोजी या कंपनीला परवाना दिला असला तरी आजमितीपर्यंत तेथे क्रशरचे काम सुरु झालेले नाही, उत्खननाचे काम सुरु नाही. सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, तेथे हे काम सुरु आहे. परंतु क्रशरचे काम सुरु करण्यापूर्वी तेथे सिमेंटीकरणाचे काम करावे लागते ते करीत असताना ग्रामपंचायतीने तक्रार केली आहे की, क्रशरचे प्रत्यक्षात काम सुरु झाले तर तेथील पोल्ट्रीधारकांचे नुकसान होईल, शेतीचे, बागायतीचे नुकसान होईल. तेथे क्रशर सुरु करण्यासाठी सिमेंटीकरणाचे काम सुरु आहे, तेथे त्यांनी मशिनरी सुध्दा बसविलेली नाही. तरी सुध्दा जिल्हाधिका-यांनी स्वत: जाऊन प्रत्यक्षात पाहणी केली आहे. त्याठिकाणी जे काम सुरु होते ते त्यांनी दिनांक 21.1.2008 रोजी बंद केलेले आहे. पण तेथे क्रशरचे काम सुरु नाही, त्यामुळे पोल्ट्रीधारकाचे, बागायतदारांचे, शेतीचे नुकसान होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

नंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.41015...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत दोन मतांमध्ये संघर्ष आहे. त्या ठिकाणी काम चालू आहे असे लोकप्रतिनिधी सांगतात आणि जिल्हाधिका-यांनी दिलेल्या निवेदनाच्या आधारावर काम बंद आहे अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदय देतात. असा हा मतामधील संघर्ष आहे. तेव्हा लोकप्रतिनिधींनी दिलेली माहिती सत्य मानून काम सुरु असेल तर ते बंद केले जाईल आणि संबंधित अधिका-यावर योग्य ती कारवाई केली जाईल असे उत्तर अपेक्षित असताना जास्त तपशिलात जाण्याची काय आवश्यकता आहे ?

श्री. नारायण राणे : कोणत्याही दोन प्रवाहामध्ये मतभिन्नता नाही. क्रशरचे मालक हे कोणत्याही राजकीय पक्षाचे असले तरी त्यांना व्यवसाय करण्याचा परवाना आणि अधिकार आहे. तक्रार आल्यानंतर काम बंद केलेले आहे. मी आज विधिमंडळामध्ये येण्यापूर्वी तेथील जिल्हाधिका-यांकडून माहिती घेतली, प्रत्यक्ष साईटवरची माहिती घेतली. तक्रारी आल्यामुळे कोणतीही परवानगी दिलेली नाही आणि देता येणार नाही. शेतक-यांचे नुकसान होणार असेल तर अशी परवानगी दिली जाणार नाही. तेथे सर्व काम बंद आहे. मी स्वत: प्रांत, जिल्हाधिकारी आणि तहसिलदार या तिघांशी बोललो आहे.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यातील तिलारी प्रकल्पाअंतर्गत लाभक्षेत्रात व बुडीत क्षेत्रात असलेल्या जमिनीवरील निर्बंध उठविण्याबाबत**

**(३) * ३७७८९ श्री.परशुराम उपरकर , डॉ. दीपक सावंत :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यातील तिलारी प्रकल्पाअंतर्गत लाभक्षेत्रात आणि बुडीत क्षेत्रात असलेल्या जमिनीपैकी ३७ गावांची जमिनीवरील निर्बंध जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २००७ रोजी वा त्यासुमारस उठविले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्बंध उठविण्याकरिता पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २६ सप्टेंबर, २००७ रोजी सद्य:स्थितीत सदर जमिनीवरील निर्बंध उठविण्यासाठी कार्यवाही लगेच करण्यात येणार नाही, असे कळविण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) असे असतांना सदर धरणाचे काम अपूर्ण असतांना व शेतकऱ्यांमधील अनेक कुटूंबाना शेतीसाठी जमिन देण्याचे शिल्लक असतांना व पाटबंधारे विभागातील अधिकारी यांनी निर्बंध उठविण्याचा नकार दिला असतांना कोणत्या कारणासाठी सदर निर्बंध उठविण्याची कार्यवाही सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी यांनी बदली होण्याआगोदर दोन दिवस आधी का करण्यात आली आहे,

(४) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता :** (१) होय.

(२) होय, कार्यकारी अभियंता तिलारी शिर्षकामे विभाग क्रमांक १ यांनी दिनांक २६.९.२००७ च्या पत्रान्वये कलम १२(१) चे निर्बंध उठविण्याची कार्यवाही लगेच करता येणार नाही, असे कळविले आहे.

(३) तिलारी मोठा आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम पूर्ण झालेले असल्याने व या प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनवर्सनासाठी शासन निर्णय क्रमांक १००२/५५७(०२) मोप्र-१ दिनांक २६.११.२००२ अन्वये तिलारी प्रकल्पांतर्गत ज्या प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी शेत जमिनी साठी महाराष्ट्र प्रकल्प बाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार जमिनीचा मोबदला रक्कमेच्या ६५% रक्कम शासनाकडे विहित मुदतीत अनामत म्हणुन भरलेली नाही तसेच ज्या प्रकल्पग्रस्तांनी विहित मुदतीत ६५% अनामत रक्कम भरुन देखील ज्यांना पर्यायी जमिनी मिळालेल्या नाहीत अशा सर्व प्रकल्पग्रस्तांना त्यांना देय ठरणाऱ्या पर्यायी शेत जमिनी ऐवजी रुपये ६८९००/- प्रती एकर या दराने रक्कम अदा करण्यास शासन स्तरावरुन मान्यता मिळालेली आहे. अशा परिस्थितीत लाभक्षेत्रातील आणखी जमिन पुनर्वसनाच्या कामासाठी आवश्यक नसल्याने पुनर्वसन कायद्यान्वये लागु केलेले निर्बंध उठविण्याची घोषणा दिनांक १७.९.२००७ रोजी केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी हा आंतरराज्यीय प्रकल्प अद्याप पूर्ण झालेला नाही. प्रकल्पग्रस्तांचे 100 टक्के पुनर्वसन झालेले नाही. असे असताना 5.1.2004 रोजी जिल्हाधिका-यांनी 1980 आणि 1988मध्ये अधिसूचना काढलेल्या जागेवरील निर्बंध उठविण्यासाठी

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अहवाल मागविला होता. तो अहवाल आलेला नसताना 17.9.2004 रोजी जिल्हाधिकारी बदलून जाण्याच्या एक दिवस आधी हे निर्बंध उठविण्याचे आदेश काढण्यात आले हे खरे आहे काय ? निर्बंध उठविण्यासंबंधीचा जो अहवाल मागविण्यात आलेला होता त्या अहवालावर विचार केला गेला नाही हे खरे आहे काय ? प्रकल्पग्रस्तांचे 100 टक्के पुनर्वसन झालेले आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : तिलारी हा आंतरराज्यीय प्रकल्प आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्याचा हा संयुक्त प्रकल्प आहे. यामध्ये 11 गावे समाविष्ट आहेत. 11 गावे बुडित क्षेत्रात येतात. लाभ क्षेत्रात 37गावे येतात. पुनर्वसनाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, 8 पुनर्वसन गावठाणे निर्माण केलेली आहेत. त्यामधील 7 गावे महाराष्ट्रामध्ये आणि 1 गाव गोवा राज्यामध्ये आहे. नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली आहेत. 1041 प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करण्याचे काम पूर्ण झ ालेले आहे. 42 भूखंड वाटण्याचे शिल्लक आहेत. 99 प्रकल्पग्रस्तांना लाभक्षेत्रातील 71 हेक्टर जमिनीचे वाटप केलेले आहे. ज्यांनी 65 टक्के जमीन पर्यायी शेतजमिनीसाठी शासनाकडे भरलेली नाही तसेच ज्यांनी 65 टक्के रक्कम विहीत मुदतीत भरली अशा सर्व प्रकल्पग्रस्तांना 68 हजार 900 रु. प्रतीहेक्टर या प्रमाणे 12 कोटी 39 लाख रु.चे वाटप केलेले आहे. निर्बंध उठविण्याच्या बाबतीत माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. त्या ठिकाणी जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यावर अनेक वर्षापासून निर्बंध होते. पुनर्वसनाचे काम पूर्ण झाल्यामुळे जिल्हाधिका-यांनी अशा प्रकारचे निर्बंध उठविलेले आहेत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 37789....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आंतरराज्यीय प्रकल्पाच्या बाबतीतील निर्बंध उठविण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना आहेत काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : होय. जिल्हाधिका-यांना अशा प्रकारचे निर्बंध उठविण्याचे अधिकार आहेत.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, जिल्हाधिकारी यांनी मागितलेला अहवाल 26 तारखेस आला आणि जिल्हाधिका-यांनी मात्र निर्बंध उठविण्याचा आदेश 17.9.07 रोजी काढले. अहवाल प्राप्त होण्यापूर्वी जिल्हाधिका-यांनी निर्बंध उठविण्याचे आदेश का काढला ? आदेश काढण्याची कारणे काय आहेत ? सदरहू आदेश अतिशय घाईगर्दीने काढण्याचे कारणे काय आहेत?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अहवाल प्राप्त होण्यापूर्वी जिल्हाधिकारी यांनी निर्बंध उठविण्यासंबंधीचे आदेश काढले ही वस्तुस्थिती आहे. अनेक वर्षापासून त्या ठिकाणी शेत जमिनीचे खरेदी-विक्री करण्यासंबंधींचे निर्बंध कायम होते. त्या ठिकाणच्या आठ-नऊ गावातील ग्रामस्थांनी सदर निर्बंध उठवावेत म्हणून शासनाकडे तक्रारी केल्या होत्या. ते सातत्याने यासंबंधी पाठपुरावा करीत होते. त्या ठिकाणी पुनर्वसनाचे काम पूर्ण झालेले आहे. शेतजमीन वाटपाचे काम पूर्ण झाले आहे. भूखंड वाटपाचे काम पूर्ण झाले आहे. नागरी सुविधा देण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणची सगळी कामे पूर्ण झाल्यामुळे जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिकारात अशा प्रकारचे निर्बंध उठविण्याबाबतचे आदेश काढले आहेत.

-------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पंचवटी (जि.नाशिक) भागातील श्रीराम सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यांवर व थकीत कर्जदारांवर भ्रष्टाचार व गैरव्यवहाराबाबत गुन्हा दाखल केला असल्याबाबत**

**(४) * ४०७७४ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. जगदीश गुप्ता , श्री. श्रीकांत जोशी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ फेब्रुवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास पंचवटी (जि.नाशिक) भागातील श्रीराम सहकारी बँकेच्या चेअरमन, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, अन्य ८ अधिकारी व सुमारे १५० ते १७५ थकीत कर्जदार ह्यांचे विरोधात भ्रष्टाचार, गैरव्यवहार, फसवणूक ई. विविध कारणाकरता गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ३ वर्षापासून या सर्व प्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीत दोषी आढळलेल्या व्यक्तीविरोधात कारवाई करण्यास व चौकशी पूर्ण करण्यास लागलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्यांचे विरोधात काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयप्रकाश दांडेगावकर,डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता**: (१) होय.

(२) होय. कायदा कलम ८३ खालील चौकशीत बँकेचे संचालक मंडळ, मुख्यकार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांनी सदोष पध्दतीने कामकाज केल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे आढळून आलेले आहे.

(३) सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालयाकडे रिट याचिका दाखल झाली होती. या रिट याचिकेचा निकाल दि. २२/८/२००७ रोजी लागला व त्यानुसार रिट याचिका फेटाळण्यात आली. तसेच सदर प्रकरण मानवी हक्क आयोगाकडे दाखल झाले होते. या प्रकरणात बँकेसंदर्भात कोणतीही पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये असे आदेश मानवी हक्क आयोगाने दिले होते. सदर आदेश दिनांक ७.१२.२००७ रोजी उठविण्यात आले, तद्नंतर कायदा कलम ८३ खालील चौकशी अहवालात दोषी आढळलेल्या व्यक्तीविरोधात कारवाई करण्यास्तव दिनांक १२.२.२००८ च्या आदेशान्वये कायदा कलम ८८ खाली चौकशीचे आदेश निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ४०७७४...

श्री. गुरुमुख जागवानी : सभापति महोदय, समाचार पत्र में रोजाना ही बँक या सोसायटी में भ्रष्टाचार के बारे में समाचार आते हैं. इससे गरीब लोगों की जिन्दगी भर की कमाई बँक या सोसायटी में डिपॉजिट होती है, वह खत्म हो जाती है. मेरा प्रश्न यह है कि महाराष्ट्र के अन्दर जिन बँक या सोसायटी में भ्रष्टाचार हुआ है वहां पर लोगों के डिपॉजिट वापस दिलाने के लिए बँक या सोसायटी को लोन देने के बारे में क्या शासन नियम बना रहा है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि भविष्य में इस प्रकार का भ्रष्टाचार न होने देने के लिए शासन कौन से उपाय कर रहा है ? इस बारे में क्या शासन सख्त कानून बनाने वाला है ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, ठेवी परत करण्यासाठी कोणतीही अशी वेगळी योजना नाही. एक लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी डिपॉझीट गॅरंटी कॉर्पोरेशनकडून परत केल्या जातात. सन्माननीय सदस्यांनी बँकेतील गैरव्यवहाराच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, यासंदर्भात सहकार आयुक्तांना कडक आदेश देण्यात आलेले आहेत. टॅप कॉपची स्थापना झालेली आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील सगळयाच सहकारी बँकावर कडक नियंत्रण ठेऊन असे गैरव्यवहार होणार नाहीत याबाबतीत शासन दक्षता घेत आहे.

श्री. प्रतापराव सोनवणे : सदर प्रकरणी दिनांक 12.2.08 च्या आदेशान्वये कायदा कलम 88 खाली चौकशीचे आदेश निर्गमित केले आहेत. या प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय ? या बँकेत 150 ते 175 प्रमुख थकीत कर्जदार आहेत. या कर्जदाराकडून रक्कम वसूल करण्यासाठी कालापव्यय न करता कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासन काय आदेश देणार आहे ? या बँकेतील ठेवीदार विविध उत्पन्न गटातील असून ते खूप अडचणीत आलेले आहेत. त्यांच्या ठेवीचे पैसे त्वरित परत करणे आवश्यक आहे. शासनाची इच्छाशक्ती असेल हा विषय त्वरित सोडविला जाऊ शकतो आणि जनसामान्य ठेवीदारांना दिलासा मिळू शकतो. याबाबतीत देखील शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कलम 83 ची चौकशी पूर्ण झाली आहे. कलम 88 ची देखील चौकशी पूर्ण झालेली आहे. दिनांक 31.1.08 रोजी आय.पी.सी.403,408,409,420 आणि कलम 120 (ब) प्रमाणे जुने संचालक मंडळ, काही

4...



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकारी व इतर सभासद कर्जदार असे एकूण 170 लोकांवर पंचवटी पोलीस स्टेशन, नाशिक येथे गुन्हा दाखल केलेला आहे. याप्रकरणी आतापर्यंत आठ ते दहा लोकांना अटक सुध्दा झालेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे या बँकेचे अध्यक्ष अजून अटकेमध्ये आहेत.

श्री. जगदीश गुप्ता : या ठिकाणी खातेदारांची फसवणूक झालेली आहे. एकूण हा भ्रष्टाचार किती रक्कमेचा आहे ? नेमकी कोणत्या पध्दतीने फसवणूक झाली आहे? फसवणूक झाली असल्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : मी मघाशीच सांगितले आहे की, या प्रकरणी संपूर्णपणे चौकशी झालेली असून जबाबदारी निश्चित करण्याचे काम चालू आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल झालेले आहेत. भ्रष्टाचार आणि थकबाकीची ही एकूण 90 कोटी रुपयांची रक्कम आहे. त्यादृष्टीने संबंधित पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आलेल्या आहेत.

--------------

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर जिल्हापरिषदेच्या समाज कल्याण विभागांतर्गत अनेक वसतिगृहात अनियमितता आढल्याबाबत**

**(५) * ३७६७९ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद समाज कल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांनी डिसेंबर २००७ दरम्यान एकाच दिवशी ९८ वसतिगृहांची तपासणी केली असता अनेक वसतिगृहांमध्ये अनियमितता आढळली. अनेक वसतिगृहांत बोगस विद्यार्थी संख्या दाखवून अनुदान लुटण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. अनेक शाळामध्ये सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले नाही ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या व्यक्तिंवर कठोर कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) कारवाई करण्यात आली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर,श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता** : (१) होय. तथापि तपासणीमध्ये ७ वसतिगृहांत अनियमितता आढळली व ४ शाळांमध्ये सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचे वाटप झाले नसल्याचे आढळून आले.

(२) व (३) वरिल ७ वसतिगृहांच्या व्यवस्थापनात गंभीर स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून सुनावणी घेण्यात आली. माहे जानेवारी, २००८ च्या फेर तपासणीनुसार ४ वसतिगृहांच्या मान्यता रद्द व ३ वसतिगृहांची मान्य संख्या कमी करण्याचे प्रस्तावित करुन वसतिगृहाची मान्यता रद्द करण्याबाबत संचालक, समाज कल्याण यांच्याकडे शिफारस केली आहे.

चार शाळांमध्ये सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटप न झाल्याने मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, नागपुर जिला परिषद के अन्तर्गत वसतिगृहों में बड़े पैमाने पर भ्रष्टाचार हो रहा है. एक दिन में ९८ जगह पर छापे मारकर कार्रवाई की गई है. इसमें बहुत सारी अनियमितताएं पकड़ में आई हैं. मेरा प्रश्न यह है कि जिन लोगों के खिलाफ आपको कार्रवाई करनी चाहिए थी, उनके खिलाफ आपने कार्रवाई की है या नहीं ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि जिन वसतिगृहों ने विद्यार्थियों की संख्या ज्यादा बताकर प्रति विद्यार्थी ५०० रुपए अधिक लिया है तो क्या उनसे पैसा वापस लेने की प्रक्रिया शुरु की है ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,नागपूर यांच्या कार्यालयामार्फत २००७ मध्ये ९८ वसतिगृहांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७ वसतिगृहांमध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्या. या वसतिगृहांचे ४० टक्के अंतिम अनुदान प्रलंबित ठेवलेले आहे. त्याचप्रमाणे ज्या त्रुटी आढळल्या त्याबद्दल वसतिगृहातील



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७६७९ पुढे सुरु....

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर ...

विद्यार्थ्यांची संख्या कमी करण्याबद्दल समाजकल्याण संचालकांकडे शिफारस करण्यात आली आहे. अनुदानाच्या बाबतीत शासनाने जी कारवाई केलेली आहे ती पुरेशी आहे. कारण अंतिम अनुदान दिलेले नाही. त्यामुळे या एकूण प्रकरणाबाबत शासनाने पूर्णपणे कारवाई केलेली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ४ शाळांमध्ये सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचे वाटप न होण्याची कारणे काय ? शिष्यवृत्तीचे वाटप न झाल्यामुळे किती विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहिले ? उत्तरामध्ये म्हटले आहे की शाळेच्या मुख्याध्यापकांना नोटीस दिलेली आहे. ही नोटीस केव्हा देण्यात आली ? नोटीस प्राप्त झाल्यानंतर मुख्याध्यापकांनी त्याला काय उत्तर दिले ? याप्रकरणात पुढे कोणती कारवाई करण्यात आली ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, ज्या चार शाळांमध्ये शिष्यवृत्तीचे वाटप झाले नाही त्यामध्ये भारत विद्यालय,कामराज नगर यामध्ये शिष्यवृत्ती न मिळालेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या -५, भोला हायस्कूल,मोतीबाग,नागपूर ७ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला नाही, राणी लक्ष्मीबाई विद्यालय, नागपूर १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही आणि नूतन विद्यालयातील ७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही. ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही ती रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली आहे. बाकीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप झालेले आहे. २५.१०.०७ आणि १३.३.०८ रोजी वाटप झालेले आहे. शिष्यवृत्ती वाटप न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १३ आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे म्हणजे त्यांना नोटीस दिलेली आहे. त्याचे उत्तर आल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मान्यता रद्द करण्याबाबत संचालक,समाजकल्याण यांच्याकडे शिफारस करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी केव्हा होणार आहे ? संबंधित शाळांची मान्यता केव्हा रद्द होणार आहे ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, प्रकरण समाजकल्याण संचालकांकडे पाठविले आहे. एक महिन्यात त्यावर कारवाई होईल.

-------

नंतर श्री. भोगले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**वालचंदनगर (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील शेती महामंडळाच्या कामगारांना कायमस्वरुपी कामावर घेण्याबाबत**

**(६) * ४११०८ श्री. प्रकाश शेंडगे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. रामनाथ मोते , श्री. मधुकर चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालचंदनगर (ता.इंदापूर) जि.पुणे येथील शेती महामंडळाच्या ४४७ कामगारांवर रोजंदारीविना उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २००८ दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मध्ये कामगार न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निर्णय देऊन कामगारांना नियमित करावे, असे सांगूनही या कामगारांना कायमस्वरुपी कामावर घेतले नसल्याचेही उघडकीस आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामगारांना कायम करण्याबाबतची दखल शासनाने घेतली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.नारायण राणे** : (१) हे खरे नाही.

(२) वालचंदनगर मळ्यावरील नैमित्तिक कामगारांना कायम करणेबाबत मा.औद्योगिक न्यायालयात दावा क्रमांक ५५१/९३ व ४२/२००० मध्ये कामगारांच्या बाजूने निर्णय झाला. या निर्णयाविरुद्ध महामंडळाने मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करुन स्थगिती घेतली आहे. अंतीम निर्णयासाठी सदर बाब मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, शासनाने शेती महामंडळाच्या माध्यमातून शेती करण्याचा प्रयोग केला. यासाठी जवळजवळ 16 हजार एकर जमीन संपादित केली. इंदापूर येथे महाराष्ट्र शासनाचा शेती फार्म आहे. शेतकऱ्यांची शेती तोटयात गेल्यानंतर शेतकरी आत्महत्या करीत आहेत. परंतु महाराष्ट्र शासनाचे शेती महामंडळ तोटयात गेल्याचे उदाहरण समोर आहे. या महामंडळामध्ये एकूण 452 कामगार काम करीत आहेत. त्यापैकी फक्त 5 कामगारांना सेवेत कायम करण्यात आले व 447 कामगारांना वाऱ्यावर सोडून देण्यात आले. या 447 कामगारांनी औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर औद्योगिक न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल दिला. परंतु महाराष्ट्र शासनाने या निकालाच्या विरोधात हायकोर्टात अपील दाखल करुन स्थगिती मिळविली आहे. शासन कामगारांच्या विरोधात जाण्याचे हे एकमेव उदाहरण आहे. या कामगारांनी न्यायालयातून जो न्यायनिवाडा मिळविला तो शासन मान्य करणार आहे का? हायकोर्टात दाखल केलेले अपील मागे घेऊन या 447 कामगारांना सेवेत कायम करणार आहे का?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे ही जमीन शासनाने संपादित केलेली नसून साखर कारखान्यांकडे असलेली अतिरिक्त जमीन यु.एल.सी. कायद्यांतर्गत ताब्यात घेण्यात आलेली आहे. औद्योगिक न्यायालयाचा निर्णय राज्य सरकारला मान्य नाही असेही सन्माननीय सदस्य म्हणाले आहेत. कोणत्याही न्यायालयाचा निर्णय मान्य करणे शासनाला बंधनकारक आहे. या महामंडळामध्ये जे तात्पुरत्या स्वरुपातील कामगार आहेत त्यांना सेवेत कायम करावे असा न्यायालयाने आदेश दिला. परंतु त्यापूर्वीच शासनाने या महामंडळाला कळविले होते की, महामंडळ वारंवार तोट्यात जात असून शासनाच्या तिजोरीतून निधी दिल्यानंतरच या कामगारांना वेतन अदा केले जाते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन 1984 साली महामंडळाला कळविण्यात आले की, कोणत्याही तात्पुरत्या स्वरुपातील कामगारांना सेवेत कायम करु नये. एका बाजूला हे महामंडळ बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतला असताना दुसऱ्या बाजूला कामगारांना सेवेत कायम करणे योग्य नाही. हे महामंडळ बंद करीत असल्यामुळे न्यायालयाने आदेशाचा फेरविचार करावा यासाठी अपील दाखल केले आहे. अपिलाचा निर्णय होताच यासंबंधी योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी, 1984 पासून कामगार या महामंडळामध्ये कार्यरत आहेत ही एक चांगली माहिती दिली. 1984 पासून 2008 पर्यंत 452 कामगार कार्यरत आहेत. त्यापैकी 5 कामगारांना सेवेत कायम करण्यात आले व 447 कामगार केवळ तात्पुरत्या सेवेत होते म्हणून त्यांची सेवा समाप्त करण्यात आली. हे कामगार किती वर्षे या महामंडळाच्या सेवेत होते? कोणत्या अटी व शर्ती या कामगारांना लागू होत्या? औद्योगिक न्यायालयाने कोणता निर्णय दिला, जो शासनाला मंजूर नाही? कोणत्या निकषावर शासनाने हायकोर्टात अपील दाखल केले? महामंडळ तोट्यात गेले हे आम्हाला मान्य आहे. परंतु ज्यावेळी औद्योगिक न्यायालयासमोर हा प्रश्न उपस्थित झाला त्यापूर्वीच हे महामंडळ बंद केले असते तर हा प्रश्न उपस्थित झाला नसता. न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर हायकोर्टात जाऊन स्थगिती घेणे योग्य आहे का?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41108.......

श्री. नारायण राणे : महोदय, सन 1984 सालापासून हे कामगार वेगवेगळया प्रकारे काम करीत आहेत. त्यात टेंपररी आणि परमनेंट असा प्रश्न नाही. कारण जशी गरज लागत होती तशी सहा महिने, एक वर्ष अशा प्रकारे रोजंदारीवर कधी पाच कामगार तर कधी दहा कामगार, अशा प्रकारे गरजेप्रमाणे त्यांना कामावर घेतले जात होते. प्रश्न असा आहे की, महामंडळ तोटयात चालले आणि त्या कामगारांचा पगार शासन देत आहे त्यामुळे महामंडळ चालवावयाचे की नाही असा प्रश्न निर्माण झाला. त्यानुसार डिस्पोज-अप करण्याची वेळ आली असता जे कामगार कायम आहेत त्यांची अशी मागणी आहे की, हे महामंडळ बंद करीत असताना आमची पी.एफ. वगैरे जी देणी असतील ती आम्हाला पैशाच्या रुपात न देता जमीन द्यावी या मुद्यावर हे कायम असलेले कामगार सर्वोच्च न्यायालयात गेले. त्यामुळे महामंडळ बंद करण्यासंबंधीचा निर्णय घेता येत नाही. तोपर्यंत या कामगारांना कायम करणे शक्य नाही म्हणून शासन अपिलात गेले आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : महोदय, अपिलात कामगार गेले नसून सरकारच गेले आहे.

श्री. नारायण राणे : कायम असलेले कामगार सर्वोच्च न्यायालयात गेले असा शब्द वापरला असून अपिलात शासन गेले असे मी सांगितले.

श्री. प्रकाश शेंडगे : महोदय, या कामगारांना न्याय द्याल, अशी अपेक्षा आहे. ज्यावेळी महामंडळ बंद करावयाचे तेंव्हा करा पण जोपर्यंत ते बंद होत नाही तोपर्यंत तरी या कामगारांना न्याय देणार की नाही ?

श्री. नारायण राणे : महोदय, तोट्यात असलेली कंपनी एखादी प्रायव्हेट कंपनी अथवा खाजगी व्यक्ती देखील चालवू शकणार नाही. त्याप्रमाणे महामंडळाचे कामच बंद असताना, महामंडळाचे उत्पन्नच नाही तर अशा परिस्थितीत कामगारांना कायम करणे शक्य होणार नाही.

--------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आदिवासींबाबत केलेल्या कायद्यात अनेक त्रुटी असल्याबाबत**

**(7) * 37609 श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.सय्यद जामा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासनाने आदिवासींबाबत केलेल्या वन कायद्यामुळे या कायद्यात अनेक त्रुटी आढळून आलेल्या आहेत या आदिवासींच्या वन जमिनी अनेक भांडवलदार या त्रुटीचा फायदा घेऊन वन जमिनी बळकाऊ शकतात. त्यामुळे आदिवासी वाड्यांवर कठीण परिस्थिती ओढावली असल्याचे माहे जानेवारी, 2008 च्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आदिवासींसाठी या कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी व त्याचा लाभ मिळण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार निर्णय किती कालावधीत घेतला जाईल,

(3) नसल्यास, प्रश्न भाग (2) च्या संदर्भात होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावित** : (1) हे खरे नाही.

(2) व (3) आदिवासी जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वन अधिकारांची मान्यता ) अधिनियम 2006 हा राज्यात दिनांक 31 डिसेंबर, 2007 पासून लागू झाला असून त्याखालील नियम 2007 दिनांक 1 जानेवारी, 2008 पासून अंमलात आले आहे. नियमानुसार गाव पातळीवर वन हक्क समिती उपविभागीय, जिल्हास्तर व राज्यस्तरावरील समिती गठीत करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. कायद्यात बदल घडवून आणण्याची कोणतीही कार्यवाही सुरू नाही. कायद्यानुसार लाभ मिळावा म्हणून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी सर्व प्रसिध्दी माध्यमाद्वारे प्रसार व प्रचार तसेच सर्व संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

श्री. संजय दत्त : महोदय, नियमानुसार यामध्ये वेगवेगळया स्तरावर समित्या स्थापन करण्याचा प्रश्न आहे. पण तीन महिने उलटून गेले तरी देखील अशा समित्यांची स्थापना झालेली नाही याचे कारण काय ? उत्तरात म्हटले आहे की, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तेव्हा ही प्रशिक्षणाची प्रक्रिया केव्हा सुरु झालेली आहे ? आतापर्यंत किती अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे ? आणि या प्रशिक्षणाचे स्वरुप काय आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : तीन स्तरावर समित्या स्थापन करण्यासंबंधीचे आदेश दिलेले आहेत. त्यापैकी राज्यस्तरीय समिती दि. 17 मार्च, 2008 रोजी गठित केलेली आहे. उप विभागीय स्तरावरील दुसरी समिती आणि जिल्हाधिकारी स्तरावरील तिसरी समिती आहे. उप विभागीय आणि जिल्हाधिकारी स्तरावरील समित्या मार्चपर्यंत गठित करण्यासंबंधीचे आदेश

.....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित ........ ता.प्र.क्र.37609......

शासनाकडून देण्यात आले आहेत. त्याचबरोबर या समितीमध्ये जे अधिकारी आहेत त्यात जिल्हाधिकारी, प्रांत, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी आणि सर्व जिल्हाधिकारी यांचे प्रशिक्षण आतापर्यंत पूर्ण झाले आहे. सहाय्यक प्रकल्प अधिकारी आणि बाकी समितीचे सदस्य जे आहेत त्यांचे प्रशिक्षण दोन महिन्यांपासून सुरु आहे. हे प्रशिक्षण देण्याचा उद्देश असा आहे की, या कायद्यानुसार रेकॉर्ड कसे तयार करावे, दावे दाखल दाखल केल्यानंतर त्याचे रेकॉर्ड तयार करुन कोणत्यानियमात बसते, पट्टे कसे द्यावयाचे आणि डिस्प्यूट असलेला भाग कसा सोडवावयाचा यासंबंधीचा उल्लेख या प्रशिक्षणामध्ये आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 37609 पुढे सुरु.......**

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्याकडे प्रकल्प अधिकारी किती ठिकाणी आहेत?प्रकल्प अधिकारी आय.ए.एस. दर्जाचे असावेत यासंदर्भात संकेत आहेत तसेच हायकोर्टाचे डायरेक्शन सुध्दा आहेत. त्यामुळे आपल्याकडे आय.एस.दर्जाचे किती प्रकल्प अधिकारी आहेत व किती ठिकाणी आय.ए.एस. दर्जाचे प्रकल्प अधिका-यांची पदे रिक्त आहेत?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, 11 संवेदनशील प्रकल्प असून प्रकल्प अधिकारी हे आय.ए.एस. दर्जाचे असावेत असे संकेत आहेत. 11 संवेदनशील प्रकल्पापैकी कोठेही आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी नियुक्त नाहीत.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनामध्ये शासनाने आश्वासन दिले होते की, लवकरात लवकर आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी नियुक्त केले जातील परंतु अद्यापही यासंदर्भात शासनाकडून कार्यवाही झालेली नाही.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, माझ्या माहिती नुसार प्रकल्प अधिकारी हे आय.ए.एस. दर्जाचे असावेत यासाठी हायकोर्टाने किंवा सुप्रीम कोर्टाने निर्देश दिलेले नाहीत. परंतु महाराष्ट्र शासनाने अती संवेदनशील जी 11 प्रकल्प नाटीफाईड केलेले आहेत तेथे काम चांगले चालावे यासाठी आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी नेमावे अशा पध्दतीचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. परंतु आय.ए.एस. पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे त्या ठिकाणी ॲडीशनल कलेक्टर लेव्हलचे, प्रांत लेव्हलच्या अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. जे 11 संवेदनशील प्रकल्प आहेत त्या ठिकाणी एक सुध्दा आय.ए.एस. अधिका-याची नेमणूक करण्यात आलेली नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरालाच हरकत आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी प्रकल्प अधिका-यांच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे त्यासंदर्भात आम्ही हक्कभंग आणू.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्तांच्या प्रश्नाला माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिले आहे ते सन्माननीय मंत्री महोदय स्वत: तपासून पाहतील व तसे आदेश असेल तर त्या आदेशाचे पालन केले जाईल.

---------------------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बल्लारपूर पेपर मिलला बांबू पुरविताना झालेल्या अनियमिततेबाबत**

**(८) * ३७७७३ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री.राजन तेली , श्री.सय्यद जामा : दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २० नोव्हेंबर,२००७ रोजीच्य यादीमधील तारांकित प्रश्न क्रमांक ३३६३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर पेपर मिलला बांबू पुरवठा करताना झालेल्या अनियमितता प्रकरणी चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक शासन आदेश दिनांक ३ जुलै, २००६ अन्वये करण्यात आली असून चौकशी चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) चौकशी अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, बल्लारपूर नगरपालिकेचा अध्यक्ष आणि नगरसेवक म्हणून मी ३० वर्षे काम केलेले आहे. या ठिकाणी मी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाच्या संदर्भात लेखी उत्तरात "होय हे खरे आहे, चौकशी चालू आहे"असे उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी मी आता नवीन प्रश्न उपस्थित करणार आहे. ज्यावेळेस बल्लारपूर येथे १९५१ मध्ये १० पैसे प्रती टन दराने बांबू दिला जात होता परंतु आता हाच बांबू ६०० रुपये प्रती टन या दराने दिला जात आहे. बाजारामध्ये बांबूचा दर आता २० ते ३० हजार रुपये प्रती टन असा आहे. यामध्ये शासनाचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. यासंदर्भात अनेक तक्रारी आलेल्या आहेत. हा प्रश्न माझ्या मतदारसंघाशी निगडित असल्यामुळे या प्रश्नाची मला चांगली माहिती आहे. ३० ते ४० हजार प्रती टन या दराने आंध्र प्रदेश, कर्नाटक येथील व्यापारी पेपरमिलसाठी बांबू घेऊन जात असतात. १९५१ पासून आज पर्यंत शासन पेपरच्या बांबूसाठी सबसीडी देत होते व त्यामुळे वहया कमी किमतीत उपलब्ध होत होत्या.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37773 श्री.जैनुद्दीन जव्हेरी...

माननीय मंत्री महोदयांना मला असे सांगावयाचे आहे की बाजारामध्ये 30 ते 40 हजार रुपये पर टन हा बांबूचा दर असतांना या कंपनीला 600 रुपये दराने बांबू देण्यात येतो. या संदर्भात चौकशी करुन कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर दिले जाते. प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला जातो परंतु वरील प्रमाणे उत्तर प्रत्येक वेळी दिले जाते. तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की, दर वाढवून देण्यासंबंधीचा निर्णय घेण्यासाठी दिरंगाई का करण्यात येत आहे आणि दर वाढवून दिल्यामुळे शासनाला अधिक उत्पन्नाचा फायदा मिळत असेला तर त्या कारखान्याला सबसिडी देण्याचे कारण काय आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मूळ प्रश्न विचारलेला आहे तो अत्यंत मर्यादित स्वरुपाचा आहे. त्या प्रमाणे मी या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे.आता सन्माननीय सदस्य जो प्रश्न विचारत आहे तो वेगळा आहे.सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न असा विचारला होता की, "बल्लारपूर पेपर मिलला बांबू पुरवठा करतांना झालेल्या अनियमितता प्रकरणी चौकशी अधिका-याची नेमणूक शासन आदेश दिनांक 3 जुलै 2006 अन्वये करण्यात आली असून चौकशी चालू आहे, हे खरे आहे काय ? त्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, " होय, हे खरे आहे? " त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला होता की," असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?" त्या प्रश्नाला असे उत्तर देण्यता आले आहे की," चौकशी अहवाल अद्याप प्रलंबित आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न असा विचारला आहे की, "अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?" त्याबाबत मी सांगू इच्छितो की अद्याप चौकशीचा अहवाल प्रलंबित आहे. त्यामुळे जोपर्यंत चौकशीचा अहवाल प्रलंबित आहे तोपर्यंत कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही. अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहे त्याची उत्तरे मी दिलेली आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी सांगितले की, बल्लारपूर पेपर मिलला 600 रुपये टन या दराने बांबू विकला जातो. वास्तविक 30 ते 40 हजार रुपये टन या भावाने त्या पेपर मिलला बांबू द्यावयास पाहिजे होता. तेव्हा या बाबतीत काय चौकशी करण्यात येत आहे ? बल्लारपूर पेपर मिलला 600 रुपये टन दराने बांबू



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्या ऐवजी 30 हजार ते 40 हजार रुपये टन या दराने बांबू देण्याचे फेर धोरण ठरविण्यात येणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी जो मूळ प्रश्न विचारला होता तो मी वाचून दाखविला आहे. त्यांनी जो मूळ प्रश्न विचारला होता त्याची उत्तरे मी दिलेली आहेत. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने जर सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारले तर त्याची उत्तरे देण्यास मी तयार आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याची माहिती आता आपल्याकडे असेल तर त्यांना ती माहिती जरुर द्यावी अन्यथा त्यांच्या बरोबर एक दिवस दालनामध्ये चर्चा करावी.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की त्या परिसरामध्ये 2 लाख मे.टन बांबू निघत असतो. तेव्हा एवढया मोठया प्रमाणावर निघत असलेला बांबू विकत घेण्यासाठी दुसरी कोणतीही कंपनी नाही.बल्लारपूर पेपर मिलला हा बांबू सध्या दिला जातो. त्यासाठी त्यांच्याबरोबर जो करार करण्यात आला होता तो स्थगित केलेला आहे.नवीन करारानुसार दर ठरविण्याच्या दृष्टीने एक समिती नियुक्त करण्यात आली आहे त्या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. ही समिती सांगेल त्याप्रमाणे बांबूचे पैसे देण्याच्या बाबतीत त्यांच्याकडून अंडरटेकींग घेतलेले आहे. त्यामुळे पुन्हा नवीन करार होईल त्यानुसार ठरलेल्या दराप्रमाणे त्यांना बांबू दिला जाईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, तेंथील कंत्राटदार आणि वन अधिकारी यांच्या संगनमतामुळे हा प्रकार घडत आहे. काल मेळघाट येथील बांबूच्या संदर्भात येथे प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. बल्लारपूर पेपर मिलला बांबू पुरविण्याच्या संदर्भात मला माननीय मंत्रीमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, जुलै 2006 रोजी चौकशी समिती नेमण्यात आली असतांना अजूनही ही चौकशी सुरु आहे. तेव्हा किती दिवस ही चौकशी सुरु राहणार आहे या चौकशी समितीचा अहवाल केव्हा येणार आहे आणि किती दिवसात शासन त्या चौकशीच्या अहवालानुसार कारवाई करणार आहे ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37773....

श्री.बबनराव पाचपुते :सभापती महोदय, संबंधित सेक्रेटरींची चौकशी सुरु आहे. त्यासाठी आता श्री.बसाक नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे.या समितीने आपला अहवाल दिल्यानंतर त्याप्रमाणे शासन कारवाई करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी मेळघाटच्या बांबू संबंधीचा उल्लेख केलेला आहे त्या व्यवहारामध्ये तोटा झालेला नाही असे उत्तर मी काल दिले होते.त्या व्यवहारामध्ये 19 लाख रुपये आपल्याला जादा पैसे मिळालेले आहेत . आता सुध्दा बल्लारपूरच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणावर बांबू निघतो हा बांबू बल्लारपूर पेपर मिलला देत असतांना इतर राज्यातील बांबूच्या दराचा अभ्यास करुन जो काही फायनल रेट निश्चित होईल त्याप्रमाणे त्यांना बांबू....

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात )

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. परंतु आपण सांगितल्यामुळे मी त्या प्रश्नाचे उत्तर देत आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य बांबूच्या संदर्भात प्रश्न विचारत आहेत. बल्लारपूर पेपर मिलला बांबु पुरवितांना जी अनियमितता झालेली आहे त्या अनुषंगाने 2006 सालापासून चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तेव्हा ही चौकशी तातडीने कशी पूर्ण होईल हे पाहिले पाहिजे. त्याचबरोबर अन्य राज्यामध्ये बांबूचे दर किती आहे तेथे कोणती पध्दत आहे हे आपण जरुर पहावे परंतु सबंधित कंत्राटदाराला बांबूचे दर वाढवून देण्यात यावे असे सन्माननीय सदस्यांचे मत आहे. तेव्हा त्या दृष्टीने देखील विचार करावा.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37773 ....

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लवकरात लवकर, दोन महिन्यामध्ये ही चौकशी पूर्ण करण्यात येईल.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, सरकार बल्लारपुर पेपर मिल को किस आधार पर बांबू सप्लाय कर रही है ? बल्लारपुर पेपर मिल के साथ महाराष्ट्र सरकार का जो एग्रीमेंट है, वह रद्द किया है या नहीं और अगर वह एग्रीमेंट रद्द नहीं किया है तो उसके क्या कारण हैं ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी सांगितलेच आहे की, सदर कंपनीबरोबर केले ॲग्रीमेंट आपण रद्द केलेले आहे आणि त्यांच्याशी नव्याने ॲग्रीमेंट आपण लवकरच करणार आहोत आणि त्यामध्ये जो भाव ठरेल त्या भावात त्यांनी बांबू घेण्याचे आपल्याला कबूल केलेले आहे तोपर्यंत आपण त्यांना जुन्या दरातच बांबू देत आहोत मात्र आपण त्यांच्याकडून अंडरटेकिंग घेतलेले आहे की, जी काही किंमत ठरेल त्यानुसार ॲग्रीमेंट रद्द केल्यापासूनच्या गॅपमधील फरक भरून देण्यास ते तयार आहेत. तेव्हा कोणताच व्यवहार तेथे थांबलेला नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, आता मंत्री महोदय म्हणतात की, जुलै 2006 ची तक्रार आहे. परंतु यापूर्वीच्याही अनेक तक्रारी याबाबत करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय ? तसेच आपल्याकडील सगळा बांबू घेणारी ही कंपनी असल्याने त्यांना आपण सबसिडीतून बांबू देत आहात. परंतु आपल्याकडील बांबू खरेदीसाठी अनेकांचे अर्ज पेंडींग आहेत हे खरे आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, जे आपल्याकडे बांबू विकत मागतात त्यांना आपण बांबू विकत देतो आणि हे बांबू आपण कापून त्यांना देत नाही तर त्याचे सारे निष्कासन त्यांनी स्वत:च करून घ्यावयाचे असते. तशा प्रकारचे ॲग्रीमेंट आहे. म्हणजे जंगलात जाऊन त्यांनी बांबू कापून घेऊन जायचा असा वेगळ्याप्रकारचा संकेत यामध्ये आहे. आपण त्यांना बांबू काढून देत नाही, त्यांना तो काढून न्यावा लागतो. केवळ आपण त्यांनी काढून घेतलेल्या बांबूची मोजदाद करतो आणि त्याप्रमाणे पैसे घेतो.

***

...... के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कोंडिवडे, कशाळ, भोमरे (ता.वडगाव मावळ जि.पुणे) येथील शेतक-याची जमीन खरेदी प्रकरणात फसवणूक केल्याबाबत

**(9) * 37435 श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर चव्हाण** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोंडिवडे, कशाळ, भोयरे ( ता.वडगांव मावळ जि.पुणे ) येथील शेतकऱ्यांची फसवणूक करुन जमिनी खरेदी प्रकरणात वडगांव परिसरातील काही शिक्षण संस्थांचे प्रमुख विशेषत: प्राध्यापक, प्राचार्य यांचा समावेश असून, त्यांच्या विरुध्द वडगांव न्यायालयात दिवाणी दावे दाखल करण्यात आल्याची बाब नोव्हेंबर, 2007 च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) सदर बाब दिवाणी न्यालयाचे अखत्यारीतील आहे.
(2) प्रस्तुत प्रकरणातील बाधीत शेतकरी दिवाणी न्यायालयात दाद मागणार असल्याकारणाने पोलीस स्टेशन वडगांव, यांनी सदरचा अर्ज निकाली काढला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी या ठिकाणी असा प्रश्न विचारला होता की, कोंडीवडे, कशाळ, भोयरे (ता.वडगाव-मावळ, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांची फसवणूक करून जमिनी खरेदी प्रकरणात वडगाव परिसरातील काही शिक्षण संस्थांचे प्रमुख विशेषत: प्राध्यापक, प्राचार्य यांचा समावेश असून त्यांच्या विरूद्ध वडगाव न्यायालयात दिवाणी दावे दाखल केल्याचे उघडकीस आले हे खरे आहे काय ? तर त्यावर आपण उत्तर दिले आहे की, सदर बाब दिवाणी न्यायालयाच्या अखत्यारीतील आहे. मात्र दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना आपण म्हटले आहे की, बाधित शेतकरी दिवाणी न्यायालयात दाद मागणार असल्याकारणाने पोलीस स्टेशन वडगाव, यांनी सदरचा अर्ज निकाली काढला आहे. तर माझा प्रश्न असा आहे की, असा कोणता नियम आहे की, पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिल्यानंतर संबंधित तक्रारदार न्यायालयात दाद मागणार असतील तर त्यांचा अर्ज निकाली काढायचा, त्याबाबत चौकशी करायची नाही ? तसेच संबंधित तक्रारदार शेतकरी न्यायालयात दाद मागणार आहेत हे आपल्याला कसे कळले ? तेव्हा त्यांची तक्रार काढून घेण्याचे कारण काय ?

...... के 3 ...

ता.प्र.क्र. **37435** ....

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या ठिकाणी श्री.राजाराम ढगे आणि श्री.पांडुरंग ढगे यांनी या शिक्षण संस्थेचे प्राचार्य आणि इतर लोकांविरूद्ध तक्रार दिली होती की, शेतजमीन खरेदी करीत असताना खरेदीखत फसवून नेले आणि कुलमुखत्यारपत्र घेऊन खेरदी केली. ही तक्रार त्यांनी 5.9.2007 आणि 24.9.2007 रोजी वडगाव-मावळ पोलीस ठाण्यामध्ये दिलेली होती. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, अशा पद्धतीने दिलेली तक्रार नंतर पोलिसांना काढून टाकता येते का ? मी आपल्याला सांगू इच्छितो की, तक्रारदारांनीच तशा पद्धतीने पोलीस ठाण्यामध्ये जाऊन सांगितले की, ही जी तक्रार आहे त्याबाबत आम्ही दिवाणी न्यायालयात दावा दाखल करणार आहोत. आम्ही त्या ठिकाणी त्यांची पोलीस ठाण्यात स्टेटमेंट घेतली आहेत आणि त्यानंतरच पोलिसांनी ही तक्रार मागे घेऊ देण्याची कारवाई केली आहे.

***

..... के 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दापोली (जि. रत्नागिरी) येथे फ्लेमिंगो पक्षांची व हार्णे परिसरात सीगल पक्षांची मोठया प्रमाणांत शिकारी होत असल्याबाबत**

**(10) * 37491 श्री.राजन तेली, श्री. संजय दत्त, श्री. शरद रणपिसे, श्री. गोविंदराव आदिक, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. सुरेशदादा देशमुख, श्री.सय्यद जामा** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दापोली (जि. रत्नागिरी) येथे प-लोंमिंगो पक्षाच्या शिकारीचे प्रकरण गाजत असतानांच हार्णे परिसरात सीगल पक्षांची मोठया प्रमाणात शिकारी होत असल्याने सीगल पक्षांचे जीवन धोक्यात येवून ते नष्ट होत असल्याचे माहे डिसेंबर, 2007 रोजी वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, सीगल पक्ष्यांची होत असलेली शिकारी रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) हे खरे नाही.
(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, पक्षी मित्रांनी आवाज उठविल्यानंतर या प्रकरणी काही जणांना अटक करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : हे खरे नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हे कोकणातील पक्षी नाहीत, थंडीच्या दिवसात हे पक्षी कोकणामध्ये दिसून आले आहेत. तेव्हा कोकणामध्ये हे पक्षी येण्याजोगे वातावरण निर्मिती झाली तर हे पक्षी आपल्याकडे कायम वास्तव्यास येऊ शकतील, किमान नेहमीच ते आपल्याकडे येऊ लागतील. या दृष्टीने शासनाकडे काही उपाय वा नियोजन आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या पक्षांच्या संदर्भात महाराष्ट्र सरकार आणि वन खाते हे सतर्क आहे. विशेषत: थंडीच्या दिवसात सैबेरियासारख्या देशांतून हे पक्षी स्थलांतरित होऊन आपल्याकडे येतात. अशा या आपल्याकडे येणाऱ्या पाहुण्या पक्षांना संरक्षण द्यावे म्हणून वन खात्याच्या जून-जुलै महिन्यात बैठका होतात आणि त्यात निर्णय घेऊन जेथे जेथे हे पक्षी येतात त्या ठिकाणांची माहिती तेथील गार्डस् आपल्याला देतात आणि आपणही त्यांना संरक्षण मिळावे म्हणून अशा ठिकाणी गार्डस् ठेवतो व ते 24 तास तेथे राहतात. ..

( यानंतर श्री. सरफरे .... एल 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37491...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मे-जून महिन्यात कडक उन्हाळा असल्यामुळे पक्षी याठिकाणी रहात नाहीत ते स्थलांतर करतात.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा या प्रश्नाशी संबंधित प्रश्न नसतांनाही त्यांनी विचारल्यामुळे मी अधिक माहिती दिली आहे. सीगल हा पक्षी कोकणामध्ये स्थिर झाला असून त्याची कोणत्याही प्रकारे हत्या झालेली नाही. त्याबाबत वन विभागाकडून लक्ष ठेवले जात असून या पक्ष्याची जर हत्या झाली तर संबधितांवर कारवाई करु.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्य व केंद्र शासनाने सन २००७-२००८ या गळीत हंगामासाठी साखर कारखान्यांना ऊसाला शासनाने निश्चित केलेले दर

**(११) * ३७५६८ श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दीपक सावंत , डॉ. नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००७-०८ या गळीत हंगामासाठी राज्य व केंद्र शासनाने साखर कारखान्यांना घालणाऱ्या ऊसांच्या प्रती टनाचे दर माहे ऑक्टोबर, २००७ वा त्या सुमारास जाहिर केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाचा प्रति टन ऊस दर काय होता व केंद्र शासनाचा प्रतिटन दर कोणता होता,

(३) असल्यास, राज्य व केंद्र शासनाने जाहिर केलेला प्रतिटन ऊसांचे दर हे कमी आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शेजारील गुजरात राज्यात महाराष्ट्रातील साखर कारखान्यांपेक्षा सरासरी ३०० रुपये जादा दर ऊसाला देतात हे खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात ऊसांचे पिक शेतकरी जास्त घेत असल्याने साखर कारखाने व शेतकरी हतबल झाल्याने त्याचा फायदा साखर कारखाने घेत आहेत हे खरे आहे काय ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) व (२) सन २००७-२००८ या गळीत हंगामासाठी राज्य शासनाने साखर कारखान्यांना गाळपासाठी येणाऱ्या ऊसाचा प्रती टन दर जाहीर केलेला नाही. केंद्र शासनाची अधिसुचना दिनांक १८.१२.२००७ अन्वये हंगाम २००७-२००८ साठी वैधानिक न्युनतम किंमत ९ टक्के साखर उताऱ्यास रु.८११.८० प्रती टन व त्यापुढील १% साखर उताऱ्यास रुपये ९०/- चा हप्ता या प्रमाणे ऊस दर जाहीर केलेला आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाने अधिसुचना दिनांक ६.१२.२००७ अन्वये राज्यातील ११३ सहकारी आणि खाजगी कारखान्यासाठी कारखाने निहाय ऊसाचा किमान वैधानिक दर हंगाम २००७-२००८ साठी जाहीर केलेला आहे.

(३) राज्य शासनाने २००७-२००८ साठी ऊसाचा दर निश्चित केलेला नाही. केंद्र शासनाने जाहीर केलेले ऊसाचे दर कमी आहेत असे म्हणता येणार नाही.

(४) अशी माहिती साखर आयुक्त कार्यालयात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. **३७५६८....**

श्री. जयप्रकाश दांडेगावकर...

(५) नाही, केंद्र शासनाने जाहीर केलेले वैधानिक न्युनतम दराप्रमाणे व ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतुदीप्रमाणे कारखान्यांनी ऊस उत्पादकांना ऊसाचा दर देणे बंधनकारक असल्यामुळे साखर कारखाने या प्रश्नात उपस्थित केलेल्या बाबींचा फायदा घेत आहेत, असे म्हणता येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र सरकारने किमान हमी भाव जाहीर केल्यानंतर ९ टक्के म्हणजे ८११.८० उतारा आला आहे, आणि त्यापुढे १ टक्का उतारा असेल तर ९० रुपये हप्ता जाहीर केला आहे. महाराष्ट्रातील किती कारखान्यांमार्फत या दराप्रमाणे शेतकऱ्यांना दर दिला आहे? आणि यापेक्षा कमी दर देणारे कारखाने किती आहेत? आणि त्यांनी दर कमी देण्याची कारणे काय आहेत?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, दिनांक ६.१२.२००७ च्या केंद्र सरकारच्या अधिसूचनेनुसार राज्यातील ११३ सहकारी व खाजगी कारखान्यांमध्ये कारखानानिहाय वैधानिक किंमत जाहीर झाली आहे. आतापर्यंत जवळ जवळ सर्व कारखान्यांनी ही किंमत दिली आहे. आणि ज्यांची राहिली आहे त्यांना एक्साईजमधून पैसे उपलब्ध करुन देत आहोत. तसेच, वैधानिक न्यूनतम किंमत ऊस उत्पादकांना मिळेल याबाबत शासन काळजी घेत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काही कारखान्यांनी आतापर्यंत ५०० रुपयांच्या वर दर दिलेला नाही. यामध्ये खाजगीरित्या चालविल्या जाणाऱ्या कारखान्यांचा उल्लेख आहे. ५०० किंवा ५५० रुपये यापेक्षा जास्त दर न देणाऱ्या कारखान्याच्या क्षेत्रामध्ये असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक दर देण्याच्या बाबतीत शासनाची भूमिका काय रहाणार आहे? हे खाजगी कारखाने लिजवर चालवावयास घेण्यात आले आहेत असे किती कारखाने आहेत? या संदर्भात शेतकऱ्यांना किमान भाव सुध्दा दिला जात नाही असे कारखाने लिजवर चालवावयास घेण्यात आले आहेत. त्यांच्या बाबतीत शासनाचे काय धोरण आहे?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, किमान वैधानिक किंमत देणे हे खाजगी साखर कारखाने असो किंवा सहकारी साखर कारखाने असो त्यांना बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांना पैसे द्यावयाचे रहातील त्यांना एक्साईजमधून देण्याबाबत सूचना दिल्या आहेत. बँकेने कारखान्यांना पैसे उपलब्ध करुन दिले आहेत. तरीही काही कारखाने राहिले असतील तर त्यांना

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र. **३७५६८....**

श्री. जयप्रकाश दांडेगावकर...

देण्याच्या सूचना दिल्या आहेत. माननीय सदस्यांनी कारखान्यांची यादी सादर करण्यास सांगितले आहे. ती माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नसल्यामुळे मी ती सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माहिती सभागृहाच्या पटलावर कशासाठी ठेवता? माननीय सदस्यांनी ३० दिवस अगोदर अतिशय साधा प्रश्न विचारला असतांना त्याच्याशी संबंधित असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध असणे आवश्यक होते. मुळात महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडून कमी भाव मिळत आहे तर शेजारच्या राज्यामध्ये ३०० रुपये जास्त भाव मिळत आहे. याठिकाणी प्रश्न विचारला असतांना "अशी माहिती साखर आयुक्त कार्यालयात उपलब्ध नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. जर माहिती उपलब्ध नसेल तर ती उपलब्ध करुन घेऊन सभागृहामध्ये सादर करण्याची आवश्यकता आहे. दुसरी गोष्ट अशी की, कमीत कमी किती भाव कोणत्या साखर कारखान्यांनी दिलेला आहे याची माहिती शासनाकडून अपेक्षित आहे, अभिप्रेत आहे. ही सर्व माहिती बाजूला ठेवून याठिकाणी दिलेले उत्तर दिशाभूल करणारे आहे. त्यादृष्टीने वस्तुस्थितीदर्शक माहिती सभागृहापुढे आली पाहिजे. शेजारच्या राज्यामध्ये काय परिस्थिती आहे आणि आपल्या राज्यामध्ये काय परिस्थिती आहे यासंबंधीची माहिती अभिप्रेत असल्यामुळे ती आपण देणार काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, अन्य राज्यातील साखर कारखान्याकडून दिल्या जाणाऱ्या दरासंबंधीची माहिती आता उपलब्ध नाही, ती सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येईल. ऊसाच्या दराचा प्रश्न हा केवळ महाराष्ट्रामध्ये नाही तर देशभरातील कारखान्यांमध्ये साखरेचे दर कोसळल्यामुळे उभा राहिला होता. आता एक्साईज डयुटीचे दोन वर्षाचे पैसे साखर कारखान्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत आणि काही कारखान्यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. एकूण १६५ साखर कारखाने चालू होते त्या सर्व कारखान्यांची आकडेवारी संकलित करणे शक्य झाले नाही. ही सर्व आकडेवारी संकलित करुन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. यामध्ये ऊस उत्पादकांचे पेमेंट करणे हा महत्वाचा भाग आहे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**न्हावा-शेवा पोर्ट ट्रस्ट (उरण) परिसरात फ्लेमिंगो पक्षांची होत असलेली शिकार**

**(12) * 39038 श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , डॉ. नीलम गोऱ्हे** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) न्हावा-शेवा पोर्ट ट्रस्ट (उरण) परिसरात दिनांक 9 डिसेंबर, 2007 रोजी वा त्यासुमारास दिवसाढवळ्या चार फ्लेमिंगो पक्षांची बंदूकीने शिकार करण्यात आली हे खरे आहे काय,
(2) असल्यास, संबंधित शिकारी तसेच उक्त घटनेचे, प्रत्यक्ष शिकारीच्यावेळी त्या परिसरात उपस्थित असलेल्या दोन पक्षी प्रेमींनी चित्रीकरण केले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, उक्त पक्षाची शिकार करणारे शिकारी तसेच शिकारीसाठी वापरलेल्या बंदूकीचा मालक आणि उक्त पक्षाच्या मासाचा मेजवानीसाठी वापर करणाऱ्या सर्व संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) व (2) हे खरे आहे.
(3) व (4) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून तीन आरोपींना विरुद्ध वन्यप्राणी संरक्षण अधिनियम 1972 अंतर्गत गुन्हा नोंदवून आरोपींना अटक करुन न्यायालयात हजर करुन न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

श्री.अनिल परब : सभापती महोदय, याठिकाणी प्रत्यक्ष शिकारीच्या वेळी त्या परिसरात उपस्थित असलेल्या दोन पक्षी प्रेमींनी चित्रीकरण केलेले आहे. शिकारीच्या वेळी ज्यांनी बंदुकीचा वापर केलेला आहे, त्यांच्याकडे ती वापरण्याचा परवाना होता काय, तसेच जर संबंधितांकडे बंदुकीचा परवाना नसेल तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे काय, आजही त्या परिसरामध्ये पक्षांची शिकार केली जाते, त्यावर शासन बंधन आणणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर त्यासंबंधात पक्षी प्रेमीं श्री.सुधीर आठवले व श्री.निखील भोपळे यांनी माहिती दिली होती. त्यांच्या माहितीच्या आधारावर संबंधितांना पकडले असून ते सध्या जेलमध्ये आहेत. तसेच यासाठी जे वाहन वापरण्यात आले होते, ते देखील जप्त केले होते. परंतु कोर्टाच्या आदेशानुसार सोडण्यात आले. पण त्यांच्याकडील बंदूक जप्त केली आहे. तसेच तीन जणांकडे बंदूक वापरण्याचे लायसन्स नव्हते. यासंदर्भात चौकशी सुरु असून त्यानंतर कारवाई केली जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----

. . . .एम-2





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला एक औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मुद्दा मांडण्याची संधी देईन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे आणि तो विधीमंडळाच्या संबंधातील आहे. म्हणून आपण मला हा मुद्दा मांडण्यास परवानगी द्यावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी त्यांना विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मुद्दा मांडण्यासाठी परवानगी देतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी विशेष उल्लेखाच्या वेळी मुद्दा मांडू काय ?

**सभापती** : होय. मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून चार-पाच सन्माननीय सदस्यांना मुद्दे मांडण्याची संधी देतो. त्यावेळी सन्माननीय सदस्यानांही दिली जाईल.

-----

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर मांडणे

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे सन 2005-2006 या वर्षाचे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचे दिनांक 31 मे 2005 ते 31 मार्च 2006 चे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----

. . . .एम-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी./मु.शी.: इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती उषा दराडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सांगली,मिरज आणि कुपवाड, नांदेड-वाघाळा आणि अकोला या तीन महानगरपालिकांच्या सेवेतील इतर मागासवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच महानगरपालिकांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना" इत्यादी बाबत इतर मागासवर्ग कल्याण समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती महोदय, सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्च 35 टक्केपेक्षा जास्त असल्याने तेथील नोकर भरती बंद आहे. तथापि, माननीय मुख्यमंत्री महोदयांची परवानगी घेऊन इतर मागासवर्गीयांच्या रिक्त पदांचा अनुशेष लवकरात लवकर भरण्यात यावा.

तसेच नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने बिंदू नामावली नोंदवहया अद्ययावत केलेल्या नाहीत. मोठया प्रमाणावर अनुशेष ठेऊन बिंदू नामावलीही अद्ययावत न ठेवणे ही अतिशय गंभीर बाब आहे. नांदेड-वाघाळा महानगरपालिकेची बिंदू नामावली अद्ययावत करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.

अकोला महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांची जातपडताळणी विनाविलंब लवकरात लवकर करुन घेण्यात यावी.

राज्यातील सर्व महानगरपालिकांसदर्भात एकच सेवा प्रवेश नियमावली तयार करण्याची शासनाची सुरु असलेली प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी व ती लागू करण्यात यावी.

राज्यातील सर्व महानगरपालिकांत विशेष मागासवर्ग कक्षांची स्थापना लवकरात लवकर करण्यात यावी व त्यांची प्रभावी अंमलबजावणी त्वरीत सुरु करावी.

**सभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी यांनी "राज्यातील 45 हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची गेल्या 8 वर्षापासूनची मागणी मान्य होत नसल्यामुळे त्यांनी आंदोलन करण्याचा दिलेला इशारा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रतापराव सोनवणे, रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी या शाळेत संस्थाचालक व शिक्षकात वाद असल्यामुळे शिक्षकांना दोन महिन्यापासून वेतन न मिळणे, कर्जाचे व विमा हप्ते कपात न झाल्याने शिक्षक शिक्षकेतरांवर कार्यवाही होत असणे, यासंबंधात त्यांनी आमरण उपोषण करण्याचा घेतलेला निर्णय " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, जगदीश गुप्ता यांनी "राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या सूतगिरण्यांच्या विकासाचे प्रकल्प अहवाल शासनाने राष्ट्रीय वस्त्रोद्योग विकास महामंडळाकडे सादर न केल्याने राज्याच्या हिश्याचा असणारा 500 कोटी रुपयांचा निधी वाया जाण्याच्या मार्गावर असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल, नितीन गडकरी यांनी " गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत विडी कामगार वसाहत कसबरा नगर येथील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**सभापती** .......

रहिवाशांना थकबाकी भरण्यासाठी 31 मार्च, 2007 ची मुदतवाढ मिळाल्याचे 26 मार्च, 2008 रोजी माहीत होणे, त्यामुळे या गरीब विडी कामगारांना 3 ते 4 दिवसात थकबाकी भरणे अशक्य असल्याने त्यांना मुदतवाढ मिळण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जी. एल. अैनापुरे यांनी "राज्यातील अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय यांना विविध महामंडळांनी कर्जे दिली असून या लोकांचे उद्योग व्यवसाय चालत नसल्याने त्यांना सदर महामंडळाचे कर्ज परतफेड करणे अशक्य होत असल्याने त्यांचे कर्ज माफ करणे व इतर मागण्यांसाठी त्यांनी केलेले आमरण उपोषण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी " दहशतवादी कारवायांपासून रेल्वे यंत्रणेला असलेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर रेल्वे पोलिसांकडून प्रवाशांच्या सामानाची तपासणी होत असताना प्रवाशांच्या बॅगेमध्ये माचिस, दारुच्या बाटल्या, लायटर्स इत्यादी वस्तू आढळल्यास पोलीस प्रवाशांकडून पैसे उकळण्याचे धंदे करीत असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख यांनी "वर्धा जिल्हा समाजकल्याण अधिकारी गट-अ (जि.प.) अंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या मूक-बधिर 7 शाळांना सन 19997-98 पासूनचे थकित असलेले परिरक्षण अनुदान (भोजन खर्च) इमारत भाडे, वेतनेतर अनुदान इत्यादी अदा करणे बाकी असल्यामुळे सदर विद्यार्थ्यांना ठरवून दिलेल्या दर्जाचे अन्न दिले जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या स्वास्थ्यावर विपरित परिणाम होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**सभापती** .......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्यातील लोणारी समाज वर्षानुवर्षे भटके व हलाखीचे जीवन जगत असून या लोकांच्या गेल्या 15 वर्षापासून एन.टी. प्रवर्गात सामावून घेण्याच्या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यात अपंगांना शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी 600 च्या वर अनुदानित संस्था असून यात सुमारे 12 हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवेत असणे, या शिक्षकांच्या विविध मागण्या शासनाकडे प्रलंबित असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक 31 मार्च, 2008 पासून मुंबई येथे धरणे, मोर्चे, आमरण उपोषण व अन्न सत्याग्रह करण्याचा संघटनेने घेतलेला निर्णय " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ स्थापन करण्याच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी न होणे

**मु. शी.** : कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ स्थापन करण्याच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी न होणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, नितीन गडकरी, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, गुरुमुख जागवानी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री रामनाथ मोते, नितीन गडकरी, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, गुरुमुख जागवानी यांनी " कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ स्थापन करण्याच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर या सभागृहात चर्चा झालेली आहे आणि शासनाच्या वतीने आम्हाला काही आश्वासने देण्यात आलेली आहेत परंतु त्यांची पूर्तता झालेली नाही म्हणून मुद्दाम या सूचनेच्या माध्यमातून शासनाचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणच्या मुंबई बोर्डाच्या कामकाजाचा बोजा कमी होण्यासाठी ठाणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र उपसंचालकांचे कार्यालय होण्याच्या संदर्भात आपण निर्देश दिले होते. जर शासनाची मानसिकता असेल तर आर्थिक बाबीचा विचार न करता तातडीने हा निर्णय व्हावयास पाहिजे. तो निर्णय झालेला नाही. अन्य काही निर्णय झालेले आहेत परंतु त्यांची अंमलबजावणी झालेली नाही. ठाणे आणि रायगड जिल्ह्यासाठी स्वतंत्रपणे शिक्षण उपसंचालकाचे कार्यालय करण्याचा शासन तातडीने निर्णय घेणार काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, तपासून निश्चितच योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ स्थापन करण्याची बाब अद्याप शासनाच्या विचाराधीन असून, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून याकरिता आवश्यक असणारी जमीन उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. यासंदर्भात आपण आदेश दिले होते, 2006 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी रत्नागिरी येथे मंत्रिमंडळाच्या बैठकीत सुध्दा कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्ष मंडळ स्थापन करण्यासाठी निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे. त्याला आता अडीच वर्षे झालेली आहेत. अद्यापही या मंडळासाठी जागा मिळत नाही. हे बलाढय शासन आहे. सभापती महोदय, आपण आश्वासन दिले आहे, माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे, तरीही शासनाला जागा मिळत नाही. शासन अर्जन्सी क्लॉज लावून जागा ताब्यात का घेत नाही ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळीही चर्चा झ ाालेली आहे. कुँआरबाव या गावची 3 एकर जागा उपलब्ध आहे ती तातडीने घेतली जाईल. पण ती जागा घेऊन त्यावर इमारत बांधण्यासाठी वेळ लागेल. म्हणून हे परीक्षा मंडळ सुरु करण्यासाठी एक जागा भाडयाने घेऊन हे मंडळ सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरु आहेत.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, पुढील शैक्षणिक वर्षाच्या इयत्ता 10 वी व 12 वीच्या परीक्षा रत्नागिरीच्या नवीन परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येतील काय ?

प्रा.वसंत पुरके : त्या दिशेनेच शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. जागा घेऊन त्यावर इमारत बांधण्यासाठी खूप वेळ लागेल म्हणून जागा भाडयाने घेण्याचा सरकारचा मानस आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यापूर्वी या विषयावर प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली होती. त्यावेळी सुध्दा कुँआरबाव येथील जागा घेऊन त्या जागेवर नवीन परीक्ष मंडळाच्या इमारतीचे बांधकाम करावे लागेल असे उत्तर दिले होते. त्यावेळी असेही सांगितले होते की, तत्पूर्वी श्री.रमेश शहा नावाच्या गृहस्थाची जागा ताब्यात घेत आहोत. हे उत्तर देऊन आता 8 दिवस झालेले आहेत. ही जागा शासनाने ताब्यात घेतली आहे काय, असेल तर पुढील शैक्षणिक वर्षापासून रत्नागिरी परीक्षा मंडळाच्या अंतर्गत परीक्षा होतील काय ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : मी मघाशी सुध्दा हेच उत्तर दिले आहे. जागा ताब्यात घेणार आहे. त्यापूर्वी भाडयाने जागा घेऊन परीक्षा घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ.दीपक सावंत : मंत्रिमहोदय संदिग्ध उत्तर देत आहेत. जागा भाडयाने घेऊन त्या जागेत शैक्षणिक वर्षाच्या मार्चपासून नवीन परीक्षा मंडळामार्फत परीक्षा घेतल्या जातील काय ?

प्रा.वसंत पुरके : जागा भाडयाने घेऊन पुढील शैक्षणिक वर्षाच्या मार्चपासून परीक्षा घेण्यात येतील. सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, माननीय सदस्यांकडून एकच विषय 2-3 संसदीय आयुधांचा वापर करुन सभागृहात उपस्थित केला जातो.

**सभापती** : मंत्रिमहोदयांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु ते टाळण्याचा मी प्रयत्न करीत असतो.

-------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : डी.एड्.चा अभ्यास पूर्ण केल्यानंतर सहा महिन्यांची इंटरशिप करण्याची केलेली सक्ती

**मु. शी.** : डी.एड्.चा अभ्यास पूर्ण केल्यानंतर सहा महिन्यांची इंटरशिप करण्याची केलेली सक्ती याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

------

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : राज्यातील नगरपालिका प्रमाणेच महानगरपालिका क्षेत्रातील जकात रद्द करण्याची व्यापा-यांनी केलेली मागणी

**मु. शी.** : राज्यातील नगरपालिका प्रमाणेच महानगरपालिका क्षेत्रातील जकात रद्द करण्याची व्यापा-यांनी केलेली मागणी याबाबत प्रा.शरद पाटील, श्री.जयंत प्र.पाटील, वि.प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील यांनी "राज्यातील नगरपालिका प्रमाणेच महानगरपालिका क्षेत्रातील जकात रद्द करण्याची व्यापा-यांनी केलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, 'जकातीऐवजी प्रवेश उपकर लागू करण्याचा निर्णय माननीय वित्तमंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन 2008-09 मध्ये दि.19.3.2008 रोजी घोषित केला आहे.' हे अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ज्याअर्थी माननीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात घोषणा केलेली आहे. त्यादृष्टीकोनातून निश्चित प्रकारे प्रयत्न सुरु आहेत.

श्री.किशनचंद तनवाणी : सभापती महोदय, संभाजीनगर, अकोला, कल्याण, अहमदनगर येथे खाजगीकरणाच्या माध्यमातून जकातीचे टेंडर दिलेले आहे. त्या टेंडरची मुदत दिनांक 31 मार्च रोजी संपत आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी घोषणा केल्याप्रमाणे नवीन वर्षापासून म्हणजे केव्हापासून सुरु होईल ? त्यांना एक्सटेंशन दिले जाणार आहे काय ? या नगरपालिकांना नवीन टेंडर काढण्यास परवानगी दिली जाईल की सध्याच्या कंत्राटदाराला मुदतवाढ दिली जाणार आहे ?

श्री.राजेश टोपे : खाजगी कंत्राटदाराची ज्या तारखेला मुदत संपत आहे त्यानंतर त्यांना मुदतवाढ देता येणार नाही. ज्यांना एक महिन्याचे एक्टेंशन दिले असेल तोपर्यंत त्यांची मुदत राहील. आता जकातीऐवजी दिनांक 1.7.2008 प्रवेश कर लागू करण्यात येणार आहे. जेथे खाजगीकरणाच्या माध्यमातून जकातीच्या टेंडरची मुदत संपत असेल तेथे दि.1.1.2009 किंवा 1.4.2009 पासून लागू करण्याचे नियोजन केलेले आहे. जेथे जकातीचे खाजगीकरण झालेले नाही त्यासाठी शासनाने नवीन व्यवस्थेची तयारी केलेली आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे ...)

एप्रिल पासून सप्टेंबर पर्यन्त हे जे नवीन उपकर लागू करीत आहोत त्यासाठी त्या त्या शहरामध्ये आपल्याला व्यापा-यांच्या याद्या तयार कराव्या लागतील, कर्मचा-यांना प्रशिक्षण द्यावे लागेल. त्यामुळे ही कार्यवाही होण्यासाठी तीन-चार महिने लागतील आणि त्यानंतर पुढील कार्यवाही पूर्ण करु.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : गडचिरोली जिल्हयातील भगवानपूर नवीन सिंचाई तलावाच्या प्रशासकीय मान्यतेमध्ये एन.पी. व्ही. रकमेचा समावेश नसणे

**मु. शी**. : गडचिरोली जिल्हयातील भगवानपूर नवीन सिंचाई तलावाच्या प्रशासकीय मान्यतेमध्ये एन.पी. व्ही रकमेचा समावेश नसणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरुग फुंडकर, केशवराव मानकर, पाशा पटेल व जगदीश गुप्ता वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आताच मला सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा फोन आला. ते ट्राफिकमध्ये अडकलेले असल्यामुळे सभागृहामध्ये येण्यास थोडा विलंब होत आहे. तेव्हा त्यांची 93च्या सूचनेवरील निवेदने नंतर घ्यावीत अशी त्यांनी मला आपणास विनंती करण्यात सांगितले आहे.

**सभापती** : ठीक आहे. 15-20 मिनिटामध्ये ते आले तर त्यांनी दिलेल्या सूचनांवरील निवेदने घेण्यात येतील.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : बोरीवली, घोडबंदर रोड, नाहूर, मुलुंड परिसरातील जमीन खाजगी वन जमीन म्हणून घोषित करणे

**मु. शी**. : बोरीवली, घोडबंदर रोड, नाहूर, मुलुंड परिसरातील जमीन खाजगी वन जमीन म्हणून घोषित करणे याबाबत सर्वश्री. विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. बबनराव पाचपुते ( वनमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "बोरीवली, घोडबंदर रोड, नाहूर, मुलुंड परिसरातील जमीन खाजगी वन जमीन म्हणून घोषित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : ह्या वनजमिनी जाहीर केल्यामुळे मुंबई शहरातील दीड लाख लोकांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. 1956 सालामध्ये याबाबतीत निर्णय झाला होता. तर मग 2005-06मध्ये शासनाला जाग न येण्याचे कारण काय ? या इमारती महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांची परवानगी घेऊन बांधलेल्या आहेत. असे असताना या लोकांना शासन संरक्षण देणार की त्यांना देशोधडीला लावणार ?

श्री. बबनराव पाचपुते : हा विषय गंभीर आहे याची शासनाला जाणीव आहे. यामध्ये मार्ग काढण्यासाठी कॅबिनेटचा ठराव घेतलेला आहे. 1950 ते 1965 मध्ये खाजगी जमिनीबाबत भारतीय वन अधिनियम 1927च्या कलम 35(3) नुसार नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 12.12.1996 च्या आदेशान्वये कोणत्याही वनक्षेत्रावर केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय वनेत्तर कार्यवाही करण्यास मनाई केली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने दि.1.2.2000च्या आदेशान्वये स्पष्ट केले आहे की, खाजगी वनक्षेत्रासाठी फक्त 35(3) ची नोटीस निर्गमित होणे पुरुसे आहे. ती नोटीस संबंधितांवर बाजवणे, चौकशी करणे अथवा 35(1)ची अधिसूचना प्रसिध्द करणे या बाबींची गरज नाही. मध्यंतरी या जमिनींच्या 7/12वर नोंदी व्हायला पाहिजे होत्या. ह्या जमिनी 1978साली खाजगी वन कायद्याच्या कक्षेत आल्या. त्यामुळे बाधित झालेल्या ब-याच व्यक्ती भूमिहीन झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या कायद्यासमध्ये 1978मध्ये सुधारणा करण्यात आली आणि 22(अ) कलम अस्तित्वात आले. कलम 22(अ) (1) अन्वये 12 हेक्टर पर्यन्तचे क्षेत्र संबंधित खातेदारास परत करता येते. त्याप्रमाणे 12 हेक्टर पर्यंतचे क्षेत्र खातेदारास परत केले असले तरी ते भारतीय वन अधिनियमाप्रमाणे खाजगी वनक्षेत्र ठरते. या संबंधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्यानंतर नोटीसा लागलेल्या सर्व जमिनी परत कराव्यात अशा प्रकारे निर्णय दिला. त्यानंतर मुख्य सचिवांनी एक बैठक बोलावली. त्यावेळी असे लक्षात आले की, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महसुली अभिलेखाता खाजगी वने अशा प्रकारच्या नोंदी दिनांक 31.5.2006 पावेतो घेण्यात आल्या आहेत. खाजगी वनजमीन वनेतर करण्यासाठी कायद्याप्रमाणे केन्द्र सरकारची परवानगी घ्यावी लागते आणि त्यासाठी काही रक्कमही भरावी लागते. या कायद्याप्रमाणे 12 हेक्टर पर्यन्त जमिनी खातेदारांना परत केल्या पाहिजेत अशा

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.बबनराव पाचपुते...)

प्रकारचा ठराव राज्य सरकारच्या कॅबिनेटमध्ये करण्यात आला. त्यावेळी त्या जमिनीवरील कामे थांबविण्याचा निर्णय झाला. कामे थांबविण्यात आल्यानंतर बिल्डर्स उच्च न्यायालयात गेले. उच्च न्यायालयाने कामे थांबविण्याला स्थगिती दिली. त्या विरुध्द वनखाते सर्वोच्च न्यायालयात गेले आणि कायद्याचे उल्लंघन झाल्याचे सांगितले. त्यानंतर याबाबतीत उच्च न्यायालयाने निर्णय घ्यावा असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. त्यानंतर याबाबतीत निर्णय झालेला आहे.

...नंतर श्री. गिते....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

सदर निर्णय वन खात्याच्या बाजुने लागलेला आहे. यासंदर्भात नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्याची छाननी झाली किंवा झाली नाही, त्या लोकांना पोहोचले किंवा न पोहोचले, डीम टू फॉरेस्ट अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे. सन्माननीय सभापती महोदय, यासंदर्भात कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे त्याची प्रत आमच्यापर्यंत अद्याप आलेली नाही. या ठिकाणी विकासकांनी इमारती बांधल्या आणि त्या लोकांना विकून ते निघून गेले आहेत. या परिसरातील इमारतीमधील सदनिका मध्यमवर्गीय लोकांनी विकत घेतलेल्या आहेत. त्यांना हा विषय मोठा अडचणीचा झालेला आहे व ही बाब वन खात्यास 2006 मध्ये निदर्शनास आली आहे. त्यामुळे याबाबतीत केंद्र सरकारकडे ठराव करुन पाठविलेले आहेत. सुप्रीम कोर्टात वन विभागाने प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्या प्रतिज्ञापत्राच्या अनुषंगाने अजून निर्णय झालेला नाही. यासंदर्भात हायकोर्टाचा निर्णय घेऊन तेथील लोकांना कसल्याही परिस्थितीत उठविले जाणार नाही, तसेच त्या लोकांना तेथून जावे लागणार नाही यासंदर्भात काय करता येईल यासंबंधीच्या काही योजना आणि काही प्रस्ताव दाखल केलेले आहेत. या परिसरातील इमारतींमध्ये विकत घेतलेल्या सदनिकाधारकांना कशा प्रकारे सूट देता येईल, त्यांच्याकडून वन कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर त्यांच्याकडून काय घ्यावे, काय घेऊ नये यासंदर्भात सुस्पष्ट असा ठराव वन विभागाने केलेला असून तो ठराव प्रतिज्ञापत्राच्या रुपाने सुप्रीम कोर्टात तो दाखल केला आहे. या प्रतिज्ञापत्रावर अजून निर्णय झालेला नाही. तो निर्णय झाल्यानंतर तसेच या केसचा कोर्टाचा निकाल प्रत्यक्षात प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी आपणास पुढे जावे लागेल. या परिसरात राहणा-या लोकांमध्ये खूप घबराट निर्माण झालेली आहे. काल सुध्दा हायकोर्टामध्ये अशा प्रकारचे एक रिट होते, ते रिट सुध्दा हायकोर्टाने फेटाळलेले आहे आणि तीन महिन्यांची मुदत दिलेली आहे. यासंदर्भात वन विभागाकडून अतिशय व्यवस्थितपणे निर्णय घेतला जाईल. या ठिकाणच्या रहिवाश्यांना विस्तापित व्हावे लागू नये म्हणून काही पैसे घ्यावे लागतील. वनासाठी काही पैसे घ्यावे लागतील. वन कायद्याच्या भंग झाला असल्यामुळे काही दंड वन विभागास आकारावा लागेल. या सगळया गोष्टीस तोंड देण्याची महाराष्ट्र सरकारची तयारी आहे. या सर्व प्रकरणाची राज्य शासनाला पूर्णपणे कल्पना आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : या ठिकाणी माननीय वन मंत्र्यांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. परंतु त्यांच्या उत्तराचा सारांश मला समजला नाही. माननीय वन मंत्र्यांनी नेमके काय उत्तर दिले आहे ते मला कृपया जाणून घ्यावयाचे आहे. 1975 साली वन कायदा झाला. वन विभागास वन सदृश्य जमीन दिसली अथवा मोठी जागा दिसली, वन दिसले तर त्या ठिकाणी 1975 चा कायदा लावला जातो. 1975 च्या कायद्यान्वये एकंदर 62,500 हेक्टर जमीन वन विभागाने आपल्या ताब्यात घेतली. त्यापैकी 42,500 हेक्टर जमीन सिंधुदुर्ग जिल्हयातील आहे. वन विभागास नंतर आढळून आले की, 42,500 हेक्टर जमीन चुकीने ताब्यात घेतली आहे. वन विभाग जास्तीत जास्त 8 हजार हेक्टर जमीन ताब्यात घेऊ शकत होते. बाकीची सर्व जमीन वन विभागाने चुकीने आपल्या ताब्यात घेतलेली आहे. आम्हाला सभागृहात सांगितले गेले आहे की, ही जमीन वन विभागाने चुकीने ताब्यात घेतलेली आहे. याबाबतीत वन विभाग हायकोर्टात जाईल, सुप्रीम कोर्टात जाईल आणि हा प्रश्न सोडविला जाईल. या सदनात माननीय मंत्री महोदयांनी हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाची भाषा जरुर करावी. परंतु सभागृहातील सदस्यांचे तोंड कोणी बंद करु शकत नाही. यासंदर्भात हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाचे निवाडे झाले असले तरी आम्हाला या सभागृहात आमचे मत मांडण्याचा पूर्णपणे अधिकार आहे. मुंबईत वन जमिनीवर इमारती बांधल्या गेल्याची बाब वन विभागास आता समजली. या जमिनीवर इमारती बांधण्यासाठी महानगरपालिकेच्या इमारत विभागाने परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी सर्व प्रकारच्या नागरी सुविधा तेथील रहिवाश्यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या परिसरात ज्या लोकांनी सदनिका विकत घेतल्या आहेत त्या लोकांचा काहीही दोष नाही. त्या लोकांवर एक प्रकारे अन्याय होणार आहे. म्हणून मुंबई,ठाणे या ठिकाणी अशा प्रकरणासंदर्भात निवाडे झाले असतील, त्या निवाडयांवर मात करुन हा प्रश्न वन विभागाने सोडविला पाहिजे. या परिसरात ज्या लोकांनी सदनिका विकत घेतलेल्या आहेत, त्या लोकांच्या सुरक्षिततेची आणि त्यांना न्याय देण्याची भूमिका शासनाकडून घेतली जाईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी कोकणातील सिंधुदूर्ग जिल्हयातील वन जमिनीचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. खाजगी वन आणि वन संज्ञा हा वेगळा विषय आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील वन जमिनीच्या बाबतीत कमिटी नेमली आहे. कमिटीच्या निर्णयाप्रमाणे 62,500 चे क्षेत्र ठरविण्यात आले होते, ते

3...



ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

क्षेत्र फक्त 1800 एकरांपर्यंत आलेले आहे. कॉन्झर्वेशन ॲक्ट हा केंद्र सरकारचा आहे. केंद्र सरकारचे ॲक्ट राज्य सरकारला पाळावे लागतात. चाललेले काम व्यवस्थित होते आहे किंवा नाही सुप्रीम कोर्टाच्या वतीने सी.ई.पी.काम करीत असते. आता जो प्रश्न निर्माण झाला आह, तो कलम 35 उप कलम 3 प्रमाणे निर्माण झाला आहे. ज्या जमिनी वनसदृश्य म्हणून जाहीर झालेल्या आहेत. तसेच या जमिनी खाजगी वन म्हणून जाहीर झाल्या आहेत. यासंदर्भात ज्या नोटीसा दिल्या जातात, त्याची चौकशी झाली पाहिजे, या जमिनी वन विभागाच्या आहेत किंवा नाहीत हे रेकॉर्डवर आले पाहिजे. 7/12 च्या उता-यात त्या जमिनींसबंधीची नोंद असली पाहिजे, असे काहीही बंधन आता हायकोर्टाने घातलेले नाही.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.गिते 13:25

श्री. बबनराव पाचपुते ...

सभापती महोदय, एकदा नोटीस दिल्यानंतर कारवाई सुरु होते. खाजगी वन जमिनीमध्ये वनेतर कामे करता येत नाहीत. ती करावयाची असतील तर त्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून केंद्राची परवानगी घ्यावी लागते. नंतरच कामे करता येतात. त्यासाठी अटी आहेत. त्या अटींमध्ये राज्य शासन सवलत मागत आहे. ती सवलत मिळाल्यानंतर हा प्रश्न निकाली निघेल. तोपर्यंत अडचणीचे आहे.

-----

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मेंढी चराईसाठी क्षेत्र उपलब्ध करणे.

**मु. शी.** : 'मेंढी चराईसाठी क्षेत्र उपलब्ध करुन देणे' याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "मेंढी चराईसाठी क्षेत्र उपलब्ध करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ SBT/ KTG/ 13:25

निवेदनानंतर

श्री. प्रकाश शेंडगे : गेल्या 40 वर्षापासून हा अतिशय महत्वाचा आणि गंभीर स्वरुपाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मेंढपाळांना चराऊ कुरणे उपलब्ध करुन द्यावीत म्हणून गेल्या अधिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे 48 पैकी 19 वनक्षेत्रांमध्ये चराईवनक्षेत्राची उपलब्धता करुन देण्यात आली. मागील अधिवेशनात याबाबत विनंती करण्यात आली होती की उर्वरित 29 वनविभागांमध्ये क वर्ग वनक्षेत्र उपलब्ध असताना सुध्दा त्यामध्ये चराऊ कुरण न देण्याची कारणे काय ? या 29 वनक्षेत्रांमध्ये क वर्ग जंगल उपलब्ध आहे. त्यासाठी चराऊ कुरण उपलब्ध करुन दिले जाईल काय ? माजी आमदार श्री. नाना कोकरे यांनी शासनाने जो जीआर काढला होता त्याला स्थगिती घेतलेली आहे. 15 सप्टेंबर ते 15 मे याकाळात राखीव चराऊ कुरण खुले करावे अशी मागणी केलेली आहे. निर्णयास स्थगिती देण्याचे कारण काय ?स्थगितीनंतर अहवाल मागितला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करुन स्थगिती उठविण्याबाबत कार्यवाही केली जाईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, चराऊ कुरण ठरविण्यासाठी समिती नेमली आहे. त्यामध्ये कोणते क्षेत्र कोणत्या जनावरांसाठी चराऊ कुरण ठरवावे याचा निर्णय होणार आहे. मेंढपाळांना कोणते क्षेत्र चराऊ कुरण म्हणून द्यावयाचे आणि केव्हा खुले करावयाचे व केव्हा बंद करावयाचे यासाठी नियम आहेत. पाऊस पडल्यानंतर जनावरे गवत खाऊन टाकतात आणि नंतर गवत वाढत नाही. म्हणून मे-सप्टेंबर हा कालावधी चराऊ कुरणांसाठीराखीव म्हणून ठेवलेला आहे.स्थगिती उठविण्याबाबतचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे दाखल केलेला आहे. त्यावर ताबडतोबीने कार्यवाही होईल अशी अपेक्षा आहे. त्यानुसार चराऊ कुरणाचे क्षेत्र खुले केले जाईल.

------

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

27-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R-4

SSK/ SBT/ KTG/ 13:25

**पृ. शी.** : शेगांव-जानोरी रस्त्याचे काम पूर्ण करणे

**मु. शी.** : "शेगांव-जानोरी रस्त्याचे काम पूर्ण करणे" सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, यांनी "शेगांव-जानोरी या रस्त्याचे काम पूर्ण करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

......5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>निवेदनानंतर</u>**

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, निवेदनावरुन दिसून येते की 2006 मध्ये या रस्त्याच्या कामास सुरुवात झालेली आहे. 15 मार्च, 2007 पर्यंत काम पूर्ण करावयाचे होते. कंत्राटदाराची ती शेवटची मुदतवाढ होती. आजची परिस्थिती पाहिली तर अजून 6-7 महिने तरी रस्त्याचे काम पूर्ण होणार नाही. माझा प्रश्न असा आहे की, सदरहू रस्त्याचे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे ? रस्त्याच्या कामासाठी जो विलंब लागला त्याबद्दल ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, रस्त्याचे काम सुरु आहे. डिझायनिंगचे काम चालू आहे. येत्या 6 महिन्यात काम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. कामाला जो विलंब झाला त्यासाठी 15.3.2008 नंतर ठेकेदाराला दंड लावण्यास सुरुवात केलेली आहे.

-------

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 13:30

**नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने पुढे ढकलण्यासंबंधी**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांची नियम 93 च्या सूचनेसंबंधीची निवेदने उद्या चर्चेला घ्यावीत अशी माझी विनंती आहे. या संदर्भात मंत्रीमहोदयांनी देखील अनुमती दर्शविली आहे. आजच्या निवेदनाच्या यादीतील अ.क्र.4, 8, 9, 10, 12, 14 उद्या चर्चेला घेण्यात यावीत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : अनुक्रमांक- 4 वरील निवेदन मी पेंडिंग ठेवले आहे. अनुक्रमांक-8 वरील निवेदन उद्या चर्चेला घेण्यात येईल. अनुक्रमांक 4 व 8 वरील निवेदने उद्या किंवा परवा चर्चेला घेण्यात येईल. अशा प्रकारचा समन्वय दोन्ही बाजूंनी असावा. काही वेळेला मंत्रीमहोदय खालच्या सभागृहाशी संबंधित कामात गुंतल्यामुळे या सभागृहात अडचणीची परिस्थिती निर्माण होते. त्यावेळेला विरोधी पक्षाकडून देखील समन्वयाची भूमिका घेतली जावी.

श्री.मधुकर चव्हाण : अनुक्रमांक-4, 8, 9, 10, 12 व 14 वरील निवेदने उद्या चर्चेला घेण्यात यावीत.

**सभापती** : अनुक्रमांक-4, 8, 9, 10, 12, 14, 15 व 16 वरील निवेदने सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मांडलेल्या नियम 93 च्या सूचनेसंबंधीची असून ती उद्या किंवा परवा चर्चेला घेण्यात येतील.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राष्ट्रीय सुरक्षा दलातील कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन दुरुस्तीबाबत

**मु. शी.** : राष्ट्रीय सुरक्षा दलातील कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन दुरुस्तीबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके(शालेय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "राष्ट्रीय सुरक्षा दलातील कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन दुरुस्ती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, निवृत्ती वेतन निश्चित करीत असताना जे ज्येष्ठ शिक्षक आहेत त्यांनी सातत्याने शासनाकडे निवेदने सादर केली आहेत. दोन वर्षापासून सभागृहाच्या माध्यमातून मी या प्रश्नासंबंधी शासनाला विनंती केलेली आहे. या शिक्षकांची भावना आहे की, केंद्र शासनाने जे निकष लागू केले त्या निकषानुसार त्यांना निवृत्तीवेतन मिळत नाही. या प्रश्नाबाबत हे अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई केली जाईल काय?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या प्रकरणी यापूर्वी देखील सन्माननीय सदस्यांशी चर्चा झ ालेली आहे. डिसेंबर, 2005 मध्ये 350 अधिक 35 अशी एकूण 385 प्रकरण प्रलंबित होती. ही सर्व प्रकरणे निकाली निघाली आहेत. आजमितीस कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. निर्णय होण्यामध्ये केंद्र शासनाकडून विलंब झाला. मध्यंतरीच्या काळात अनेक शिक्षक निवृत्त झाले. ही खेदजनक बाब आहे. परंतु आज कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. प्रकरणे प्रलंबित असतील तर बैठक घेऊन निकाली काढली जातील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही योजना मुळात केंद्र शासनाची योजना आहे. या योजनेतून वेतन व निवृत्ती वेतनाचा 100 टक्के भार केंद्र शासनाकडून स्वीकारला जातो. 1976 मध्ये केंद्र शासनाने सर्व खर्च आम्ही देऊ या अटीवर ही योजना राज्य शासनाकडे हस्तांतरित केली. मंत्रीमहोदयांनी निवेदनामध्ये वेतनश्रेणीबाबत उल्लेख केला आहे. हे सर्व शिक्षक निवृत्त झाले असून वयस्कर आहेत. केंद्र सरकार या कामासाठी 100 टक्के अनुदान देत असताना सेवानिवृत्ती निश्चिती बरेच दिवस पेंडिंग होती. या शिक्षकांचे क्लेम्स केंद्र शासनाकडे पाठविले का? या शिक्षकांना वेतन पुनर्निश्चिती केल्याचे कळविले का? जर कळविले नसेल तर कळविण्यामध्ये नक्की अडचण काय आहे? त्यांना केव्हा कळविले जाईल?

प्रा.वसंत पुरके : पुनर्निश्चितीच्या संदर्भात मला निश्चित कल्पना नाही. परंतु क्लेम्स सेटल करण्याचा प्रयत्न करु.

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांना बोलावून त्यांच्याशी बैठक घ्यावी. याचा भार राज्य शासनावर पडणार नाही. अनेक शिक्षकांचे क्लेम्स अद्याप फिक्स झालेले नाहीत. केंद्र सरकार निधी द्यायला तयार आहे. फक्त बिले पाठविण्याची आवश्यकता आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सदस्यांशी येत्या आठ-दहा दिवसात बैठक घेऊन ज्यांची प्रकरणे प्रलंबित असतील त्यांची वेतन पुनर्निश्चिती करणे, ज्यांची पुनर्निश्चिती झालेली आहे त्यांना कळविणे आणि केंद्र सरकारकडे ती बिले पाठविणे ही कारवाई केली जाईल काय?

प्रा.वसंत पुरके : येत्या आठ दिवसात सन्माननीय सदस्यांशी बैठक घेऊन अधिकाऱ्यांशी चर्चा करुन ही प्रकरणे निकाली काढली जातील.

---------

(नंतर श्री.खर्चे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अर्बन को.ऑप. क्रेडिट सोसायटी, जळगांवच्या उल्हासनगर शाखेत झालेला गैरव्यवहार.

**मु.शी.**: अर्बन को.ऑप. क्रेडिट सोसायटी, जळगांवच्या उल्हासनगर शाखेत झालेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्रीरामनाथ मोते, संजय केळकर, मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी "अर्बन को.ऑप. क्रेडिट सोसायटी, जळगांवच्या उल्हासनगर शाखेत झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : महोदय, सहकार मित्र श्री. चंद्रकांत बढे या अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या संदर्भातील हा प्रश्न असून संपूर्ण राज्यभर या पतपेढीत करोडो रुपयाच्या ठेवी आहेत परंतु त्या परत मिळत नाहीत. मी स्पेसिफिकली उल्हासनगरच्या बाबतीत हा विषय उपस्थित केला आहे. उल्हासनगर मधून या पतपेढीत 3 कोटीच्या ठेवी असून त्या सर्व परिपक्व झालेल्या आहेत. परंतु तेथील संचालक मंडळाने गैरव्यवहार करुन ही सर्व रक्कम परत देण्यास असमर्थता दर्शविली आहे. उत्तरात दिलेले आहे की, 43 लाखाच्या ठेवी परत करण्यात आल्या. परंतु असे घडलेले नाही आणि ठेवीदारांची फसवणूक होत आहे. कारण एक लाखाची ठेव असेल तर पन्नास हजार रुपये दिले जातात आणि सही मात्र एक लाख रुपये मिळाल्याची घेतली जाते, अशा प्रकारे फसवणूक होत आहे. यासंदर्भात तातडीने चौकशी करुन ठेवीदारांच्या ठेवी पूर्णपणे परत मिळतील यासंबंधीची उपाययोजना शासन करणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, एक लाख रुपयाच्या ठेवी असताना 50 हजार रुपये देत असतील तर ही बाब गंभीर आहे आणि यादृष्टीने चौकशी करण्यात येईल. यासंबंधी वेगवेगळया बातम्या वर्तमानपत्रात आल्या असून मोठमोठया ठेवीदारांच्या महाराष्ट्रभर संपूर्ण शाखांमध्ये रांगा लागल्या असल्याने तातडीने त्या सर्वांना पैसे देणे शक्य नाही परंतु या ठेवी परत मिळाव्यात म्हणून विविध उपाययोजना केल्या आहेत. सहकार आयुक्त कार्यालयातील 31 कर्मचाऱ्यांना कलम 156 प्रमाणे वसुलीचे अधिकार दिले आहेत. तसेच या वसुली प्रकरणी लक्ष देऊन वसुलीची कारवाई करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : महोदय, या क्रेडिट सोसायटीच्या संदर्भात वर्तमानपत्रातून वेगवेगळया बातम्या आल्या की, संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला. तसेच चुकीची कर्जे घेतल्याचेही अनेक ठिकाणी निदर्शनास आले. म्हणून ज्यांनी चुकीच्या पध्दतीने कर्जे घेतली त्यांची आणि या संचालकांची प्रॉपर्टी जप्त करुन त्यांच्या प्रॉपर्टीवर टाच आणण्याची कारवाई शासन करणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : यासंबंधीची तपासणी चालू असून चौकशी अंती कारवाई करण्यात येईल.

-----------

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: परिवहन विभागातर्फे देण्यात येणाऱ्या स्मार्ट कार्डसाठी रिडरची सुविधा नसणे

**मु.शी.**: परिवहन विभागातर्फे देण्यात येणाऱ्या स्मार्ट कार्डसाठी रिडरची सुविधा नसणे यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य सरकारच्या परिवहन विभागामार्फत राज्यातील लाखो वाहन चालकांना वाहन चालविण्याचा परवाना व वाहन मालकांना परिवहन खात्याचे नोंदणी पुस्तक अनुक्रमे स्मार्ट कार्ड व ऑप्टिकल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्यात येणे, सदर कार्डामध्ये वाहनाच्या इंजिन, चासी क्रमांक, मालकाचे नाव व पत्ता, वहान कर, विमा आदि सर्व माहिती परिपूर्ण असणे, सदर ऑप्टिकल स्मार्ट कार्ड करीता नोंदणी शुल्का व्यतिरिक्त 350 (तीनशे पन्नास रुपये) जादा शुल्क आकारण्यात येणे, सदर ऑप्टिकल कार्ड देण्याचे काम खाजगी कंपनीला कंत्राट देण्यात येणे, राज्यातील 22 प्रादेशिक परिवहन कार्यालयातील साडे चार लाख वाहन चालकांची स्मार्ट कार्ड द्वारे नोंदणी होणे,
परंतू एवढया मोठया प्रमाणावर कार्ड उपलब्ध झाल्यानंतर ते तपासण्याची यंत्रणाच परिवहन विभागाकडे नसणे, करारा नुसार कार्ड पुरविणाऱ्या कंपनीने कार्ड रिडर पुरविण्याची जबाबदारी असतानाही सदर कंपनीकडे ही कार्ड रिडरची यंत्रणा उपलब्ध नसणे, परिणामी कार्ड धारक व शासनाची झालेली फसवणूक यामुळे कार्डधारकांत पसरलेला प्रचंड असंतोष यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------



PFK/ SBT/ KTG/ 13:35

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकश शेंडगे : महोदय, केंद्रशासनाच्या आदेशानुसार राज्य शासनाच्या परिवहन विभागामार्फत एक आदेश काढला की, संपूर्ण राज्यामध्ये जी वाहने आहेत, त्यांची नोंदणी प्रक्रिया स्मार्ट कार्ड स्वरुपात केली पाहिजे. त्यानुसार बीओटी तत्वावर एका खाजगी कंपनीला हे काम देण्यात आले. त्याप्रमाणे 6,53,535 वाहनांना हे कार्ड देण्यात आले आहे. त्यासाठी केंद्रशासनाने 200 रुपये चार्ज ठेवला आणि राज्यशासनाने त्यात 150 रुपये वाढविले. त्याप्रमाणे चासीस क्रमांक, मालकाचे नाव व पत्ता, वाहन कर, विमा इ. सर्व माहिती त्यात ॲड केली. अशा प्रकारे 350 रुपये प्रत्येक कार्डामागे घेऊन 6.53 लाख वाहन मालकांना कार्ड देण्यात आले. परंतु हे वाचण्यासाठी जी यंत्रणा, जे मशिन आवश्यक आहे ते ही कंपनी देऊ शकली नाही त्यामुळे वाहन मालकांची अडचण झालेली आहे. हे रिडिंग घेण्यासाठी मशिन दिले नसतील तर शासन या कंपनीच्या विरुध्द कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, या ठिकाणी दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न म्हणजे स्मार्ट कार्डच्या संदर्भात हायकार्ट निर्णय घेणार आहे. हायकोर्टाच्या निर्णयामुळे रक्कम आता कमीही करता येणार नाही किंवा वाढविता देखील येणार नाही कारण यासंदर्भात हायकोर्टाने निर्णय द्यावा, असे ठरले आहे. तसेच दुस-या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, रिडींग मशीन बाबत केंद्रशासनाच्या एनआयसी कंपनीने क्लिअरन्स दिलेला असून सॉफट्वेअर सुध्दा त्यांनीच तयार केलेले आहे. रिडींग मशीन मिळण्याच्या संदर्भात दोन वर्षापासून प्रयत्न सुरु असून रिडींग मशीन आता लवकरच उपलब्ध होणार आहेत. सध्या स्मार्ट कार्ड तपासण्यासाठी रीडर यंत्रणा बसवण्याचे काम सुरु आहे. आतापर्यंत राज्यातील 41 पैकी 21 परिवहन कार्यालयात ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. स्मार्ट कार्डच्या संदर्भात केंद्रशासनाने कायदा केलेला असून त्यांनी त्याचा रेट 200 रुपये ठेवला होता परंतु आपण या स्मार्ट कार्ड मध्ये अधिक माहिती टाकल्यामुळे त्याची किंमत 150 रुपयांनी अधिक वाढून ती आता 350 झालेली आहे.

--------------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना नवीन सहवीज प्रकल्प सुरु करता यावेत यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयांच्या लाभापासून 17 कारखान्यांनाच्या वीज प्रकल्पांना वंचित ठेवणे

**मु. शी.** : राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना नवीन सहवीज प्रकल्प सुरु करता यावेत यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयांच्या लाभापासून 17 कारखान्यांनाच्या वीज प्रकल्पांना वंचित ठेवणे यासंबंधी सर्वश्री यशवतंराव गडाख, संजय दत्त, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती उषाताई दराडे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. यशवंतराव गडाख ( अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना नवीन सहवीज प्रकल्प सुरु करता यावेत यासाठी शासनाने 20 फेब्रुवारी 2008 रोजी घेतलेले निर्णय, त्यानुसार नवीन प्रकल्पांसाठी खर्चाच्या 5 % पर्यंत भागभांडवल अनुदान म्हणून पुरवण्याचा शासनाचा सहभाग, साखर विकास निधीतून प्रकल्प खर्चाच्या 30 % पेक्षा कमी रक्कम मिळाल्यास शासनाने करावयाची आणखी 5% मदत, त्यासाठी चालू अंदाजपत्रकात 100 कोटीची तरतूद करण्याचा घेतलेला निर्णय, तथापि प्रचंड आर्थिक अडचणी असतानाही राज्यातील 17 साखर कारखान्यांनी सुरु केलेल्या वीज प्रकल्पांना या निर्णयापासून वंचीत ठेवले जाणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, वास्तविक पाहता त्यांनाही आर्थिक मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका. "

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ...3

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात प्रथम मी स्वागत करतो. गेल्या 3-4 वर्षापासून को-जनरेशनच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये वीज निर्माण होऊ शकते यासंदर्भात अनेक आयुधे वापरुन सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. 1000 ते 1200 मे.वॅ. वीज ही चिपाडापासून तयार होऊ शकते यासंदर्भात शासनाने देखील निर्णय घेतलेला आहे. यासाठी साखर आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली समिती नेमून आर्थिक मदत घेण्यासाठी व भागभांडवल देण्यासाठी शासनाने जो निर्णय घेतला आहे त्यासंदर्भात मी शासनाचे अभिनंदन करतो. सगळे साखर कारखाने अडचणीत असतांना महाराष्ट्रातील 15 ते 20 साखर कारखान्यांनी को-जनरेशनच्या मदतीने वीज निर्माण केलेली आहे. 1 मेगावॅट वीज तयार करण्यासाठी साधारणत: 40 ते 50 कोटी रुपये खर्च येत असतो. साखर कारखाने अडचणीत असतांना या ठिकाणच्या साखर कारखान्यांनी 236 मे.वॅ. वीज तयार करुन ती महाराष्ट्र शासनाला दिलेली आहे. असे असतांना लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात म्हटले आहे की, "कारखान्यांनी त्यांच्या प्रस्थापित वीज निर्मिती क्षमतेत वाढ करण्याचा निर्णय घेतल्यास त्यांना या वाढीव क्षमतेच्या मर्यादेत शासनाच्या धोरणानुसार शासकीय भागभांडवल देण्याबाबत विचार करण्यात येईल." त्यामुळे माझी विनंती आहे की, साखर कारखाने अडचणीत असतांना देखील ज्या साखर कारखान्यांनी धाडसाने वीज निर्माण केली, महाराष्ट्रामध्ये विजेची कमतरता असतांना महाराष्ट्राला वीज दिली, असे साखर कारखाने अडचणीत होते तरी सुध्दा त्यांनी वीज निर्मिती केली त्या कारखान्यांचा समावेश या योजनेमध्ये केला जाणार आहे काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, नवीन 55 कारखान्यांच्या बाबतीत 1000 मे.वॅ. विजेचा प्रस्तावास फेब्रुवारीमध्येच मान्यता देण्यात आलेली आहे. जुन्या कारखान्यांच्या बाबतीत पूर्वी चर्चा झालेली आहे व हा विषय कॅबिनेट समोर सुध्दा गेलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांच्या साखर कारखान्यात सुध्दा वीज तयार केली जाते. महाराष्ट्रातील 21 कारखान्यांमध्ये वीज तयार केली जात आहे. जे कारखाने वीज तयार करतात त्या कारखान्यांचा शासन जरुर पॉझीटीव्ह विचार करेल. या संदर्भात आपल्याला हा विषय कॅबिनेट समोर सुध्दा मांडावा लागणार आहे. जुन्या कारखान्यांच्या बाबतीत जो निर्णय योग्य राहील तोच घेण्यात येईल.

-----------------

...4



SGJ/ SBT/ KTG/ प्रथम श्री. खर्चे..... 13:40

**<u>लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत</u>**

**सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 व 4 च्या संदर्भात संबंधित मंत्रीमहोदयांनी सदर लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याच्या बाबतीत लेखी विनंती केलेली आहे. त्यामुळे सदर लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेण्यात येतील.

----------

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.** :अहमदनगर जिल्हयातील राहाता या शहरात शिवाजी महाराजांचा पुतळा तयार असुन सुध्दा न बसवणे

**मु.शी.** :अहमदनगर जिल्हयातील राहाता या शहरात शिवाजी महाराजांचा पुतळा तयार असून सुध्दा न बसवणे याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

( **सन्माननीय सदस्य अनुपस्थित** )

-----------

**पृ. शी.** : पाईपलाईनमधून तुरटी युक्त पाण्याची गळती

**मु. शी.**: पाईपलाईनमधून तुरटी युक्त पाण्याची गळती याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

( **सन्माननीय सदस्य अनुपस्थित** )

-----------

....5

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : कु.स्वाती,रा.पाटोदा, जि.बीड या विद्यार्थिनीला एम.बी.बी.एस. प्रथम वर्षासाठी शासन कोटयातून प्रवेश मिळाला असतांना शैक्षणिक शुल्क भरण्यास दिलेली नोटीस

**मु. शी.** : कु.स्वाती,रा.पाटोदा, जि.बीड या विद्यार्थिनीला एम.बी.बी.एस. प्रथम वर्षासाठी शासन कोटयातून प्रवेश मिळाला असतांना शैक्षणिक शुल्क भरण्यास दिलेली नोटीस याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य ॲड. उषा दराडे, यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

सभापती महोदय, कुमारी स्वाती चांगदेव राख, रा. पाटोदा, जिल्हा बीड या विद्यार्थीनीने 2005-2006 साली एन.के.पी. साळवे इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स आणि रिसर्च सेंटर, डिगडोल हिल्स, हिगणा रोड, नागपूर येथे एम.बी.बी.एस.च्या प्रथम सत्राकरिता शासकीय कोटयातून प्रवेश घेतला होता.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळ परिपत्रक काढून मागासवर्गीय, भटक्या विमुक्त प्रवर्गातील विद्यार्थ्याचे शिक्षण शुल्क व अन्य शुल्क महाराष्ट्र शासनाने भरावेत अशा वारंवार दिलेल्या सूचना, शासनाच्या या धोरणामुळे वैद्यकीय प्रवेशाच्या वेळी संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण शुल्क व अन्य शुल्क भरण्याची आवश्यकता नाही असे सांगणे, त्याप्रमाणे विद्यार्थीर्नीनी प्रवेश घेणे, संचालक ,वैद्यकीय शिक्षण यांनी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांना दिनांक 25.1.2008 रोजी शासकीय कोटयातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याची शैक्षणिक शुल्क अदा केले नाही ते त्वरित अदा करावे अशी नोटीस कॉलेजमार्फत तिला पाठविण्यात आलेली आहे. तिच्या वडिलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्यामुळे एवढी फी ते भरु शकत नाही. शैक्षणिक फी भरण्याची आवश्यकता नाही असे शासनाने कळविले असल्यामुळे तिने प्रवेश घेतला होता व आता एवढी फी भरण्याची त्यांची ऐपत नाही. अशा प्रकारे अनेक विद्यार्थ्याना नोटीसेस पाठविण्यात आलेल्या आहेत. काल पैसे भरण्याची शेवटची मुदत होती हे पैसे न भरल्यामुळे त्यांना हॉल तिकीट मिळणार नाही.विमुक्त जाती व भटक्या जमातीचे आणि इतर मागासवर्गीय समाजाच्या अनेक विद्यार्थ्यानी अशा प्रकारे कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेला आहे त्यांच्या समस्येकडे शासनाने लक्ष दिलेले नसल्यामुळे त्यांचे शैक्षणिक आयुष्य धोक्यात येण्यार आहे तेव्हा त्याबाबत शासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा व या संदर्भात तातडीने मार्ग काढावा विशेषत: दोन दिवसाच्या आत या संबंधीचा निर्णय घ्यावा म्हणजे या विद्यार्थ्याना हॉल तिकीट मिळेल व परीक्षेला बसता येईल.

----

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यासाठी माध्यन्ह भोजन योजना सुरु करणे

मु.शी :विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यासाठी माध्यन्ह भोजन योजना सुरु करण्याबाबत श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

" राज्यामध्ये सर्व प्रकारच्या शाळेमधून विद्यार्थ्याची गळती थांबविण्यासाठी शासनाने माध्यन्ह भोजन योजना सुरु केलेली असून अगोदर या विद्यार्थ्यांना तांदळाचे वाटप केले जात होते परंतु नंतर त्यात बदल होऊन आता तांदूळ शिजवून दिला जात आहे. भोजनाचा आठवडयाचा मेनू ठरलेला असतो प्रत्येक दिवशी वेगळया प्रकारचा भात शिजवून विद्यार्थ्यांना दिला जात असे,ही योजना इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतच्या सर्व प्रकारच्या अनुदानित शाळेसाठी सुरु आहे व गेल्या महिन्यातच शासनासने इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू केली आहे. परंतु राज्यात समान न्यायाचे तत्व स्वीकारलेले असतांनाही विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळातील विद्यार्थ्यांना ही माध्यन्ह भोजनाची योजना लागू नाही. विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वेगळा न्याय का ? या विषयी शासनाने गंभीरपणे विचार करुन सर्वांना समान न्याय देऊन विना अनुदानित व कायम अनुदानित शाळातील विद्यार्थ्यासाठीही मध्यान्ह भोजन योजना लागू करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे. या ठिकाणी माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदय उपस्थित आहेत तेव्हा त्यांनी या संदर्भात " होय " असे उत्तर द्यावे.

( उत्तर दिले नाही )

---



VTG/ SBT/ KTG/

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : कल्याण डोंबिवली महापालिकेत सेवेत असलेल्या बालवाडी शिक्षिकांना कायम करुन वेतनश्रेणी देणे

मु.शी : कल्याण डोंबिवली महापालिकेत सेवेत असलेल्या बालवाडी शिक्षिकांना कायम करुन वेतनश्रेणी देण्याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. :-

" कल्याण डोंबिवली महानगरपालिका 1 नोव्हेंबर 1994 रोजी स्थापन झाली होती त्यानंतर जिल्हा परिषदेच्या अधिकार कक्षेत ज्या बालवाडया चालविल्या जात होत्या त्या बालवाडया महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आल्या होत्या. या बालवाडयातील शिक्षिकांना दरमहा 500 रुपये मानधन दिले जाते. या बालवाडयामधील शिक्षिकांना कायम करुन वेतनश्रेणी देण्यात यावी अशा ठराव 1996 साली महानगरपालिकेने केला होता. त्यावेळी 145 बालवाडी शिक्षिका होत्या त्यातील दहा शिक्षिकांचे निधन झालेले आहे. त्यामुळे फक्त 130 - 135 शिक्षिका राहिलेल्या आहेत. आपली मागणी मान्य करण्यासाठी या बालवाडी शिक्षिकांनी अनेकदा लोकप्रतिनिधींची भेट घेतली होती व आपले म्हणणे त्यांच्याकडे मांडले होते. त्याचबरोबर माननीय मंत्रीमहोदयांबरोबर तसेच पालक मंत्र्यांबरोबर चर्चा केली होती. दिनांक 19 ऑगस्ट 2006 रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महासभेने या शिक्षिकांना कायम करुन वेतनश्रेणीत सामावून घेण्यासंबंधीचा ठराव संमत केला होता व तो नगरविकास खात्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता ...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

परंतु आजपावेतो या ठरावाला शासनाने म्हणजे नगरविकास खात्याने मंजुरी दिलेली नाही. महापालिकेने मात्र त्यांच्या अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद केलेली आहे. मात्र त्यांना कायम करण्यास शासनाची अनुमती न मिळाल्याने या सर्व बालवाडी शिक्षकांनी उद्या पासून आझाद मैदानामध्ये धरणे आंदोलन सुरू करण्याचे निश्चित केले आहे. सभापती महोदय, भिवंडी, ठाणे, मिरा-भाईंदर या महापालिका क्षेत्रातील सर्व बालवाडी शिक्षिका वेतनश्रेणीवर काम करीत आहेत. त्यांची वेतनश्रेणी मंजूर झालेली आहे, महापालिकेने ठराव केला, महासभेने ठराव केला, नगर प्रशासनाने त्यांना मान्यता दिलेली आहे. पण कल्याण-डोंबिवलीचा प्रस्ताव मात्र अजूनही प्रलंबित आहे. म्हणून या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो आहे की, कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील बालवाडी शिक्षकांना वेतनश्रेणीवर कायम करण्याचा नगरविकास विभागाने तातडीने निर्णय घ्यावा, त्याची कार्यवाही करावी आणि या बालवाडी शिक्षकांना न्याय द्यावा अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

***

..... डब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : केंद्र सरकारने गरिबांच्या गव्हाच्या कोट्यात निम्म्याने कपात केल्यामुळे गोरगरिबांची होणारी आबाळ.

**मु. शी.** : केंद्र सरकारने गरिबांच्या गव्हाच्या कोट्यात निम्म्याने कपात केल्यामुळे गोरगरिबांची होणारी आबाळ याबाबत श्री.प्रकाश शेंडगे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

केंद्र सरकारने गोरगरिबांच्या गव्हाच्या कोट्यात निम्म्याने कपात करावी असे निदेश देणे. त्यामुळे गोरगरीबांना जगता यावे यासाठी सुरू असलेले अंत्योदय, अन्नपूर्णा आणि दारिद्र्यरेषेखालील योजना म्हणजे बीपीएल योजना या योजनांचा बोजवारा उडणे. केंद्र सरकारच्या अन्न महामंडळाने अचानकपणे फतवा काढून गव्हाच्या कोट्यात निम्म्याने कपात करणे, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तसे पत्र पाठविणे, आणि उर्वरित कोटा म्हणजे जो शिल्लक राहिलेला 50 टक्के कोटा आहे तो पूर्ण करण्यासाठी राज्याने गहू आयात करण्यासाठी आपापली यंत्रणा उभी करावी असा अनाहूत सल्ला देणे. परंतु आपल्या राज्य सरकारची अशी कोणतीही आयात करण्याची योजना नसणे. त्यामुळे या तिन्ही योजनांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. त्यामुळे गोरगरिबांची होणारी आबाळ या विषयी या सभागृहात विशेष उल्लेखाद्वारा शासनाचे लक्ष वेधत आहे. या विषयी सरकारने कृपया निवेदन करावे.

***



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी पुरवठा होणाऱ्या दुधाच्या दरामध्ये अचानक 2 ते 5 रूपयांनी केलेली वाढ.

**मु. शी.** : मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी पुरवठा होणाऱ्या दुधाच्या दरामध्ये अचानक 2 ते 5 रूपयांनी केलेली वाढ. याबाबत श्री.संजय दत्त,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

मुंबई शहर व उपनगरातील नागरिकांसाठी उपलब्ध होणारा दूध पुरवठा दिनांक 1 एप्रिल 2008 पासून प्रति लीटर 2 ते 5 रूपये वाढीव दराने मिळणार आहे. याबाबतचा निर्णय मुंबई दूध प्रोड्यूसर असोसिएशनने त्यांच्या वार्षिक बैठकीत जाहीर केला. दुधाचे पहिले दर एक लिटर दुधासाठी 29 रूपये होते आणि नवीन दरानुसार आता ते 32-33 रूपये लिटर होणार आहे. गेल्या पाच महिन्यापूर्वीच राज्य सरकारने प्रति लिटर मागे दोन रूपयांची वाढ केली होती. त्यामुळे सध्या मुंबईतील नागरिकांसाठी दुधाच्या किंमतीत अचानक वाढ दाखविल्याने मुंबई शहर व उपनगरीय नागरिकांच्या मनात संभ्रमाचे वातावरण पसरले आहे. त्यासाठी मुंबई दूध प्रोड्यूसर असोसिएशनने मुंबईतील नागरिकांसाठी केलेली दरवाढ मागे घेण्याची अत्यंत गरज आहे अशी जनतेची भावना आहे. याबाबत शासनाने पुढाकार घेऊन संबंधितांना योग्य त्या सूचना द्याव्यात व याबाबत कारवाई करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारा करतो.

***

....... डब्ल्यू 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परळी तालुक्यातील (जि.बीड) आरोग्य उपकेंद्रे बंद असणे.

**मु. शी.** : परळी तालुक्यातील (जि.बीड) आरोग्य उपकेंद्रे बंद असणे याबाबत श्रीमती उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

या सभागृहामध्ये याच अधिवेशनामध्ये मी आरोग्य उपकेंद्रांच्या अवस्थेबद्दल उल्लेख केला होता आणि आरोग्य खात्याकडून बीड जिल्ह्यातील सगळी आरोग्य उपकेंद्रे अत्यंत चांगल्या प्रकारे चालू आहेत अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले होते. सभापती महोदय, सभागृहासमोर येणारी प्रत्येक बाब ही स्वच्छ आणि खरी असली पाहिजे अशी किमान अपेक्षा आपण बाळगू या. परळी तालुक्यातील काही आरोग्य उपकेंद्रांची मी समक्ष पाहणी सभागृहासमोर शासनाकडून उत्तर आल्यानंतर केली आहे. त्या पाहणीत मला असे आढळून आले की, नागपिंपरी उपकेंद्र,परळी, बोधेगाव उपकेंद्र,परळी या दोन्ही आरोग्य उपकेंद्रांमध्ये जाऊन पाहिले असता तेथे जी अवस्था आहे त्याचे फोटोग्राफ्स मी आपल्याकडे सादर केलेलेच आहेत. त्या फोटोग्राफ्सवरून आणि गावातील लोकांच्या या संदर्भात भेटी घेतल्यानंतर असे समजून आले की, नागापूरचे उपकेंद्र बांधून सहा वर्षे झाली आहेत आणि या सहा वर्षामध्ये गावातील लोक त्या इमारतीचा उपयोग सकाळचा प्रातर्विधी करण्यासाठी करतात आणि अजून पर्यंत या उपकेंद्राचे, त्या इमारतीचे उद्घाटन झालेले नाही. आणि त्या गावात एक महिन्यातून केव्हा तरी एकदा डॉक्टर वा आरोग्य कर्मचारी येऊन जातात. सभापती महोदय, सध्या वेगवेगळ्या प्रकारच्या लसी देणे गरजेचे आहे. म्हणून हे उपकेंद्र त्वरित सुरू करणे गरजेचे आहे. बोधेगाव येथील उपकेंद्र देखील अशाच पद्धतीने बंद आहे आणि त्याचेही फोटोग्राफ्स मी सभापती महोदय, आपल्याकडे दिलेले आहेत. तेथील ग्रामस्थांची अशी तक्रार आहे की, शिरसाळ्याला कर्मचारी राहतात आणि गावात मात्र ते येत नाहीत, 8-15 दिवसांनी कधी तरी

..... डब्ल्यू 5 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे ....

गावात येतात आणि उपकेंद्रामध्ये जातात. बाकी त्या उपकेंद्राला नेहमी कुलूपच असते आणि त्याचे फोटो देखील मी आपल्या कडे पाठवून मी ते आपल्या निदर्शनास आणलेले आहे.

( यानंतर श्री. सरफरे ....एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताइ दराडे...

तिसरे उपकेंद्र गव्हाणे कोडगाव, तालुका परळी येथे आहे. त्याच्या समोर उगवलेले गवत आणि त्या केंद्राच्या दाराला असलेले कुलूप याचे फोटोग्राफ्स आपणास दिले आहेत. परळी तालुक्यातील या उपकेंद्राची अत्यंत वाईट अवस्था आहे. वेगवेगळया साथी पसरलेल्या आहेत. याचबरोबर आपल्या नजरेस आणून द्यावयाची आहे की, ज्यावेळी गोदावरी नदीला पूर येतो त्या प्रत्येक पूरामध्ये पोहोनेरचे प्राथमिक आरोग्य केंद्र पाण्याखाली जाते. अनेक वेळा या केंद्राच्या बांधकामासंबंधीचे ठराव डी.पी.डी.सी. च्या बैठकीमध्ये झाले आहेत. परंतु जागा उपलब्ध होत नसल्याचे कारण सांगितले जाते. माझी आपणास विनंती आहे की, हे गोदावरीच्या काठावरील गाव असून तेथील काळीभोर क्षारयुक्त जमीन आपल्याला कोण देणार आहे? त्याठिकाणी 15 ते 20 फूट खोल खणले तरी काळी माती लागते. ही जमीन आपण संपादित केल्याशिवाय प्राथमिक आरोग्य केंद्राला जागा कोठून मिळणार? तेव्हा आरोग्य खात्याने ती जागा संपादित करुन त्याठिकाणी निवासस्थानासह प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण केले पाहिजे. त्या गावात कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात असल्यामुळे कर्मचारी गावामध्ये राहू शकत नाही. तसेच, डॉक्टर गावामध्ये राहत नाहीत अशाप्रकारचे आरोप आपणच करतो. त्यामुळे त्या गावामध्ये कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची व्यवस्था झाली पाहिजे..

सभापती महोदय, शिरसाळयाच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची देखील अशीच अवस्था आहे. त्या केंद्राचे देखील बांधकाम होत नसल्यामुळे कर्मचारी निवासस्थानामध्ये रहाण्यासारखी परिस्थिती नाही. तरीसुध्दा जीव मुठीत घेऊन तेथील कर्मचारी राहत आहेत. अशाप्रकारची परिस्थिती आहे हे आरोग्य खात्याने मान्य केले आहे. आपण शिरसाळयाच्या डॉक्टरचे घर जाऊन पहावे. त्या घराचा एक कोपरा पूर्णपणे पडलेला आहे. अशा अवस्थेत ते राहत आहेत. बीडच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये क्लास वनच्या जागा असतांना त्या डाऊन ग्रेडच्या करुन क्लास टूच्या जागा भरल्या आहेत. सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये फार मोठया प्रमाणावर गर्भाशय विकाराचे प्रकार होतात असे मागील आठवडयात मी सभागृहात सांगितले होते. त्याकरिता लेप्रोस्कोपिक सर्जन त्याठिकाणी उपलब्ध नाही. जे आहेत ते फक्त कुटुंब कल्याणाची शस्त्रक्रिया करतात. एकमेव डॉक्टर औरंगाबादहून बीडला जातात ते गर्भाशयाची शस्त्रक्रिया करतात. अशाप्रकारची दयनीय अवस्था आहे. काही उपकेंद्राच्या बाबतीत ही अवस्था आहे. सभापती महोदय, गेल्या 60 वर्षापासून आम्ही मागणी करीत आहोत. या सभागृहाने बीड जिल्हयातील आमच्या नागरिकांना न्याय द्यावा आणि या व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणावा अशाप्रकारे विशेष उल्लेखाची सूचना मी याठिकाणी मांडते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जसलोक हॉस्पिटलचे श्री. मसंद यांनी विधानपरिषदेच्या तदर्थ समितीसमवेत केलेले गैरवर्तन

**मु.शी.**: जसलोक हॉस्पिटलचे श्री. मसंद यांनी विधानपरिषदेच्या तदर्थ समितीसमवेत केलेले गैरवर्तन याबाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"आजच्या "मुंबई मिरर, टाईम्स ऑफ इंडिया" दैनिकात विधीमंडळ विधान परिषदेने नियुक्त केलेल्या "रुग्ण समितीच्या" बाबतीत जसलोक हॉस्पिटल येथे दारिद्रय रेषेखाली येणाऱ्या रुग्णांना उपचारामध्ये सवलत मिळते की नाही याची पहाणी करण्याकरिता केलेल्या दौऱ्यात जसलोक हॉस्पिटलचे श्री. मसंद यांनी विधान परिषदेचे आमदार व राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्याशी गैरवर्तन केले.परंतु आज उपरोक्त "वर्तमानपत्रात आमदारांनी चुकीचे प्रश्न विचारले" आणि राज्य शासनाने याबाबत चुकीचे "ॲफिडेव्हीट" फाईल केले अशा आशयाचा मजकूर प्रसिध्द झाला. या विषयासंबंधी विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास मला अनुमती मिळावी."

सभापती महोदय, मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून एका महत्वाच्या वैधानिक विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. माझ्या हातामध्ये "मुंबई मिरर" हे इंग्रजी दैनिक आहे. जीवनदायी योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत नाही म्हणून शासनाने या सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्री नामदार श्री. हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली विधानपरिषदेच्या माननीय सदस्यांची तदर्थ समिती नेमली होती. या समितीमध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेस पक्षाच्या अनेक माननीय सदस्यांचा समावेश करण्यात आला होता. या समितीचे नाव "रुग्ण समिती" असे ठेवण्यात आले होते. या समितीच्या बैठकीमध्ये अनेक हॉस्पिटल्सना भेटी देण्याचा कार्यक्रम ठरविण्यात आला. त्याप्रमाणे जीवनदायी योजनेंतर्गत निर्धन आणि दारिद्रय रेषेखालील लोकांना व्यवस्थित उपचार मिळतात की नाहीत यासंबंधी प्रत्येक हॉस्पिटल्सना भेट

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KGS/ MMP/ KTG/

डॉ. दीपक सावंत...

देऊन तपासणी करण्याचे समितीने ठरविले. त्यानुसार या समितीने दिनांक 25 फेब्रुवारी रोजी पहिला दौरा ठरविला. त्या दौऱ्यामध्ये जसलोक, ब्रीच कँडी आणि बॉम्बे हॉस्पिटल या तीन हॉस्पिटल्सना भेटी दिल्या. प्रथम जसलोक हॉस्पिटलला भेट दिली असतांना त्या हॉस्पिटलचे श्री. मसंद यांनी समितीच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्यास नकार दिला व समितीच्या सदस्यांबरोबर गैरवर्तन केले. समितीने त्यांच्याकडे याबाबत पुन्हा पुन्हा आग्रह धरला असतांनाही त्यांनी उत्तर देण्यास नकार दिला. त्याचबरोबर समितीच्या प्रश्नांना उत्तरे न देणे हे माझे डिस्क्रिएशनल पॉवर राहील असे सांगितले.

सभापती महोदय, दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबतचा पुरावा किंवा प्रमाणपत्र सादर करणाऱ्या रुग्णांना रुग्णालयामध्ये मोफत उपचार दिले पाहिजेत अशाप्रकारचे सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे यासंबंधी धर्मादाय आयुक्तांनी देखील त्यांना पत्र पाठविले आहे. समितीच्या भेटीच्या वेळी धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे प्रतिनिधी, विधीमंडळाचे अधिकारी आणि मिडियाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत श्री. मसंद यांनी समितीच्या सदस्यांबरोबर गैरवर्तन केले. त्यानंतर धर्मादाय आयुक्तांनी लिहिलेल्या पत्रानुसार हायकोर्टामध्ये चालू असलेल्या केससंबंधी शासनातर्फे म्हणणे मांडण्यात आले आहे. ते या वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. त्यात असे म्हटले आहे की, " MLAs caught asking wrong Questions. They demanded the records of the Charity Works from the Hospital, but the State Government says it was not part of their brief, they were supposed to visit 7 / 11 Victims."

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

म्हणजे त्यांनी फक्त बॉम्बस्फोटामध्ये जखमी झालेल्या लोकांची चौकशी करावी असा त्या कमिटीचा स्कोप आहे असे ॲसोसिएट ॲडव्होकेट जनरल कुंभकोणी यांनी कोर्टामध्ये प्रतिपादन केले. सभापती महोदय, ही दुर्दैवी घटना आहे,गंभीर घटना आहे.शासनाच्या वैधानिक समितीचा स्कोप काय आहे ? ते विधीमंडळाकडून गेलेले नाही. या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी कोणत्या अधिकाराखाली हॉस्पिटलच्या संबंधित अधिकाऱ्यांना प्रश्न विचारले ? म्हणून सन्माननीय सदस्यांनाच दोषी ठरविण्यात आले आहे. हा कोणाचा वैयक्तिक प्रश्न नव्हता. तर सामान्य गरीब जनतेला सर्व सेवा, सुविधा मिळतात की नाही हे पाहण्यासाठी सर्व आमदार तेथे गेले होते. या समितीमध्ये सर्वश्री मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी देखील उपस्थित होते. त्यावेळी माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफसाहेब स्वत: हजर होते. तसेच विधीमंडळाचा स्टाफ देखील उपस्थित होता. त्यावेळी संबंधितांनी कशा प्रकारचे वर्तन केले आहे हे सर्वांनी पाहिलेले आहे. सभापती महोदय, अशा प्रकारचे ॲफीडेव्हीट कसे करण्यात आले ? याची गंभीरपणे दखल घ्यावयास पाहिजे. वर्तमानपत्रामध्ये जे काही छापून आलेले आहे, त्यामुळे ही बदनामी झालेली आहे. मिड-डे वर्तमानपत्रात आलेल्या बातमीमध्ये पुढे असे म्हटले आहे की, "In its reply filed on March 12, associate advocate general Ashutosh Kumbhkoni told the Court that the said committee comprising MLAs was set up to supervise the treatment of 7/11 blasts victims and not to oversee charity works by hospitals." सभापती महोदय, आमचा हा अपमान आहे. याची गंभीर दखल घेण्यात यावी हेच मी या विशेष उल्लेखाव्दारे सांगू इच्छितो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला एक बाब सांगावयाची आहे. मी यावर चर्चा करीत नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सर्वसाधारणे विषयाला सपोर्ट करणारे भाषण . . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हा विषय महत्वाचा आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना हेच सांगत आहे की, हा विषय महत्वाचा आहे. त्यामुळे आपण याबाबत बोलू शकता.

. . . .वाय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याबाबतीत गंभीर मुद्दा असा आहे की, धर्मदाय रुग्णालयाच्या संदर्भात जी कमिटी नेमलेली आहे, ती कायद्याच्या कलम 41(ए)(ए) प्रमाणे अधिकृत आहे. ही कमिटी रुग्णालयामध्ये भेट देण्यासाठी गेल्यानंतर अशा प्रकारचे ॲफीडेव्हीट करणे बरोबर नाही. याच्या बाबतीत शासनाने निवेदन करावयास पाहिजे. नाहीतर आम्हाला अन्य हॉस्पिटल्स् सुध्दा दरवाजाच्या आत घेणार नाहीत. हे विधीमंडळ,कायदेमंडळ सर्वोच्य आहे. कोर्टामध्ये अशा प्रकारचे ॲफीडेव्हीट करणे हा आमचा अपमान आहे. शासनाच्या नियमानुसार या रुग्णालयामध्ये गोरगरीबांना सवलती मिळतात की नाही ? त्यांना तेथे ट्रिटमेंट मिळते की नाही ? योग्य प्रकारची आरोग्य सेवा उपलब्ध होते की नाही ? हे पहाण्यासाठी आम्ही गेलो होतो. पूर्वी झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये जे जखमी झाले आहेत आणि जे आतापर्यंत त्या रुग्णालयामध्ये जखमी झाले आहेत, त्यांना व्यवस्थित ट्रिटमेंट मिळते की नाही ? एवढेच पहाण्यासाठी आम्ही गेलो नव्हतो. खरे म्हणजे सन्माननीय सदस्यांनी सकाळी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून माननीय सभापतींना विनंती केली होती. पण माननीय सभापतींनी सन्माननीय सदस्यांना सांगितले की, त्यांनी विशेष उल्लेखाच्या वेळी मुद्दा मांडावा. माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे की, याबाबतीत आपण निवेदन करण्यास सांगावे. कारण मागच्या आठवडयामध्ये माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफसाहेब, आम्हाला येऊन असे म्हणाले की, मी मंत्री असल्यामुळे मला लक्षवेधी सूचना देता येत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आता जे वाक्य उच्चारलेले आहे, ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

**तालिका सभापती** : बरोबर आहे, ते रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही यासंदर्भात दिलेली लक्षवेधी सूचना या आठवडयामध्ये येणार आहे. हक्कभंगासाठी म्हणून, कारण आमचा अपमान केला. मग ते क्रॉसिंग होईल. ती विसंगती होईल. कोर्टामध्ये शासनाच्यावतीने जे ॲफीडेव्हीट दाखल केलेले आहे, शपथपत्र दाखल केलेले आहे, ते भयानक आहे.

**तालिका सभापती** : शासनाने याची गंभीर दखल घ्यावी आणि योग्य ती कार्यवाही करावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, . . . .

. . . .वाय-3



**तालिका सभापती** : शासनाने याची गंभीर दखल घ्यावी असे मी सांगितलेले आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य वेगळया आयुधाचा वापर करुन हा विषय उपस्थित करु शकतात.तसेच मी शासनाला आदेश दिलेला आहे की,याची गंभीर दखल घेण्यात यावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, . . ..

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, शासनाने याची गंभीर दखल घ्यावी असे सांगितले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण माझे म्हणणे समजून घ्यावे. वैधानिक समित्यांमार्फत . . . .

**तालिका सभापती** : ही बाब वेगळया आयुधाच्या माध्यमातून उपस्थित करणे औचित्याचे ठरेल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शासन नव्हे . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा औचित्याचा मुद्दा आहे. आणखी कसा करणार ? याठिकाणी सभागृहाचा अपमान झाला आहे, शासनाचा अपमान आहे. . . .

**तालिका सभापती** : विशेष उल्लेखाच्या मुद्याबाबत निवेदन केले जात नाही. परंतु शासनाने याची गंभीर दखल घ्यावी किंवा वेगळया मार्गाने हा प्रश्न उपस्थित करावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यासाठी आणखी कोणता वेगळा मार्ग आहे ?

**तालिका सभापती** : या मार्गाने प्रश्न उपस्थित केल्यानंतर शासनाने याची गंभीर दखल घ्यावी असे मी सांगितले आहे. तसेच वेगळया मार्गाने हा प्रश्न पुन्हा उपस्थित करावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आज पेपरमध्ये ही बाब आल्यानंतर आजच याची दखल घ्यावयास पाहिजे . . . .

**तालिका सभापती** : शासनाने याची गंभीर दखल घ्यावयास पाहिजे असे मी सांगत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शासनाने आपली भूमिका आज संध्याकाळपर्यंत स्पष्ट करावयास पाहिजे. म्हणजे यामध्ये आमची चूक आहे की शासनाची चूक आहे हे कळले पाहिजे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

. . . .वाय-4



डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या सगळयामध्ये आम्ही चुकीचे ठरतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विनंती करतो की, ही जी समिती आहे, त्या समितीनेच याबाबतीत निर्णय घ्यावा आणि तो शासनाकडे द्यावा. कारण आपली समिती अजूनही अस्तित्वात आहे. मग या समितीने याबाबतीत एकमताने जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो घ्यावा आणि शासनाला सूचना कराव्यात.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ....

आपल्याला दोन तीन मार्ग आहेत. आपण त्या समितीचे सदस्य आहात.

डॉ. दीपक सावंत : होय.

**तालिका सभापती** : ती समिती आजही अस्तित्वात आहे. माननीय राज्यमंत्री त्या समितीचे प्रमुख आहेत. त्या समितीमध्ये आपण निर्णय घ्यावा आणि त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे हक्कभंगाचे प्रकरण होऊ शकते. याबाबतीत निवेदन झाले पाहिजे.

**तालिका सभापती** : मी सांगितले की, आपण वेगळया आयुधांमार्फत हा विषय उपस्थित करु शकता. विशेष उल्लेखाच्या बाबतीत अशी सुरुवात झाली तर हे कधीच संपणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा औचित्याचा मुद्दा असणे आवश्यक होते. याचे गांभीर्य निघून जाईल.

**तालिका सभापती** : मी सांगितले की, समिती अस्तित्वात आहे. त्या समितीमध्ये आपण निर्णय घ्यावा. तसेच अधिवेशन सुध्दा चालू आहे.

डॉ. दीपक सावंत : समितीमध्ये कोणाच्या विरोधात निर्णय घ्यावयाचा ? आपल्याच ॲडव्होकेट जनरलच्या विरोधात निर्णय घ्यावयाचा काय ?

**तालिका सभापती** : आपण त्या ॲफिडेव्हिटबाबत समितीमध्ये चर्चा करु शकता. अधिवेशन चालू आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. आपल्या सभागृहाचे जे नियम आहेत, जे संकेत आहेत तसेच ज्या प्रथा आहेत त्याला बाधा येऊ नये.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांचे काय म्हणणे आहे ते आपण ऐकून घ्यावे.

**तालिका सभापती** : मी ऐकून घेतलेले आहे. ती समिती अस्तित्वात आहे आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे त्या समितीचे सदस्य आहेत. माननीय राज्यमंत्री त्या समितीचे प्रमुख आहेत. अधिवेशन चालू आहे. विशेष उल्लेखाच्या बाबतीत अशा प्रकारे निवेदन करण्याचा प्रघात नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : त्या समितीचा स्कोप काय आहे याचा खुलासा व्हावा.

**तालिका सभापती** : याबाबत गंभीर दखल घेतलेली आहे आणि शासनाने याबाबत गंभीर दखल घ्यावी असे सांगितलेले आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

**पृ. शी.** : राहाता (जि.अहमदनगर) येथे बसवावयाचा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा 7-8 वर्षे तहसिल कार्यालयाच्या गोडाऊनमध्ये बंदिस्त करण्यात येणे

**मु. शी.** : राहाता (जि.अहमदनगर) येथे बसवावयाचा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा 7-8 वर्षे तहसिल कार्यालयाच्या गोडाऊनमध्ये बंदिस्त करण्यात येणे याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा विषयाकडे मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

"अहमदनगर जिल्ह्यातील राहाता शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारला जावा अशी राहाता शहरवासियांची गेल्या 40 वर्षापासूनची मागणी होती. सन 1999 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे माननीय महसूल मंत्री यांनी पुतळा उभारणीसाठी राहाता नगरपरिषदेअंतर्गत शिवाजी चौकातील जागेचे भूमिपूजनही केले हाते. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण केल्यानंतर कमी दराच्या निविदाधारकाकडून पुतळा खरेदी करण्यात आला होता. नाशिकचे शिल्पकार ज्यांनी श्री. सप्तशृंगी देवी व त्र्यंबकेश्वर अशा नामांकित देवस्थानांसाठी आभुषणे घडविली होती त्यांच्याकडून हा पुतळा बनवून घेण्यात आला. पुतळ्याची किंमत रु. 14,91,585 /- इतकी निश्चित झाली. त्यापैकी रु. 50,000/- ची आगाऊ रक्कमही श्री. मैद यांना देण्यात आली. श्री. मैद यांनी पुतळ्याचे क्ले मॉडेल बनवून राहाता नगरपरिषदेकडे सादर केले. नगरपरिषदेने त्या मॉडेलला पसंती दर्शवून कला संचालनालयाचा अभिप्राय मागविला. कला संचालनालयाच्या अहवालात, "सदर पुतळा कलात्मकदृष्ट्या आकर्षक, सुबक व प्रमाणबध्द झाल्यामुळे ब्रॉंझ घातूमध्ये रुपांतरीत करण्यास परवानगी देण्यात येत आहे." असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले असताना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

देखील गेली 7-8 वर्षे हा पुतळा तहसिल कार्यालयाच्या गोडाऊनमध्ये बंदिस्त करण्यात आला आहे.

सर्व प्रकारच्या अटींची पूर्तता केल्यानंतर देखील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा एका गोडाऊनमध्ये दीर्घकाळ बंदिस्त राहणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. शासनाने याचा गांभीर्याने विचार करुन सदर पुतळ्याचे लवकरात लवकर अनावरण करावे यासाठी विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे."

सभापती महोदय, हा महाराष्ट्र छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र आहे असे आपण संबोधित करतो. आपण नेहमी शिवशाहीचा उल्लेख करीत असतो. ज्या छत्रपती शिवरायांनी हा महाराष्ट्र घडविला त्यांच्या पुतळ्याची अशी अवस्था झालेली आहे. सभापती महोदय, त्या ठिकाणी परवानगी दिल्यानंतर देखील तेथील नगराध्यक्षा सौ. ममता पिपाडा यांना याचे श्रेय जाऊ नये म्हणून 7-8 वर्षे स्थानिक आमदाराच्या काही लोकांकडून तो पुतळा बसविण्यापासून रोखण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्रामध्ये तो पुतळा पोलिसांनी ताब्यात घेतला आणि तहसिल कार्यालयातील गोडाऊनमध्ये गेली 7-8 वर्षे तो पुतळा धूळ खात पडलेला आहे. माझी सभागृहाला नम्र विनंती आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेणार असू तर तेथील स्थानिक आमदाराच्या दबावाला बळी न पडता ताबडतोब तो पुतळा बसवावा. तो पुतळा न बसविल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान झाला. 7-8 वर्षे तहसिल कार्यालयातील गोडाऊनमध्ये त्या पुतळ्याला डांबून ठेवले आहे. तो पुतळा बाहेर काढून सन्मानाने त्या पुतळ्याची त्या ठिकाणी उभारणी करावी अशा प्रकारची मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

मला खेद वाटतो की, अशाप्रकारचा प्रश्न आम्हाला सभागृहामध्ये उपस्थित करावा लागतो. म्हणून सभापती महोदय, अहमदनगर जिल्हयातील राहाता या गावी शिवछत्रपतींचा पुतळा ताबडतोब बसवून समारंभपूर्वक पुतळयाचे उद्‌घाटन करावे यादृष्टीने आपण शासनाला निदेश द्यावेत, अशी आपल्याला विनंती करतो.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, याबाबत दखल घेतली जाईल.

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.40 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.10 ते 2.40 पर्यंत मध्यंतर )

------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)**

**तालिका सभापती** : मध्यंतराची वेळ आणखी 15 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

(दुपारी 2.41 ते 2.56 मध्यंतर)

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**मु.शी.**: सन 2008-2009 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

( चर्चा पुढे सुरु...)

**तालिका सभापती** ( श्री.उल्हास पवार ) : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा आजचा तिसरा व शेवटचा दिवस आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्तमंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षांच्यासदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधीय पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत ज्या सदस्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे आपल्या पक्ष प्रतोदांमार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी.

या चर्चेस सुरुवात होण्यापूर्वी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत 10 सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. या चर्चेत अजून 29 सदस्यांना आपापले विचार मांडावयाचे आहेत. सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेऊन आपापली मते व्यक्त करावीत अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. माननीय वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांनी महाराष्ट्राचा सलग दहावा अर्थसंकल्प मांडला त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती निश्चितपणे सावरली आहे त्यामुळे मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. केंद्र शासनाने शेतक-यांवरील कर्जमाफीचा निर्णय घेतला. सदरहू निर्णय उशिराने जरी घेतला असला तरी देखील हा निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले त्याबद्दलही राज्य शासनाने मी अभिनंदन करतो. ज्या शेतक-यांनी कर्जाची परतफेड नीटपणे केली आहे, त्या शेतक-यांना देखील सवलती जाहीर केलेल्या आहेत त्याबद्दलही केंद्र शासनाचे आभार मानतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचा पहिला अर्थसंकल्प त्यावेळच्या माननीय वित्तमंत्र्यांनी 39 हजार 86 कोटी रुपयांचा मांडला होता. आताचा अर्थसंकल्प 99 हजार 562 कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. अर्थसंकल्पाचा आकारमान वाढला आहे. याबाबतीत माननीय वित्तमंत्री कौतूक करुन घेत आहेत. अर्थसंकल्पाच्या वाढलेल्या आकारमानाचा फायदा राज्यातील गोरगरिबांना किती मिळेल हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तकातील सांख्यीकी पाहिली तर माननीय वित्तमंत्र्यांना कौतूक करण्याचा अधिकार राहणार नाही...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ...

सभापती महोदय, या राज्यामध्ये 91 टक्के आदिवासी दारिद्रश्य रेषेखालील जीवन जगत आहेत. त्यातील 40 टक्क्याहून अधिक कुटुंबे भूमीहिन आहेत. साक्षरतेच्या बाबतीत विचार केला तर 76 टक्केपेक्षा अधिक आदिवासी महिला निरक्षर आहेत. 7 लाखाहून अधिक बालकामगार आहेत. शिक्षणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. जोशी यांनी काल उल्लेख केला होता. राज्यातील 15 टक्के प्राथमिक शाळांमध्ये आजही एक शिक्षक आहे. 8 हजार शाळांमध्ये निम्मेशिक्षक आहेत. पूर्ण शिक्षकच नाहीत. अर्धशिक्षकी प्राथमिक शाळा आहेत. त्यातील काही शाळांमध्ये शिक्षकच नाहीत. नाविन्यपूर्ण शिक्षणाच्या नावाखाली योजना सुरु आहेत. राज्यातील महिलांच्या शिक्षणाचा विचार केला तर 10 वी पास मुलींचे प्रमाण 45 टक्के असून 55 टक्के मुली 10 वी ची वेस ओलांडू शकत नाहीत आणि महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्याला हे भूषणावह नाही. आणखी एका वैगुण्याकडे मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. दरवर्षी पुरवणी मागण्यांची टक्केवारी वाढत आहे. खरे पाहता 24 टक्केपेक्षा अधिक्याच्या पुरवणी मागण्या असता कामा नयेत. परंतु गेली काही वर्षे हे प्रमाण 30 टक्केपेक्षा जास्त गेलेले आहे. विशेषत: सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाच्या पूरक मागण्या या 36 टक्क्यांच्या घरात गेलेल्या आहेत. पुरवणी मागण्यांमधील रकमांचे प्रमाण कमी करण्यासाठी योग्य पाऊल उचलण्यामध्ये आणि त्यावर निर्बंध घालण्यामध्ये माननीय अर्थमंत्र्यांना अपयश आलेले आहे.

सभापती महोदय, आपल्या भाषणामध्ये कर्जमाफीबद्दल अर्थमंत्र्यांनी अनेकदा कौतुक करुन घेतले आहे. याबाबत निर्णय घेतला त्यासाठी मी त्यांचे आभार मानतो. त्याचप्रमाणे सिंचनाचा विचार केला तर या राज्यातील फक्त 17 टक्के क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. राष्ट्रीय पातळीवरील प्रमाण 43 टक्के आहे. महाराष्ट्र हे आपण प्रगतीशील राज्य मानतो. अशा राज्यामध्ये आपण फक्त 17टक्के सिंचन क्षमता निर्माण करु शकलो आहोत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागील जी अनेक कारणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे सिंचनक्षेत्र आपण वाढवू शकलो नाही. ज्या भागात सिंचनक्षेत्र कमी आहे त्याच भागातील शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे हे लक्षात घेतले पाहिजे. या बाबीकडे लक्ष वेधणे अतिशय आवश्यक आहे. माननीय वित्त राज्यमंत्री याठिकाणी बसलेले आहेत. विदर्भ,मराठवाडा,कोकण आणि खानदेश या भागातील सिंचनाकडे अधिक लक्ष देणे

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

आवश्यक आहे. कृष्णा-खोऱ्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु या भागामध्ये सिंचन क्षेत्र वाढविले पाहिजे. छोटी छोटी राज्ये सिंचन क्षेत्र खूप वाढवीत आहे आणि त्यांच्याकडे सिंचन क्षेत्र वाढले सुध्दा आहे. त्यांच्याकडील आकडेवारी पाहिली तर त्या तुलनेत आपण खूप कमी पडतो असे नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या अडचणींबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. परंतु सागरी शेतीकडे सुध्दा शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. या शेतीकडे शासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. अर्थसंकल्पामध्ये बंदराबद्दल मोघम उल्लेख केलेला आहे. कोणतीही नवीन तरतूद केलेली नाही. मोघम उल्लेख केलेला आहे. गेली अनेक वर्षे सदनामध्ये आणि बाहेरही सातत्याने सांगण्यात येते की राज्यामध्ये मत्स्यदुष्काळ आहे. यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु शासनाने याबाबत कोणतीही उपाययोजना केलेली नाही. मागील आठवडयामध्ये ज्यावेळी दुष्काळाबाबत प्रश्न उपस्थित झाला होता आणि त्यावेळी जी आकडेवारी देण्यात आली होती त्यावरुन शासन मत्स्यशेतीकडे किती दुर्लक्ष करीत आहे हे सिध्द झालेले आहे. त्यावेळी माहिती सादर केली जाईल असे शासनाने सांगितले होते परंतु अजून माहिती सादर केलेली नाही. आपण पारंपारिक मच्छिमारी करतो. छोटया-मोठया होडयांमधून आणि यांत्रिकी बोटीमधून जी मच्छिमारी चालते त्याची नोंदणी करुन मोजणी होणे आवश्यक आहे. मोठया जहाजातून फॅक्टरी शिपिंगच्या माध्यमातून जी मासेमारीची आकडेवारी येते ती लक्षात घेतली तर माशांचा दुष्काळ दिसणार नाही. त्यासाठी वेगळी पाहणी करणे अतिशय आवश्यक आहे. मच्छिमार बांधव अनेक वर्षे मागणी करीत आहेत की, याबद्दल शासनाने नुकसान भरपाई द्यावी. जशी आपण पिकांची आणेवारी निश्चित करुन नुकसान भरपाई देतो त्याचप्रमाणे मच्छिमारीची आणेवारी निश्चित करुन त्यासंबंधी मदत करण्याचे निकष बदलणे आवश्यक आहे आणि त्यानुसार नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..........

सातत्याने चार-पाच वर्षे ही मागणी केली जात आहे. परंतु शासनाने एक रुपयाचीही मदत दिली नाही. सागरी मृत्यूनंतर 50 हजार रुपये मदत द्यायचे निश्चित केले होते. आता ही मदत एक लाख रुपये देऊ पहात आहात. अपघात झाल्यानंतर मदत देण्यापेक्षा नैसर्गिक अपघात सुरु आहे, मोठया प्रमाणात पर्शियन नेटद्वारे, यांत्रिक बोटीद्वारे जी मासेमारी सुरु आहे त्यामुळे अधिक नुकसान सहन करावे लागत आहे. नवनवीन बंदरे येत आहे, नवनवीन प्रकल्प येत आहेत, त्यामुळे पारंपारिक मच्छिमार उद्ध्वस्त झाला आहे. त्याला उभारी देण्याचे, पॅकेज जाहीर करण्याचे काम होत नाही. मच्छिमारांना सुध्दा कर्जमाफी मिळाली पाहिजे. किमान 50 हजार रुपये मच्छिमारांचे सोसायटीचे, बँकेचे कर्ज सर्वच्या सर्व माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने स्वत:हून घ्यावा. केंद्र सरकार निर्णय घ्यायचा तेव्हा घेईल. परंतु त्याची वाट न पाहता राज्य सरकारने या संदर्भात पावले उचलली पाहिजेत. किमान 2 ते 4 टक्के व्याजाच्या दराने नव्याने कर्ज पुरवठा सुरु केला पाहिजे. व्याजाचा दर प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे पारंपारिक मच्छिमार खचून जात आहे आणि उद्ध्वस्त होत आहे ही वस्तुस्थिती आहे. खाड्यातील गाळ नियमितपणे काढला गेला नाही त्यामुळे जलवाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत. मासेमारीला सुध्दा अडचण निर्माण होत आहे. परकीय चलन मिळवून देणारे समुद्रातील हे सोने आहे. त्यासाठी खाड्यातील गाळ काढण्यासाठी अधिक तरतूद करणे आवश्यक होते. शासनाने ती तरतूद केलेली नाही. यासाठी तरतूद करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सीआरझेडची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याची आवश्यकता असताना त्याला बगल देऊन सीएनझेड सुरु केले आहे. ते ताबडतोब रद्द केले पाहिजे. आलेवाडी बंदर रद्द करण्याची मागणी कोळी समाजाने सातत्याने करुनही त्याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. याबाबत शासनाने निश्चित भूमिका घ्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, शासनाने नव्याने गृहनिर्माण धोरण मांडले आहे त्याचे मी स्वागत करतो. त्याचबरोबर 0.33 एफएसआय उपनगरासाठी वाढवून देण्याचे जाहीर केले. हाच निर्णय मुंबई शहरासाठी सुध्दा लागू करण्यात यावा. आज 1.33 एफएसआय मुंबई शहरासाठी लागू असला तरी तो 1.66 केल्याने काही बिघडत नाही. मुंबई शहरातील सामान्य माणूस या शहरातच राहणे आवश्यक आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी उपनगराप्रमाणे मुख्य मुंबई शहरासाठी सुध्दा 0.33 वाढीव

..2..

श्री.कपिल पाटील.........

एफएसआय लागू करण्याची आवश्यकता आहे. या शहरामध्ये म्हाडाच्या 56 वसाहती आहेत. या वसाहतींचा पुनर्विकास करावयाचा असेल तर 2.5 एफएसआय मिळाला पाहिजे हे खरे असले तरी तेवढा एफएसआय देऊनच भागणार नाही. केवळ एफएसआय वाढविला आणि मोकळ्या जमिनी काढून घेतल्या तर कोणतेही पुनर्वसन होणार नाही. या 56 वसाहतींमध्ये सामान्य मराठी माणूस, कष्टकरी वर्ग राहतो आहे. तो तेथेच रहावा, त्याचे तेथेच पुनर्वसन व्हावे असे वाटत असेल तर मोकळी मैदाने आणि मोकळ्या जागांसह अतिरिक्त एफएसआय या वसाहतींना मंजूर केला पाहिजे, तरच त्यांना न्याय मिळू शकेल. अन्यथा पुनर्वसनाच्या नावाखाली 225 चौ.फुटाच्या घरात ही सामान्य माणसे जातील. आज छोट्या छोट्या घरांमध्ये दोन-दोन, तीन-तीन कुटुंबे दाटीवाटीने रहात आहेत. मुंबईतील म्हाडाच्या वसाहती असोत, बीडीडी चाळी असोत, महापालिकेच्या वसाहती असोत या सर्वांसाठी सर्वंकष भूमिका घेतली पाहिजे. आज सामान्य मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला जात आहे. त्याला वाचवायचे असेल तर या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राकडे माननीय अर्थमंत्र्यांनी नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केले आहे. काल माननीय शिक्षणमंत्र्यांनी सांगितले की, या विषयावर वेगळी चर्चा करण्याची आवश्यकता आहे. परंतु प्रश्न बजेटचा आहे. बजेटच दिले नाही तर करणार काय? शिक्षणाच्या बाबतीत या राज्याचा देशात शेवटचा क्रमांक लागतो.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ........

.....अडथळा......तुलनात्मक आकडेवारी आपण पहावी. केरळ, नागालँडमध्ये हे प्रमाण किती आहे हे पहावे. आपले नेते माननीय श्री. शरदराव पवार यांनीच सांगितले आहे की, मिझोराम, नागालँड पेक्षा आपले राज्य मागे पडले आहे. निदान ते सांगतात त्याकडे तरी लक्ष द्यावे. महोदय, महाराष्ट्र राज्य हे प्रगतिशील राज्य आहे आणि शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव सकाळ संध्याकाळ फक्त घेतो परंतु ज्यांनी स्त्रियांसाठी पहिली शाळा सुरु केली त्या घटनेला गेल्या जानेवारीमध्ये 160 वर्षे पूर्ण झ ााली. त्याची आठवण ठेवून शिक्षणासाठी काय करीत आहात ? याचाही विचार केला पाहिजे. एवढया वर्षानंतर आपल्या राज्याची शिक्षणाची आज काय स्थिती आहे याचा आपण विचार करावा. मघाशी मी सांगितले की, राज्यातील 55 टक्के मुली दहावीची रेषा सुध्दा ओलांडत नाहीत. आठ हजार खेड्यांमध्ये शाळांची व्यवस्था नाही, काही ठिकाणी शिक्षक नाही तर काही ठिकाणी निमशिक्षक, म्हणजे पूर्णवेळ शिक्षक सुध्दा नाही. त्यापलिकडे जाऊन मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, शासनाने या अर्थसंकल्पात नाविन्यपूर्ण शाळा निर्माण करण्याचा मनोदय व्यक्त केला, हे तर जास्त धोकादायक आहे...अडथळा....त्यांना बजेट देत नाही म्हणून त्या शाळा काहीच करु शकत नाही. माननीय शरद पवारयांनी सांगितले त्यानुसार मी आठवण करुन देऊ इच्छितो, आपल्या नेत्याचे तरी आपण ऐकले पाहिजे. गोव्याचे उदाहरण आपण देत आहात पण गोव्यात प्रत्येक विद्यार्थ्याला कॉम्प्युटर दिलेले आहे, आपण पाटी-पेन्सिल सुध्दा देत नाहीत. विनाअनुदानित शाळा शासनाने प्राथमिक स्तरावर सुरु केल्या. वास्तविक शिक्षणाची जबाबदारी पूर्णपणे राज्यशासनाची आणि केंद्रशासनाची आहे. कारण समवर्ती सूचीमध्ये शिक्षणाचा हक्क आपण समाविष्ट केला आहे. प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण कदापि विना अनुदानित असता कामा नये, ते अनुदानितच असायला पाहिजे. बाकी ठिकाणी आपण पाहिजे तेवढा खर्च करतो. बुडालेले कारखाने वाचविण्यासाठी खर्च करतो....अडथळा....मुलींसाठी सायकली दिल्या, ही चांगली गोष्ट आहे कारण मुलींना आपण पहिल्यांदा शिक्षणापासून वंचित ठेवतो. केवळ मुलींसाठीच नव्हे तर मुलांनाही सायकली दिल्या पाहिजेत. दोडा मार्ग येथे पहिले कॉलेज सुरु केले त्या दिवशी फक्त एकच मुली कॉलेजमध्ये हजर होती. मी त्याबाबत चौकशी केली असता मला माहिती मिळाली की, मुलींना कॉलेजमध्ये पाठवित नाहीत. म्हणून विना अनुदानित पध्दत

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.......

शासनाने रद्द करावी. कारण विना अनुदानितच्या नावाखाली राज्यात अनेक प्राथमिक शाळा सुरु केल्या पण त्या शाळांमध्ये साधी खिचडी सुध्दा मुलांना दिली जात नाही. अशा विना अनुदानित शाळांसाठी कोणताही निधी वापरता येत नाही, त्यांना कुठल्याही सवलती मिळत नाहीत. अशा शाळांमध्ये गरिबांचीच मुले शिकतात, झोपडपट्टीतील व खेड्या-पाड्यातील मुले शिकतात त्यांच्या बाबतीत शासन योग्य ती भूमिका घेणार की नाही ? की फक्त शाहू, फुले, आंबेडकर आणि कर्मवीरांचे नाव घेणार आहात ? एवढेच आपण सांगायचे आणि करायचे मात्र काहीच नाही. हा दुटप्पीपणा बंद करावा आणि किमान शिक्षणाची जबाबदारी आम्ही उचललेली आहे ती पूर्ण करणार हे उत्तरामध्ये सांगितले पाहिजे. शिक्षकांचे एका बाजूला प्रचंड शोषण सुरु आहे. त्यांच्या तक्रारी असतील पण त्या 2/3 टक्के असतील. परंतु या शिक्षकांना कुठल्याही प्रकारच्या सवलती नाहीत, त्यांना पगार नाही, वेतनेत्तर अनुदान नाही, शाळांची व्यवस्था नाही आणि आपण म्हणता की, मुलांना शिकवा.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ प्रथम श्री. खर्चे...... 15:15

श्री. कपिल पाटील....

शासनाच्या नवीन धोरणाला माझा विरोध नाही परंतु या राज्यातील मुलांना पुर्ण शिक्षण मिळण्याचा अधिकार असतांना त्यांचा अधिकार आपण काढून घेत आहात. विद्यार्थ्यांना पूर्ण शिक्षण घेण्याचा जो अधिकार आहे तो अधिकार काढून घेण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिलेला आहे? ब्रिटीश शासनाने तरी घरा-घरापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे काम केले होते. पेशवाई परवडली परंतु तुमच्या लोकशाही आघाडीचे सरकार शिक्षणाच्या बाबतीत परवडले नाही अशी म्हणण्याची वेळ आज जनतेवर आलेली आहे. खरे म्हणजे शिक्षण धोरणाची गुणवत्ता तपासण्याची वेळ आता आलेली आहे. त्यामुळे आपण श्वेतपत्रिका काढून चित्र स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. येथे शिक्षणावर भाषण देणे सोपे आहे. प्रत्यक्षात बजेटमधील एक रुपयासुध्दा गोरगरिबांपर्यंत पोहचत नाही अशी परिस्थिती आहे. या शासनाला शिक्षणाची अनास्था आहे. या सभागृहामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले होते की, शिक्षकांचे पगार हे एक तारेखलाच होतील. एक तारखेला शिक्षकांना पगार दिले जातील अशी घोषणा या सभागृहात झालेली असतांना देखील शिक्षकांना महिन्याच्या एक तारखेला कधीच पगार मिळत नाही. त्यांना दोन-दोन, तीन-तीन महिने पगार मिळत नाही. शिक्षकांना पगार वेळेवर मिळत नसल्यामुळे त्यांना घराचे हप्ते वेळेवर भरता न आल्यामुळे वर्षाला 5-6 हजार रुपये बँकाचे फाईन भरावा लागतो ही लाजीरवाणी गोष्ट आहे. आज सुध्दा शिक्षकांना पगार वेळेवर दिले जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या राज्यातील पाच लाख विद्यार्थी असे आहेत की त्यांना 1 ते 5 अंक सुध्दा काढता येत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे श्वेतपत्रिका काढावयाची असेल तर या 5 लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य काय राहणार आहे याची सुध्दा चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी नेमका मुद्दा उपस्थित केलेला आहे. या राज्यातील 5 लाख मुलांना का लिहिता येत नाही, 2 लाख मुले का शाळेत जात नाही याची माहिती दिली तर शासनाचे धिंडवडे निघतील. शासन काहीच देणार नाही आणि विद्यार्थ्यांना सांगणार घ्या तुम्ही शिक्षण तर ते कसे काय शक्य आहे? या राज्याच्या आरोग्याची परिस्थिती सुध्दा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासारखीच आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची शिक्षणाच्या संदर्भात जर एवढी तळमळ असेल तर शिक्षणावर एक दिवस चर्चा घेऊ या मी त्या चर्चेला उत्तर देण्यास तयार आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात चर्चा घ्यावी अशी मी तीन अधिवेशनापासून मागणी करीत आहे. परंतु तरी सुध्दा चर्चा लावली जात नाही.

सभापती महोदय, राज्यातील आरोग्याच्या संदर्भात मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. राज्यातील माता मृत्यूचा दर 135 वर पोहचला आहे, राज्यातील स्त्रियांचे प्रमाण हजारी 800 ते 850 वर पोहचले आहे. राज्यातील आरोग्य सुविधांचा बोजवारा उडालेला आहे. दवाखाना असेल तर डॉक्टर नाही, डॉक्टर असेल तर औषध नसेल, औषध असेल तर सुविधा नाही त्यामुळे तेथील डॉक्टर पेशंटलर डॉक्टर सांगतात की, आपण खाजगी हॉस्पीटलमध्ये जा आणि उपचार करुन घ्या अशी राज्य शासनाच्या आरोग्य सेवेची परिस्थिती आहे.

सभापती महोदय, आपण आरोग्य सेविकांना किती पैसे देतो याचा विचार केलेला आहे काय?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

आरोग्य सेविकांना फक्त एक हजार रुपये दिले जातात. या पैशामध्ये त्यांनी वाडी वस्तीमध्ये दारोदार फिरुन महिलांना कॅल्शियमच्या गोळया द्यावयाच्या आणि लहान मुलांना पोलिओचे डोस पाजावयाचे आहेत. त्याचप्रमाणे वाडया वस्त्यामध्ये फिरुन कुंत्री, मांजरे किती आहेत याची आकडेवारी गोळा करण्याचे काम देखील त्यांना करावे लागते. जर शासनाला आरोग्य सेवा सक्षम करावयाची असेल तर आरोग्य सेविकेपासून इस्पितळाच्या सुसज्जतेपर्यंत विविध बाबीसाठी भरीव तरतूद अर्थसंकल्पात करण्याची आवश्यकता आहे परंतु अशा प्रकारची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही ही तरतूद करण्यात यावी याकडे मला माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, राज्यातील एका मोठया सारस्वताचे निधन झाले होते. कै. बाबुराव बागूल यांचे काल निधन झाले होते. केवळ दलित साहित्यालाच नाही तर मराठी साहित्याला समृध्द करणारा आणि क्रांतीचे तत्वज्ञान देणारा असा हा एक मोठा साहित्यिक होता. श्री.नरेंद्र जाधव यांनी असे सांगितले होते की, त्यांचे साहित्य जर इंग्रजीतून प्रकाशित झाले असते तर त्यांना नोबल पारितोषिक मिळाले असते. आपण गुरु महाराजांना वंदन करतो परंतु कै. बाबुराव बागुलांना वंदन करतो काय ? त्यांचे निधन झाल्यामुळे वास्तविक येथे शोक प्रस्ताव मांडावयास पाहिजे होता. हा शोक प्रस्ताव मांडण्यास पुढाकार घ्यावयास पाहिजे होता परंतु तो मांडण्यात आला नाही तेव्हा हा शोक प्रस्ताव का मांडण्यात आला नाही हे मला माहीत नाही. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, निदान उद्या तरी हा शोक प्रस्ताव मांडण्यात यावा.: सभापती महोदय, कै. बाबुराव बागुल यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळालेले नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावर बोलावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. साहित्य संमेलनाकरता आपण अर्थसंकलपामध्ये दर वर्षी 25 लाख रुपयांची तरतूद करीत असतो. या राज्यातील मराठी भाषा आणि मराठी साहित्य जर समृध्द व्हावयाचे असेल तर तिचे सर्व प्रवाह देखील समृध्द झाले पाहिजेत आणि ते सशक्त झाले पाहिजेत. हे शासन केवळ सदाशिव पेठेसाठी देणगी देणार असेल आणि बाकीच्या वाड्या ताड्यांना मात्र देणगी देणार नसेल तर ते बरोबर होणार नाही. तेव्हा त्यांना देखील देणगी देण्यात यावी म्हणून मला या मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

. सभापती महोदय, दलित साहित्य समेलन , आदिवासी साहित्य संमेलन, विद्रोही साहित्य संमेलन इत्यादीसाठी भरीव तरतूद करावयास पाहिजे. कै. बाबुराव बागूल हे विद्रोही साहित्य संमेलनाचे पहिले अध्यक्ष होते. या साहित्य संमेलनासाठी शासन तरतूद का करीत नाही ? त्यांच्यासाठी पैशाची तरतूद करणे आणि सर्व प्रवाह सशक्त करणे ही शासनाची प्रमुख जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे विविध बोली भाषेची संमेलने भरविण्यात येतात. ख्रिश्चन साहित्य संमेलन, मुस्लिम साहित्य संमेलन भरविण्यात येते तेव्हा त्यासाठी निधीची तरतूद करावयास पाहिजे त्याचप्रमाणे मराठी भाषा सशक्त करण्यासाठी जो प्रयत्न केला जातो त्याला शासनाने साथ दिली पाहिजे मराठी भाषेला समृध्द करण्यासाठी जे प्रयत्न करीत आहेत त्यांना शासनाने निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे व साथ दिली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देतांना माननीय मंत्रीमहोदयांनी याबाबतीत खुलासा करावा. ज्याप्रमाणे साहित्य संमेलनाकरिता 25 लाख रुपये देता तेव्हा यांना सुध्दा कमीत कमी पाच लाख रुपये देण्यात येतील असे उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदय सांगतील अशी मी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की आपले भाषण सुरु होऊन 24 मिनिटे झालेली आहेत. अर्थसंकल्पावर 30 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तेव्हा प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी 20 मिनिटे बोलावयाचे ठरविले तरी पाच-सहा तास लागतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दोन तीन मिनिटामध्ये मी माझे भाषण संपवितो या राज्यातील अनेक मोठया जिल्हयांचे विभाजन करण्याचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे ठाणे जिल्हयाची लोकसंख्या एक कोटीच्या घरात गेलेली आहे. त्या जिल्हयावर प्रचंड ओझे पडत आहे. डिलिमिटेशनमुळे त्या जिल्हयात आता 24 मतदारसंघ निर्माण झालेले आहेत. ठाणे जिल्हयाचे तीन जिल्हे करण्यात यावे अशी मी मागणी करतो. नागरी पट्टयाचा एक जिल्हा, जव्हार पालघर हा आदिवासी विभागाचा एक जिल्हा आणि वसई - भिवंडीचा एक जिल्हा अशा प्रकारे तीन जिल्हे करण्यात यावेत अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय,. आणखी एक बाब मला या निमित्ताने मांडावयाची आहे. ती बाब ठाणे जिल्हयाशी ंसबंधित असून संपूर्ण राज्याच्या हक्काच्या दृष्टीने तो मुद्दा महत्वाचा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 15.20

श्री.कपिल पाटील...

ज्याला आपण "मुंबई हाय" म्हणतो परंतु तो प्रत्यक्षात "वसई हाय" आहे .या मुंबई हाय मधून मिळणारा गॅस संपूर्ण देशाला पुरविण्यात येतो . त्यावर संपूर्ण देशाचा अधिकार आहे त्यावर मी कधीही वाद घ्ालणार नाही परंतु महाराष्ट्राचा देखील या गॅसवर अधिकार आहे तो हिस्सा राज्याला मिळाला पाहिजे . संपूर्ण राज्यामध्ये पाईप लाईन टाकून हा गॅस पुरविण्यात आला तर त्यामुळे घरा घरात गॅस पोहोचेल तसेच अनेक उद्योगधंद्याना त्या गॅसचा उपयोग होऊ शकेल.व संपूर्ण राज्य समृध्द होईल.

सभापती महोदय, यानंतर मला ठाणे जिल्हयाच्या संदर्भात एक मुद्दा मांडावयाचा आहे आपण आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी तसेच कापूस उत्पादक शेतकऱ्यासाठी वेळोवेळी नुकसान भरपाई जाहीर केलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

ठाणे जिल्हयातील चिकू, नारळ आणि भोपळी मिरची या तीन पिकांचे सातत्याने 60 ते 70 टक्के नुकसान होत आहे. तरीसुध्दा शासनाकडून त्या पिकांचे पंचनामे करण्याचे सौजन्य दाखविले जात नाही. सभापती महोदय, हे नुकसान होत असल्यामुळे भोपळी मिरचीचे पिक संपले आहे. वसईची प्रसिध्द असलेली केळी संपली आहेत. चिकू या फळाला कीड लागत आहे. ती कीड कशी लागते यासंबधीचे संशोधन केले जात नाही. या पिकांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना दिली जात नाही. शेतकऱ्यांच्या शेतातील नारळ सुकत चालले आहेत, ते आकुंचन पावत आहेत. भोपळी मिरचीवर थ्रिप्स नावाची कीड पडत असून ती मिरचीमधील पाणी शोषून घेत आहे. मिरची आकसल्यामुळे ती बाजारामध्ये विकण्यास चांगली ठरत नाही व भाव मिळत नाही. तेव्हा ठाणे जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे काम शासनाने करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, कोकणासाठी 206 कोटींची कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. कोकणातील शेतकरी कर्जबाजारी असून सुध्दा तो वेळेवर आपले कर्ज फेडीत आहे. त्यामुळे त्याला आपण नुकसान भरपाई देणार की नाही याबाबतचा खुलासा करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील धरणामधील पाणी मुंबईसाठी वापरण्यात येते. ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याचा थेंब सुध्दा मिळत नाही. सूर्या धरणामधील पाणी उचलून ते शहरामध्ये आणले जात आहे. परंतु ठाणे जिल्हयाच्या पश्चिम किनारपट्टीवरील शेतीसाठी सूर्या धरणातील पाणी पोहोचविले जात नाही ते पोहोचविले पाहिजे.

सभापती महोदय, तिसरा व शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. ठाणे जिल्हयामध्ये डायमेकींगची कॉटेज इंडस्ट्री तेथील लोकांच्या स्वतःच्या ताकदीवर मोठया प्रमाणावर उभी आहे. या धंद्याला कोणत्याही सरकारने मदत दिलेली नाही. ठाणे जिल्हयातील पाच हजार घरांमध्ये डाय मेकींगचा व्यवसाय सुरु आहे. परंतु लोड शेडींगमुळे हा उद्योग अडचणीत सापडला आहे. या व्यवसायाला कॉटेज इंडस्ट्रीचा दर्जा नसल्यामुळे बँकेचे कर्ज मिळत नाही, शासनाच्या सवलती मिळत नाहीत. लोड शेडींगमुळे वीज मिळत नसल्यामुळे हा संपूर्ण धंदा अडचणीत सापडला आहे. त्यामुळे हा धंदा करणारे लोक कर्जबाजारी झाले आहेत. त्यामुळे या धंध्याकरिता वेळेवर वीज पुरविली पाहिजे आणि या डाय मेकींग धंद्याला कॉटेज इंडस्ट्रीचा दर्जा दिला पाहिजे. आपण जर हे केले तर ठाणे जिल्हयाच्या डहाणू तालुक्यामधील घरा-घरामध्ये हा व्यवसाय वाढीला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. कपिल पाटील....

लागेल. आज हे डाय बनवून देशात आणि परदेशामध्ये पाठविले जातात. दाग-दागिन्यांच्या, कलाकुसरीच्या वस्तूंचे डाय बनविण्याचे काम घरा-घरामध्ये चालते. आज या धंध्याला कोणत्याही सवलती मिळत नाही. बँकेकडून कर्ज मिळत नाही, त्यामुळे धंदा करणारे लोक खाजगी सावकाराकडून कर्ज घेतात. हा शेतकऱ्यांचा जोड धंदा असल्यामुळे या धंद्याला आपण कॉटेज इंडस्ट्रीचा दर्जा ध्यावा अशी विनंती करुन आपण मला भाषण करण्याकरिता अधिक वेळ दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या पुस्तकातील पृष्ठ क्र. 15 वर असे लिहिले आहे की, "कमी उत्पन्न गट व मध्यम वर्गाकरिता परवडणाऱ्या सदनिका उपलब्ध करुन देणार". संपूर्ण गृहनिर्माण विभागावर बोलावयाचे म्हटले तर गेल्या 15-20 दिवसांमध्ये बिल्डरांचा या गृहनिर्माण विभागामध्ये पिंगा चालला आहे. मला असे वाटले होते की, समाजवादी समाजरचनेविषयी आपण बोलाल. परंतु एफ.एस.आय. वाढवून देण्याचा आपला विचार असल्यामुळे आपण बिल्डरांच्या बाजूने बोलत आहात. कमाल नागरी जमीन धारणा कायदा रद्द करण्यात आला. त्यामागचा उद्देश असा होता की, शासनाला जी अतिरिक्त जमीन मिळणार आहे. त्या जमिनीवर गरिबांसाठी घरे बांधण्यात येतील. असे माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये म्हटले आहे. मुळात या देशात कोणतीही योजना तयार करावयाची झाली तर उदा. इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा प्रकल्प, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान इत्यादी योजना असो, किंवा या देशातील सर्व रस्ते, सर्व बंधारे, सर्व संकल्प नेहरु गांधी घराण्याच्या नावाने सोडले जातात. या देशामध्ये इतर महापुरुष झाले नाहीत काय? असा याचा अर्थ आहे. मुळात आपण जाहीर केले आहे की, 2 लाख 50 हजार झोपडपट्टयांचे पुनर्वसन करणारी घरे बांधणार आणि दीड लाख मध्यमवर्गीयांसाठी घरे बांधणार.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

सभापती महोदय, मी विचारु इच्छितो की, घरे बांधण्यासाठी जमीन कोठून आणणार ? या मुंबई शहरामध्ये जमिनीचा एक तुकडाही उरलेला नाही. या मुंबई शहरामध्ये 338 व्यक्तींकडे 15 हजार हेक्टर जमीन आहे. त्यापैकी एकट्या गोदरेजकडे 2500 हेक्टर जमीन आहे. बेहरामजी जिजूभाईकडे 600 हेक्टर जमीन आहे. दिनशॉ ट्रस्टकडे 800 हेक्टर जमीन आहे. एस्सेल वर्ल्डकडे 650 हेक्टर जमीन आहे. ॲम्युझमेंटकडे 300 हेक्टर हमीन आहे. मग आपण गरिबांना घरांसाठी जागा कोठून देणार ? धारावीमध्ये 300 हेक्टर जमिनीपैकी फक्त 18 हेक्टर जमिनीमध्ये सर्वसामान्य माणसांना कोंबणार आणि उरलेल्या 288 हेक्टर जमिनीवर आपण 4 एफ.एस.आय. देणार आहात. आपण गरिबांची भाषा करता. मुंबई शहरामध्ये आपल्याकडे जमीन कोठे उरली आहे ? व्हेकंट लँड टेनन्सी ॲक्टनुसार जी जमीन उपलब्ध व्हावयास पाहिजे होती त्यामध्ये 16676 हेक्टर जमीन उपलब्ध झाली. त्यापैकी फक्त 5556 हेक्टर जमीन संपादित करण्याची कायदेशीर तरतूद झाली आणि प्रत्यक्षात 4050 हेक्टर जमीन ताब्यात आली. त्यापैकी 2500 हेक्टर जमिनीवर अनधिकृत बांधकामे आहेत. आपण घरे कोठे बांधणार ? आपण नवीन धोरणामध्ये काय कायदा करणार आहात ? आपण कोणता फसवा कायदा करणार आहात ? यामध्ये आपण असे लिहिले आहे की, मोकळ्या जमिनीवर आम्ही कर घेणार आहोत. म्हणजे माझ्याकडे जर अतिरिक्त जमीन असेल आणि मी जर अतिरिक्त जमिनीमध्ये विवक्षित काळासाठी घरे बांधली नाहीत तर त्या ठिकाणी आपण माझ्यावर कर बसविणार आहात. बाजार भाव वाढेपर्यंत मी आपल्याला कर देत राहीन. ज्या ठिकाणी एक चौरस फुटाचा भाव 2 हजार ते 5 हजार रुपये असेल त्या ठिकाणी आपण माझ्याकडून 1 रुपया घेणार आहात आणि मी तो देणार आहे. माझी अशी मागणी आहे की, व्हेकंट लँड टेनन्सी ॲक्ट नुसार किती जमीन मुक्त झाली याची आपण पाहणी करावी. आपण व्हेकंट लँड टेनन्सी ॲक्ट रद्द केला. तो कायदा रद्द केल्यानंतर आपण आता गृहनिर्माण विभागातर्फे पाहणी केली पाहिजे. कोणाकडे किती जमीन गेलेली आहे याची पाहणी केली पाहिजे. माझी अशी मागणी आहे की, आपण याबाबतीत कायदा करावा. शासनातर्फे जे बांधकाम होईल, खाजगी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

विकासकांतर्फे जे बांधकाम होईल त्यासंदर्भात परवा माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेबांनी असे सांगितले की, 30 टक्के बांधकाम आम्ही अल्प उत्पन्न गटासाठी, मध्यमवर्गीयांसाठी करु. आपण या अर्थसंकल्पामध्ये 10 टक्के लिहिले आहे. माननीय श्री. राणे साहेब 30 टक्के म्हणाले. या मुंबई शहरामध्ये आपण 30 लाख, 35 लाख, 40 लाख रुपयांमध्ये कोणता पोलीस घर घेणार आहे ? कोठला कारकून घर घेणार आहे ? कोठला शिपाई घर घेणार आहे ? कोठला कंडक्टर घर घेणार आहे ? कोठला टॅक्सी ड्रायव्हर घर घेणार आहे ? कोठला माथाडी कामगार घर घेणार आहे ? कोठला शिक्षक घर घेणार आहे ? कोठला सेवानिवृत्त माणूस घर घेणार आहे ? काही सन्माननीय सदस्य आमदारांचा उल्लेख करीत आहेत. सगळे आमदार दोन नंबरचा पैसा आणि भ्रष्टाचाराची माती तोंडात घालून गडगंज संपत्ती मिळवत नाहीत. प्रामाणिकपणे काम करणारे अनेक आमदार आपल्या पक्षात तसेच सगळ्या पक्षात आहेत. आपण मला टोकू नका. हा या ठिकाणी बोलण्याचा विषय नाही. आपली प्रतिमा आपण खराब करुन घेऊ नये. माझी अशी मागणी आहे की, जी अतिरिक्त जमीन असेल त्यातील 60 टक्के बांधकाम आपण राखीव ठेवले पाहिजे. त्या 60 टक्क्यापैकी 35 टक्के बांधकाम वन बीएचके म्हणजे एक बेडरुम किचन एवढे करावयास सांगितले पाहिजे. उरलेल्या 25 टक्क्यामध्ये 2 बीएचके बांधकाम केले पाहिजे. आपण आता कायदा आणणार आहोत. विजेच्या संदर्भात जसे कमिशन नेमले तसे हाऊसिंगसाठी कमिशन नेमणार आहात. आपण त्यामध्ये सांगितले पाहिजे की, यामध्ये दर लावताना बांधकामाची कॉस्ट, जमिनीचा भाव आधिक त्याला जो 80 टक्के 100 टक्के नफा घ्यावयाचा असेल तो धरावा. म्हणजे 2 हजार रुपये प्रति चौरस फूट दराने जागा मिळाली तरी 350-400 चौरस फुटाची जागा एखादा मध्यमवर्गीय गरिबाला 7 ते 8 लाख रुपयांमध्ये मिळेल आणि 2 बेडरुम किचनची जागा 12 लाख रुपयांमध्ये मिळेल. असा कायदा आपण करणार आहात काय ? आज सकाळी काही बिल्डरचे आम्हाला फोन आले की तुम्ही धोरणावर बोलणार आहात तेव्हा आपण असे म्हणावे की, 70 टक्के रहिवाशांनी मान्यता दिल्यानंतर असे जे आहे तसे न करता 50 टक्केच करा आणि 70 वर जी कॅप आहे ती काढून टाका. म्हणजे शासन जी काही बंधने घालणार आहेत ती सगळी काढून

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

टाकावयाची काय ? हाऊसिंगचे धोरण बिल्डर ठरविणार काय ? या मुंबई शहराच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण आहे. गृहनिर्माण खात्याचे राज्यमंत्री ज्यांना केले आहे त्या व्यक्तीबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. त्या मंत्र्यांना काही कळतच नाही. ते या ठिकाणी येतच नाहीत. कधी गृहनिर्माण भवनामध्ये जाऊन बसत नाहीत. आपण त्यांना कधी सांगितले काय ? त्यांनी म्हाडा ॲक्ट सुध्दा कधी वाचला नसेल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ श्री.बरवडनंतर 15:35

श्री.मधुकर चव्हाण.....

युएलसी कायद्यानुसार जमीन झाल्यानंतर जमिनीचे भाव खाली येतील असे म्हटले होते. पण प्रत्यक्षात जमिनीचे भाव खाली आले काय ? दादर, परळ, लालबाग या भागांमध्ये प्रती चौ.फूटाचा भाव 2 हजार, 3 हजार रुपये इतका होता. आता 5 हजार, 6 हजार, 7 हजार रुपये प्रती चौ.फू.असा भाव झालेला आहे. या किंमतींवर शासनाचे नियंत्रण आहे काय ? शासन केवळ गृहनिर्माणाच्या योजना जाहीर करीत आहे. त्यानुसार शासनाने आता क्लस्टर डेव्हलपमेंटची संकल्पना पुढे आणली आहे. 4 हजार चौ.फूट जागा असेल ती एकत्रित केली पाहिजे. मागील 15 दिवसापासून बिल्डर्स मागणी करीत आहेत की, 4 हजाराची मर्यादा कमी करुन 2 हजार चौ.फू.इतकी करावी. 50 इमारती, 30 इमारती, 20 इमारती करु नये. आमच्या 'सी' वॉर्डचा विकास करण्यासाठी काही बिल्डर्स एकत्र आले आहेत. काही लोकांना त्यांनी एकत्र करुन असे म्हटले आहे की, आम्ही तुमच्या वॉर्डाचा विकास करणार आहोत. माझे असे म्हणणे आहे की, मुंबई शहराप्रमाणे पुणे, नागपूर यासारख्या शहरांचा तुकडया तुकडयांमध्ये विकास करु शकणार आहात काय ? करु शकणार नाही.

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )** : माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, आपण भाषण सुरु करुन 11 मिनिटे झालेली आहेत. त्यामुळे आपण भाषण आटोपते घ्यावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, अर्थसंकल्पावरील चर्चेचे भाषण दोन मिनिटात संपविण्याची कायद्यात तरतूद नाही. अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी आपण वेळ वाढवावी. इतक्या कमी वेळेत आम्हाला आमचे विचार मांडता येणार नाहीत. या मुंबई शहरामध्ये 19,600 जुन्या इमारती होत्या. त्यापैकी फक्त 800 इमारतींचे पुनर्वसन केलेले आहे. उर्वरित इमारतींचे पुनर्वसन करण्यासाठी दरवर्षी 500 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या वर्षाच्या अर्थसंकल्पात घरदुरुस्ती मंडळासाठी 38 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. 40 कोटी रुपये सेसमधून जमा झ ाल्यानंतर तेवढेच तदर्थ अनुदान शासनाने देणे बंधनकारक आहे. परंतु शासनाने मुंबई घरदुरुस्त मंडळाचे दोन तीन वर्षापासून 300-350 कोटी रुपये या दिलेले नाहीत. मग हे मंडळ कोणत्या निधीतून घरे बांधणार आहे ? शासन गृहनिर्माण धोरण आखणार आहे त्यावेळी

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

सर्वसामान्य माणसाला डोळयासमोर ठेवले गेले पाहिजे. आज दादर, परळ, लालबाग, शिवडी, कुलाबा, भायखळा या भागामध्ये आकाशाला गवसणी घालणारे मोठमोठे टॉवर्स उभे रहात आहेत. या टॉवर्समधील फ्लॅट 2 हजार चौ.फूटाचे आहेत, 1500 हजार चौ.फूटाचे आहेत. शासनाने झ ाोपडपट्टयांच्या पुनर्वसनाच्या योजना आणल्या आहेत. तो बिल्डर पुनर्वसनाचा भाग पूर्ण करतो, त्यातून झोपडपट्टयांचे पुनर्वसन केले जाते आणि उर्वरित सेलेबल एफएसआयमधून उपलब्ध झ ाालेल्या घरात श्रीमंत लोक रहात आहेत. गोरेगाव येथील बिंबीसार नगर येथे मंडळाने 12 लाख, 14 लाख रुपये किंमतीचे फ्लॅट्स बांधले आहेत. अनेक फ्लॅट्स बंद आहेत, त्याची पाहणी केली पाहिजे. लोकांनी केवळ पैशांची गुंतवणूक करण्यासाठी फ्लॅट घेऊन ठेवले आहेत. एखादी इमारत उभी राहिली आणि दुस-या दिवशी चौकशीसाठी गेलो तर हेच फ्लॅट रिसेलमध्ये विक्रीसाठी उपलब्ध होत आहेत असे सांगितले जाते. याचा अर्थ काही लोकांनी पैशाची गुंतवणूक करण्यासाठी हे फ्लॅट खरेदी करुन ठेवले आहेत. म्हणून माझी अशी मागणी आहे की, एखाद्याने फ्लॅट रजिस्टर केल्यानंतर 5 वर्षे तो दुस-याला देता येणार नाही अशी अट घातली पाहिजे. त्यामुळे सर्व दोन नंबरचे धंदे बंद होतील. सध्या रिसेलचे 5500 फ्लॅट्स टाळे लावून बंद आहेत. शासनातर्फे गृहनिर्माण योजना निश्चित केल्या जातील त्यावेळी भूमिपुत्रांना जागा मिळाली पाहिजे. ज्याचा मुंबई शहरात जन्म झाला त्यालाच शासनाच्या योजनेतून मुंबईत घर घेता येईल. सध्या काय होत आहे की, बिहारचा माणसू, तामीळनाडूचा माणूस मुंबईत आल्यावर दोन नंबरचा पैसा मुंबईत गुंतवितो. फ्लॅट विकत घेऊन तो भाडयाने देतो. डॉ.आंबेडकर मार्गावर लालबाग भागामध्ये श्रीकृपा नावाची पुनर्रचित इमारत झालेली आहे. तेथे 225 चौ.फूटाच्या सदनिकेचे भाडे 12 हजार रुपये, 14 हजार रुपये भाडे घेतले जाते. पालव नावाचा शिपाई माझ्या भागात राहतो. त्याला जुनी जागा विकून 7 लाख रुपये मिळाले आहेत. त्याच्यासमोर इमारत पडलेली आहे. दलाल 20 लाख रुपये भाव सांगतो. जी मुंबई मंडळाने बांधलेली आहे. माननीय गृहनिर्माण मंत्र्यांनी गृहनिर्माण भवनामध्ये जाऊन लोकांचे दु:ख काय असते ते पाहिले आहे काय ? गृहनिर्माण भवनाला दलालांचा विळखा पडलेला आहे. अधिका-यांच्या माध्यमातून सभागृहात असत्य उत्तरे दिली जातात. संक्रमण

3...

श्री.मधुकर चव्हाण.....

शिबिरामधील 7500 गाळयांमध्ये बेकायदेशीरपणे घुसखोर रहात आहेत. त्यांना हे शासन बाहेर काढू शकत नाही. त्यामुळे जुन्या इमारतींमध्ये लोक जीव मुठीत घेऊन रहात आहेत. शासन मात्र त्या इमारतीखाली ही जागा रहाण्यासाठी अयोग्य अशी नोटीस लावते. मग ते लोक ती नोटीस घेऊन इस्टेट मॅनेजरकडे जातात, त्यावेळी ते सांगतात की, जागा नाही. याचा अर्थ आंधळं, दळते कुत्रं पीठ खाते. विरोधासाठी विरोध करणे यासाठी आम्ही येथे बोलत नाही. या भाषणामध्ये गरिबांसाठी लाखो घरे बांधण्याचे जाहीर आहे. लोकांसमोर एक स्वप्न ठेवले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ 15:40

(श्री. मधुकर चव्हाण...)

1960 च्या दरम्यान मुंबई शहरामध्ये जवाहर नगर, मोतीलाल नगर, अभ्युदय नगर, आदर्श नगर, विक्रळीचे कन्नमवार नगर अशा वसाहती बांधण्यात आल्या. त्या वेळी सर्वसामान्य माणूस हा तेथे घर घेऊ शकत होता. त्यानंतर आमच्या युतीच्या काळात आम्ही 5 वर्षामध्ये साडेसात हजार गाळे बांधले.1960 नंतर आतापर्यन्त या मुंबई शहरामध्ये मोठमोठी नगरे निर्माण झाली. त्यावेळी हिंद सायकल, प्रिमियर मध्ये काम करणारा, विकासाच्या कामासाठी हातभार लावणारा कष्टकरी कामगार घर घेऊ शकत होता. परंतु आज सर्वसामान्य माणूस घर घेऊ शकतो काय ? तो घर घेऊ शकत नाही. आता म्हाडामध्ये स्वाधीन क्षत्रिय नावाचे चांगले कार्यक्षम अधिकारी आलेले आहेत. ते प्रामाणिकपणे काम करतात. ते अधिकारी त्यांचे प्रशासकीय निर्णय घेतील, परंतु राजकीय निर्णय घेण्याचे अधिकार हे सरकार पक्षाचे आहेत. उपनगरांसाठी 1.33 एफएसआय दिला. आपण 0.33 एफएसआय वाढवून दिल्यानंतर विकासकाला अटी घालणार आहात काय ? आज उपनगरामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर नाही, सांडपाणी वाहून जाण्याची व्यवस्था नाही. मुंबईशहरामध्ये कॉंक्ट्रीट जंगलाचे प्रमाण 95 टक्के झालेले आहे. आज मुंबई शहरामध्ये पडलेल्या पावसाचे पाणी वाहून जाते काय ? चालायला रस्ते आहेत काय ? पदपथ आहेत आहे ? पार्किंगची व्यवस्था आहे काय ? मैदाने आहेत काय ? बागबगीचे आहेत काय ? म्हणून मला असे वाटते की, हौसिंग पॉलिसीच्या बाबतीत एक सर्वंकष असा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. हौसिंग पॉलिसी ठरविताना बिल्डरच्या प्रभावाने प्रभावित न होता सर्वसामान्य माणसाला घर कसे मिळेल हे पाहिले पाहिजे. आज श्रीमंत माणसे बाजारात कितीही पैसे टाकून फॅल्ट विकत घेत आहेत. 50 लाख, 1 कोटी अशा फ्लॅटच्या किंमती आहेत. माटुंगा सर्कलच्या ठिकाणी जे आरोरा थिएटर आहे त्याठिकाणच्या एका 4 बेड रुम्सच्या फ्लॅटची किंमत 1 कोटी रु. आहे. एकेका मजल्यावर एकेक फ्लॅट आहे. अशा परिस्थितीमध्ये सर्वसामान्य माणूस घर घेऊ शकेल काय ? मुंबईतील सर्वसामान्य माणूस हा जीव मुठीत घेऊन जगत आहे. मंत्रालयाच्या परिसरातील एखादा कारकून निवृत्त झाला असेल, त्याला 2 मुले असतील आणि त्या मुलांना त्याठिकाणी एस्टॅब्लिश करण्याची त्याची इच्छा असली तरी त्या ठिकाणी तो आपल्या मुलाला घर घेऊन देऊ शकणार नाही. यू.एल.सी. ॲक्ट रद्द झालेला आहे. तेव्हा बिल्डरला इमारती बांधताना अट टाका, की तुला जमीन मुक्त केलेली आहे, तेथे तू घरे बांध आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

पैसे मिळव, परंतु जे बांधकाम तू करशील त्यातील 60 टक्के बांधकाम हे आरक्षित असले पाहिजे. त्या पैकी 30 टक्के बांधकाम हे वन बेडरुम किचन अशा घरांचे आणि 30 टक्के बांधकाम हे टू बेडरुम किचन अशा घराचे असावे. जेणेकरुन 7 ते 10 लाखपर्यन्त सर्वसामान्य माणसाला घर मिळेल. या मुंबई शहरामध्ये कोणीही यावे आणि रहावे. मी प्रांतवाद किवा कोणत्या राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. या मुंबई शहरामध्ये भौगोलिकदृष्ट्या केवळ 65 लाख लोक राहू शकतात. पण आज या मुंबई शहरामध्ये 1 कोटी 35 लाख लोक राहात आहेत. सभापती महोदया, या सभागृहामध्ये 78 सदस्यांची बसण्याची व्यवस्था असेल आणि 200 सदस्य बसविण्याचे ठरवले तर ते बसू शकतील काय ? म्हणून मुंबईमध्ये येणा-या लोंढयांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. आपण 2000पर्यन्तच्या झोपड्या अधिकृत करण्यास मान्यता दिलेली आहे. हे शासन केवळ मते मिळविण्यासाठी आकर्षक घोषणा करते, मायाजाळ निर्माण करते. परंतु या घोषणा करीत असताना येथे राहाणा-या लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्यांच्या शौचालयाची, पिण्याच्या पाण्याची, रस्त्यांची, वाहतुकीची व्यवस्था केली पाहिजे. आज मुंबई शहरातील नागरिक रल्वेमधून जीव मुठीत घेऊन प्रवास करतो, पदपथावरुन जीव मुठीत घेऊन चालतो, जीव मुठीत घेऊन रोड क्रॉस करतो. जो पर्यन्त या मुंबईचा नियोजनबद्द विकास होणार नाही तोपर्यन्त या मुंबईमध्ये पुढील 25 वर्षे तरी सुखाने राहाता येणार नाही.

सभापती महोदया, आता टाटाची एक लाखाची नॅनो कार येणार आहे. ही गाडी मुंबईत आली तर मुंबईचे काय होईल ? सामान्य माणसालाही गाडी घेण्याचा अधिकार आहे. परंतु माझा अधिकार हा दुस-याच्या मरणाला कारणीभूत होता कामा नये. मला सर्व गोष्टींचा आनंद घेण्याचा अधिकार आहे. पण तो अधिकार वापरत असताना दुस-याला कष्ट करण्याचा मला अधिकार नाही. तेव्हा टाटाला ही गाडी मुंबई न आणण्याची अट टाका. गृहनिर्माण योजना राबवित असताना बिल्डरांच्या प्रभावाखाली येऊ नका, येथील भूमिपुत्रांना, सर्वसामान्यांना,गरिबांना परवडतील अशी घरे बांधण्याची योजना आखा एवढे सांगून आणि सभापती महोदया, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

--

... नंतर श्री. गिते...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जितेन्द्र आव्हाड ( नामनियुक्त ) :सभापती महोदय, मी बजेटवर भाषण करण्यापूर्वी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे की काल बुधवार, दिनांक 27 मार्च रोजी ज्येष्ठ साहित्यिक श्री. बाबुराव बागूल यांचे नाशिक येथे निधन झाले, त्या संदर्भात महाराष्ट्राच्या 12 कोटी जनतेच्या वतीने त्यांना श्रध्दाजली अर्पित करण्यासाठी या सभागृहात शोक प्रस्ताव घेण्यात यावा, या सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांच्या मी मताशी सहमत आहे. तरी उद्या या सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक श्री बाबुराव बागूल यांना श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी शोक प्रस्ताव घेण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. ज्येष्ठ साहित्यिक श्री बाबुराव बागूल यांनी महाराष्ट्रीलच नव्हे तर देशाचे साहित्य समृध्द केले. साहित्य क्षेत्रामधील त्यांचे योगदान इतके मोठे आहे की त्यांना नोबल पारितोषिक मिळू शकले असते.

सभापती महोदय, गेल्या दोन दिवसापासून या सभागृहात अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेला सुरुवात झालेली आहे. या चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपापली मते मांडलेली आहेत. मी सुरुवातीला सांगू इच्छितो की, "मेरा मकसद हंगामा खड़ा करना नहीं है. मैं सूरत बदलना चाहता हूं." यावर बरीच टिंगल टवाळी झाली. केंद्रीय अर्थसंकल्प बघितला आणि राज्य शासनाचा अर्थसंकल्प नीटपणे बघितला तर खरोखरच वाटते की, सूरत बदलनी चाहिये याबाबतीत आम्ही ठाम आहोत. चांगल्या माणसाचा चेहरा बदलतो. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल साहेब तुमचा चेहरा कसा बदलणार ? चेहरा बदलण्यासाठी चेहरा चांगला लागतो. श्री.पाशाभाई जाऊ द्या, ते तुमचे काम नाही. आम्ही आम आदमीचा चेहरा बदलण्याची शपथ घेतलेली आहे आणि त्यास अनुसरुन प्रत्येक पाऊल सरकारकडून टाकले जात आहे त्याबाबतीत मी शासनाचे अभिनंदन करतो. माननीय केंद्रीय कृषि मंत्र्यांना आम्ही जाणता राजा म्हणून पदवी बहाल केली आहे. त्यांचा वारंवार जाणता राजा म्हणून आम्ही उल्लेख या सभागृहात करीत असतो. परंतु ज्या प्रमाणे आम्ही त्यांना जाणता राजा पदवी बहाल केली आहे, त्याप्रमाणे विरोधी पक्षाचे सदस्य देखील त्यांना जाणता राजा म्हणून पदवी बहाल करतात, त्यामुळे विरोधी पक्षाचे देखील मी या निमित्ताने आभार मानतो. त्यांनी आपल्या माध्यमातून या देशातील सर्वसामान्य शेतक-यांना न्याय मिळवून दिला आहे. शेतक-यांनी विदर्भात आत्महत्या केल्या आहेत. त्याप्रमाणे आंध्र प्रदेशातील तेलंगणा येथे देखील शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. मेघालय येथील नॅरोहिल येथे शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. डेहराडून, केरळमधील कोट्टियम येथील शेतक-यांनी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

आत्महत्या केल्या आहेत. देशात शेतक-यांच्या होत असलेल्या आत्महत्येची आपल्याला माहिती नसते, परंतु ही बाब केंद्र शासनाला माहिती असते. त्या महितीच्या आधारे केंद्र शासनाकडून देशाचे धोरण ठरविले जाते. केंद्र सरकारच्या कर्जमाफीच्या निर्णयामुळे देशातील तमाम शेतक-यांना न्याय मिळाला आहे. महाराष्ट्रातील 76 टक्के शेतक-यांना न्याय मिळाला आहे. मेघालयात 97 टक्के शेतक-यांना न्याय मिळाला आहे. वेस्ट बंगालमधील 95 टक्के शेतक-यांना न्याय मिळाला आहे. परंतु आपल्याला प्रांतवार विभागणी करुन चालणार नाही. पण या देशातील आणि या राज्यातील बळीराजांना न्याय देण्याचा आमचा विचार होता, तो विचार आम्ही पुढे आणला, आणि तो अंमलात देखील आणला. पाच एकर शेती असलेल्या तसेच दहा एकर शेती असलेल्या शेतक-यांना खरोखरच या निर्णयामुळे न्याय मिळालेला आहे. शेतक-यांना न्याय मिळण्यास सुरुवात झाली आहे ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे. चेहरा बदलतो आहे. हंगामा खड़ा करना हमारा मकसद नही हैं. मी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, शासनाने चांगले निर्णय घेतले असतील तर त्या निर्णयांना चांगले म्हटले पाहिजे. पण सगळीकडे चेहरा विद्रुप करण्याचे कारण नाही. शोर मचाना मेरा मकसद नहीं है. सूरत तो देखो. मला असे वाटते की, या अर्थसंकल्पाकडे चांगल्या दृष्टीकोनातून बघण्यात आले पाहिजे. मी संपूर्ण अर्थसंकल्प पाहिला त्यातील ब-याच गोष्टी वाचल्या. अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांसाठी वेगवेगळे प्रकल्प राज्य शासनाकडून राबविले जात आहेत. घरे बांधून देण्याचा कार्यक्रम हाती घेतला जात आहे. आम्ही विमुक्त व भटक्या समाजात जन्माला आलो आहोत, आमच्या समाजाला देखील न्याय देण्याच्या माध्यमातून शासन प्रयत्न करीत आहे. आम्ही जाणता राजाच्या पाऊलावर पाऊल टाकण्याचा प्रयत्न करीत आहोत. सत्तेची पर्वा न करता मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले गेले. एकीकडे मनुवादीचे समर्थन करणारे म्हणत होते की, " ज्यांच्या घरात नाही पीठ, ते मागता आहेत विद्यापीठ". आम्ही म्हणत होतो की, सत्ता गेली तर चालेल. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देऊन त्या विभागातील गरीब जनतेला न्याय दिला. तेथील गरीब जनतेला मुख्य प्रवाहात आणले. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशा प्रकारची तेथील सर्व जनतेची मागणी होती, ती मागणी या सरकारने पूर्ण केली आहे. आमचा चेहरा तोच आहे. आम्ही कधीही चेहरा बदलत नाही. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल

3...

श्री. जितेंद्र आव्हाड....

साहेब तुम्ही आमच्या बरोबर पदयात्रेत होतात. तुम्हाला काही तरी मिळाले म्हणून तुम्ही तिकडे गेलात हे सच्चर आयोगावरुन दिसून आले. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेब, सच्चर आयोगाच्या बाबतीत आम्ही तुमच्या डोळयात अश्रू पाहिलेले आहेत.

.

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 15:50

श्री. जितेंद्र आव्हाड ...

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : सन्माननीय सदस्य बोलत असताना इतर सन्माननीय सदस्यांनी खाली बसून कॉमेंटस् क रु नयेत. सभागृहाचे कामकाज अत्यंत गांभीर्याने चालविण्यास सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आम्ही चेहरा बदलत आहोत. मनुवाद्यांच्या नाकावर टिच्चून मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर केले. गावकुसाबाहेरील दलितांना न्याय मिळाला पाहिजे यादृष्टीने भूमिका घेतली. ज्यांना विरोध करावयाचा होता त्यांनी तो केला. संस्कृती बदलत नाही. संस्कार बदलत नसतात. त्याबद्दल तुमचे देखील अभिनंदन करतो. जे उपेक्षित आहेत त्यांना न्याय मिळाला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. एकलव्याचे वंशज आहोत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सैनिकी शाळेत पाठविण्यासाठी योजना आखली. त्यामुळे निश्चितच हे शासन कौतुकासाठी पात्र आहे. याठिकाणी शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. नरीमन पॉइंटपर्यंत सागरी सेतू वाढविणार आहोत. तुम्ही एन्रॉन पाण्यात बुडविला परत वर काढला. तुमच्या राजवटीत जो गोंधळ घातला त्याची फ ळे आज भोगत आहोत. किंमती वाढत आहेत. महाराष्ट्राचा युती शासनाने इतका बट्टयाबोळ केला की आज इतकी वर्षे झाली तरी त्याचे फळे भोगावी लागत आहेत. विजेचा तुटवडा त्यामुळेच निर्माण झाला आहे. युती शासनाने 5 वर्षे कसा कारभार केला आणि 5 वर्षामध्ये जो गोंधळ घातला याचे परिणाम आज भोगावे लागत आहेत.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा विनंती करते की, कृपा करुन परवानगीशिवाय कुणीही बोलू नये. खाली बसून कॉमेंटस् करु नयेत. सभागृहाचे कामकाज शांततेने चालविण्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, वांद्रे-वरळी सागरी पूल नरीमन पॉइंटपर्यंत वाढविण्यात येणार आहे यात मी चूक असे काय बोललो ? एन्रॉन तुम्ही बुडविला म्हणून बोललो. हंगामा खडा करना हमारा मकसद नही है हेच वाक्य गृहपाठ करुन आलेले आहेत. त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा ती काय करणार ? हमारा मकसद सूरत बदलना है. प्रामाणिकपणे काम करीत आहोत. गोंधळ घालायचा नाही, कुठे वाच्यता करायची नाही. जे करावयाचे ते करुन दाखविले आहे. जाणत्या राजाने शेतकऱ्यांना मदत केली. प्रसंगी टीका-टिप्पणी सहन केली. चोऱ्या सगळीकडे होतात. परंतु सहकार चळवळीने महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलून टाकला हे विसरुन

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 15:50

श्री.जितेंद्र आव्हाड ....

चालणार नाही. महाराष्ट्रातील गोरगरीब शेतकऱ्याला मग तो बीडमधील असो, औरंगाबादमधील असो किंवा पश्चिम महाराष्ट्रातील असो त्याच्या घरापर्यंत शिक्षण पोहोचविले. अर्थकारण मजबूत केले. अनेक गावांमधून अर्थकारण मजबूत केले. पश्चिम महाराष्ट्रात एक मोठा बेस तयार केला. केवळ पैसा आणि सबसिडी बघू नका. एकंदरीत गावाचे अर्थकारण, सामाजिक ताकद, बारा बलुतेदारी बदलून टाकली. विरोधी पक्ष म्हणून टीका होणारच आणि ती सहन करण्याची आमच्या क्षमता देखील आहे. परंतु जो विकास झाला त्याचा सर्वसामान्य माणसाला सार्थ अभिमान आहे. प्रसंगी टीका-टिप्पणी सहन करु. जे सूर्यावर थुंकतात त्यांची थुंकी त्यांच्याच तोंडावर पडते हा जगाचा नियम आहे हे विसरु नका.

नंतर श्री. भोगले

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड..........

त्यामुळे मला वाटते या अर्थसंकल्पाचा चेहेरा, या अर्थसंकल्पातील प्रत्येक वाक्य हे राज्य शासनाने सर्वसामान्यांच्या दृष्टीने टाकलेले विधायक पाऊल आहे असेच म्हणावे लागेल.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : सन्माननीय सदस्य भाषण करीत असताना सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाच्या बाजूने कोणीही खाली बसून पीठासीन अधिकाऱ्यांची परवानगी न घेता बोलणे योग्य नाही. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेकडे गंभीरतेने पहावे अशी मी विनंती करीत आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, एकेकाळी या महाराष्ट्रातील जनतेला सांगण्यात आले की, आम्ही फुकट घरे देऊ. कुठे गेली ती घरे? या राज्यातील प्रत्येक माणसाचे एकच स्वप्न असते. मला चार भिंती, एक छप्पर आणि असलेच तर घरामध्ये शौचालय असावे. प्रत्येक कुटुंबातील स्त्रीला सामाजिक सुरक्षितता, शारिरीक सुरक्षितता हवी असते. संसार करताना तो उघड्यावर करण्याची वेळ येऊ नये. डोक्यावर छप्पर मिळाले तर मी जन्माला आले त्याचे सार्थक झाले असे तिला वाटते. त्यासाठी शासनाने जे पाऊल उचलले आहे ते कौतुकास्पद आहे. सामान्य गरीब लोकांसाठी शासन छप्पर उभारीत आहे त्याबद्दल मनापासून कौतुक करतो.

सभापती महोदया, म्हाडाच्या वसाहतींबद्दल याठिकाणी बोलले गेले. मुंबईसाठी जे करीत आहात ते कौतुकास्पद असले तरी शासनाचे फक्त मुंबईकडे लक्ष केंद्रीत झालेले आहे. ते लक्ष आजूबाजूच्या परिसराकडे वळविण्यात यावे. मुंबईची वाढ आता संपली आहे. यापुढे मुंबईची वाढ होऊ शकत नाही. या मुंबईचा भार पेलण्याची ताकद असलेल्या दोन महानगरपालिका मुंबईला लागून आहेत, त्या महानगरपालिकांकडे लक्ष द्यावे लागेल. मुंबई शहरातील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करण्यासाठी 2.5 चा एफएसआय देत आहात. परंतु म्हाडाच्या वसाहती मिरा-भाईंदर, ठाण्यामध्ये देखील आहेत. त्यांनाही वाढीव एफएसआय मंजूर करण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणे 1960 साली मुंबईमध्ये टागोरनगर, कन्नमवारनगर, अभ्युदयनगरची उभारणी झाली. त्याप्रमाणेच 1960 साली ठाण्यामध्ये वर्तकनगर उभे राहिले. त्या वर्तकनगरच्या पुनर्विकासासाठी देखील वाढीव एफएसआय मंजूर करावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्रातील गरजांकडे अधिक लक्ष देण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, ठाणे शहराची

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...........

लोकसंख्या 1 कोटीपेक्षा अधिक झालेली आहे. ठाणे शहरामध्ये एखाद्या गरीब व्यक्तिला हार्टअटॅक आला तर उपचारासाठी सायन हॉस्पिटलपर्यंत यावे लागते. ठाण्यामध्ये खाजगी रुग्णालयात देखील कॅथलॅबची सोय उपलब्ध नाही. ठाण्याहून सायनला यायचे म्हटले तर दुपारच्या वेळेस देखील कमीत कमी सव्वादोन तास लागतात. एवढ्या मोठया लोकसंख्येच्या शहराला न्याय देण्यासाठी ठाणे शहरातील सामान्य रुग्णालयामध्ये कॅथलॅबची सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. 1 कोटी लोकसंख्या असलेल्या शहराला न्याय देणार नसाल तर तेथील लोकसंख्येवर तो अन्याय ठरेल.

सभापती महोदया, एमयुटीपी आणि इन्फ्रास्ट्रक्चरसंबंधी चांगली तरतूद केलेली आहे. मुंबई शहरामध्ये येण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधत असताना जलवाहतूक हा एक पर्याय आहे. बोरीवली ते नरिमन पॉईंटपर्यंत जलवाहतुकीची योजना आखलेली आहे. मुंबई हे बेटांचे शहर आहे. या शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणाहून जलवाहतूक होऊ शकते. आजूबाजूचा खाडी परिसर स्वच्छ केला तर आसपासच्या नागरिकांना देखील फायदा होऊ शकतो. यापुढे मुंबईचा विकास हा ठाण्याला लागूनच होणार आहे. बोरीवलीहून मिरा-भाईंदरमार्गे घोडबंदर हा अर्ध वर्तुळाकार मार्ग वापरात आहे. परंतु नरिमन पॉईंट ते मिरा-भाईंदर आणि ठाणे ते गेटवे ऑफ इंडियापर्यंत जल वाहतुकीच्या माध्यमातून गोलाकार वाहतूक करता येईल.

(नंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेद्र आव्हाड ....

तेव्हा अशा प्रकारे जर आपण जल वाहतूक सुरु केली अधिक सोयीचे होईल. आज ठाण्यात राहणारा रहिवाशी घोडबंदर येथून निघून ठाणे रेल्वे स्टेशनवर येतो आणि तेथून लोकल पकडून सी.एस.टी.ला येतो. परंतु जलवाहतूक जर सुरु करण्यात आली तर त्या रहवाश्याला अशा प्रकारे प्रवास न करता बोरिवलीचा रहिवाशी घोडबंदर येथे येऊ शकतो तसेच ठाण्याचा रहिवाशी घोडबंदर येथे येऊ शकतो .व तेथून बोट पकडून काही जण नरिमन पाईन्टला जाऊ शकतात व काही जण गेट वे ऑफ इंडियाला जावू शकतात. तेव्हा अशा प्रकारे जलवाहतूकीचे हे दोन्ही मार्ग खुले झ्ाले पाहिजेत. हे मार्ग खुले करण्यासाठी तेथील खाडीचा परिसर स्वच्छ करण्याची गरज आहे तेव्हा हा परिसर स्वच्छ करण्यात यावा अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदया, या चर्चेच्या निमित्ताने मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे पर्यटनाच्या दृष्टीने राज्य शासनाने काही चांगली पावले उचलली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या लहानपणी आपण जिजामाता उद्यान, चौपाटी किंवा मलबार हिलवरील म्हातारीचा बूट इत्यादी ठिकाणी एक दिवसाची पिकनीक काढून जात होतो. लहानपणी मी देखील ताडदेवलाच राहत होतो. त्यामुळे मी देखील या ठिकाणी पिकनीकला जात होतो. परंतु आज अशी स्थिती आहे की, मुंबईमध्ये आणि ठाण्यामध्ये एक दिवसाची पिकनीक काढण्यासाठी जागा राहिलेली नाही ही शोकांतिका आहे.एक दिवसासाठी डबा घेऊन कोणत्या तरी ठिकाणी आई वडिलांनी आपल्या मुला बाळांना घेऊन जावे तेथे आई वडिलांनी गप्पा माराव्यात आणि मुलांनी खे्ळत बसावे अशी एकही जागा मुंबईत राहिलेली नाही ही शोकांतिका आहे. ठाण्या जवळ येऊरचा परिसर आहे आणि त्याला लागून खाडीचा परिसर आहे तेव्हा हे दोन्हीही निसर्गाने वरदान दिलेले परिसर आहेत .त्या ठिकाणी पर्यटन स्थळ व्हावे यासाठी शासनाने योग्य प्रयत्न केले पाहिजेत तशा प्रकारे जर प्रयत्न केले तर हे पर्यटन स्थळ होऊ शकेल. मध्यमवर्गीय माणूस सहा सात दिवस धावपळ करतो त्याला चार पाच तास विश्रांतीची गरज असते आपल्या मुलांना घेऊन कोठे तरी जावे असे त्याला वाटत असते. तेव्हा त्यांच्यासाठी या दोन्ही ठिकाणी सोय करावी असे मला वाटते. पर्यटनाच्या माध्यमातून येऊरचा डोंगर आणि त्याला लागून असलेल्या खाडीच्या परिसराच्या ठिकाणी विकास करण्याचे ठरविले तर सर्वसामान्य माणसांना वेगळया प्रकारचा आनंद देता येईल तेव्हा हा आनंद त्यांना देता यावा या दृष्टीने सरकारने प्रयत्न करावे अशी मी सरकारला विनंती करतो.

27-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) PP 2
VTG/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 16=00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदया, महाराष्ट्राचे सांस्कृतिक धन जतन करण्यासाठी या शासनाने अनेक पावली उचलली आहेत. सी.डी.देशमुख आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्मारक उभारण्याचे शासनाने ठरविलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माझ्यावर दहिहंडीच्या संदर्भात बरीच टीका केली होती. त्यांनी असे सागितले होते की , मी दहिहंडी फोडत नाही. त्याना मी सांगू इच्छितो की, ठाणे शहरामध्ये मी दहिहंडी फोडण्याचा कार्यक्रम आयोजित करतो याचा मला सार्थ अभिमान आहे. दहिहंडीचा उत्सव हा फक्त लालबाग आणि परळ या भागात राहणाऱ्या कामगारांचा होता. या उत्सावाकडे हेटाळणीच्या स्वरुपात पाहिले जायचे .तो उत्सव मी साता समुद्राच्या पलीकडे नेला आहे. हा उत्सव स्पेन, युरोपला मी नेला आहे आणि आता अमेरिकेत दहिहंडीच्या उत्सावासाठी काही मुले जाणार आहेत. मला या गोष्टीचा अभिमान आहे दहिहंडीचा कार्यक्रमामध्ये चांगली व निकोप अशी स्पर्धा व्हावी म्हणून शिवसेनेने माझ्या दहिहंडीच्या बाजूला दुसरी दहिहंडी उभी केली होती आणि त्या ठिकाणी श्री. उध्दव ठाकरे चार तास उभे होते. जर या दहिहंडीमध्ये काही विशेष नसते तर आपले नेते चार तास वाया घालविण्यासाठी तेथे आले नसते. सांस्कृतिक रीत्या महाराष्ट्र श्रीमंत झाला पाहिजे.त्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. तसेच हे उत्सव माणुसकी जपणारे आणि. मानवाला मानवाशी जोडणारे उत्सव आहेत. तेव्हा या उत्सवाचे जतन करण्यासाठी व त्याचे जतन करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये काही तरी तरतूद करावी अशी मी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदया, महाराष्ट्राचा पुरोगामी चेहरा दाखविणारा हा अर्थसंकल्प आहे या चर्चेच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, शासन सगळीकडेच एफ.एस.आय. वाढवत आहे तेव्हा त्या निर्णयापासून ठाणे शहराला लांब ठेवण्यात येऊ नये . ठाण्याकडे जर शासनाने दुर्लक्ष केले तर मुंबईचे जे झाले आहे तेच ठाण्याचे व्हावयाला वेळ जागणार नाही असे मी या निमित्ताने आपलयाला सांगू इच्छितो.. उपनगरात 1.33 इतका एफ.एस.आय.वाढवून देण्यात येणार आहे तेव्हा ठाण्यालासुध्दा तेवढाच एफ.एस.आय. देण्यात यावा. ठाण्यामध्ये अनेक जुन्या सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. 1960 साल्यानंतर मुंबईमध्ये गृहनिर्माण संस्थांची डेव्हलपमेन्ट सुरु झाली होती त्याच काळात ठाण्यामध्ये देखील गृह निर्माण संस्थाची डेव्हलपमेन्ट सुरु झाली होती.मुंबईमध्ये रिडेव्हलपममेन्टच्या स्कीमसाठी 2 एफ.एस.आय. देण्यात येणार आहे तेव्हा

ठाण्यासाठी देखील तेवढाच एफ.एस.आय. देण्यात यावा अशी मी शासनाकडे मागणी करीत आहे. गोर गरीब व्यक्ती आणि नोकरदार वर्ग मुंबईतून आता ठाण्यामध्ये रहावयास आला आहे आज त्याला ठाण्याहून बदलापूरला जावे लागेल अशी स्थिती निर्माण झालेली आहे.तेव्हा या चर्चेच्या निमित्ताने माझी शासनाकडे अशी मागणी आहे की आमच्या भागातील ज्या धोकादायक इमारती आहेत, गृहनिर्माण संस्थाच्या ज्या इमारती आहेत त्याना दोन एफ.एस.आय. देण्यात यावा आणि ठाण करांना न्याय देण्यात यावा अशा प्रकारे मी विनंती करीत आहे.

सभापती महोदया,यानंतर मला दुसरा एक मुद्दा मांडावयाचा आहे. मुंबईतील आणि ठाण्यातील औद्योगिक पट्टा आता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. मुंबई ठाण्यातील सगळे उद्योगधंदे आता इतर राज्यात जात आहे. तेव्हा या राज्यातील गरीब माणसाने कोठे जावयाचे या राज्यातील पुढच्या पिढीने काय करावयाचे ? ठाण्यातील शेतकऱ्यांनी एक एक हजार एकर जमीन त्या काळात बोअरींगर नॉल या कंपनीला दिली होती. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना या कंपनीची माहिती आहे.आज ती कंपनी राहिलेली नाही. त्या कंपनीच्या जागेवर रहेजा बिल्डरने मोठे कॉम्पलेक्स उभे केले आहे.व्होल्टास कंपनी देखील राहिलेली नाही. तेथे शेठ डेव्हलपर्स मोठे कॉम्पलेक्स उभे करीत आहे.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड .....

आज आपली रेमंड कंपनी विकायला निघाली आहे, कॅडबरी विकली गेली आहे. या सगळ्या कंपन्या बंद पडल्या आहेत. बॉम्बे वायर बंद पडली आहे. आमच्या गोरगरीब शेतकऱ्यांनी दीड हजार एकर जमीन महाराष्ट्रातील औद्योगिक व्यवस्था मजबूत व्हावी, महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती व्हावी म्हणून अगदी कवडीमोलाच्या भावाने दिली. ते लोक आज रिक्षा चालवित आहेत आणि ज्यांना जमिनी दिल्या ते उत्तम चालणारे धंदे बंद करून इमले बांधत आहेत. यावर कोठे तरी पायबंद आणा. आज ते सगळे शेतकरी मला भेटले. आज तेथे जवळ जवळ 1200 एकर जमीन उघडी पडली आहे. त्या बाराशे एकर जमिनीचा प्रस्ताव तुमच्याकडे आलेला आहे, थांबवा तो प्रस्ताव. असा एखादा स्पेशल इकॉनॉमी झोन तेथे आणा की ज्या कारणासाठी आम्ही तुम्हाला जमिनी दिल्या होत्या, त्याच कारणासाठी त्या जमिनी वापरल्या जातील आणि मग त्यातून या महाराष्ट्रातील तरूणांना नोकऱ्यांच्या नव्या संधी मिळतील. अशा प्रकारे नोकरी-धंद्याच्यादृष्टीने पुन्हा एकदा मुंबई आणि ठाणे मजबूत होऊ द्यात. परत होऊ द्यात औद्योगिक क्रांती. ही क्रांती थांबली तर ठाण्याचे भविष्य कठीण आहे हे तुम्हाला मी आज सांगतो. मुंबई ही कॅपिटल सिटी आहे, मुंबई ही फायनान्शिअल कॅपिटल ऑफ इंडिया आहे. पण ठाणे आणि ठाण्याचा परिसर हा काय आणि कसा होता व आहे हे सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार दादांना माहिती आहे, सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी साहेबांना माहिती आहे. ठाण्याची प्रगतीच मुळी औद्योगिक प्रगतीमुळे झालेली आहे. तेव्हा या उद्योगांची अधोगती झाली तर महाराष्ट्राची प्रगती खुंटेल म्हणून आपण या गोष्टीवर गांभीर्याने विचार करावा अशी प्रामाणिक भावनेने मी विनंती आपल्याला करतो.

सभापती महोदया, जाता जाता केवळ एवढीच विनंती करतो की, ठाण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जशी विनंती केली की, ठाण्याचे विभाजन होणे ही काळाची गरज आहे. आज ठाण्याची लोकसंख्या 1 कोटी झालेली आहे. सागरी पट्ट्यावरून आपल्याला हे विभाजन करणे गरजेचे आहे, आमची ती प्रमुख मागणी आहे. आता सगळेच जण बोलू लागले आहेत. महाराष्ट्राची एकंदरीतच प्रगती होत आहे. तुम्ही लातूरला एअरपोर्ट देता आहात. प्रत्येक मंत्री, जो पॉवरफुल आहे तो आपल्या जिल्ह्यात एअरपोर्ट नेतो आहे. सभापती महोदया, दुसऱ्या महायुद्धातील एक एअरपोर्ट महाराष्ट्रात आहे आणि तो अंबरनाथला आहे. ती सारी जमीन आज मोकळी आहे, एक सलग अशी जमीन आहे. 1400 एकर अगदी क्लिअर

.....क्यूक्यू 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

टायटल, सिंगल पझेशन, विदाऊट एन्क्रोचमेंट अशी ही जमीन आहे. आमची या निमित्ताने मागणी आहे की, त्या 1400 एकर जमिनीवर एक छानसे, छोटे एअरपोर्ट येऊ द्या. आज ती महाराष्ट्राची गरज आहे. दररोज दिल्लीहून येताना आपल्याला त्रास होतो, रात्री दीड-दीड तास हवेतच फिरावे लागते. हे थांबवायचे असेल तर जरा अंबरनाथला उतरून या, मग अर्ध्या तासाच्या प्रवासात मुंबईला पोहोचू या. ठाणेकरांच्या हिताचा निर्णय घ्या. मुंबई मजबूत करताना ठाण्याकडे दुर्लक्ष करू नका एवढीच या ठिकाणी विनंती करतो. सभापती महोदया, जाणता राजाच्या पावलावर पाऊल टाकून पुरोगामी महाराष्ट्राचा चेहरा या देशाला दाखविल्याबद्दल परत एकदा त्रिवार अभिवादन करतो. ज्या मनुवाद्यांनी आणि ज्या कुलकर्ण्यांनी आपल्यावर टीका केली त्यांच्याकडे जास्त लक्ष न देता पुरोगामी महाराष्ट्राचा असाच सूरत बदलण्याचा, आम आदमीला न्याय देण्याचा आपला विचार कायम ठेवा एवढेच बोलतो आणि आपली रजा घेतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर येथे चर्चा चालू आहे आणि या चर्चेमध्ये मुंबई आणि काही एकाच ठिकाणच्या लोक प्रतिनिधींना आपण या चर्चेत भाग घेण्याची संधी देत आहात. कमीत कमी विदर्भाच्या आमदारांनाही आपण या चर्चेत भाग घेण्याची, बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : आपल्याला देखील संधी मिळणार आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे भाषण करतील.

.... क्यूक्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, आताच आमचे सुसंस्कृत मित्र, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड, त्यांच्या सुसंस्कृतपणाबद्दल भरपूर काही आम्ही ऐकले आहे, त्यांचे भाषण मी ऐकले. ते माझे चांगले मित्र आहेत. त्यांना मी एकच सांगतो. जाणता राजावर ओढलेला आसूड, त्यामुळे त्यांचे विव्हळणेदेखील समजले. त्यांच्या त्या विषयीच्या वेदना आणि विवषता मी समजू शकतो. एखाद्या व्यक्तीवर प्रेम केल्यानंतर, त्या नेतृत्त्वावर कोणी आसूड ओढले तर त्याचे वळ केव्हा केव्हा ज्ञानेश्वरांसारखे कुठे तरी भलतीकडेच उमटतात. ...

**तालिका सभापती** : मी सभागृहाला विनंती करते की, येथून मागेही अनेक सदस्यांच्या बाबतीत असे झाले आहे आणि येथून पुढे देखील होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी भाषणाच्या ओघात उपरोधिक असे जे बोलले जाईल ते तपासून घेऊन कामकाजातून काढून टाकले जाईल.

( यानंतर श्री. सरफरे ..... आरआर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, मी आपला आदर राखून सांगू इच्छितो की, मी नियमाच्या चौकटीच्या बाहेर जाऊन बोलणार नाही.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : अजून माझे बोलणे संपलेले नाही. मी फक्त एवढेच नमूद करते की, सदनामध्ये कुणीही माननीय सदस्य उपरोधिकपणे बोलले असा मी अर्थ काढीत नाही. परंतु कोणत्याही पक्षाच्या किंवा सदनाच्या माननीय सदस्यांकडून असे बोलले गेले असेल तर ते तपासून घेणे गरजेचे आहे असे याठिकाणी मला नमूद करावेसे वाटते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, आता आपण याठिकाणी सदनामध्ये माननीय सदस्यांकडून उपरोधिक बोललेले कामकाजातून काढून टाकले जाईल असे सांगितले. आपण दिलेले रुलिंग अन्यायकारक आहे. सभापती महोदया, राजकारणामध्ये उपरोधिकपणे बोलणे आणि एकमेकांवर मात करणे यासाठी हे सर्व चाललेले आहे. नाही तर आम्हाला भाषण बंद करावे लागेल. तेव्हा कृपा करुन पीठासीन अधिकाऱ्यांनी अशाप्रकारचे रुलिंग देऊ नये.

**तालिका सभापती** : या सदनामध्ये राजकीय टीका करीत असतांना...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, वैयक्तिक टीका केली गेली असेल तर ती कामकाजातून काढून टाकता येईल. तेव्हा कृपा करुन आपण असा निर्णय देऊ नये अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पातील तरतुदीसंबंधी आपले विवेचन करावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, याठिकाणी अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना समोरच्या माननीय सदस्यांची विवशता दिसून आली. माननीय अर्थमंत्र्यांनी या सदनामध्ये अर्थसंकल्पाचे भाषण केल्यानंतर या राज्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्त्या, त्यांचे दु:ख यासंबंधी राजकीयदृष्टया एकमेकांची नव्याने सालटी काढण्याचे सत्र समोरच्या बाजूने सुरु झाले आहे. आणि या अर्थसंकल्पाचा डांगोरा पिटला जात आहे. यामध्ये आपली असलेली विवशता आम्ही समजू शकतो. परंतु आपण काय बोलत आहोत याचे तारतम्य पाळले जात नाही. असे सांगण्यात आले आहे की, ज्यांचे काळया मातीशी नाते नाही ते शेतीवर बोलत आहेत. मला आपणास विचारावयाचे आहे की, या देशामध्ये यु.पी.ए. च्या अध्यक्षांचे काळया मातीशी नाते नाहीच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

त्याचबरोबर या देशाच्या मातीशी देखील त्यांचा संबंध नाही. त्यांच्या नावाने डांगोरा पिटला जात आहे....

(गोंधळ)

(सत्ताधारी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. अरविंद सावंत : मी याठिकाणी कुणाचेही नाव घेतलेले नाही.

(गोंधळ)

श्रीमती अलका देसाई : नाव घेतले नाहीतर घेऊनच दाखवा.....

श्री. अरविंद सावंत : घेतो, श्रीमती सोनिया गांधी... त्यांचा या देशाशी संबंध काय? त्यांचा काळया मातीशी संबंध काय?

(गोंधळ)

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी विषयाला सोडून बोलू नये...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, मी विषयाला सोडून बोलत नाही...

(गोंधळ)

(सदनाच्या दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात)

**तालिका सभापती** : सर्व माननीय सदस्यांनी शांतता पाळावी. एकाच वेळी एकमेकांविरुध्द बोलू नये. याठिकाणी एकेक माननीय सदस्यांनी बोलावे...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, समोरच्या बाजूने बोलल्यामुळे मला बोलावे लागले...

डॉ. वसंत पवार : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहातील कुणाही माननीय सदस्यांना कुणाचेही नाव घेऊन टीका करावयाची असेल तर त्यांना अगोदर नोटीस ध्यावी लागते. त्याशिवाय त्यांना आरोप करता येणार नाही. जी व्यक्ती या सदनाचे सदस्य नाही अशा व्यक्तिचे नाव घेऊन त्यांना बोलता येणार नाही. त्यामुळे आपणावर हक्कभंग उपस्थित करता येऊ शकतो.

(गोंधळ)

(सदनाच्या दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात)

(यानंतर श्री. बरवड)



RDB/ KGS/ पूर्वी श्री. सरफरे 16:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे

श्री. राम पंडागळे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. अरविंद सावंत : श्री. पवार साहेबांनी काँग्रेस का सोडली ते सुध्दा आपण सांगावे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एखादी स्त्री माहेराहून सासरला आल्यानंतर तिकडचे नाव बदलले जाते.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. राम पंडागळे : सभापती महोदया, एकदा स्त्रिचे लग्न झाल्यानंतर तिला मुले झाली, तिच्या मुलांना मुले झाली आणि गेली 30 वर्षे ती स्त्री या देशामध्ये राहात असेल व त्या स्त्रिचा या मातीशी संबंध नाही असे कोणी म्हणत असेल तर ते बरोबर नाही.

श्री. अरविंद सावंत : हे आपण आपल्या मित्रांना सांगावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे समजलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदया, अशा प्रकारे स्त्रिचा अपमान करणे सन्माननीय सदस्यांना शोभत नाही.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. संजय दत्त : त्यांचे मित्रपक्ष प्रत्येक गोष्टीमध्ये त्यांना साथ देतात काय ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण सगळे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून परवानगी न घेता एकमेकांना बोलत आहात. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना समजलेल्या आहेत. ते रेकॉर्डवर आलेले आहे. आता सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावरील आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, मी अधिक वादात जाऊ इच्छित नाही. जे झाले ते झाले. मूळ मुद्दा असा आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे राजकारण सुरु आहे हे दुर्देव आहे. देशाच्या कृषीमंत्री पदावर आपले नेते आहेत आणि त्यांच्याकडून अपेक्षा बाळगणे हे आमचे काम आहे. जनता अपेक्षा बाळगणारच. त्या अपेक्षांची पूर्तता झाली तर आनंद मानणार नाही तर टीका



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

श्री. अरविंद सावंत ....

करणार. ती टीका करताना कोठे तरी एखादा शब्द वापरला त्यावरुन जर बाकीचे सदस्य आमच्या मातीचे, आमच्या जन्माचे काढावयास निघाले तर त्यांच्य मातीचे इमान आम्हाला काढल्याशिवाय राहता येणार नाही. ते आम्ही सहन करणार नाही. ते इमान आम्हाला काढावयास लावू नका. बोलताना एकच लक्षात ठेवावे की, जे आपण बोलतो तेव्हा आपली चार बोटे आपल्याकडे असतात. सभापती महोदया, शेतकऱ्यांच्या संदर्भात जेव्हा विषय येतो तेव्हा परवा सुध्दा मी सांगितले की, नेता हा नेता असतो, मग तो कोणत्याही पक्षाचा असो. मी त्यांचा प्रचंड आदर करुन सांगतो. मी आता नाव घेतो. श्रीमती सोनिया गांधी यांचा आदर करुन सांगतो. त्या महिला आहेत. पण जेव्हा त्या आपल्या असतील तेव्हा त्यांच्यावर टीका करण्याचे सोडणार नाही ही सुध्दा मी सांगतो. त्या व्यक्तीशी आमचे वैर नाही. महिलांचा आदर करणे हे आम्हाला शिवप्रभूंनी शिकवले आहे. दांभिकपणा नसानसात भिनला की असेच घडत असते. इतका दांभिकपणा नसानसात भिनला की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये तुम्ही पाच एकराची कर्जमुक्ती केल्यानंतर 41 आत्महत्या झालेल्या आहे. त्याची वेदना नाही पण डांगोरा पिटणे सुरु आहे. याचे दुःख आहे. त्यानंतर सुध्दा 41 आत्महत्या महाराष्ट्रात होतात याचे आपल्याला भूषण वाटते काय ? आपण डांगोरा पिटत सुटला आहात. पोस्टर्स लावत आहेत. काही ठिकाणी जाणता राजाचे काही ठिकाणी यूपीएचे पोस्टर्स लावत आहेत. लावा. आपल्याला मनाची लाज वाटत नाही काय ? जनाची नाही तर मनाचीही नाही काय ? म्हणून भाषण करताना चेहरा भोली सुरत दिल के खोटे, नाम बडे और दर्शन खोटे असा असतो. हे आम्हालाही येते म्हणून सांगतो की भोली सुरत घेऊन येऊ नका. आपल्या दिलात काय आहे याला महत्व आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

अर्थसंकल्पातील शेतक-यांच्या विषयावर अधिक न बोलणार नाही. सभागृहात संताची वाणी घेऊन भाषणे केली जातात. हे एक नवल आहे, मी काल सुध्दा एक नवल पाहिले आहे. शेतक-यांना न्याय देण्याची भूमिका सरकारने घेतली पाहिजे, पाच एकरच्या वरच्या शेतक-यांना कर्जमाफीचा फायदा होणार नाही हे मी त्यादिवशी सुध्दा असे सांगितले होते. पण राज्य सरकार केंद्र सरकारकडे बोट दाखवित आहे. आपल्यापैकी कोणी एकाने तरी धारिष्टय दाखववे. केंद्र सरकारने दिले नाही तरी हरकत नाही, पण राज्य सरकार शेतक-यांसाठी मदत देईल, त्यामुळे शेतक-यांनी आत्महत्या करु नये. अशाप्रकारचे वाक्य सरकारमधील कोणत्याही नेत्याच्या मुखातून येत नाही. सरकारमध्ये बसलेल्या एखाद्या तरी नेत्याने हे आश्वासक शब्द वापरले असते तर शेतक-यांना विश्वास वाटला असता आणि आत्महत्या थांबल्या असत्या.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य मांडत असलेला मुद्दा बरोबर आहे. पण राज्य सरकारने काही दिले नाही असे म्हणणे बरोबर नाही. राज्य सरकारने विदर्भातील सहा जिल्हयांसाठी यापूर्वीच 1075 कोटींचे पॅकेज दिले आहे. त्यानंतर माननीय पंतप्रधानांनी 3075 कोटींचे पॅकेज दिले आहे. आता 60 हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केलेली आहे. या व्यतिरिक्त देणे आवश्यक आहे असे राज्य सरकारला वाटले तर राज्य सरकार तेही देईल असे सरकारने आश्वासन दिलेले आहे.

श्री.अरविंद सावंत : माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मला या अर्थसंकल्पामध्ये असे एक तरी वाक्य दाखववे. मी त्यांचे स्वागत करण्यास तयार आहे. परंतु या अर्थसंकल्पामध्ये काहीच तरतूद नाही, केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्येही तरतूद नाही. पब्लिक सेक्टरमध्ये 5 टक्के निर्गुंतवणूक करुन त्याच्यातून हा पैसा दिला जाणार आहे, त्याला आमचा विरोध आहे. आता त्या विषयामध्ये मी जात नाही. सरकारने काही चांगले केले असले तरी त्यातील त्रुटी दाखविणे हे आमचे काम आहे आणि ते आम्ही करीत आहोत. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी मुंबई बरोबरच ठाणे शहराकडे लक्ष देण्यात यावे असे मत मांडले. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. मुंबईच्या उपनगरामध्ये 1.33 टक्के एफएसआय दिला जाणार आहे.

2....

NTK/ MMP/ KGS/

श्री.अरविंद सावंत....

सभागृहात माननीय अर्थ राज्यमंत्री बसले आहेत. या मुंबईतील जागांचे भाव हे भयानकपणे वाढले आहेत, भयानकपणे वाढले आहेत. शासनाने युएलसीचा कायदा रद्द केला, त्याच्यातून जमिनी मोकळया केल्या आहेत. या जमिनींचा वापर केला नाही तर सरकार त्यावर कर लावणार आहे. असे सांगून सरकारने एक डोस काही लोकांना डोस दिला आहे. जो भाव येईल तो येईल घ्यावा आणि करा मजा. युएलसीचा कायदा रद्द करुन त्यावर कर लावण्याचे माननीय अर्थमंत्र्यांनी सुतोवाच केलेले आहे. त्यापूर्वी तुम्हाला लवकरात लवकर काय करावयाचे आहे ते करावे असे सांगितलेले आहे. यामध्ये मध्यमवर्गीय भरडला जात आहे. सध्या समाजामध्ये दोन वेगळे वर्ग निर्माण झाले आहेत. एक अत्यंत गरीब आणि दुसरा अतिशय श्रीमंत. रेल्वेच्या रुळालगत राहतो त्याला घर मिळते, अनधिकृतपणे राहणा-याला लगेच घर मिळते. परंतु जो अधिकृतपणे विविध कर भरुन जीवन जगतो, छोटयाशा घरात राहतो तो मात्र मोठे घर घेऊ शकत नाही. नुकतीच सिडकोची जाहिरात आलेली आहे. त्या जाहिरातीमध्ये उत्पन्नाची स्लॅब दाखविलेली आहे. ज्याचे मासिक उत्पन्न 10 हजार असेल मध्य उत्पन्न गट म्हणता येईल. अशा व्यक्तीला 500 चौ.फूटाचे घर घेता येईल. परंतु आज शिपायाचे उत्पन्न सुध्दा 10 हजार पर्यंत गेले आहे. तरी सुध्दा 500 चौ.फूटाचे घर तो घेऊ शकत नाही. त्याला 10 लाख रुपयांचे घर घ्यावयाचे असेल तर 7-8 लाख रुपयांचे लोन घ्यावे लागेल. त्यासाठी त्याला 7-8 हजाराचा हप्ता भरावा लागेल, मग उर्वरित पगारातून आपले घर कसे चालविणार हा प्रश्न आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत ....)

म्हणजे 10 हजार रु. पगार असणारा माणूस ज्या गटामध्ये मोडतो त्या गटातील घर तो घेऊ शकत नाही. परंतु तो जर त्यापेक्षा लहान घर घेऊ इच्छित असेल तर तो त्या गटामध्ये मोडत नसल्यामुळे लहान घरही घेऊ शकत नाही. म्हणून मध्यम उत्पन्न गटाची मर्यादा ही 20 हजार ते 25 हजार अशी ठेवावी जेणे करुन तो घर धेऊ शकेल. 10 हजार रु. उत्पन्न असणारा माणूस घर घेऊ शकेल अशा रीतीने स्लॅब ठेवावा. या स्लॅबच्या रचनेमध्ये बदला करवा अशी माझी शासनाला सूचना आहे.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये पोलिसांच्या निवासस्थानांसाठी 90 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे त्याचे मी स्वागत करतो. आदिवासी विकास खात्याचे म्हणणे तेच आहे की, आमच्याकडे पैसे नाहीत, पण सार्वजनिक बांधकाम खाते इमारत बांधून टाकते. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी सभागृहामध्ये अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, नवी मुंबई येथे पोलिसांची निवासस्थाने अशा ठिकाणी बांधलेली आहेत की त्या ठिकाणी एकही पोलीस राहायला गेला नाही. त्या निवास्थानावरील सर्व खर्च वाया गेलेला आहे. पूर्वी जी निवास्थाने बांधली ती 100 चौ.फुटाची बांधली. त्या जागा देखील खाली पडून आहेत. तेव्हा निधी नसेल तर अशा ठिकाणी अडीच एफएसआय देऊन कमर्शियल एक्स्प्लॉयटेशन करता येईल आणि पोलिसांसाठी निवासस्थाने बांधता येतील. ही निवासस्थाने बांधताना ती पोलीस ठाण्याच्या जवळ बांधली गेली पाहिजे. म्हणून पोलीस क्वार्टर्स हे पोलीस ठाण्यांच्या जवळ बांधण्यात आलेली आहेत. या पोलीस क्वार्टर्सची अवस्था अत्यंत वाईट आहे. वरळी बी.डी.डी. चाळीमध्ये पोलिसांची निवासस्थाने आहेत. पण कुठे छत पडलेले आहे, टॉयलेटमध्ये गळती आहे अशी अवस्था आहे. मी माझ्या आमदार विकास निधीतून 10 लाख रु देऊन ती निवासस्थाने रिपेअर करुन घेतली. मागच्या वेळी पोलिसांच्या निवासस्थानासाठी 50 कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. परंतु त्यामधील रक्कम वरळी येथील बी.डी.डी.चाळीसाठी उपलब्ध झालेली नाही. यावेळी ती उपलब्ध होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदया, शिक्षण या अतिशय महत्वाच्या विषयावर मी बोलणार आहे. शिक्षण हा विषय मला सतत वेदना देत आलेला आहे. या शिक्षण व्यवस्थेमध्ये आपण एक नवीन विषमता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत....)

राज्यामध्ये निर्माण करीत आहोत. ही विषमता अशी आहे की, एका बाजूला आमच्या गरिबांची मुले जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकांच्या शाळामध्ये शिक्षण घेत आहेत आणि दुसरीकडे खाजगीकरणाच्या निमित्ताने खाजगी शाळा व्हायला लागल्या आहेत. या खाजगी शाळांमधून प्रचंड फी आकारली जाते. मग त्या शाळा जाणता राजाच्या नावाने असू द्या की आणखी कोणत्या नावाने असू द्या. आपण लोणावळयाला जात असताना पहातो की, लोणावळा येथे सिंहगड नावाची इन्स्टिटयूट आहे. ही सिंहगड इन्स्टिटयूट वन खात्याच्या जमिनीवर उभारली गेली आहे. ती इन्स्टिटयूट एखाद्या पॅलेस सारखी दिसते. त्या इन्स्टिटयूट विरुध्द वन खाते कोर्टात गेले. तेथील बांधकाम थांबवा अशा प्रकारचे आदेश दिले गेले. परंतु अजूनही वन खात्याच्या त्या जमिनीवर छोटी-छोटी बांधकामे होत आहेत. इतकेच नव्हेतर त्या इन्स्टिटयूटला बाधा पोहोचू नये म्हणून मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे बाजूने नेला. मागच्या वेळी त्या इन्स्टिटयूट मधील विद्यार्थ्यांचा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेला होता. त्या इन्स्टिटयूटने रजिस्ट्रेशन कुठे केलेले आहे ? तेथे शिक्षण घेणा-या 300-400 विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आलेले आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्र राज्यातील शिक्षण क्षेत्रातील आणखी एक विदारक चित्र मी या सदनासमोर मांडत आहे आणि ते म्हणजे 8वी पर्यन्त शिक्षण घेणा-या मुलींच्या गळतीचे प्रमाण सारखे वाढत चालले आहे.

...नंतरश्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

राज्यातील 30 टक्क्यांपेक्षा अधीक म्हणजे 3 कोटी जनता दारिद्रयरेषेखाली जीवन जगत आहेत. 57 टक्के आदिवासी बालके नव्हेतर राज्यातील एकूणच 46 टक्के बालके कुपोषित आहेत. राज्यात माता मृत्यूदर 134 आहे. अजूनही केवळ 45 टक्के मुलींनी दहावीचा पल्ला गाठला आहे. एवढया मोठया प्रमाणात मुलींची शिक्षणाची आबाळ होत आहे. आता या मुलींना सायकली देण्यात येत आहेत. ही मानसिकता पुरोगामी महाराष्ट्रात आहे याचे दु:ख होते. त्यास अनेक कारणे असतील. त्यात गरिबी असेल, कदाचित भीती सुध्दा असेल. कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे इतक्या टोकाला निघाले आहेत की, आपली मुलगी शाळेत पाठवावी काय ? आपली मुलगी घरी सुरक्षित येईल काय ? मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी का होत चालले आहे याचा शासनाने कधी विचार केला आहे काय ? मुलींचे शिक्षणाचे प्रमाण 26 टक्क्यांवरुन 20 टक्क्यांपर्यंत आले आहे. एवढया मोठया प्रमाणात मुलींची गळती होत असेल तर मला वाटत नाही की, मुलींना शिक्षण देण्याच्या बाबतीत आपण पुढे जाऊ. म्हणून माझी या निमित्ताने मागणी आहे की, शिक्षणातील ही विषमता कशी दूर केली पाहिजे. या ठिकाणी शासनाकडून सांगितले जाते की, आम्ही संपूर्ण महाराष्ट्र साक्षर करीत आहोत. या महाराष्ट्रात किती आदिवासी निरक्षर आहेत ? शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत लोकांची किती वाईट अवस्था आहे ? यासंबंधीचा खुलासा राज्य शासनाने आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदया, शिक्षणातील भ्रष्टाचाराच्या बाबतीत बोलणार आहे. पुणे येथील शिक्षण संस्थांची तक्रार नावानिशी दिलेली आहे. शिक्षणातील भ्रष्टाचारासंबंधी सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी लक्षवेधी सूचना देऊन बघावी. ती सूचना स्वीकृत होते काय ते तुम्हीच बघावे. मी शिक्षण संस्थांची तक्रार मी नावानिशी केलेली आहे.परवा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अनधिकृतपणे कोर्सेस कशा पध्दतीने सुरु आहेत यासंबंधीची माहिती सभागृहात दिली आहे. या राज्यात ज्यांना मान्यता नाही असे कोर्सेस मोठया प्रमाणात सुरु आहेत. या राज्यात अनेक मान्यता नसलेल्या मेडीकल तसेच इंजिनिअरींग संस्था सुरु आहेत. या राज्यात 378 अनधिकृत डी.एड.महाविद्यालये सुरु आहेत. अशा संस्था निर्माण करणारे शिक्षण सम्राट कोण आहेत? या डी.एड.महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे काय? या 378 मान्यता नसलेली डी.एड.महाविद्यालये सुरु आहेत. या अनधिकृत संस्थांच्या बाबतीत हायकोर्टाने ताशेरे ओढलेले

2....

श्री. अरविंद सावंत...

आहेत. या विषयाच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. ती सूचना सभागृहात उपस्थित झाल्यानंतर या विषयावर मी अधिक बोलणार आहे. शिक्षणाच्या बाबतीत फार मोठी हेळसांड होत आहे. शिक्षण क्षेत्रात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे, तो आपल्याला बुडविल्याशिवाय राहणार नाही. मुलुंड येथे वाणी विद्यालय आहे. या विद्यालयात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना तामिळ किंवा मल्याळम भाषा सक्तीची केली आहे. मराठी अथवा संस्कृत भाषा त्या विद्यालयात सक्तीची नाही. या दोन भाषेपैकी एक भाषा सक्तीची करण्यात आली आहे. तामिळ अथवा मल्याळम भाषेची सक्ती करणा-या वाणी विद्यालयाला परवानगी कोणी व कशी दिली ? परप्रांतीय भाषेची सक्ती करणा-या संस्थांना शासन परवानगी कशी काय देऊ शकते ? यासंबंधीचा खुलासा शासनाने उत्तराच्या भाषणात करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, रोजगार हमी योजनेच्या बाबतीत मी बोलणार आहे. रोजगार हमी योजनेसाठी 2 हजार कोटी रुपये ठेवण्यात येतील असे शासनाच्या वतीने सांगितले जाते. या वर्षी 631 कोटी रुपये खर्च केला गेला ही गोष्ट देखील शासनाकडून मोठया अभिमानने सांगितली जाते. माननीय वित्तमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात 32 लक्ष बेरोजगारांची संख्येचा उल्लेख केलेला आहे. 1970 साली रोजगार हमी योजना कायदा आला, त्यावेळी वि.स.पागेसाहेब होते. मागेल त्याला काम मिळावे म्हणून रोजगार हमी योजनेचा कायदा या राज्यात आणला गेला. परंतु या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी निधी कोठून आणावयाचा यासंबंधी या सभागृहात चर्चा झाली. विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. गणतराव देशमुख हे त्यावेळी देखील विधानसभेचे सदस्य होते आणि आज देखील ते विधानसभेचे सदस्य आहेत. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी निधी कसा उपलब्ध करावयाचा याबाबतीत दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा झाली. त्यावेळी दोन्ही बाजुच्या सदस्यांकडून सांगितले गेले की, या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी व्यवसाय कर लावा. महाराष्ट्रातील आहे रे आणि नाही रे लोकांकडून व्यवसाय कर घ्यावा. सभागृहांमध्ये निर्णय घेतल्यानंतर व्यवसाय कर घेण्याची सुरुवात करण्यात आली आणि व्यवसायकराच्या रुपाने निधी उभा राहिला आहे. हा निधी बेरोजगारांसाठी वापरावा अशी जी मूळ संकल्पना होती, त्या संकल्पनेला या शासनाने छेद दिला आहे. या विषयाच्या बाबतीत संयुक्त समिती नेमली गेली होती. संयुक्त समितीचा अहवाल येण्यापूर्वी शासनाने नव्याने अध्यादेश काढला आणि सभागृहात गोंधळात

3...



ABG/ KGS/ प्रथम श्री. शिगम 16:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

त्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करुन घेतले. रोजगार हमी योजना कायदा या राज्यास लागू करण्यात आला होता, त्यावेळी राज्यात अशिक्षितांचे प्रमाण, गरिबीचे प्रमाण प्रचंड मोठे होते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील एखाद्या जिल्हयात 100 टक्के मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करीत आहेत असे एखादे उदाहरण मला दाखवून द्यावे.

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

सभापती महोदय, आपल्याला अनेकदा असे दिसेल की परप्रांतीय माणूस रस्त्याच्या कामावर किंवा विहिरीच्या कामावर काम करीत आहे. काही जिल्हयांमधून तेथील मजूर रोजगार हमीच्या कामावर काम करीत असतील. परंतु रोजगार हमीवरील निधी खर्च न होता शिल्लक राहतो ही शासनाची अकार्यक्षमता आणि निष्क्रियता आहे. शासनाला पैसे खर्च करायला जमले नाही. कायद्याची व्यापकता वाढवायला हवी होती. त्याचा फायदा मजुरांना झाला असता. आज राज्यामध्ये 32 लाख बेरोजगार आहेत. राज्यामध्ये सुशिक्षितांचे प्रमाणही वाढले आहे. शेतकऱ्याची 10 वी पास झालेली मुले आणि रोजगार हमीच्या कामावर जात नाहीत. शिक्षकांना आपण 100 कामे लावता. सुशिक्षित तरुणांना काम दिले असते तर उत्पन्न वाढले असते आणि काही प्रमाणात बेकारीही दूर झाली असती. कायद्याची व्यापकता वाढवा अशी मी शासनाला विनंती करतो. पण पैसे पळवायचे असल्यामुळे हे झ ााले नाही. या रोजगार हमीच्या निधीमध्ये व्यवसाय करातून आलेला पैसा आणि तेवढाच शासनाकडील पैसा जमा होतो. 1600 कोटी रुपये व्यवसाय करातून आले तर 1600 कोटी रुपये शासनाने द्यावयाचे आहेत. शासनाने पैसे जमा केले नाहीत आणि 1600 कोटी खर्च देखील झाले नाहीत. पगारदार नोकरांकडून 'At a Source' व्यवसाय कर वसूल करते. जर रोजगार हमी योजनेतील रक्कम खर्च होणार नसेल तर मग हा व्यवसाय कर रद्द करा. मोठया मनाने नोकरदारांनी हा व्यवसाय कर दिला. बेरोजगारांना रोजगार मिळेल या हेतून त्यांनी हा व्यवसाय कर दिला. तो सुध्दा शासनाने पळविला. हे शासनाचे अपयश आहे. म्हणून या कायद्याची व्यापकता वाढवावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या संदर्भात मी एक-दोन मुद्दे बोलणार आहे. किती गिरणी कामगारांनी आत्महत्या केल्यावर शासन त्यांच्या प्रश्नाबाबत लक्ष घालणार आहे ? गिरणी कामगारांना नोकरी आणि घर या दोन गोष्टींची पूर्तता शासन कधी करणार आहे ? त्यासाठी काय तरतूद केली जाणार आहे ते वित्तमंत्र्यांनी सांगावे. कै.सी.डी.देशमुखांच्या स्मारकासाठी निधीची तरतूद केली याचे मी स्वागत करतो. पण लक्षात ठेवा की एक मराठी स्वाभिमानी माणूस पं.नेहरुंच्या तोंडावर राजीनामा फेकून निघून आला. या लोकांकडून एक अंश जरी आपण घेतलात तरी खूप बरे वाटेल. परंतु लाचारांची फौज दिल्लीत उभी राहते. स्वाभिमानी राजगुरुच्या स्मारकासाठी पैसे नाहीत. यासंदर्भात मी विशेष उल्लेखाची सूचना दिली होती परंतु त्याचे उत्तर

.......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

देखील आले नाही. चित्रपटासाठी 50लाख रुपये घेतले परंतु चित्रपट तयार झाला नाही. ज्यांनी चित्रपट तयार केला त्या मोहाडीकर आणि करमरकर यांना शासन पैसे देत नाही.

सभापती महोदय, गृहखात्याच्या बाबतीत एकच गोष्ट शासनाने स्पष्ट करावी. भिवंडी येथील पोलीस ठाणे केव्हा बांधणार आहात ? तुमच्या मनगटात तेवढी ताकद आहे काय ? नाचता येईना अंगण वाकडे अशी शासनाची परिस्थिती आहे. अर्थसंकल्पामधून केवळ भूलभुलैय्या उभा केलेला आहे. पावसाळा आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्ज देण्याची वेळ येईल त्यावेळी खरे चित्र स्पष्ट होईल एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

जयहिंद, जयमहाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदया, मुझे काफी इन्तजार के बाद 2008-09 के अर्थ-संकल्प पर बोलने के लिए समय मिला है. आपने मुझे जो समय दिया गया है, उसके अन्दर ही मैं अपनी बात समाप्त करुँगा. मेरे विधान परिषद के कार्यकाल में महाराष्ट्र सरकार का यह दूसरा बजट है. हमने इस बजट को स्टडी किया है और महाराष्ट्र शासन का यह बहुत अच्छा बजट आया है. इसको जांचने के जो जो पैमाने हो सकते हैं, उनके ऊपर यह बजट खरा उतरता है. सन् 2005 में जब मैं इस सभागृह में नहीं था, तब महाराष्ट्र फिस्कल मेनेजमेंट एक्ट बनाया था. इसके अन्दर कुछ टारगेट दिए गए हैं कि 4 साल में डेफिसिट बजट का रेसियो कम करेंगे. मैं महाराष्ट्र शासन का अभिनन्दन करना चाहता हूँ कि 2 साल में ही डेफिसिट को 1 प्रतिशत से कम पर लाए हैं. यह एक बहुत बड़ी उपलब्धि है. फिस्कल मेनेजमेंट को कम करने की दृष्टि से यह एक अच्छा कदम है. इसलिए मैं शासन का अभिनंदन करना चाहता हूँ.

सभापति महोदय, बजट में हमारे इन्फ्रा स्ट्रक्चर के लिए जैसे उदाहरण के तौर पर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा ...

मैं राज्य मंत्री महोदय से अनुरोध करना चाहता हूं कि अगर आप लेबर विभाग का बजट देखेंगे तो आज वह लोएस्ट प्रायारिटी पर है. हमारे राज्य में जो लेबर कमिश्नर का कार्यालय है वहां पर्याप्त स्टाफ नहीं है, आवश्यक मशीनरी नहीं है, फॅक्स मशीन नहीं है. सहायक आयुक्त, श्रम विभाग के कार्यालय में जाकर देखें तो वहां भी कोई व्यवस्था नहीं है. वहाँ के कर्मचारियों को उद्योगपतियों से पैसे लेकर झेरॉक्स कॉपी निकालनी पड़ती हैं. इसलिए मेरा माननीय मंत्री जी से अनुरोध है कि वे लेबर कमिश्नर कार्यालय का आधुनिकीकरण करें, स्टाफ बढ़ाए और इस कार्य के लिए उचित धनराशि का प्रावधान करें.

सभापति महोदय, मैं न्यायालयीन व्यवस्था के बारे में यह कहना चाहूंगा कि आज श्रम एवं औद्योगिक न्यायालयों में कई सालों से अनेक केसेस पेंडिंग है. इसलिए श्रम न्यायालय और औद्योगिक न्यायालयों में मामलों का जल्द निपटारा करने के लिए जजों की संख्या बढ़ाई जाए और फास्ट ट्रेक कोर्ट की स्थापना की जाए. दूसरी बात यह है कि भारत सरकार ने श्रमिकों के हित के लिए अनेक कानून बनाए हैं, जैसे कि मिनिमम वेजेस एक्ट. महाराष्ट्र सरकार ने भी श्रमिकों के हित के लिए अनेक कानून बनाए हैं. लेकिन बड़े अफसोस की बात है कि हमारी व्यवस्था में कमी है. हम उद्योगों के मालिकों से कहते हैं कि कानून का पालन करें लेकिन जब हम सरकार से कहते है कि कानून के अनुसार सबको मजदूरी या वेतन मिलना चाहिए तो सरकार ध्यान नहीं देती है. उदाहरण के लिए हमारी सरकार ने मिनिमम वेजेस एक्ट बनाया है. लेकिन क्या इस कानून का ठीक प्रकार से पालन हो रहा है ? हम कहते हैं कानून का पालन होना चाहिए लेकिन सरकार ध्यान नहीं देती. शिक्षकों को दो-दो महीने वेतन नहीं मिलता है. ग्राम पंचायत, पंचायत समिति के कर्मचारियों को समय पर वेतन नहीं मिलता है. माननीय मंत्री जी से अनुरोध है कि भारत सरकार और राज्य सरकार ने जो कानून बनाए हैं, उनका पालन करवाया जाए, जो कर्मचारी और अधिकारी कानून का पालन नहीं करते हैं उनके खिलाफ कार्रवाई की जाए, जिम्मेदारी फिक्स की जाए. कानून का पालन न करने पर सरकार कंपनी एवं उद्यागों के मालिकों पर कार्रवाई करती हैं लेकिन अधिकारियों एवम् कर्मचारियों पर कोई कार्रवाई नहीं होती है. महाराष्ट्र प्रगतिशील राज्य है. इस बात को विरोधी पक्ष के लोग भी मानते हैं. हमारे राज्य में रोजगार हमी योजना शुरु की गई है और बहुत सारे कानून बनाए गए हैं, श्रमिकों के हित के





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा ...

लिए बहुत सारे कानून बनाए गए हैं लेकिन बड़े खेद के साथ कहना पड़ता है कि मिनिमम वेजेस एक्ट बनाने के बाद भी आज शिक्षकों को 1000 से 1500 रुपये तक वेतन दिया जाता है. कोई भी नीति बनाने से पहले उसके बारे में सोचना चाहिए कि वह कितनी उचित है. विभिन्न क्षेत्रों के लिए हमने मिनिमम वेजेस तय की है लेकिन क्या हम उसके अनुसार वेतन दे रहे हैं ? अगर सरकार की क्षमता नहीं है तो ऐसी नीति ही न बनाए और अगर नीति बनाते हैं तो सम्मानजनक वेतन दिया जाना चाहिए. मेरा अनुरोध है कि सरकार इस बारे में विचार करें और उचित कदम उठाए.

सभापति महोदय, कई सम्माननीय सदस्यों ने यहां बताया कि विभिन्न विभागों में रिक्त पदों को भरा नहीं जा रहा है. चूंकि सरकार ने आश्वासन दिया है कि अब रिक्त पदों को भरने की कार्यवाही जल्द होगी. राज्य में कोतवाल, ग्राम सेवक, सचिव के अनेक पद रिक्त है. एक तरफ हम ग्रामीण अर्थव्यवस्था को मजबूत करने की बात कर रहे हैं, केन्द्रीय सरकार की योजनाओं को लागू करने की बात कर रहे हैं लेकिन दूसरी तरफ हमारे पास मशीनरी नहीं है.

इसके बाद श्री शर्मा...

असुधारित प्रत / प्रकाशनार्थ नाही

. . . . श्री. सय्यद जामा जारी (पूर्वी तालेवार)

हमारा शासन से अनुरोध है कि आप उसके ऊपर विशेष ध्यान दें. यह ग्रामीण क्षेत्र की अर्थ व्यवस्था को मजबूत करने के लिए बहुत आवश्यक है. केन्द्र सरकार और महाराष्ट्र सरकार की योजनाओं को अच्छी तरह से लागू किया जाना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र को जब आजादी मिली थी, उस समय कोतवालों की संख्या 50-60 हजार थी, लेकिन आज उनकी संख्या घटकर 15 हजार से भी कम रह गई है. कोतवालों को बड़ी मुश्किल से 2 हजार रुपए प्रति माह मिलते हैं. उनको सामाजिक सुरक्षा नहीं है, उनके लिए कोई फंड नहीं है, उनके लिए कोई पेंशन नहीं है. ये लोग 25-30 साल से काम कर रहे हैं और सरकार उनको केवल 2 हजार रुपए वेतन दे रही है. महाराष्ट्र प्रगतिशील राज्य है, इसलिए सरकार को इनकी तरफ ध्यान देकर इनका वेतन बढ़ाकर अन्य सुविधाएं भी प्रदान करनी चाहिए.

सभापति महोदय, मैं 2-3 बातें आपके सामने और रखना चाहता हूँ. किसानों के बारे में बहुत से माननीय सदस्यों ने यहां पर कहा है और मैंने उनकी बातें बहुत ध्यान से सुनी हैं. हमारे माननीय सदस्य एग्रीकल्चर एक्सपर्ट हैं. लेकिन अभी तक मेरे सुनने में नहीं आया कि हमारे किसी साथी की ओर से वैकल्पिक सुझाव आए हों. किसानों की आत्महत्या कोई आज की बात नहीं है और यह एक ग्लोबल फिनोमिना है. मैं राजनैतिक दृष्टि से नहीं बोल रहा हूँ. कई विकासशील देशों के किसान भी आत्महत्या कर रहे हैं. अमेरिका जैसे प्रगतिशील देश में किसानों के माल की सही कीमत मिलने के लिए भारी मात्रा में सबसिडी देनी पड़ती है. यह पूरे विश्व की समस्या है, लेकिन यह महाराष्ट्र और विदर्भ में अधिक है. इस समस्या को हल करने के लिए हमारे किसी साथी ने वैकल्पिक योजना नहीं बताई है. पिछले दिनों विदर्भ के लिए माननीय प्रधान मंत्री की ओर से विशेष पेकेज दिया गया. हमारे सत्ताधारी पक्ष और विपक्ष के सब लोगों ने मांग की थी और मोर्चे निकाले थे कि किसानों का कर्जा माफ होना चाहिए. आज अगर किसानों का कर्जा माफ करने के लिए कदम उठाया गया है तो उसमें शंका करने कोई बात नहीं है. इसके लिए बजट प्रोवीजन किया गया है और मॉडिलिटी तैयार हो रही है. सरकार को जुलाई 2008 तक कर्जा माफ करना है. लेकिन आज हम सब को मालूम है कि स्पेशल पेकेज के बाद भी किसानों की आत्महत्याएं रुक नहीं रही हैं. यह बड़ी गंभीर समस्या है और अगर हम ऐसा सोचते

. . . ZZ 2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री सय्यद जामा

हैं कि एक दूसरे पर आरोप लगाकर हमारी जबाबदारी पूरी हो जाएगी तो हम लोग गफलत में हैं. इसलिए इस बात के ऊपर विशेष ध्यान देने की आवश्यकता है. हमारे कई साथी एग्रीकल्चर एक्सपर्ट हैं, जिन्होंने अपनी बात यहां पर कही है, लेकिन किसानों की आत्महत्याओं को रोकने के उपायों बारे में एक आम सहमति सामने आनी चाहिए. सरकार इसके लिए पैसा देने के लिए तैयार है.

सभापति महोदय, नागपुर जिले में मिहान प्रकल्प बहुत अच्छा है, लेकिन प्रकल्पग्रस्तों के पुनर्वसन के बारे में इस बजट में बहुत ज्यादा प्रावधान नहीं है. इसलिए किसानों की तकलीफ को देखते हुए सरकार को उनके बारे में उचित व्यवस्था करनी चाहिए.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT पूर्वी श्री शर्मा.. 16:55

श्री सय्यद जामा ....

सभापति महोदय, ग्रामीण क्षेत्र में गरीबी रेखा के नीचे के लोगों के लिए जो राशन कार्ड दिए जा रहे हैं, उसमें बहुत घपला हो रहा है. जायज़ लोगों को भी राशन कार्ड नहीं मिल रहा है. जब कार्यालय के कर्मचारियों से पूछते हैं कि आप जायज़ लोगों को राशन कार्ड क्यों नहीं दे रहे हैं तो वे यह कहते हैं कि भारत सरकार ने कोटा तय किया है इसलिए तय कोटे से ज्यादा हम राशन कार्ड नहीं दे सकते हैं. मैं यह पूछना चाहता हूं कि क्या गरीबी के लिए भी कोटा तय कर दिया गया है ? सरकार से मेरा अनुरोध है कि इस व्यवस्था में सुधार करें.

सभापति महोदय, मेरी दूसरी यह मांग है कि नागपुर के पास जो देवलापार नामक गांव है उसको तहसील बनाया जाए और कन्हान-खापरखेड़ा में नगरपरिषद की स्थापना की जाए. तीसरी मेरी यह मांग है कि नागपुर के पास मौदा में नियोजित एक हजार मेगावॉट का पावर प्रोजेक्ट का काम शीघ्र शुरु किया जाए. एक हजार मेगावॉट के बिजली प्रोजेक्ट को मान्यता मिल चुकी है और प्लानिंग कमीशन ने बजट का प्रावधान भी किया है लेकिन महाराष्ट्र सरकार के बजट में इसका कोई उल्लेख नहीं है. इसलिए मेरा अनुरोध है कि सरकार इस संबंध में विचार करें.

सभापति महोदय, मैं अल्पसंख्याक के बारे में थोड़ा बोलना चाहूंगा. कभी कभी मुझे बहुत खराब लगता है कि, जब हमारे राज्य में महाराष्ट्रीयन संस्कृति और अस्मिता की बात चलती है तो यह कहा जाता है कि हमें भी उस पर बोलना चाहिए. लेकिन हम महाराष्ट्र के लोग इस बात से सहमत है ही और इसमें कोई मतभेद नहीं है. लेकिन मेरा यह कहना है कि महाराष्ट्र की अस्मिता और संस्कृति की जब बात चलती है तो महाराष्ट्र में रहने वाले अल्पसंख्याक के बारे में केवल हम ही बोले और बाकी के हमारे साथी न बोले, ऐसा नहीं होना चाहिए. बाकी के हमारे साथियों को भी महाराष्ट्र में रहने वाले अल्पसंख्याक के हितों की रक्षा के बारे में बोलना चाहिए. मैं यह कहना चाहता हूं कि महाराष्ट्र की सरकार ने बुनकरों के हित की रक्षा करने के लिए पावरलूम और हेण्डलूम कार्पोरेशन की स्थापना की है. लेकिन आज बुनकरों की हालत बहुत खराब है. इसलिए बुनकरों की हालत सुधारने के लिए भी सरकार विचार करें. सभापति महोदय, प्रधानमंत्री जी के 20 सूत्रीय कार्यक्रम की घोषणा हुई है. लेकिन इन कार्यक्रमों के लिए धनराशि नहीं मिल रही है. उदाहरण के लिए मैं यह बताना चाहता हूं कि उस्मानाबाद, बीड और बहुत सारे जिलों में मुस्लिमों को कुएं मंजूर हो गए हैं, इसके लिए बजट में प्रावधान भी किया गया है लेकिन इस

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा ....

संबंध में पत्र लिखने के बाद भी अल्पसंख्य समुदाय को योजना का लाभ नहीं मिल रहा है, उनके साथ भेदभाव किया जा रहा है. इसलिए मंत्री जी से मेरा अनुरोध है कि प्रधानमंत्री के 15 सूत्रीय कार्यक्रम में अल्पसंख्याक के लिए जो योजनाएं गई है, चाहे वे सिख हो, ईसाई हो, सिंधी हो, मुस्लिम हो, उसके लिए बजट का अलोकेशन किया जाए और इस संबंध में विभागवार आदेश दिए जाए ताकि किसी भी विभाग में काम न रुक सके. इस के लिए 15 प्रतिशत बजट दिया गया है. हेडवाईज प्रावधान किया गया है और इस कार्यक्रम को राज्य सरकार ने स्वीकार किया है. इसलिए मेरा अनुरोध है कि सरकार इस संबंध में आवश्यक कदम उठाए. उसी प्रकार से उर्दू अकादमी, हिन्दी अकादमी, सिंधी अकादमी को फंड नहीं मिल रहा है. इसलिए मेरा अनुरोध है कि शीघ्र फंड प्रदान किया जाए और फंड की राशि भी बढ़ाई जाए ताकि काम पूरा हो सके.

सभापति महोदय, केन्द्रीय सरकार ने कहा कि पुलिस विभाग में पुलिस की भरती में अल्पसंख्याक समुदाय के लोगों को प्राथमिकता दी जाएगी. लेकिन इस दिशा में कोई कार्यवाही नहीं हो रही है. इसलिए मेरा अनुरोध है कि सरकार इस ओर विशेष ध्यान दें.

सभापति महोदय, सिक्स पे कमीशन ने केन्द्रीय सरकार को अपनी रिपोर्ट दे दी है. कुछ दिनों में केन्द्रीय सरकार कमीशन की रिपोर्ट को स्वीकार करेगी. मैं इस संबंध में यह कहना चाहता हूं कि महाराष्ट्र एक प्रगतिशील राज्य है. महाराष्ट्र सरकार ने इसके पहले भी केन्द्रीय सरकार के पे कमीशन की सिफारिशों को स्वीकार किया था इसलिए मुझे विश्वास है कि सिक्स पे कमीशन की सिफारिशें भी महाराष्ट्र सरकार स्वीकार करेगी. मैं इन शब्दों के साथ बजट का समर्थन करते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.......

यानंतर सौ. रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:00

**तालिका सभापती** (श्रीमती उषाताई दराडे) : मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना भाषणे करावयाची आहे. त्यामुळे आपल्याला सभागृहाची वेळ वाढवावी लागेल. सध्या आपण सभागृहाची वेळ एक तास म्हणजे सहा वाजेपर्यंत वाढवावी आणि तेवढया कालावधीमध्ये जेवढया सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील, तेवढी पूर्ण करु. त्यानंतर मग जो निर्णय घ्यावयाचा असेल तो घेऊ. मला असे वाटते की, प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी दहा मिनिटांमध्ये आपले भाषण संपविले तर बऱ्याच सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण होऊ शकतील.

श्री.राजन तेली : सभापती महोदया, माझी अशी सूचना आहे की, आपण प्रत्येक सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी दहा मिनिटांची वेळ ठरवून द्यावी, म्हणजे सर्वांना भाषण करण्याची संधी मिळू शकेल.

**तालिका सभापती** : मी मघाशी तेच सांगितले. आता सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .3 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने अर्थसंकल्पाच्या संदर्भात काही विशिष्ट मुद्यांबाबत माझे मनोगत व्यक्त करणार आहे.

सभापती महोदया,आज या सदनामध्ये अर्थसंकल्पावरील चर्चेचा तिसरा दिवस आहे. या कालावधीत अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतलेला आहे आणि त्यांनी विविध मुद्यांबाबत आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत 40212 वर्ग खोल्या बांधण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. केंद्र शासनाकडून राज्य शासनाला सर्व शिक्षा अभियान योजनेच्या संदर्भात फार मोठया प्रमाणात आर्थिक मदत मिळते. या राज्यामध्ये सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत वर्ग खोल्यांचा जो अनुशेष आहे, तो पूर्ण करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाकडून प्रयत्न केला जात आहे. परंतु अद्यापही या राज्यात अनेक ठिकाणी जवळजवळ 15 टक्के शाळांमध्ये वर्ग खोल्यांची संख्या अपूरी आहे. त्याठिकाणी वर्ग खोल्या बांधण्याची गरज आहे. जरी सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत या वर्ग खोल्यांचे बांधकाम होणार असले तरी देखील राज्य शासनाने सुध्दा या वर्ग खोल्या बांधण्यासाठी आणि ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांना शिक्षण देण्यासाठी चांगले वातावरण निर्माण करण्याकरता प्रयत्न करण्याची गरज आहे. वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी केंद्र शासनाकडून मिळणारा जो निधी आहे, तो अनेक ठिकाणी अखर्चित रहातो. याबाबतीत राज्य शासनाचे असे म्हणणे म्हणणे आहे की, हा निधी त्या वर्षी खर्च झाला नाही तर तो परत जात नाही. तो निधी पुढच्या वर्षी खर्च करता येतो. परंतु केंद्र शासनाकडून राज्य शासनाला जो मोठया प्रमाणात निधी मिळतो, त्याचा योग्य प्रमाणात विनियोग होण्याची गरज आहे. त्यासाठी विविध उपक्रम राबवून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बरवड . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .......

या वर्गखोल्या बांधण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांवर किंवा मुख्याध्यापिकांवर देण्यात आलेली आहे. हे सगळे पैसे त्या शाळेचे मुख्याध्यापक तसेच त्या गावचे सरपंच किंवा ग्राम शिक्षण समितीचे जे अध्यक्ष असतील त्यांच्या संयुक्त खात्यामध्ये ठेवले जातात. या योजनेअंतर्गत अनेक वर्गखोल्या निर्माण झालेल्या असल्या तरी यामध्ये अनेक शिक्षकांचा बळी गेलेला आहे. संयुक्त खात्यामध्ये पैसे असले तरी बहुतेक वर्गखोल्यांच्या बांधकामाच्या बाबतीत राजकीय दबावापोटी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकावर किंवा मुख्याध्यापिकेवर दबाव आणून ही सगळी मंडळी पैसे काढून घेतात. वर्गखोल्याचे बांधकाम अपुरे राहते आणि ज्यावेळी तपासणी होते त्यावेळी पैसे देऊनही वर्गखोल्याचे बांधकाम झाले नाही म्हणून त्या शाळेच्या मुख्याध्यापकावर किंवा मुख्याध्यापिकेवर पोलीस केस होते. जसे घराच्या बांधकामाच्या बाबतीत लक्ष ठेवतो त्याप्रमाणे वर्गखोल्यांच्या बांधकामाच्या बाबतीत शाळेचे मुख्याध्यापक जबाबदारी घेतात. ही जबाबदारी आम्ही घेतली पाहिजे हे तत्वत: मान्य आहे. सर्व मुख्याध्यापक याबाबतीत सहकार्य करतात. परंतु या आर्थिक व्यवहारामध्ये अनेक मुख्याध्यापकांना अडकविले जाते. त्यांच्यावर दबाव टाकून त्यांच्याकडून पैसे काढून घेतले जातात आणि वर्गखोल्यांचे पैसे वापरले जातात. त्यामुळे अनेक मुख्याध्यापकांचे आणि शिक्षकांचे यामध्ये बळी गेलेले आहेत. ते काम आम्ही स्वीकारले असले तरी या आर्थिक व्यवहारातून या मुख्याध्यापकांना मुक्त करण्याची वेळ आलेली आहे. यासंदर्भात परवा मी एक विषय मांडला होता. 10 फेब्रुवारी, 2008 ला जामकी, ता. बोधवड, जिल्हा जळगाव येथील सरपंचांनी बांधकामाचे पैसे काढून घेतले आणि वर्गखोलीचे बांधकाम झाले नाही. त्यामुळे तेथील मुख्याध्यापकांचा मोठ्या प्रमाणावर छळ करण्यात आला. शेवटी त्या मुख्याध्यापकाने विष प्राशन करुन आत्महत्या केली. त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या खिशामध्ये एक टिपण लिहून ठेवले होते. त्यांना संबंधित अधिकाऱ्यांकडून आणि गावातील लोकांकडून त्रास झाला. पोलिसांकडे तक्रार केली तरी सुध्दा त्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य मिळू शकले नाही. त्यांना आपला प्राण गमवावा लागला. टिटवाळ्याजवळ मानवली गाव आहे. तेथील मुख्याध्यापक माझ्याकडे आले. त्यांनी सांगितले की, वर्गखोल्या बांधण्यासाठी 200 गोणी सिमेंट आले. संबंधित बांधकामाचे जे ठेकेदार

...2...

श्री. रामनाथ मोते ......

होते तेच संयुक्त खात्यामधील सही करणारे अधिकारी असल्यामुळे त्यांनी त्यापैकी 100 गोणी सिमेंट घेतले मात्र वर्गखोल्यांचे बांधकाम अपूर्ण राहिले. आता कामासाठी मुख्याध्यापक सिमेंट मागतात तेव्हा ते सिमेंट देण्यास तयार नाहीत. याची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये केलेली आहे. त्यामुळे याबाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सैनिकी शाळांच्या जादा तुकड्या सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये सैनिकी शाळांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. सैनिकी शाळांचे महत्व शासनाने ओळखलेले आहे ही अत्यंत चांगली बाब असली तरी आणि राज्यामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये सैनिकी शाळा सुरु झालेल्या असल्या तरी प्रत्येक शाळेला अनुदान मिळतेच असे नाही. या सैनिकी शाळा सुरु करताना शासनाच्या धोरणाप्रमाणे विना अनुदान तत्वावर किंवा कायम विना अनुदान तत्वावर सुरु आहेत. सैनिकी शाळा जर इतक्या महत्वाच्या आहेत, सैनिकी शाळा जर इतक्या महत्वाच्या वाटतात तर या सैनिकी शाळांना, ज्या शाळा ग्रामीण भागामध्ये काम करतात आणि खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण देण्याचे काम करुन अत्यंत चांगली जबाबदारी पार पाडत आहेत त्या सर्व सैनिकी शाळांना अनुदान देण्याची नितांत आवश्यकता आहे. याचा शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, शालेय पोषण आहार योजनेसाठी 342 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. या शालेय पोषण आहार योजनेचा लाभ 44 लाख विद्यार्थ्यांना होणार आहे. परंतु ही योजना अनुदानित शाळांसाठी आहे. आता आपण या योजनेचा विस्तार केलेला आहे. आता इयत्ता आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा योजनेअंतर्गत किंवा मध्यान्ह भोषण योजनेअंतर्गत खिचडी मिळणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

खरा प्रश्न आहे तो विना अनुदानित शाळांचा, कायम विनाअनुदानित शाळांचा, ग्रामीण भागातील शाळांचा आहे. केवळ विनाअनुदानित शाळा आहे, शासनाचे अनुदान मिळत नाही म्हणून शासनाच्या चांगल्या योजनेपासून हे विद्यार्थी वंचित रहात आहेत. मध्यान्ह भोजन या योजनेचा लाभ त्यांना मिळत नाही. सर्व शिक्षण अभियानामध्ये बसत नसेल तर राज्य शासनाने बोजा उचलण्याची आवश्यकता आहे, शासनाने त्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्या विद्यार्थ्यांमध्ये अशाप्रकारे भेदभाव करणे योग्य होणार नाही. या राज्यातील शाळांची परिस्थिती अशी आहे की, एकाच शाळेमध्ये काही वर्ग अनुदानावर चालतात, काही वर्ग विना अनुदानित तत्वावर चालतात तर काही वर्ग कायम विना अनुदानित तत्वावर चालतात. अनुदानित तत्वाच्या वर्गातील मुलांना खिचडी मिळते आणि त्यांच्यासमोरच विना अनुदानित तत्वाच्या वर्गातील मुले तोंड पहात बसत आहेत. त्यांना खिचडी मिळत नाही. अशाप्रकारचा भेदभाव प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना अनुभवयास मिळत आहे, याचाही शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. म्हणून ही योजना केवळ अनुदानित तत्वाच्या शाळांना लागू न करता विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळांमध्ये लागू करण्यासाठी शासनाने तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, 2003 सालापासून शासनाने क्रीडा संकूल बांधण्याची योजना आणलेली आहे. गेल्या 5 वर्षापासून ही योजना लागू आहे. पण आतापर्यंत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी, प्रत्येक विभागाच्या ठिकाणी, प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी किती क्रीडा संकुले उभी केली आहेत ? मागील 5 वर्षामध्ये फक्त 16 तालुक्यामध्ये क्रीडा संकुले उभी केली आहेत, ती सुध्दा केवळ 3 जिल्हयातील आहेत. या क्रीडा संकुलांसाठी शासनाने 13.11 कोटींची तरतूद केली आहे. राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये, जिल्हयांमध्ये ख-या अर्थाने क्रीडा या विषयाला वाव द्यावयाचा असेल, ख-या अर्थाने क्रीडा हा विषय विकसित करावयाचा असेल, विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल आवड निर्माण करावयाची असेल, त्यांचा सहभाग व्हावा अशी मानसिकता निर्माण करावयाची असेल तर क्रीडा संकुले मोठया प्रमाणात होण्याची आवश्यकता आहे. यासाठी करण्यात आलेली तरतूद अत्यंत अपुरी आहे. त्यामध्ये वाढीव तरतूद करण्याची गरज आहे.

NTK/

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, यावर्षी 75 वर्षे पूर्ण झालेल्या शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती या संस्थेला शासनाने 75 लाख रुपये देण्याची तरतूद केली आहे. राज्यामध्ये अनेक जुन्या व चांगल्या संस्था आहेत. 1990 सालापासून निर्माण झालेल्या संस्था आहेत, त्या कशाप्रकारे व कशा निर्माण झाल्या हा वेगळा विषय आहे. परंतु 1995 पूर्वी चांगल्या हेतूने, चांगल्या उद्देशाने संस्था निर्माण झालेल्या आहेत, अत्यंत समर्पित भावनेने काम करणा-या संस्था आहेत. म्हणजे 50-60 वर्षापूर्वीच्या संस्था आहेत. मागील वर्षी कोल्हापूर जिल्हयातील एका संस्थेला 50 लाख रुपये दिले होते. यावर्षी अमरावती जिल्हयातील संस्थेला 75 लाख रुपये दिले जाणार आहेत. परंतु राज्यात 100 वर्षे पूर्ण झालेल्या अनेक संस्था आहेत. 100 वर्षे पूर्ण झालेल्या चांगल्या शाळा आहेत. म्हणून एखाद्या संस्थेला देण्याऐवजी एक ठोस कार्यक्रम आखावा लागेल. ख-या अर्थाने शिक्षण क्षेत्राला चालना देण्याचे काम केलेले आहे त्या संस्थांना आर्थिक मदत करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, राज्यामध्ये 140 नवीन वसतिगृहे बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्यामधून 36 हजार विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होणार आहे. त्यासाठी काही तरतूदही केलेली आहे. पण आदिवासी भागात जी वसतिगृहे सुरु आहेत त्यांची अवस्था कशी आहे ? या वसतिगृहांच्या माध्यमातून शिक्षणाची सोय करणार आहे की नाही ? केवळ वसतिगृहांची संख्या वाढविण्याचे काम शासन करणार आहे काय ? केवळ वसतिगृहांची संख्या वाढवून चालणार नाही. सध्या जी वसतिगृहे सुरु आहेत त्यामध्ये चांगल्या प्रकारचे वातावरण आहे काय, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहांची सोय, चांगल्या जेवणाची सोय आहे काय ? तेथे संगणकाची सोय आहे, ग्रंथालयाची सोय आहे, पण त्याचा त्यांना चांगला उपयोग होत आहे काय ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते....)

यापैकी आमच्या विद्यार्थ्यांना काहीही मिळत नाही. या वसतिगृहांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. वसतिगृहांची संख्या वाढविणे ही चांगली बाब असली तरी जी वसतिगृहे अस्तित्वात आहेत ती चांगल्या अवस्थेमध्ये ठेवण्यासाठी त्यांची देखभाल दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील 14 क्रमांकावरील प्रश्न हा वसतिगृहाच्या बांधकामाच्या संदर्भातील होता. महाड याठिकाणी वसतिगृह बांधण्याचे निश्चित केलेले असून त्यासाठी 3.18 कोटी रु. निधी उपलब्ध झालेला आहे. परंतु अद्यापही त्या वसतिगृहाचे काम सुरु झालेले नाही. अनेक वसतिगृहे अशी आहेत की ती अनियमित कारभारामुळे बंद करण्यात आलेली आहेत. परंतु जी वसतिगृहे गैरकारभारामुळे चौकशी होऊन बंद झालेली आहेत त्या वसतिगृहामध्ये शिक्षण घेणा-या मुलांचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. गैरकारभार करणारी जी वसतिगृहे असतील त्याबाबतीत जरुर कारवाई केली गेली पाहिजे. परंतु ती वसतिगृहे शिकणा-या मुलांचे भवितव्य लक्षात घेता बंद न करता ती दुस-या संस्थेला देण्याच्या बाबतीत विचार झाला पाहिजे. म्हणून यादृष्टीकोनातून विचार झाला पाहिजे.

सभापती महोदया, व्यावसायिक शिक्षणाच्या संदर्भात माझे विचार मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या संदर्भात केन्द्र शासनाकडून जवळपास 1600 कोटी पेक्षा अधिक रक्कम मिळते. सर्वच विद्यार्थी हे उच्च शिक्षण घेत नाहीत. उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या केवळ 7 ते 8 टक्के इतकीच आहे. 10 वी, 12वी नंतर 92-93 टक्के विद्यार्थी हे अन्य क्षेत्राकडे जातात. हे जे 92-93 टक्के अन्य क्षेत्राकडे जाणारे विद्यार्थी आहेत त्यापैकी काही विद्यार्थी हे आपल्या पायावर उभे राहू शकतील, स्वावलंबी बनू शकतील अशा पध्दतीचे व्यावसायिक शिक्षण, की ज्यामधून रोजगार उपलब्ध होऊ शकेल, देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदया, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रश्न मांडला. त्या पार्श्वभूमीवर मी सांगू इच्छितो की, हे विभाजन केवळ महसुली तत्वावर न होता शैक्षणिदृष्ट्याही विभाजनाचा विचार होणे आवश्यक आहे. मुंबई जिल्ह्याचे कार्यक्षेत्र हे प्रचंड व्यापक आहे. या ठिकाणी शिक्षण उपसंचालकांचे एक कार्यालय आहे. मुंबईतील शाळांची जबाबदारी त्या कार्यालयावर आहे. आता रायगड जिल्हा हा देखील मुंबईला जोडलेला आहे. 1400-1500 शाळा

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...)

असलेला ठाणे जिल्हा हा देखील मुंबई विभागाला जोडलेला आहे. सभापती महोदया, रायगड आणि ठाण्यासाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालकाचे कार्यालय करण्याचा निर्णय झाला होता. परंतु शासनाकडून त्याबाबतीत असे उत्तर देण्यात आले की, या कार्यालयासाठी मॅनपॉवर उपलब्ध करावी लागेल, कार्यालय करावे लागेल, अधिका-याचे पद निर्माण करावे लागेल. या कारणासाठी ठाणे आणि रायगडसाठी शिक्षण उपसंचालक कार्यालय होऊ शकले नाही. शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी हे शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय होण्याची गरज आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची शासनाची जबाबदारी आहे. अनेक विषय मला मांडावयाचे होते. परंतु आपण एक दोन वेळा सूचना केल्यामुळे तसेच मला वेळ दिल्यामुळे मी आपले आभार मानून माझे भाषण येथेच संपवितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन 2008-09च्या अंदाजपत्रकाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, केन्द्र शासनाने या राज्याची या वर्षाची जी वार्षिक योजना होती त्यापेक्षा अडीच ते पावणेतीन हजार कोटी रुपये वाढवून दिलेले आहेत. 25 हजार कोटीची वार्षिक योजना असणारे भारतातील, हिंदुस्थानातील महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. या अर्थसंकल्पाच्या बाबतीत फार चांगल्या ओळी लिहिलेल्या नियोजन मंडळाने लिहिलेल्या आहेत. राज्याची आर्थिक शिस्त कशी असली पाहिजे, आर्थिक बाजू कशी असली पाहिजे, ती कशा पध्दतीने सांभाळली पाहिजे या दृष्टीने देशाच्या नियोजन मंडळाने राज्याचे फार चांगल्या पध्दतीने कौतुक केलेले आहे. त्याबद्दल मी या शासनाचे आणि वित्तमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

माननीय वित्तमंत्र्यांनी 965 कोटी रुपयांचे सरप्लस बजेट दिले. शिलकी अर्थसंकल्प दिल्यानंतर देखील काही व्यक्तींनी सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर त्यावर टिका केली की, शिलकी अर्थसंकल्प देण्याची गरज काय होती? माझ्या दृष्टीकोनातून सदर अर्थसंकल्प हा शिलकी आहे की तो शिलकी नाही हे महत्वाचे नाही. अर्थसंकल्पातील तरतुदी अत्यंत महत्वाच्या आहेत. अर्थसंकल्प कोणासाठी करीत आहोत ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. " If you know 'Why' of Life, you know 'How' of Life. If you know 'Why' of Budget, you know 'How' of Budget." जीवन का जगावे हे जर समजले तर जीवन कसे जगावे हे कळते. अर्थसंकल्प का सादर करावा हे जर समजले तर अर्थसंकल्प कशासाठी, कशा पध्दतीने सादर करावा ही गोष्ट निश्चितपणे लक्षात येते. शिलकी अर्थसंकल्प दिला त्याबद्दल मी माननीय वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करतो. या देशात आणि या राज्याच्या तिजोरीत प्रत्येक रुपया कसा येतो त्यासंबंधी एक स्मॉल बजेटचे उदाहरण या ठिकाणी सांगू इच्छितो. "If you know 'Why' of Budget, you know 'How' of Budget." त्या बजेट इन ब्रीफमध्ये पैसा येतो कसा आणि जातो कोठे यासंबंधीची माहिती देणार आहे. हा अर्थसंकल्प मला स्वत:ला आवडला आहे. मी या ठिकाणी एखाद्या विशिष्ट पक्षाचा सभासद म्हणून बोलत नाही. परंतु आदरणीय वित्तमंत्री श्री.जयंत पाटील यांनी गेल्या आठ-नऊ वर्षामध्ये जे अर्थसंकल्प सादर केले, त्यातील उत्तम, आदर्श, विकासाभिमूख, समाजाभिमूख, सर्वांना न्याय देणारा असा हा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्प मांडल्याने महाराष्ट्रातील सर्व प्रश्न सुटले असा दावा मी करणार नाही. महाराष्ट्रातील प्रश्न सुटावेत, सर्वसामान्य माणसांना चांगल्या पध्दतीने जीवन जगता यावे, त्यासंदर्भातील शासनाची जबाबदारी आणि सामाजिक न्याय देण्यासंदर्भातील विचार हा या अर्थसंकल्पात निश्चितपणे केलेला दिसून येतो. राज्याच्या तिजोरीत प्रत्येक रुपया कसा येतो? गेल्या पाच सहा वर्षाचे बजेट इन ब्रीफ मी पाहिले. त्यात राज्याचे देशांतर्गत ऋण 18 पैसे आणि केंद्र शासनाकडील कर्ज 1 पैसा असे आहे. रुपया कसा जातो हे देखील नमूद केले आहे. त्यात व्याज सेवा आणि ऋण सेवा 13 पैसे, सरकारी ऋणांची परतफेड 6 पैसे असे प्रमाण आहे. दोन्ही बाजूचे प्रमाण 19 पैसे आहे. ही टक्केवारी कमी झाली पाहिजे. ही टक्केवारी 19 टक्क्यांपासून 15 टक्क्यांपर्यंत कशा पध्दतीने येईल याचा देखील विचार निश्चितपणे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

झाला पाहिजे. आपले राज्य सेल्सटॅक्सच्या माध्यमातून मिळणा-या उत्पन्नावर चालते आहे. आता त्याला आपण व्हॅट म्हणू. व्हॅटचे उत्पन्न 51 टक्के आहे आणि इतर उत्पन्न 49 टक्के एवढे आहे. व्हॅट कसा वाढेल यासाठी देखील प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्याला जो व्हॅट अपेक्षित होता, जो विक्रीकर अपेक्षित होता तो कमी झालेला आहे. तो कसा कमी झाला ही बाब मी नंतर शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे. मागच्या पाच, सहा वर्षापूर्वी आम्ही अर्थसंकल्पावर भाषण करीत होतो, त्यावेळी एक मुद्दा सातत्याने यावयाचा तो म्हणजे "कॅपिटल एक्सपेंडीचर आऊट ऑफ रेव्हेन्यू." अर्थसंकल्प सादर व्हायचा, त्या अर्थसंकल्पातील तरतुदीस 10 टक्के कात्री लावली जायची, काही वेळेस ही कपात 20 टक्क्यांपर्यंत केली जात असे आणि भांडवली खर्च महसुली खर्चातून भागविण्यासाठी निधी वापरला जात होता. गेल्या दोन तीन वर्षाचे अर्थसंकल्प पाहिले तर "कॅपिटल एक्सपेंडीचर आऊट ऑफ रेव्हेन्यू" असे निदर्शनास येत नाही. भांडवली खर्च हा भांडवलीच असला पाहिजे. आपण बजेट इन ब्रीफमध्ये पाहिले तर भांडवली खर्च 19 टक्क्याच्या वर गेलेला दिसत नाही. हे प्रमाण कसे वाढेल यासंदर्भातील प्रयत्न माननीय अर्थमंत्र्यांनी केला पाहिजे. मागच्या कालावधीतील अर्थसंकल्पाचा विचार केला तर भांडवली खर्च कमी करुन महसुली खर्च वाढत होता. तो खर्च आता नियंत्रणात आलेला आहे. पूर्वी राज्य गहाण ठेवावे लागेल की काय? अशी परिस्थिती या राज्यात निर्माण झाली होती. पण गेल्या सात, आठ वर्षाच्या कालावधीत ज्या गतीने महसूल वाढला आहे, ज्या टक्केवारीने महसूल वाढला आहे, त्यासंबंधीची देखील आकडेवारी या ठिकाणी देणे उचित ठरेल असे मला वाटते.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

राज्याच्या आर्थिक परिस्थितीच्या काही ठळक बाबी आहेत त्यामध्ये कर्ज किती आहे हे आपण पाहू. गेल्या चार वर्षांची आकडेवारी पाहिली तर 2005-06 मध्ये 124 कोटी, 2006-07 मध्ये 133 कोटी,2007-08 मध्ये 144 कोटी आणि 2008-09 मध्ये कर्जाची अपेक्षित रक्कम 158 कोटी रुपये इतकी आहे. हे कर्ज काढीत असताना निश्चितपणाने कर्ज वाढू नये असे प्रत्येकाचे म्हणणे असते. राज्यातील उत्पन्नाची टक्केवारी काढली की समाधान वाटते. उत्पन्न आणि खर्च यांची टक्केवारी पाहिली तर 2004-05 मध्ये 28 टक्के, 2005-06 मध्ये सुध्दा 28 टक्के, 2006-07 मध्ये 26 टक्के, 2007-08 मध्ये 25 टक्के आणि यावर्षी 24 टक्क्यांवर गेलेली आहे. खर्च वाढत आहे ही वस्तुस्थिती आहे. खर्च वाढत असताना उत्पन्नाशी त्याचा रेषो पाहिला तर महसूल वाढतो आहे ही समाधानाची बाब आहे. खर्च वाढत असताना त्याप्रमाणे उत्पन्न वाढत आहे. त्यादृष्टीने विचार केला तर कर्जाची एकही थकबाकी राहिलेली नाही. ज्यादिवशी देय असेल त्यादिवशी ते भरले जात आहे. 3/4 वर्षापूर्वी ओव्हर ड्राफ्ट घेऊन पगार द्यावा लागत होता. यावेळी ओव्हर ड्राफ्ट घेण्याची गरज भासली नाही हे आपल्या राज्याच्या प्रगतीचे प्रसादचिन्ह आहे असे मी सजतो. महसूली जमा आणि व्याजाची टक्केवारी याचा विचार केला तर 2003-04 मध्ये व्याजारी टक्केवारी महसूलाशी 25 टक्के होती, 2004-05 मध्ये 21.70 टक्के होती, 2005-06 मध्ये 19 टक्के, 2007-08 मध्ये 17.85 टक्के यावर्षी ती 16 टक्क्यांवर येत आहे. एकंदर चित्र पाहिले तर एका विशिष्ट अशा दिशेने राज्य प्रगती करीत आहे हे आपल्याला यासंदर्भात म्हणता येईल. महसूली आणि भांडवली जमेचा तपशील हा लक्षात घेतला तर 2006-07 मध्ये 79,824 कोटी रुपये, 2007-08 मध्ये 88,543 कोटी रुपये आणि 2008-09 मध्ये 101 लाख कोटी रुपये अशी आकडेवारी पाहिली तर राज्याचा महसूल चांगल्या पध्दतीने वाढतो आहे हे लक्षात येईल. प्रशासकीय खर्च देखील अत्यंत महत्वाचा आहे. प्रशासकीय खर्चाची मागील वर्षाशी तुलना केली तर 2007-08 मध्ये 6.44 आणि 2008 मध्ये प्रशासकीय खर्च 2 टक्क्यांनी कमी होऊन 4.59 टक्क्यावर आला आहे. दरडोई महसूल कसा आहे हे पाहिले तर 2007-08 मध्ये दरडोई महसूल 6363 कोटी रुपये आणि यावर्षाला अंदाजे 7 हजार 337 कोटी रुपये दरडोई महसूल आहे. म्हणजे दरडोई महसूल 1000 रुपयांने वाढत आहे. दरडोई खर्च 932 रुपयांनी वाढणार आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय, करवसुलीचा दुसरा एक मुद्दा मी याठिकाणी मांडणार आहे. विक्रीकराच्या संदर्भात विचार केला तर 100 रुपये वसूल करण्यासाठी 1 रुपया खर्च होतो. हे प्रमाण आता कमी होत आहे. यावर्षी वसूली खर्च वाढतो आहे हे मंत्रीमहोदयांनी लक्षात घ्यावे. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे याठिकाणी उपस्थित आहेत. वसूलीचा जो खर्च आहे तो 2005-06 मध्ये 87 पैसे होता. 2007-08 मध्ये तो 82 पैसे होता. यावर्षी तो वाढतो आहे म्हणजे 85 पैसे होत आहे. प्रशासकीय खर्च वाढणार नाही ही शासनाची आणि मंत्रीमहोदयांची जबाबदारी आहे. हा खर्च वाढणार नाही यासाठी शासनाने लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदय, उद्योगाच्या संदर्भात देखील सांगता येईल. उद्योगधंद्याच्या बाबतीत राज्य पहिल्या क्रमांकावर की दुसऱ्या क्रमांकावर अशी आपण चर्चा करतो. आपली स्पर्धा नेहमी गुजरातबरोबर केली जाते. गुजरातमध्ये चांगले प्रकल्प येत आहेत. या राज्याची स्पर्धा केवळ गुजरातबरोबर नसून कर्नाटक, तामिळनाडू, आंधप्रदेश या राज्यांशी आहे. या राज्यांशी तुलना करीत असताना पायाभूत विकास सुविधा या अत्यंत महत्वाच्या आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी........

उद्योगधंद्यांसाठी इन्फ्रास्ट्रक्चर तयार करणे. दुर्दैव असे की, विजेच्या बाबतीत आपण मागे आहोत. वीज निर्मितीच्या राजकारणात जाण्याची गरज नाही. गेल्या 7-8 वर्षाच्या काळात विजेचे उत्पादन कमी प्रमाणात झाले ही वस्तुस्थिती कोणाला नाकारता येणार नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, पुढील 2-3 वर्षाच्या काळात खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून साधारणत: 3 हजार मे.वॅट आणि शासनाच्या माध्यमातून जे प्रकल्प उभारले जात आहेत त्यातून 3-4 हजार मे.वॅट विजेचे उत्पादन वाढले तर पुनश्च एकदा उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर येईल. या स्पर्धेत आपण राहिले पाहिजे. केवळ मुंबईला आपले मंत्रालय असून चालणार नाही. केंद्र शासनाच्या माध्यमातून जो निधी राज्याला मिळतो त्यासाठी एक मिनी मंत्रालय दिल्लीला देखील उभारण्याची गरज आहे. तेथे काही आयएएस अधिकारी आणि इतर अधिकारी नेमून उद्योगाची सबसिडी जी महाराष्ट्राला मिळते, ती कशी अधिकाधिक मिळेल, कृषि क्षेत्रासाठी महाराष्ट्राला जी सबसिडी मिळते ते कशा पध्दतीने जास्त मिळेल याकडे लक्ष दिले पाहिजे. शेवटी पैशावर सर्व अवलंबून आहे. तुकाराम महाराजांनी अर्थसंकल्प कसा असावा याबाबत सुंदर उदाहरण दिले आहे. जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, विवेक विचारे वेचे करी. या ठिकाणी राज्याच्या एकत्रित निधीमधील एक-एक रुपया हा जनतेच्या मालकीचा आहे. तो खर्च करीत असताना अत्यंत विवेकबुध्दीने खर्च करु ही भावना असली पाहिजे. म्हणून केंद्र शासनाच्या माध्यमातून जितका अधिक निधी राज्याला मिळेल तो आणण्याच्या संदर्भातील विचार अत्यंत महत्वाचा आहे. कृषि क्षेत्राबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांची मते मांडली आहेत. 60 हजार कोटी रुपयांची कर्जे माफ झाली. त्याचा फायदा महाराष्ट्राला किती झाला, हिंदुस्थानला किती झाला, 5 एकरच्या आतील माणसाला किती झाला, विदर्भाच्या शेतकऱ्यांना किती झाला किंवा इतर भागातील शेतकऱ्यांना किती झाला यामध्ये न जाता 5 एकरपेक्षा ज्यांची जास्त होल्डिंग आहे आणि कोरडवाहू शेती आहे त्यांच्या बाबतीत शासन आश्वासन देत आहे का? 5 एकरपेक्षा ज्यांची जास्त कोरडवाहू शेती आहे त्यांना जरी केंद्र शासनाने माफी दिली नाही तर त्यांच्यासंबंधी राज्य शासन विचार करेल हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. या संदर्भात संकेत देखील आहेत. केंद्रामध्ये जे राज्यकर्ते आहेत त्यांच्याकडून देखील संकेत येत आहेत. माझे नेते आदरणीय श्री.शरद पवार यांच्यासोबत एका शेतकरी मेळाव्यात होतो. त्याठिकाणी देखील त्यांनी संकेत दिले, आमची याठिकाणी मागणी

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी........

अशीच राहिल की, केंद्र शासनाने 5 एकरपेक्षा ज्यांची जास्त कोरडवाहू शेती आहे त्याला जर जादा माफी मिळत नसेल तर आपण सर्वांनी एकत्रित येऊन तो फायदा त्या शेतकऱ्याला मिळण्याच्या संदर्भातील विचार करणे गरजेचे आहे. ज्यांनी वेळेवर पैसे भरले त्यांना काहीच फायदा मिळत नाही. Honesty has become penalty. प्रामाणिकपणा हाच दंड झालेला आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. मग तो विचार केंद्र शासनाच्या माध्यमातून होत नसेल तर राज्य शासनाच्या माध्यमातून 2 टक्के व्याजाने 25 हजार रुपयांपर्यंत, 25 हजार ते 3 लाखापर्यंत 4 टक्के व्याजाने आणि 6 टक्के व्याजाची योजना देखील यावर्षी सुरु ठेवली आहे. परंतु

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत)**

ज्यांनी वेळेवर कर्ज फेडले, वेळेवर हप्ते भरले त्या शेतकऱ्यांना न्याय देणे अत्यंत गरजेचे आहे. त्या संदर्भातील विचार मंत्रीमहोदयांनी करावा अशी या सभागृहाच्या माध्यमातून विनंती करतो. कृषि क्षेत्राचा जर आपण विचार केला तर कृषि क्षेत्रामध्ये विजेचा वापर फार मोठ्या प्रमाणावर कमी होत चालला आहे. कृषि विजेचा वापर कमी होत आहे ही चिंतेची बाब आहे. 2000-2001 साली 21 टक्के वापर कृषि क्षेत्रात होत होता. म्हणजे 21 युनिट वीज कृषि क्षेत्रात वापरली जात होती. आज हा वापर 15.70 टक्क्यावर आलेला आहे. म्हणजे 16 युनिट वापर होत आहे. हा कृषि क्षेत्रातील विजेचा वापर कमी होणार नाही, शेतीचा हिस्सा कमी होणार नाही याचा विचार झाला पाहिजे. Electricity and water are inevitable for the progress and development of Agriculture.

(नंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 17.35

श्री.अरुण गुजराथी..

राज्यामध्ये जर पुरेशी वीज नसेल, पुरेसे पाणी नसेल तर या शेतकऱ्यांना कितीही मदत केली किंवा त्यांचे कर्ज कितीही माफ केले तरी त्यांची आर्थिक प्रगती होणार नाही. असे मला सांगावयाचे आहे

.सभापती महोदय, जास्त न बोलता मला शेवटचा एकच मुद्दा येथे मांडावयाचा आहे. संपूर्ण देशामध्ये दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत हरियाणा राज्य पहिल्या क्रमांकावर आहे आणि आपले राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी या पुस्तकाच्या पान नंबर 102 वर दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण किती आहे याची माहिती देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे राज्यातील दारिद्रय रेषेखालील व्यक्तीची टक्केवारी 30 टक्के आहे. आपले राज्य हे श्रीमंतीच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर किंवा दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि दारिद्रयाच्या बाबतीत देखील आपले राज्य चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकावर आहे. प्रमुख राज्यातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण मी आपल्याला सांगतो त्या नुसर ओरीसा 46 टक्के, बिहार 41 टक्के, मध्य प्रदेश 38 टक्के, उत्तर प्रदेश 32 टक्के, महाराष्ट्र 30.7 टक्के, कर्नाटक 25 टक्के,पश्चिम बंगाल 24 टक्के, तामिळनाडू 22.5, राजस्थान 22.1, आंध्र प्रदेश 15.8, केरळ 15 टक्के आणि भारताची सरासरी टक्केवारी 27 आहे. भारताच्या सरासरीपेक्षा देखील महाराष्ट्राच्या दारिद्रय रेषेखालील राहणाऱ्या लोकांची टक्केवारी ही जास्त आहे. अर्थात त्याची वेगवेगळी कारणे आहेत त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. सभापती महोदय, मी माननीय अर्थ राज्य मंत्र्यांना विनंती करतो की, या संदर्भात आपण शासनाच्या माध्यमातून एक श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी . महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीच्या पुस्तकामध्ये असे म्हटलेले आहे की, "ही टक्केवारी 15 टक्यावर आणण्यासाठी अकराव्या पंचवार्षिक योजना संपेपर्यंत आपण प्रयत्न केला पाहिजे." तेव्हा हे आव्हान आपण स्वीकारु या . येत्या तीन चार वर्षाच्या कालावधीमध्ये ही टक्केवारी 30 टक्यावरुन 15 टक्यावर येण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावा लागेल आणि त्याकरिता महाराष्ट्र शासनाने एक श्वेतपत्रिका काढावी. 30 टक्यावरुन 15 टक्कयावर येण्यासाठी आम्ही अमुक अमुक प्रयत्न करणार आहोत किंवा अमुक धोरणे आखणार आहेत हे सांगणारी एक श्वेतपत्रिका प्रसिध्द करण्यात यावी असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.अशा प्रकारे जर प्रयत्न करण्यात आला तर हे राज्य आणखी पुढे जाऊ शकेल असे मला वाटते.

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

सभापती महोदय, यु.एल.सी.चा कायदा आपण रद्द केला आहे परंतु हा कायदा रद्द केल्यानंतर व्हेकॅन्ट लॅन्ड टॅक्स आपण आणलेला आहे. तेव्हा यु.एल.सी.चा कायदा रद्द केल्यानंतर सहा महिन्यात किंवा एक वर्षात काय लाभ झाला आहे याचा आढावा घेणे देखील अत्यंत महत्वाचे आहे.मुंबईच्या प्रश्नावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपआपले विचार मांडलेले आहेत. दहा लाख घरकुले बांधण्यात येणार आहेत परंतु त्यासाठी जे काही इन्फ्रास्टक्चर लागणार आहे ते केव्हा आणि कसे उभे करण्यात येणार आहे ? पिण्याचे पाणी तेथे मिळणार आहे काय, स्टॉर्म वॉटरची काय व्यवस्था करण्यात येणार आहे ? यासबंधीचे अनेक मुद्दे विचारात घेण्यची गरज आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी गहू, तांदूळ, हळद, मिरची डाळ 2010 सालापर्यंत करमुक्त केल्यामुळे लोकांना दिलासा मिळणार आहे. आतापर्यंत ही तीन महिन्यांनी मुदत वाढविण्यात येत होती परंतु आता 2010 सालापर्यंत करमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ही एक चांगली बाब आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे . "ड" वर्गाच्या ज्या महानगरपालिका आहे त्यांची जकात रद्द करण्यात आलेली नाही तर त्यांच्या क्षेत्रांत प्रवेश कर वसूल करण्यात येणार आहे. नवीन मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात गेल्या पाच सहा वर्षापासून बुक बेस्ड ऑक्ट्राय ठेवलेला आहे. तशा प्रकारे ड वर्गाच्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात बुक बेस्ड ऑक्ट्राय वसूल करण्यात येणार आहे. आज दुपारी आझाद मैदानावर या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी मोर्चा आणला होता आणि ऑक्ट्राय रद्द करण्यात आलेला असल्यामुळे आमच्या नोकरीचे काय होणार आहे असा प्रश्न त्यांनी मांडला होता. ज्यावेळी युती शासनाचे राज्य होते त्यावेळी अ,ब,क, नगरपालिकांचा ऑक्ट्राय रद्द केला होता तेव्हा देखील हाच प्रश्न निर्माण झाला होता. तेव्हा आता जो प्रश्न निर्माण झाला आहे या प्रश्नाचा शासनाला विचार करावा लागणार आहे. एक जुलै पासून ही पध्दत सुरु करण्यात येणार आहे. तेव्हा या कर्मचाऱ्यांचे काय करण्यात येणार आहे याचा देखील विचार आपण केला पाहिजे. ज्यावेळी व्हॅट आणला होता त्यावेळी संपूर्ण देशामध्ये असे तत्व ठरविण्यात आले होते की, व्हॅट आणल्यानंतर दुसरा कोणताही टॅक्स

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

राहणार नाही. याचा अर्थ असा की, व्हॅट लावण्यात आल्यानंतर स्टेट एक्साईज डयुटी राहणार नाही, ऑक्ट्राय राहणार नाही. आज तसे करणे राज्याला शक्य नसेल, हे मला मान्य आहे कारण राज्य चालविणे सोपे नाही. पैशाचे सोंग करणें सोपे नाही. परंतु हे लक्षात ठेवावे लागेल की ...

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुजराथी ....

वॅट आणल्यानंतर जकात राहणार नाही म्हणून ही मागणी आहे. आज राज्याकडे तेवढा निधी नसेल, शेवटी पैशाचे सोंग आणणे सोपे नाही. परंतु वॅट आल्यानंतर कोणत्याही पद्धतीचा कर, जकात राहणार राज्यात राहणार नाही हे आपण केले पाहिजे. सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजनेचा मासिक निधी वाढवून देण्याची गरज आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महामंडळाचा निधी आपण या अर्थसंकल्पातून वाढवून दिला नाही. कदाचित हे अनावधानाने राहिले असेल तर तो निधी वाढवून दिला गेला पाहिजे. सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मालमत्तेचे निर्माण हाही महत्त्वाचा भाग आहे. या योजनेमधून आम्ही 623 कोटीतील 610 कोटी आम्ही खर्च केले आणि 5 कोटी मनुष्यदिन निर्माण केले. त्यामधून किती मालमत्ता निर्माण झ ाली हेही पाहिले पाहिजे. वाटल्यास त्यासाठी रोहयोचा 60:40 हा रेशिओ आहे तोही काढून टाकला तरी हरकत नाही. आज केंद्र सरकारने देखील रोजगार हमी दिलेली आहे. 33 राज्यांमध्ये 100 दिवसाची हमी केंद्राने दिलेली आहे. तेव्हा आपल्या रोहयोमध्ये बदल करून त्याचा रेशिओ कमी जास्त करून मजुराला रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच मालमत्तेचेही निर्माण होईल हे पण आपण लक्षात घेतले पाहिजे. सभापती महोदय, बचत गटाला 4 टक्के व्याज देण्याच्या बाबतीत आमची अपेक्षा होती. आज ही अपेक्षा पूर्ण झाली नसली तरी पुढील काळामध्ये आमची ही अपेक्षा आपण पूर्ण करावी अशी विनंती आहे. सभापती महोदय, थोडक्यात जे काही विचार येथे या चर्चेच्या माध्यमातून मांडणे शक्य होते ते मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे, आपण त्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

( **सभापतीस्थानी - माननीय सभापती** )

...... 3जे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करून घेणे.

डॉ. सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

" कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरूवार, दिनांक 27 मार्च 2008 रोजी दुपारी 3.30 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचार विनिमय करून सोमवार, दिनांक 31 मार्च 2008 ते शुक्रवार, दिनांक 11 एप्रिल, 2008 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

| | |
|---|---|
| **मार्च, 2008** | |
| सोमवार, दिनांक 31 | : शासकीय विधेयके. |
| **एप्रिल, 2008** | |
| मंगळवार, दिनांक 1 | : 1) सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव.,<br>2) शासकीय विधेयके. |
| बुधवार, दिनांक 2 | : शासकीय विधेयके. |
| गुरूवार, दिनांक 3 | : 1) विरोधी पक्षाचा प्रस्ताव.,<br>2) शासकीय विधेयके. |
| शुक्रवार, दिनांक 4 | : अशासकीय कामकाज (ठराव) |
| शनिवार, दिनांक 5 | : बैठक होणार नाही. |
| रविवार, दिनांक 6 | : सुट्टी. |
| सोमवार, दिनांक 7 | : 1) विरोधी पक्षाचा प्रस्ताव.,<br>2) शासकीय विधेयके. |
| मंगळवार, दिनांक 8 | : शासकीय विधेयके. |
| बुधवार, दिनांक 9 | : शासकीय विधेयके. |
| गुरूवार, दिनांक 10 | : 1) विरोधी पक्षाचा प्रस्ताव.<br>2) शासकीय विधेयके. |
| शुक्रवार, दिनांक 11 | : अशासकीय कामकाज (विधेयके) |

...... 3जे 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून एकमताने संमत झाला.

***

**सभापती** : मी सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना एक बाब सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा दोन दिवस असते. ती या वेळेस आपण तिसऱ्या दिवशी देखील ठेवली आहे. तरीही माझ्याकडे या चर्चेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या सदस्यांची नावे पाहता अजून 14-15 सदस्य बोलणार आहेत. त्यानंतर माननीय अर्थमंत्र्यांचे उत्तराचे भाषण होणार आहे. तेव्हा आज ही चर्चा अशीच आपण पुढे चालू ठेवू व आजचे वक्ते पूर्ण करू. तसेच आज आपण लेखानुदान विनियोजन विधेयक घेऊ, तसेच एक विधेयक पुन:स्थापनार्थ आहे, तेही घेऊ आणि उद्या सभागृहाची बैठक सकाळी 10.00 वाजता सुरू करावी अशी माझी इच्छा आहे. त्या दृष्टीने आता आपण लेखानुदान विनियोजन विधेयक घेऊ. त्यानंतर पुन्हा अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सुरू करू. त्यात सन्माननीय सदस्य श्री.उपरकर हे यानंतर भाषण करतील.

( यानंतर श्री.सरफरे ....3के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विनियोजन विधेयक</u>

**पृ.शी.: विनियोजन (लेखानुदान) विधेयक**

L.A. BILL NO. XV OF 2008

( A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2008-2009)

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 15 राज्याच्या एकत्रित निधीतून 2008-2009 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी L.C. BILL NO. IV OF 2008

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PARAGANA AND KULKARNI WATANS (ABOLITION) ACT, 1950, THE BOMBAY SERVICE INAMS (USEFUL TO COMMUNITY) ABOLITION ACT, 1953, THE BOMBAY MERGED TERRITORIES MISCELLANEOUS ALIENATIONS ABOLITION ACT, 1955, THE BOMBAY INFERIOR VILLAGE WATANS ABOLITION ACT, 1958 AND THE MAHARASHTRA REVENUE PATELS (ABOLITION OF OFFICE) ACT, 1962.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार व पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 4 मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, 1950, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, 1953, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, 1955, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, 1958 आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, 1962 यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा एकच मुद्दा आहे की, ही प्रथा पडता कामा नये. खरे म्हणजे महसूल विभागाशी संबंधित हे विधेयक आहे. माननीय महसूल मंत्र्यांना काही काम आहे, त्यामुळे ते येऊ शकत नसतील तर किमान माननीय राज्यमंत्री महोदयांनी तरी येथे उपस्थित असावयास हवे होते. मात्र याठिकाणी माननीय सहकार मंत्र्यांनी विधेयक मांडलेले आहे. तेव्हा अशी प्रथा पडता कामा नये.

**सभापती** : अशी प्रथा पडणार नाही.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 4 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

. . . .3 एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2008-2009 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु)

**सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी भाषण सुरु करावे.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008-2009 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना मला माझ्या बोलीभाषेतून म्हणणे मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे. या सभागृहामध्ये मघाशी जी चर्चा झाली, त्यामध्ये एकमेकांवर टीका केल्यानी "हयना कोण थय गेलो, अन् थयना कोण हय इलो" याच्या बाबत सगळ्यांनी सांगितल्यानी. आमच्या कोकणातल्या काही माणसांका थंय घेतलास, मुख्यमंत्री करतव म्हणान सांगितलास पण त्यांका मुख्यमंत्री काय केलास नाय. तो माणूस आज देवचारासारखो फिरताहा आणि तुमची उणीदुणी काढताहा.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे मालवणी भाषेमध्ये बोलत आहेत. पण याठिकाणी त्याचा अनुवाद करण्यासाठी कोणी उपस्थित आहे काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांच्या मालवणी भाषणाचा अनुवाद करण्यासाठी तातडीने व्यवस्था होऊ शकणार नाही. पण आपल्याला जेवढे समजेल, तेवढे आपण समजून घेऊ या. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी तुमका सांगतय की, आमच्या कोकणाक काय दिलास नाय. पण बोलण्याची संधी तरी देवा. आतापर्यंत कोकणातल्या माणसानी आपली लय गाऱ्हाणी मांडली. पण त्यांच्या पदरात मात्र तुम्ही धोंडे टाकलास. आता तरी त्येंका धोंडे देव नको. कायतरी मदत देवा अशी मी तुमच्याकडून अपेक्षा करतय. कोकण म्हटला की, सत्ताधारी पक्षातले सगळे जण आमच्याकडे तिरक्या नजरेने बघतत. कोकणाक काय देवचा म्हटला की, त्येंच्या डोक्यार सतराशे साठ आठ्यो पडतत. कोकण आजपर्यंत उपेक्षित ऱ्हवलेलो असा, कोकणातलो सगळ्यो अडचणी तुम्ही नजरेच्या आड केलास. खालच्या सभागृहात अर्थसंकल्प मांडण्यासाठी अर्थमंत्री आमच्या गावच्या गावपुरुषासारखो ईलो. वरती टोपी घातल्यान, धोतर घातल्यान,कोट .....

. . . .3 एल-2





श्री.परशुराम उपरकर . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

घातल्यान. पण त्या टोपीखाली काय दडला ता मात्र सांगाक ईसारलो. हयाठिकाणी पुढाऱ्यासारखो ईलो, केंद्राच्या काय योजना आसत ते सांगून आपले मात्र फुकटचे फुशारक्यो मारल्यान. कोकणी आणि मालवणी भाषेत एक म्हण असा "आयजीच्या जीवार बायजी उधार नी सासयेच्या जीवार जावय सुभेदार" अशी परिस्थिती ह्यो अर्थसंकल्प मांडताना आमच्या मंत्र्यांनी केलेली असा. कोकण आणि कोकणातलो आंबो, आंब्याक राजो म्हटलो जाता. पण कोकणातल्या आंब्याक काय देवचा म्हटला का ह्येंच्या पोटाक मात्र गोळो येता.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

पण पंधरा हजारातला फक्त 9 हजार अनुदान तुम्ही आमका देऊक लागलास. आज आपण कोकणातील आंब्याकडे कसा बघतास? कोकणातली खईची योजना जाहीर केली की, त्यांका तुम्ही खईचे निकष लावतास पण द्राक्षा, केळी आणि बाकीचे जे आसत, त्यांका देताना मात्र खईचे निकष तुम्ही लावनास नाय. पण कोकणाक काही देऊचा म्हटला की, त्येका मेजरमेंट लावतास, टेप लावतास आणि निकष लावतास. आंबो ह्यो राजो म्हटलो जाता. पण आंब्याची दशावतारी राजासारखी गत तुम्ही करुन सोडलास. कारण दशावतारातलो राजो रात्रीचो राजा आसता आणि सकाळी मात्र डोक्यावर बोजा घेऊन जाता तशा प्रकारची परिस्थिती आज आंब्याची करुन ठेवलास. आज बघितलास तर मोठो पावस पडलो. पावसामुळे पुष्कळ नुकसान झाला. आज आंबो नाय, फणस नाय, जांभळं खाऊक मिळूची नाय अशी परिस्थिती झालेली आसा. त्यामुळे आंब्याक या वर्षी तरी 50 हजार रुपये अनुदान देऊचो निर्णय शासनाने घेवक व्हयो अशा प्रकारची मी या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने सूचना करतय. आज या ठिकाणी समुद्राचो किनारो 720 किलोमीटरचो असा. आणि कोकणातलो मच्छिमार त्या किनारपट्टीवर वसलेले आसत. त्या कोकणातल्या मच्छिमारांका काही तरी देतालास, पॅकेज देतालास म्हणून घोषणा करतास पण घोषणा केल्यानंतर मात्र अर्थसंकल्पात खचचीच तरतूद करत नाय. म्हणजे कोकणी माणसास परत फसवतास अशा पध्दतीची परिस्थिती झालेली आसा. आज विदर्भातले लोक आत्महत्या करतहत. ते शेतकरी म्हणून आत्महत्या करतहत. आता शेतकऱ्यांप्रमाणे मच्छिमारांनी आत्महत्या करुक सुरुवात केलेली आसा. त्याचा उदाहरण म्हणजे आज एका मच्छिमाराक आपल्या बोटीचा कर्ज भागवक मिळाला नाय, ट्रॉलरचा कर्ज फेडूक मिळाला नाय म्हणून नवी मुंबईतीरल नेरुर येथील कार्वे गावात ऱ्हवणारो मच्छिमार रामचंद्र रेवण नाखवा, वय वर्षे 45 हयेनी गळफास लावून आत्महत्या केल्यान. हेची एन.आय.आर. पोलीस स्टेशनात तक्रार नोंदवलेली आसा. त्यामुळे कोकणातल्या मच्छिकारांका दिलासा देण्यासाठी काय तरी उपाययोजना करण्याची गरज आसा. इतर राज्यात त्यांच्यानी या लोकांसाठी उपाययोजना केलेल्यो आसत. केरळ राज्यात, कर्नाटक राज्यात, गुजरात राज्यात मच्छिमारांका वेगवेगळ्यो योजना दिलेल्यो आसत. त्या योजनेचो अभ्यास करण्यासाठी एक समिती

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ......

गठीत करा. समितीच्या माध्यमातून लवकरात लवकर या कोकणातल्या मच्छिमारांका काही तरी देऊक व्हया आणि मच्छिमारांका दिलासो मिळात यासाठी सबसिडीचा रॉकेल, रापणकारांका सबसिडी, पेन्शन योजना राबविण्याची गरज आसा. छोटया मच्छिमारांका जा काय देऊक मिळात त्यासाठी शासनान उपायोजना करुन त्या राज्यासारख्या याही राज्यात त्यांका काही तरी दिलासो देण्याचो काम या ठिकाणी करुक व्हया.

सभापती महोदय, केंद्र सरकारान सिंधुदुर्ग जिल्हो पर्यटक जिल्हो म्हणून घोषित केलो. पण पर्यटन जिल्हो व्हतलो असा म्हटल्याबरोबर समुद्रालगत मोठमोठ्या हॉटेलवाल्यांनी, फाईव्ह स्टारसाठी जागा घेतल्यानी. पण जागा घेऊन काय सुध्दा उपयोग केल्यानी नाय. हेंच्यानी बांधकामाची एक वीट सुध्दा लावली गेली नाय. अशा प्रकारची परिस्थिती फाईव्ह स्टार वाल्यांची झालेली आसा. पर्यटन महामंडळ सुविधा केंद्र काढल्यानी पण ती सुविधा केंद्रा अशा ठिकाणी बांधल्यानी की, त्या सुविधा केंद्राचो काय तरी वेगळो वापर होयत आसा पण पर्यटनासाठी तो वापर होना नाय अशी सगळी परिस्थिती आसा. आमच्याकडे कुणकेश्वराचा चांगला देऊळ आसा तसाच सिंधुदुर्ग किल्ला, तारकर्ली, वेंगुर्ला, आरवली, वेतोबा, सावंतवाडी, नरेंद्र डोंगर राजवाडा, विजयदूर्ग किल्ला, आंबोली, आचरा अशी ठिकाणा आसत. ही प्रमुख पर्यटन केंद्रा मुलभूत सुविधानी विकसित केली तर त्या ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात येतीत. पण त्याकडे दुर्लक्ष करुन प्रदूषण करणारे औष्णिक ऊर्जा प्रकल्प व पर्यावरण बिघडवणारे मायनिंग प्रकल्प आणून जिल्ह्याचो प्रदूषण आणि पर्यावरण बिघडवणारे असल्याने पर्यटक पाठच फिरवतलो. एका बाजूक आपण सिंधुदुर्ग जिल्हो पर्यटन जिल्हो म्हणून घोषित करतास आणि दुसऱ्या बाजूक त्या ठिकाणी मायनिंगच्यो खाणी आणतास आणि प्रदूषण करतास. ज्या जिल्हयात प्रदूषण होता त्या जिल्हयात पर्यटक येनत नाय. माका तुमका सांगूक अभिमान वाटता की, मलेशियासारख्या छोटासा शहर, मायनिंगवर जगणारा.. पण मायनिंग बंद करुन ता शहर पर्यटन व्यवसायाकडे वळला आणि त्या शहरान पर्यटन व्यवसायामध्ये प्रगती केली तशीच प्रगती आमच्या सिंधुदूर्ग जिल्हयाची होण्यासारखी आसा, कारण सिंधुदूर्ग जिल्हयाक समुद्रकिनारो आसा, डोंगराळ प्रदेश आसा, सृष्टीसौंदर्य आसा, मोठमोठी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

देवळा आसत, त्या देवळांची प्रतिष्ठा जपण्यासाठी ह्यो जिल्हो पर्यटन जिल्हो म्हणून घोषित करुन त्याका अनुदान देवची आज खरी गरज आसा. नायतर एकदा या शासनान जाहीर करुचा की, हयो जिल्हो पर्यटन जिल्हो म्हणून आमका घोषित करुचो नाय आसा. या जिल्हयात आमका प्रदूषण करणारे कारखाने आणूचे आसत, प्रदूषण करणारे मायनिंग प्रकल्प आमका या ठिकाणी आणूचे आसत. या ठिकाणी शासनाचो पैसो वाया जाव नये म्हणान मी तुमका हया सांगतय. गेल्या चार पाच वर्षांपासून आम्ही कोकणी माणसा ऐकतव की, सिंधुदूर्ग जिल्हयात विमानतळ येतलो. या विमानतळासाठी शासनान 1 हजार हेक्टर जमीन 150 रुपयांनी, 15 रुपयांनी घेतली होती. त्या कामासाठी माननीय मंत्री महोदयांनी दोन वेळा निविदा काढल्यानी, दोन वेळा नारळ फोडल्यानी, पण त्या विमानतळाचा काम मात्र होना नाय. एक माननीय मंत्री महोदय येता आणि हयच विमानतळ होतलो असा सांगता, दुसरो माननीय मंत्री महोदय येता आणि हया काम निकषात बसना नाय असा सांगता अशा प्रकारची वेगवेगळी धोरणा घेवन आमच्या कोकणी माणसाचो नायनाट करण्याचा काम करुचा असा या शासनकर्त्यांनी ठरवला आसा.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

कोकण विकास महामंडळान 1 हजार हेक्टर जमिनीवर तेलताड प्रकल्प घेतलो होतो. त्या झ ाडांका फळा लागली, थयसर एक कारखानो उभो केल्यानी, पण तो कारखानो चार दिवसात बंद पडलो. म्हणजे तेथेही कोकणावर अन्यायच केलो. कोकण विकास महामंडळान तेलताड प्रकल्प आणलो पण त्या प्रकल्पाची सुध्दा वाट लावून ठेवलास.

सभापती महोदय, कुडाळमध्ये एमआयडीसी आणण्यासाठी 500-600 हेक्टर जमीन घेतली होती. या एमआयडीसीमधले 80 टक्के उद्योग बंद आसत. थंय उद्योग येतले म्हणान शेतक-यांनी आपल्यो जमिनी दिल्यो. पण आता त्या जमिनीवर कारखानदारांनी घरा बांधली आसत. शेतकरी म्हणतत की, कारखान्यासाठी आम्ही जमीन दिली पण त्यावर कारखानदारांनी घरे बांधली आहेत. त्यासंदर्भात स्थानिक लोक यांच्या विरोधात उपोषणा करतत, मोर्चा काढतत. मंत्रिमहोदयांकडे निवेदने दिली आहेत. परंतु सरकारने आतापर्यंत त्याची दखल घेतलेली नाही. शासनाक एक एमआयडीसी सांभाळूक जमना नाय. आता मालवण तालुक्यातील देवली येथील शेतक-यांची जमीन एमआयडीसी होण्यासाठी संपादित करण्याचा प्रयत्न सुरु आहे. तेथील शेतक-यांचे त्या जागेवर घर आहे, गुरांचो गोठा असा, आंबा बागायती असा, वाडी असा. तेथील शेतक-यांना कोणतीही माहिती न देता एमआयडीसीने कोणत्याही प्रकल्पाची माहिती न देता त्यांच्या 7/12 वर ' औद्योगिक विकास महामंडळ ' असे शिक्के मारल्यानी. त्यामुळे तेथील लोकांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. हा असंतोष टाळावयाचा असेल तर सरकारने त्याकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

सभापती महोदय, मालवणी मानसा, कोकणी मानसा सभागृहात सांगत असतात की, कोकणात 200 इंच पाऊस पडता, 250 इंच पाऊस पडता. कोकणातील वाया जाणा-या पाण्याचा विचार करण्यासाठी स्वामीनाथन् समिती नेमली होती. त्या समितीने आपलो अहवाल शासनाक दिलो हा. युतीच्या काळात कोकण सिंचन मंडळाची स्थापना केली होती. कोकण सिंचन प्रकल्पाची निर्मिती झाल्यानंतर कोकणात सिंचन प्रकल्पांची कामे सुरु झाली. पण कर्मधर्म संयोगाने युतीची सत्ता गेली. पण सत्ता बदल झाल्यावर या महामंडळाच्या माध्यमातून सुरु असलेल्या कामावर पाणी फिरवला गेला. या कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिलो जाना नाय.. त्यामुळे अनेक कामा बंद पडलेली आसत, काही कामा धीम्या गतीने सुरु आसत. कोकणचो पालक मंत्री

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

सांगता की, कोकणातील सिंचन प्रकल्पासाठी मी 250 कोटी आणलंय, मुख्यमंत्री सांगतत की, मी 40 कोटी रुपये दिलंय. पण हयो पैसो खंय गेलो ता समजना नाय. कोकणातला पाणी जिरविण्यासाठी व अडवण्यासाठी भरीव निधी देवची आवश्यकता आसा. त्यादृष्टीन शासनान प्रयत्न करण्याची आवश्यकता आसा.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागावर बोलताना माका खूप दु:ख होता. मार्ग व पूल, 2054 या लेखाशीर्षाखाली 276 कोटी 44 लाखांची तरतूद केलेली आसा. या निधीतून 1973 कामे केली जावची आसत. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हयाची फक्त 16 कामे आसत. त्यासाठी फक्त 1 कोटी रुपये दिले आहेत. म्हणजे 276 कोटींपैकी सिंधुदुर्ग जिल्हयासाठी केवळ 1 कोटीची तरतूद केली आहे. अशाप्रकारे कोकणाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. तारामुंब्री पूल होण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविल्याचे सांगण्यात येते. केंद्राची मंजुरी मिळाल्यानंतर या पुलाचे काम केले जाईल असे बोलले जाते. परंतु या पुलाच्या कामासाठी याही वर्षी तरतूद केल्याचे दिसत नाही. यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. अशी या सिंधुदुर्ग जिल्हयाची परिस्थिती आहे.

**तालिका सभापती ( श्री.अरविंद सावंत )** : सभागृहाची वेळ 6 वाजेपर्यंत वाढविली होती. आता 7 वाजेपर्यंत वेळ वाढविण्यात येत आहे. या वेळेमध्ये जेवढी भाषणे व्हायची ती होतील. माननीय सभापतींनी केलेल्या सूचनेप्रमाणे सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, आज कोकणाकडे एवढा दुर्लक्ष करतास. कोकणात हत्ती फिरतत आणि हत्ती लोकांचो बळी घेतत. पण त्या हत्तीन बळी घेतल्यानंतर त्यांका फक्त 1 लाख रु. देतास, मात्र वाघान मारल्यान तर त्यांका 10 लाख जाहीर करतास. आमचे हत्ती तुमच्याकडे घेऊन जावा आणि थयचे वाघ आमच्याकडे पाठवा म्हणजे कोकणी माणूस कसो तरी सुखी व्हयत. असा तरी काय ते करा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. हत्तीने माणसाला मारले तर 1 लाख रु. दिले जातात आणि वाघाने मारले तर 10लाख रु. देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे. दोन्ही वेळेला माणूस हा मरणारच आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : हत्तीमुळे माणूस दगावला तर खास बाब म्हणून 2 लाख रु आर्थिक मदत करण्याचा निर्णय झालेला आहे.

**तालिका सभापती** : हत्तीने मारले तर 1 लाख रु. दिले जातात आणि वाघाने मारले तर 10 लाख रु. दिले जातात, एवढाच सन्माननीय सदस्यांचा मुद्दा आहे. त्याबाबतीत शासन उत्तर देईल.

श्री. दिवाकर रावते : हत्तीने मारले तर 1 लाख रु. दिले जातात आणि वाघाने मारले तर 10 लाख रु. दिले जातात म्हणून वाघ आमच्याकडे पाठवा आणि हत्ती तुमच्याकडे घ्या, एवढेच सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, त्यामुळे मंत्री महोदयांका मी विनंती करतय की आमचे हत्ती तुमच्याकडे घेवा आणि तुमचे वाघ आमच्याकडे पाठवा. त्यामुळे तरी कोकणी माणसाक 10 लाख रु. मिळतील. अशा प्रकारचा समाधान आमका तरी वाटात. त्याच बरोबर अर्थसंकल्पात मच्छिमारांच्या कुटुंबातील कोण बुडलो तर त्याका मिळत असलेली 50 हजाराची भरपाई 1 लाख केलास. म्हणजे सर्व ठिकाणी माणूस पण त्या मरणा-या माणसाची किंमत कशी करतास हया तुमच्या अर्थसंकल्पातून तुम्ही दाखवून दिलेला आसा.

सभापती महोदय, या ठिकाणी बांधकाम विभागाचो कार्यकारी अभियंता लाच घेताना पकडलो जाता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचो कार्यकारी अभियंता लाच घेताना पकडलो जाता,

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर...)

तलाठी पकडले जातत, तहसिलदार पकडले जातत. तहसिलदार धान्य घोटाळयात अडाकतत, डीएसओ अडाकता, पण त्यांका मात्र आमचो पालकमंत्री सहिसलामत सोडता. त्यांचा निलंबन करना नाय, त्यांचा निलंबन करुचा म्हटला तर निलंबन करणार नाय, मी त्याच्यावर असलेले केसेस काढून टाकतलय म्हणून पेपरमध्ये सांगून मोकळो होतास आणि त्याच धान्य घोटाळयात अडजस्टमेंट झाली म्हणून सांगतास, अशा पध्दतीचो शासनाचो पालकमंत्री आमच्या जिल्ह्यामध्ये दिलेलो आसा. सावंतवाडी तालुक्यात मडु-याची पार्टी झाली....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अशा प्रकारे वैयक्तिक आरोप सन्माननीय सदस्यांना करता येतात काय ? अर्थसंकल्पावर बोलत असताना नको त्या विषयावर अशा प्रकारची आकसाने वक्तव्ये करणे इष्ट नाही. तेव्हा माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावर बोलण्यास सांगावे.

श्री. दिवाकर रावते : या सदनामध्ये बोलताना कुणाचे नाव घेतलेले नाही. श्री. शरद पवार हे केन्द्रीय कृषीमंत्री आहेत म्हणून त्यांच्यावर टीका होते. शरद पवार म्हणून वैयक्तिक टीका त्यांच्यावर कोणी करीत नाही. तेव्हा पालकमंत्री हे राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री आहेत. तेव्हा मंत्र्यांच्या धोरणावर टीका करण्याचा सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. अशा प्रकारची टीका ही व्यक्तिगत टीका होऊ शकत नाही. भ्रष्ट अधिका-यांना मी वाचवीन अशा प्रकारचे स्टेटमेंट पालकमंत्र्यांनी करु नये एवढेच सन्माननीय सदस्यांना सांगायचे आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माका एकच सांगूचा आसा. लोकांका धान्य मिळना नाय पण धान्य घोटाळे होतत. त्यांका ॲडजस्टमेंट म्हणून सांगितल जाता आणि 6 रुपयान मिळणारो गहू 12 रुपयाने विकलो जाता, ह्यांच्या पाठिमागे जे उभ रव्हतत. त्यांका शिक्षा होऊक व्हयी. तशी शिक्षा त्यांका होवची या माध्यमातून याठिकाणी मी ह्या मांडतय.

...नंतर श्री. गिते...

अमुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

आमच्या सावंतवाडी तालुक्यात मडुऱ्याक एक पार्टी झाली. ती बर्थ डे पार्टी होती असे आमच्या पालक मंत्र्यांनी सांगितला आणि त्या बर्थ डे पार्टीमध्ये परदेशी पर्यटकांनी गोव्यात स्वस्त दारु मिळता म्हणून सिंधुदूर्ग जिल्हयात येऊन महागाची दारु पिल्यानी. त्या ठिकाणी इलेल्या पर्यटकांना सोडून दिला. आम्ही म्हणतव की, थंयचे पर्यटक अर्धनग्न होते. त्येंचे फोटो आमच्याकडे आसत. ते अर्धनग्न होते. आमच्याकडे फोटो आसत. पालक मंत्री टी.व्ही.वर सांगतत की, या बायकांनी किती कपडे घालूचे हयो त्येंचो प्रश्न आसा. त्यांका तोकडे कपडे घालू दे, अर्धनग्न कपडे घालू दे. सिंधुदूर्ग जिल्हयाची परवानगी त्यासाठी घेवची गरज नाय. पण सिंधूदुर्गाक एक संस्कृती आसा. ती मोडण्याचा काम या माध्यमातून केला जाताहा. मडुरा सारख्या ठिकाणी रेव्ह पार्टी झाली. ती बर्थ डे पार्टी होती असा सांगण्यात इला. ही बर्थ डे पार्टी तिकीटा लावन झाली. आज काल तिकीटा घेऊन बर्थ डे पार्टी प्रसिध्दी मिळविण्यासाठी केली जाता की काय अशी शंका येऊक लागली आसा. मालवणमध्ये अश्लिल चित्रफीत तयार केली. या चित्रफितीची सी.डी. परदेशात पाठविली.परंतु पोलिसांनी या बाबतीत काय सुध्दा दखल घेतली नाय. 20 लाख रुपयांचो गांजो सिंधुदूर्ग जिल्हयात मिळालो. आमच्या जिल्हयात गांजो पिकविलो जाना नाय, परंतु आमच्या जिल्हयात तो सापडल्यामुळे आमच्या जिल्हयाचा नाव खराब झाला.

सभापती महोदय, "डॉक्टर तुमच्या दारात"असा शासनाकडून सांगितला जाता. परंतु शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात गेलास तर थय डॉक्टर उपलब्ध नसतत. ग्रामीण रुग्णालयांची देखील तशीच परिस्थिती आसा. ग्रामीण भागात वैद्यकीय उपचार करुन घेण्यासाठी शासनाचे डॉक्टरच भेटनत नाय. मी अमरावतीचा याक उदाहरण ऐकलंय. त्या ठिकाणी श्वानदंशाची एक्सपायरी डेटची 30 कोटी रुपयांची इंजेक्शने खरेदी केली गेली. अशा प्रकारची औषधा खरेदी करुन शासनाचो निधी बेकायदेशीरपणे खर्च करण्याचा काम शासनामार्फत होयत आसा. कोकणातील एक विरोधी पक्षाचो सदस्य म्हणून मी कोकणातल्या अडचणींचा रडगाणा या ठिकाणी मांडलंय. परंतु सत्ताधारी पक्षातील मंत्री सांगत सुटले हत की, हया सरकार सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सोडविणारा आसा. त्यांच्यानी पत्रकार परिषद घेऊन सांगितला की, या शासनातील मंत्री, मुख्यमंत्री लोकांची कामे करनत नाय. दिल्लीच्या वा-यो करुन, दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी मंत्री मंडळातील सर्व गोष्टी सांगून टाकल्यानी. मंत्री झाल्यानंतर गोपनीयतेची शपथ घेतली

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

जाता. सरकारच्या काय गोष्टी असल्यो तर त्यो गोपनीय ठेवले जातीत अशी शपथ घेतलेली असता. पण सरकारच्या गुप्त गोष्टी गोपनीय न ठेवता दिल्लीत पत्रकार परिषदा घेऊन शासनाची लक्तरा काढली जातत. आमच्या जिल्हयातील मंत्र्यांका मुख्यमंत्र्यांच्या पदाचे डोहाळे लागले आसत.म्हणून मुख्यमंत्र्यांका धडा शिकवण्यासाठी दिल्लीत जाऊन पत्रकार परिषदा घेऊन सरकारच्या विरोधात बोलला जाता...

श्री. राजन तेली : सन्माननीय सदस्य अर्थसंकल्पावर बोलत आहेत काय ?

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी अर्थसंकल्पावर बोलतंय. आमच्या मंत्र्यांका मुख्यमंत्री पदाचे डोहाळे लागलेले आसत ....

श्री. दिवाकर रावते : कालच्या भाषणात सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली असे म्हणाले की, आमचा कोकणातील हिरा आहे, त्यांना महसुलाचे कोंदण पुरे पडत नाही. त्यांना मोठे कोंदण पाहिजे. तर ते अर्थसंकल्पात नव्हते. ही तीच चर्चा आहे.

श्री. परशुराम उपकर : सभापती महोदय, दिल्लीमध्ये सांगून झाला. आमच्या मंत्र्यांका मुख्यमंत्री पदाचे डोहाळे लागलेले आसत. मुख्यमंत्री होण्यासाठी काय काय बडबडतत ते. म्हणूनच केंद्र शासनातले आणि राज्य सरकारातले मंत्री कोकणासाठी निधी देनत नाय. आमका कोकणाचो मुख्यमंत्री नको. पण आमची विकास कामे थांबव नका. त्यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्येवा अशी माझी शासनाक विनंती आसा. सभापती महोदय, आपण माका मालवणी भाषेत बोलाक संधी दिलास त्या बद्दल मी तुमचे आभार मानतय. मी हयसर मालवणी भाषेत कोकणातील अडचणी सांगितलेल्यो आसत, त्यो माननीय मंत्रिमहोदयांना कळल्यो नसतीत, म्हणून मी त्यांच्या दालनात जाऊन त्यांका ह्यो अडचणी निश्चितपणे सांगान. मी काय काय बोललंय ता मंत्र्यांका सांगान. कोकणाक कायतरी दिलासा द्येवा अशी विनंती करतय आणि माझे भाषण संपवतय.

श्री. दिवाकर रावते : माझी अशी सूचना आहे की, सन्माननीय सदस्यांनी मालवणीत भाषण केलेले आहे. ते भाषण माननीय मंत्र्यांना समजण्यासाठी सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांचेवर मी जबाबदारी सोपवितो.

यानंतर श्री. कानडे....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या राज्याचे कार्यक्षम आणि अभ्यासू अर्थमंत्री ना. श्री. जयंत पाटील यांनी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्या अर्थसंकल्पाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. कोणतीही करवाढ नसलेला तसेच सर्वसामान्यांना दिलासा देणारा आणि राज्याच्या विकासाचा वेध घेणारा आणि इतर राज्यांना मार्गदर्शन करणारा असे या अर्थसंकल्पाचे वर्णन करता येईल. चांगला अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे जाहीर अभिनंदन करतो. राज्यातील अर्थव्यवस्थेला शिस्त आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. त्यासाठी कटू निर्णय घेण्याचे धारिष्टय माननीय अर्थमंत्र्यांनी दाखविले आहे.

सभापती महोदय, राज्याची जी सिंचनाची क्षमता आहे ती 17 टक्के आहे. राष्ट्रीय पातळीवर ही क्षमता 43 टक्के आहे. याचा विचार केला तर कोकणची सिंचन क्षमता ही केवळ 3 टक्के आहे. कोकणातील सिंचन प्रकल्पांचा विचार केला तर एकूण 94 प्रकल्प अपूर्ण आहेत. या प्रकल्पांची कामे पूर्ण होण्यासाठी भरीव निधी मिळण्याची आवश्यकता आहे. परंतु याबाबतचा उल्लेख अर्थमंत्र्यांच्या भाषणात दिसत नाही.

सभापती महोदय, देशाच्या इतिहासात पहिल्यांदा केंद्र शासनाने धाडसी निर्णय घेऊन शेतकऱ्यांसाठी 60 कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली त्याबद्दल मी केंद्र शासनाला धन्यवाद देतो. परंतु कोकणातील शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणाने 100 टक्के कर्जाची परतफेड केली त्यांच्यासाठी हे शासन काय मदत करणार आहे ? त्यांना सुध्दा कोठे ना कोठे शासन सवलत देणार आहे काय याचा विचार करुन त्यासाठी तरतूद करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे कोकणातील शेतकऱ्यांना सुध्दा पीक विमा योजना लागू करण्याची आवश्यकता आहे. सध्या ही योजना फक्त कापूस पिकासाठी लागू करण्यात आली आहे. कोकणातील फळबागांसाठी ही योजना लागू करणे गरजेचे आहे. कोकणामध्ये जे गवत होते त्यामुळे बागायती नष्ट होते. 11 मार्च 2008 रोजी सावंतवाडीतील माळगांव येथे रेल्वेच्या बाजूने असलेल्या गवताला आग लागली आणि 35-40 शेतकऱ्यांचे नुकसान झाले. कोकणातील या भागातील बागायतदारांचे नुकसान झाले. शेतकरी उद्ध्वस्त झाला. 6 ते 7 कि.मी.अंतरावरुन पाणी आणून शेतकऱ्याने फळबागांची लागवड केली होती. गेल्या 4/5 वर्षापासून उत्पन्न देखील सुरु झाले होते.शासन म्हणते आगीमध्ये जे नुकसान झालेले आहे त्याची भरपाई करण्यासाठी

.....2



श्री. राजन तेली .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाकडे कोणतीही तरतूद नाही. जवळजवळ 1.5 कोटी रुपये नुकसानीचे पंचनामे झालेले आहेत. कोकण रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही आमची चूक नाही. कोकण रेल्वेचे एमडी सुध्दा पाहणी करुन गेले. त्यांना शेतकऱ्यांनी घेराव घातला होता. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारचे दिलासा देण्याचे काम केलेले नाही. शेतकऱ्यांनी शासनाच्या 100 टक्के योजनेतून कर्ज घेतले होते त्यांना दिलासा देण्यासाठी 7/12 चा उतारा कोरा करावा. म्हणजे सर्वसामान्य शेतकऱ्याला दिलासा मिळेल. कोकणातील गवताला आग लागली की सगळया ठिकाणी असलेल्या फळबागांचे नुकसान होते. म्हणून यावर उपाययोजना म्हणून पीक विमा योजना कोकणातील शेतकऱ्यांना लागू करण्याबाबत शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनात आघाडीवर आहे. फलोत्पादनासाठी 35 कोटींची तरतूद केलेली आहे. फळ निर्यातीसाठी प्रोत्साहन देण्याबाबत अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आलेला आहे. पण केवळ द्राक्ष, डाळिंब या पिकांचा उल्लेख आहे. कोकणात आंब्याप्रमाणेच काजू, जांभूळ, करवंद, कोकम ही फळे होतात. यांचा देखील निर्यातीसाठी असलेल्या योजनेत समावेश करावा अशी माझी शासनाला विनंती आहे. या फळांची निर्यात झाली तर कोकणातील शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात फायदा होईल .

सभापती महोदय, कोकणामध्ये बांबूचे उत्पादन होते. छोटयाशा जिल्हयात 10 कोटी रुपयांचे बांबूचे उत्पादन होते. बांबूची लागवड मोठया प्रमाणात झाली तर किमान 2000 कोटी रुपयांचा टर्नओव्हर या माध्यमातून होईल आणि त्यातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना फायदा मिळेल. केंद्राची आणि राज्याची योजना जिल्हा स्तरावर देखील निर्माण झालेली आहे.

नंतर श्री. भोगले

SGB/ 18:20

श्री.राजन तेली.........

म्हणून या गोष्टींचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

कोकणातील सर्वात महत्वाचा विषय म्हणजे मत्स्य व्यवसाय हा आहे. परकीय चलन मिळवून देणारा हा व्यवसाय आहे. गेली 30 वर्षे या व्यवसायाकडे म्हणावे तसे लक्ष राज्य शासनाने दिलेले नाही. गेल्या 30 वर्षात एकदाही महाराष्ट्र शासनाने मच्छिमारांनी भरीव मदत दिली नाही किंवा मत्स्य दुष्काळ जाहीर केला नाही. या संदर्भात जे मूल्यमापन केले जाते त्याबाबत कोणतीही पध्दत राज्य स्तरावर अस्तित्वात नाही. किनारपट्टीवर 5 ते 7 हजार बोटी असतील, त्यातील एक बोट समुद्रात गेल्यानंतर इतर बोटी बंद आहेत का? नादुरुस्त आहेत का? याचा विचार होत नाही. एक बोट समुद्रात गेल्यानंतर त्यांनी किती उत्पन्न मिळविले त्या आधारे एकूण बोटींचा हिशोब केला जाऊन 50 टक्क्यापेक्षा कमी उत्पन्न नसल्यामुळे मत्स्य दुष्काळ जाहीर होऊ शकत नाही. म्हणून याबाबत ठोस परीक्षण झाले पाहिजे. यासाठी एखादी समिती नेमली पाहिजे. शेजारच्या गुजराथ, केरळ, कर्नाटक या राज्यांमध्ये कशाप्रकारे मच्छिमारांना वेगवेगळया सोयी-सुविधा दिल्या जातात, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कसे प्रयत्न केले जातात, राज्याच्या उत्पन्नात कशाप्रकारे भर घातली जाते याचा सार्वभौम विचार करुन या राज्यातील गोरगरीब कोळी बांधवांना दिलासा देण्याचे काम झाले पाहिजे. आज शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करण्यात आली. त्याचा फायदा या गोरगरीब मच्छिमारांना मिळणार नाही. मच्छिमारांनी छोट्या छोट्या मागण्या मांडलेल्या आहेत. त्याबाबत शासन स्तरावर विचार झाला पाहिजे. आज गुजराथ राज्याने छोट्या छोट्या होड्यांसाठी गॅस किट उपलब्ध करुन दिले आहे. त्यामुळे डिझेलवरचा खर्च कमी झाला. या राज्यातील मच्छिमारांनी देखील गॅस किट उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. गुजराथ व केरळ राज्याने जर मच्छिमारांना त्यांच्या होडीसाठी गॅस किट उपलब्ध करुन दिले असेल तर त्याच धर्तीवर कोकणातील छोटे मच्छिमार आहेत त्यांना गॅस किट उपलब्ध करुन दिले तर त्यांना मोठया प्रमाणात दिलासा देण्याचे काम होऊ शकते. या मच्छिमारांची दुसरी मागणी अशी आहे की, त्यांना जे डिझेल पुरविले जाते त्याचे दर जास्त असल्यामुळे डिझेलऐवजी केरोसीन पुरविण्यात यावे. ज्यांच्या छोट्या होड्या आहेत अशा मच्छिमारांना स्वस्त दरात केरोसीन उपलब्ध करुन दिले तर त्यांना मोठया प्रमाणात दिलासा मिळू शकेल. म्हणून मी मागणी करतो की, किनारपट्टीवरील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:20

श्री.राजन तेली.........

मच्छिमारांना दिलासा देण्यासाठी कोकणातील सर्व लोकप्रतिनिधींचे मत जाणून घेऊन मच्छिमारांसाठी विशेष पॅकेज द्यावे किंवा मत्स्य दुष्काळ जाहीर करता आल्यास त्याचा विचार व्हावा. मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे मागील 30 वर्षात मत्स्य दुष्काळ जाहीर करण्याबाबत कोणतीच पध्दत अस्तित्वात नसल्यामुळे खरी आकडेवारी रेकॉर्डवर येत नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागात जे सचिव कार्यरत आहेत किंवा यापूर्वी जे सचिव होते त्यांना या माशांचा गंध नाही, या क्षेत्राची पुरेशी माहिती नाही. त्यासाठी कोकणातील गरीब मच्छिमारांकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन रेकॉर्ड तयार केले तर त्यांना दिलासा मिळू शकेल. आज या मच्छिमारांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. त्यांना दीर्घ मुदतीचे कमी व्याज दराचे कर्ज उपलब्ध करुन देणे शक्य असेल तर ते देण्याचा विचार व्हावा अशी मी शासनाला सूचना करतो.

सभापती महोदय, आज कोकणामध्ये गड आणि किल्ले मोठया प्रमाणात आहेत. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मुंबईतील पुरातन वास्तूंचे जतन करण्यासाठी शासनाने भरीव तरतूद केली आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतु मी सातत्याने मागणी करीत आहे, मुंबईपासून कोकणापर्यंत जवळपास 107 गड आणि किल्ले आहेत, सिंधुदुर्ग हे नाव जिल्हयाचे असले तरी सिंधुदुर्ग जिल्हयात मालवण येथे सिंधुदुर्ग किल्ला आहे. विजयदूर्ग, रांगणागड व इतर किती तरी किल्ले आहेत. या किल्ल्यावर भगवा झेंडा लावण्याची मागणी केली गेली होती. हे काम खाजगी माध्यमातून करावयास दिले आहे. परंतु माझी मागणी आहे की, मुंबईपासून कोकणातील संपूर्ण किनारपट्टीवर जे गड आणि किल्ले आहेत त्याकडे राज्य शासनाने पुरातन विभागाला लक्ष पुरविण्यास सांगावे. या गड किल्ल्यांचे पर्यटनाच्या दृष्टीकोनातून, इतिहासकारांना अभ्यासाच्या दृष्टीकोनातून पुनर्वसन झाले तर पर्यटनाला देखील चालना मिळू शकेल.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजन् तेली........

ज्याप्रमाणे आपण 15 कोटी रुपये मुंबईच्या पर्यटन विकासासाठी दिले तसे कोकणातील गड-किल्ल्यांसाठी द्यावेत, अशी विनंती करतो. या निमित्ताने सर्वात महत्वाचा उल्लेख मी करु इच्छितो की, ज्याप्रमाणे आपण दरवर्षी शुगर पॅकेज देतो. मग कुठलाही अर्थसंकल्प असो अथवा पुरवणी मागण्या असोत त्यात शुगरसाठी मदत दिली जाते. मग राज्यात ऊस जास्त पिकला तरी पैसे देतो, ऊस फुकट गेला तरी पैसे देतात आणि ऊसाच्या वाहतुकीचा प्रश्न असला तरी पैसे देतात अशा प्रकारे सर्व गोष्टींसाठी पैसे दिले जातात. तसाच दृष्टीकोन शासनाने पर्यटनाच्या बाबतीत ठेवला तर बरे होईल. सन 1997-98 मध्ये पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग जिल्हा संपूर्ण देशातून पहिला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. त्यासाठी यावर्षी पाच कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली त्याबाबत मी शासनाला धन्यवाद देतो पण ज्याप्रमाणे कर्नाटक, केरळ, राजस्थान किंवा गोवा या राज्यांमध्ये पर्यटनाच्या दृष्टीने विचार करुन तसेच मार्केटिंग करण्याच्या दृष्टीने विविध सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला व त्यासाठी पैसे उपलब्ध करुन दिले त्याच धर्तीवर राज्यशासनाने या जिल्ह्यासाठी किमान 200 कोटी रुपये दिले तर जास्तीत जास्त महसूल कोकणातून पर्यटनाच्या माध्यमातून मिळू शकेल. कारण कोकणात पर्यटनाच्या माध्यमातून आपल्याला ॲग्रीकल्चर टुरिझम विकसित करता येईल, सह्याद्रीचे चांगले पट्टे आहेत, चांगला समुद्री किनारपट्टा आहे, चांगले गड व किल्ले आहेत, आंबोलीसारखी चांगली हिल स्टेशन्स आहेत अशा सर्व गोष्टींचा विचार केला तर निश्चितपणे माझी खात्री आहे की, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने चांगल्या प्रकारे विकसित होऊ शकतो म्हणून यासाठी किमान 200 कोटीची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे. तसेच पर्यटनावर सभागृहात किमान तीन-चार तास चर्चा घडवून आणली तर आणखी त्यातून अनेक चांगले मार्ग निघतील, त्यादृष्टीनेही विचार करावा, अशी मी सूचना करतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2008-09 च्या अर्थसंकल्पावर माझ ो विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, हा अर्थसंकल्प सतत तिसऱ्या वर्षी शिलकी अर्थसंकल्प मांडलेला आहे. मागील वर्षी 2200 कोटी रुपये शिलकीचा आणि चालू वर्षी 964 कोटीची शिल्लक होईल असे प्रस्तावित केले आहे. अशा प्रकारे महसुली अधिक्य दाखवून स्थैर्य मिळविण्याचा दावा शासन करीत असले तरी महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये वस्तुस्थिती निदर्शक व विदारक सत्य समोर आले आहे. त्यानुसार आज राज्यात 46 टक्के कुपोषित बालके आहेत त्यापैकी 55 टक्के आदिवासी आहेत. राज्यातील मातांचा मृत्यू दर 134 वर गेलेला आहे. आजही 45 टक्के एवढ्याच मुली दहावीपर्यंत शिकतात आणि 55 टक्के मुली दहावीपर्यंत देखील शाळेत जाऊ शकत नाही, हे देखील सत्य या अहवालातून समोर आले आहे. 15 वर्षात अवाढव्य निधी खर्च करुन सुध्दा सिंचनाखालील क्षेत्रात काहीच वाढ झालेली नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ...

15 टक्के प्राथमिक शाळेत एकच शिक्षक आहे इतके भयाणक सत्य पाहणी अहवालामध्ये आहे. आपण केवळ शिलकी बजेट म्हणून ढोल बडवत आहात परंतु एकीकडे महाराष्ट्राचे विदारक दृष्य जनतेसमोर येत आहे ते महाराष्ट्रासाठी भुषणावह नाही.

सभापती महोदय, जलसंधारणासाठी 5900 कोटी, पाटबंधारेसाठी 5507 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केलेली आहे. परंतु सांगली जिल्हा, सोलापूर जिल्हयाला जीवनदायी ठराव्यात अशा दोन योजना आहेत त्या म्हणजे ताकारी-म्हैसाळ, ठेंभू या योजनांची कामे 90 टक्के पूर्ण झालेली आहे परंतु 10 टक्के काम पूर्ण होण्यासाठी निधी मिळत नसल्यामुळे या सर्व योजनांचा शेतक-यांना काहीही फायदा होत नाही. या योजनांना निधी मिळणार की नाही असा प्रश्न या ठिकाणच्या जनतेला पडलेला आहे. जत, कवठेमहांकाळ या ठिकाणच्या शेतक-यांच्या दोन तीन पिढया पाण्यासाठी उद्ध्वस्त झाल्या परंतु तरी सुध्दा या भागाला पाणी उपलब्ध झालेले नाही. या भागातील शेतकरी, शेतमजूरांचे संपूर्ण कुटुंब जगण्यासाठी आपला भाग सोडून ऊस तोडीसाठी, हमालीसाठी, वेठबिगारीसाठी बाहेर पडलेला आहे. या परिसरातील विदारक चित्र मी लहानपणापासून अनुभवत आहे आणि हे चित्र मी आज सुध्दा पाहत आहे. या तालुक्यांचा दोष केवळ हे तालुके पश्चिम महाराष्ट्रात येतात हाच आहे. पश्चिम महाराष्ट्रातील हे तालुके असल्यामुळे त्यांचा विकास निधी रखडलेला आहे, त्यांच्या योजना निधी न मिळाल्यामुळे त्यांच्या योजना पूर्ण होत नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, त्यांना आपण पश्चिम महाराष्ट्रातील म्हणू नका. या लोकांना तुम्ही पश्चित महाराष्ट्रातील म्हणाल्यामुळे त्यांची वाट लागली आहे. पश्चिम महाराष्ट्राचे आहोत म्हणून या लोकांनी फार मोठी किंमत मोजलेली आहे. पश्चिम महाराष्ट्र म्हटले की, संपूर्ण देशासमोर असे चित्र उभे राहते की, हा भाग सुजलाम,सुफलाम आहे, भरपूर पाणी, आर्थिक स्थिती चांगली आहे. परंतु प्रत्यक्षात कृष्णा खोरे, कोयना, वारणा, पंचगंगेला भागच सुजलाम सुफलाम आहे. या ठिकाणी सिंचनाचे प्रश्न सुटले आहेत, शेतीचा विकास झाला आहे परंतु जे दुष्काळी तालुके आहेत त्या दुष्काळी तालुक्यांकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नाही. मागच्या दोन वर्षापूर्वी या ठिकाणी महापूर आले त्यावेळी शेकडो टीएमसी पाणी वाहून जात होते परंतु या ठिकाणावरून 22 कि.मी. अंतरावरील जनतेला टँकरने

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

पाणी पुरवले जात होते असे चित्र होते. या दुष्काळी भागाला निधी मिळावा, या ठिकाणच्या योजना पूर्ण व्हाव्यात यासाठी आंदोलने केली, राज्यपाल महोदयांची भेट घेतली परंतु काही उपयोग झाला नाही. कारण आम्ही पश्चिम महाराष्ट्रातील असल्यामुळे आमच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षदा लावण्यात आल्या. आम्हाला पिण्याला पाणी मिळत नाही, शेतीसाठी पाणी मिळत नाही, जगण्यासाठी आम्ही दाहो दिशा फिरतो, वाटेल ते काम करुन आम्ही आमचे पोट भरतो. काबाडकष्ट करुन पुन्हा एकदोन महिने आापल्या गावात येतो व पुन्हा एक दोन महिन्यांनी पोट भरण्यासाठी दाहो दिशा फिरत असतो असे असतांनाही आम्ही आत्महत्या करीत नाही म्हणून तुम्ही आमच्याकडे लक्ष देत नाही का ? आम्ही आत्महत्या केल्यानंतर शासन आमच्याकडे लक्ष देणार आहे काय?

सभापती महोदय, दुष्काळी तालुक्यांसाठी आम्ही महामंडळाची मागणी केली होती त्यासंदर्भात दोन वर्षापूर्वी दुष्काळी महामंडळाची घोषणाही शासनाकडून करण्यात आली परंतु या दुष्काळी महामंडळाचे पुढे काय झाले ते समजलेच नाही. यासंदर्भात आम्ही विचारणा केली तर सरकार लक्ष देण्यास तयार नाही. सरकार म्हणते की, रंगनाथन समितीचा अहवाल आल्यावर निर्णय घेऊ. खरे म्हणजे या अहवालासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली होती परंतु दोन वर्षे उलटून गेले तरी रंगनाथन समितीचा अहवाल आलेला नाही त्यामुळे शासन दुष्काळी महामंडळ करीत नाही, आमच्या दुष्काळी तालुक्यांसाठी निधी दिला जात नाही आणि अनुशेषाचे खापर आमच्या माथी फोडून आमच्या योजना पूर्ण करीत नाही. आमच्या दुष्काळी तालुक्यासाठी 16 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढलेले आहे असे शासनाने सांगितलेले आहे मग आपण आमच्या दुष्काळी तालुक्याचे प्रश्न का सोडवत नाही असा प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ...

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत मिळावी म्हणून पंतप्रधानानी पॅकेज जाहीर केले होते.त्या अंतर्गत दुग्ध व्यवसायाला बळकटीकरण करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला होता. परंतु त्या कार्यक्रमाची सत्य स्थिती काय आहे ? या कार्यक्रमा अंतर्गत अनेक शेतकऱ्यांना भाकड म्हशी वाटण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला होता तसेच या कार्यक्रमामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला होता. त्या सबंधीची चौकशी अजूनही पूर्ण झालेली नाही. तेव्हा ही चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी आणि झारीतील शुक्राचार्य कोण आहेत याची माहिती त्वरित जनतेसमोर शासनाने सादर करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, मत्स्यव्यवसायाच्या विकासाकरिता सन 2008-2009 सालच्या अर्थसंकल्पात 40.5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. आपल्या राज्याला 720 किलोमिटर्स लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. तेथे मोठया प्रमाणावर मासेमारी करण्यात येते त्याचप्रमाणे राज्यात ज्या ठिकाणी गोडया पाण्याचे तलाव आहेत त्याठिकाणी भोई समाज मासेमारी करीत असतो. गोडया पाण्याच्या तलावात मासेमारी करण्याचे ठेके गुजर आणि मारवाडी सारख्या पर राज्यातून आलेल्या व्यक्तींना दिले जातात. टेन्डर भरत असतांना ही मंडळी जास्त भाव कोट करीत असतात. त्यामुळे गोडया पाण्याच्या तलावात मासेमारी करण्याचे ठेके त्यांनाच मिळतात परिणामी राज्यातील भूमिपूत्र असलेला जो भोई समाज आहे तो उदघ्वस्त झालेला आहे. भोई समाजाच्या व्यक्तींनी सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत तेव्हा गोडया पाण्याच्या तलावात मासेमारी करण्याचा ठेका त्यांना दिला पाहिजे. असे करण्यात आले तर राज्यातील भूमिपूत्राना गोडया पाण्याच्या तलावात मासेमारी करता येईल आणि त्यातून त्यांना उत्पन्नाचे साधन मिळाल्यामुळे त्यांचे जीवन सुसहय होईल.

सभापती महोदय, यांनतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. सांगली जिल्हयातील "दंडोबाचा डोंगर" हे पर्यटन स्थळ म्हणून जाहीर करण्यात आहे त्यासंबंधी आम्ही वर्तमानपत्रातून नेहमी बातम्या वाचत असतो .परंतु त्या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने अजून काहीही प्रगती झालेली नाही. माननीय उपमुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्री, सहकार मंत्री, तसेच 17 आमदार सांगली जिल्हयातील आहेत. इतके मंत्री आणि आमदार इतर जिल्हयाच्या वाटयाला आलेले नाहीत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ...

तेव्हा सांगली जिल्हयातील "दंडोबाचा डोंगर" या पर्यटन स्थळासाठी अर्थसंकल्पात तरतूद करुन त्या क्षेत्राचा विकास करण्यात यावा अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे. माननीय अर्थमंत्री या जिल्हयातील आहेत परंतु या ठिकाणासाठी आर्थिक तरतूद करण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही असे मला खेदाने सांगावेसे वाटते. सांगली जिल्हयातील "दंडोबाचा डोंगर" या पर्यटन स्थळासाठी अर्थसंकल्पात तरतूद करुन त्या क्षेत्राचा विकास करण्यात यावा अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय,यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी केन्द्रीय अर्थसंकल्पात 60 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाने सातत्याने केन्द्र सरकारकडे पाठपुरावा केला होता म्हणूनच शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी केन्द्रीय अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली होती असे राज्य शासनाने म्हटलेले आहे. या निमित्ताने मला एक मुद्दा मांडावयाचा आहे की, कर्ज माफ करण्यात येणार असल्याची घोषणा झाल्यानंतर सुध्दा एक दोन दिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरुच होत्या. एवढया मोठया प्रमाणात कर्ज माफ करण्यासाठी तरतूद केल्यानंतरसुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या का सुरु होत आहेत याबाबतीत विचार केल्यानंतर असे लक्षात आले की, पाच एकर पेक्षा कमी शेती असलेल्या शेतकऱ्यांनाच या कर्ज माफीचा फायदा मिळणार आहे आणि या शेतकऱ्यांकडे असलेले कर्ज माफ करण्यासाठी 50 हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. त्यापेक्षा जास्त शेती ज्या शेतकऱ्यांकडे आहे त्यानी 75 टक्के रक्कम एक रकमी भरावी आणि त्यानंतर 25 टक्के कर्जाची रक्कम माफ करण्यात येणार आहे. अशा प्रकारे कर्ज माफ करण्यासंबंधीचे सत्य बाहेर आल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु झाल्या आणि आतापर्यंत 41 शेतकऱ्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. त्यानंतर राज्य शासनाला जाग आली आणि आपले काही तरी चुकले आहे असे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर पुन्हा शेतकऱ्यांचे मेळावे घेण्यास सुरुवात करण्यात आली आणि त्यामध्ये सत्ताधारी पक्षाची मंडळी असे सांगत आहे की, कर्ज माफ करण्यासाठी पाच एकराची अट टाकण्यात आलेली आहे ती अट बदलण्यात आली पाहिजे. मला शासनाला असे विचारावयाचे आहे की, जेव्हा कर्ज माफीच्या संदर्भात राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे पाठपुरावा केला होता तेव्हा

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ...

तुमचे ज्ञान मातीत गेले होते काय ? विदर्भातील शेतकऱ्याकडे पाच एकरा पेक्षा जास्त होल्डीग आहे हे आपल्याला त्यावेळी माहीत नव्हते काय ? राज्य शासनाने जर चांगला अभ्यास करुन व्यवस्थितपणे कर्ज माफीसबंधीचा प्रस्ताव मांडला असता तर शेतक-याच्या हातामध्ये काही तरी लागले असते आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या. ..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ...

शेवटी जो शेतकरी आहे त्याचे कर्म-भोग अजून संपलेले नाहीत असेच म्हणावे लागेल. म्हणून माझी या निमित्ताने आग्रही मागणी आहे की, संपूर्ण कर्जमाफी झाल्याशिवाय महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादनावर आधारित भाव मिळाला पाहिजे. हे दोन उपाय झाल्याशिवाय या आत्महत्या थांबणार नाही तरी त्या दृष्टीने हे उपाय आपण अमलात आणावे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी तरतूद करण्याचे शासनाने ठरविले आहे आणि त्यासाठी 67 कोटी रूपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे. ग्रामीण भागात प्रामुख्याने भटक्या-विमुक्त समाजाची देव-देवस्थाने असून त्यांच्या यात्रेनिमित्ताने लाखो भाविक तेथे जमा होत असतात. परंतु या तीर्थक्षेत्रांची, देवस्थानांची निधी अभावी हेळसांड सुरू असताना ती थांबविण्यासाठी सरकारने त्वरित लक्ष देण्याची गरज आहे. सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील कवठे-महांकाळ तालुक्यातील आरेवाडी येथे महाराष्ट्रातील तमाम धनगर समाजाचे दैवत असलेले बिरोबा मंदिर असून तेथे रोज हजारो भाविक येत असतात आणि प्रत्येक अमावस्येला यात्रेच्या काळात तर 5-7 लाख लोक येतात. या देवस्थानाला तीर्थक्षेत्राचा दर्जा यद्यावा आणि त्यासाठी दोन कोटी रूपयांचा विकास निधी देण्याची मागणी मी यापूर्वीही केली होती. परंतु मागील वर्षी माझी ही मागणी मान्य केली गेली नाही. म्हणून या वर्षी पुन्हा मी ही मागणी करतो आहे. आमच्या बिरोबा देवस्थानाला 2 कोटी रूपयांचा निधी ताबडतोब द्यावा.

सभापती महोदय, तांडा-वस्त्या विकास योजना - भटक्या विमुक्त समाजाच्या वाड्या वस्त्यांचा विकास करणे यासाठी 25.53 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. अतिशय तुटपुंजी तरतूद केलेली आहे. महाराष्ट्रातील इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या या वाड्या-वस्त्या लक्षात घेतल्या आणि त्यांची तेथील भयानक अवस्था पाहिली तर जी ही रक्कम आहे ती किती वाड्या-वस्त्यांना पुरणार आहे ? 8-10 वाड्या-वस्त्यांना तरी ही रक्कम पुरणार आहे का ? तेव्हा यासाठी 25.53 कोटीची तरतूद करून सरकारने भटक्या-विमुक्त समाजाची थट्टा चालविली आहे असेच मी म्हणेन. तेव्हा या वाड्या-वस्त्यांचा विकास सरकारने करावा, त्यासाठी अधिक निधी दिला जावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, ऊर्जा क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पामध्ये 1200 कोटीचा निधी दिलेला आहे.

...... 3व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेंडगे ....

पण दऱ्या-खोऱ्यातील, कोकणातील धनगर समाजाच्या जवळपास 300 हून अधिक वाड्यावस्त्या आहेत त्या आजही अंधारात आहेत. आपण आता लोडशेडींगच्या गोष्टी करता, विजेचे उत्पादन करणार म्हणून सांगता, परंतु आमच्या या वाड्यावस्त्यांना आज देखील वीज मिळालेली नाही. या वाड्या-वस्त्या संपूर्णपणे अंधारात आजही आहेत. आमच्यापर्यंत तुमची वीज अजूनही आलेलीच नाही. या वाड्या-वस्त्यांना तुम्ही केव्हा प्रकाश देणार आहात ? ही मागणी मी प्रत्येक अधिवेशनामध्ये करतो आहे, पण त्याबाबतीत प्रत्येक वेळेस टाळाटाळ केली जाते. निदान यावेळेस तरी माननीय अर्थमंत्र्यांनी या बाबतीत उत्तर द्यावे, आमचे समाधान करावे.

सभापती महोदय, महामंडळांना भागभांडवल - यामध्ये अण्णासाहेब पाटील महामंडळाला 50 कोटी, चर्मकार समाजासाठी असलेल्या चर्मोद्योग महामंडळाला 30 कोटी, मातंग समाजासाठी असलैल्या अण्णाभाऊ साठे महामंडळाला 60 कोटी, महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळास 100 कोटी रूपयांचा निधी आपण दिलेला आहे आणि वसंतराव नाईक भटक्या विमुक्त महामंडळास मात्र केवळ 16 कोटीचा निधी दिलेला आहे. म्हणजे या महामंडळास आपण वाटाण्याच्या अक्षता दिल्या आहेत. जी 22 कोटी जनता आहे तिच्यासाठी केवळ 16 कोटीचा निधी आपण देत आहात. ज्यांना आपण जास्त निधी दिला आहे त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही परंतु आम्हालाही त्याप्रमाणे आपण निधी दिला पाहिजे. किमान लोकसंख्येच्या प्रमाणात तरी हा निधी मिळाला पाहिजे. या महामंडळांना निधीचे वाटप करताना कोणावर अन्याय होणार नाही याची दक्षता आपण घ्यायला पाहिजे. त्यात दुजाभाव केला जाऊ नये. महाराष्ट्रात जाती-जातीमध्ये भेद करणे शासनाला शोभनीय नाही असे माझे मत मी या ठिकाणी व्यक्त करीत आहे. सभापती महोदय, धनगर समाजाच्या शेळी-मेंढी विकास महामंडळासाठी देखील मी गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने मागणी करीत आहे, पण यंदाही आमच्या तोंडाला पाने पुसण्यात आली आहेत. या महामंडळासाठी एक रूपयाचादेखील निधी आपण दिलेला नाही. त्यासाठी केवळ एवढेच म्हटले आहे की, आवश्यकता असेल तर देऊ. म्हणजे आम्हाला आवश्यकता नाही असे आपले म्हणणे आहे का ? मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये होतो तेव्हा यासाठी 10 कोटी रूपयांचा निधी आणला होता. मात्र त्या 10 कोटीच्या निधीचे काय झाले हा प्रश्नच आहे. त्या निधीवर संचालक मंडळाने डल्ला मारला. त्यात सगळेच संचालक दोषी आहेत पण त्यांच्यावर कारवाई करण्यास हे सरकार धजावले नाही. ...

( यानंतर श्री. सरफरे ....3डब्ल्यू 1 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे...

आणि गोरख मेघ समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार जे संचालक दोषी आढळले आहेत त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करावी अशी मागणी करतो.

सभापमती महोदय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असलेल्या चौंडी येथील तीर्थक्षेत्राचा विकास करण्याकरिता प्रत्येक अधिवेशनामध्ये मी मागणी करतो. या क्षेत्राचा विकास युती सरकारच्या काळात करण्यात आला. त्यानंतर आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर त्याचा विकास थांबला आहे. त्याठिकाणी समाज मंदिर, हॉल बांधण्यात आला आहे त्या समाज मंदिराच्या सभागृहामध्ये गुरा-ढोरांची सभा भरते, गावातील कुत्र्यांची सभा भरते. मागील अधिवेशनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांनी ही मागणी मान्य केली. आणि या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद करण्याचे प्रस्तावित केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु हे "लबाडाघरचे आवताण असून जेवल्याशिवाय खरे नाही" . म्हणून माझी आपणास विनंती आहे की, 2 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित न करता त्या तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता खर्च करण्यासाठी वर्ष अखेर निधी मिळाला नाहीतर या मार्च अखेर आपण टेंडर काढून हे काम सुरु करावे. ते जर झाले नाहीतर या वर्षी सुध्दा त्या सभागृहामध्ये गुरा-ढोरांची सभा भरेल. म्हणून या चौंडीचा विकास आपण करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, मुंबई उपनगरासाठी 1.33 टक्के एफ.एस.आय. जाहीर करण्यात आला आहे. उपनगराकरिता हा वाढीव एफ.एस.आय. जाहीर करीत असतांना त्यामधून मध्यमवर्गीयांना परवडतील अशाप्रकारची लहान घरे बांधण्याची अट विकासकांवर घालावी अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, मुंबईतील माथाडी कामगारांसाठी भूखंड देण्यात आला असून त्या ठिकाणी घरकुले बांधण्याचे काम सुरु आहे. परंतु मुंबईतील जे गोदी कामगार आहेत त्यांचा मुंबईच्या विकासामध्ये महत्वाचा वाटा आहे, त्यांनी यामध्ये काम केले आहे. त्यांच्या घराचा प्रश्न सुध्दा मार्गी लागला पाहिजे. यानिमित्ताने माझी महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की, वर्षानुवर्षे गोदी कामगार मुंबईमध्ये रहात आहेत. जेव्हा गोदी सुरु झाली तेव्हापासून ते याठिकाणी काम करीत आहेत. त्यांच्या घरकुलाकरिता सरकारने भूखंड उपलब्ध करुन ध्यावा. जेणेकरुन मुंबईमध्ये कायम स्वरुपामध्ये वास्तव्य करण्याची त्यांना संधी मिळेल. विशेषत: त्यांची मुले व कुटुंब सुध्दा मुंबईमध्ये स्वत:चे आयुष्य जगतील.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.प्रकाश शेंडगे...

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रासाठी 18 कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत. सांगली जिल्हयातील कवठे महांकाळ, तासगाव आणि शिराळा या तालुक्यांमध्ये पवन चक्क्यांचे प्रकल्प सुरु आहेत. या चक्क्यांमुळे तेथील शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये यासंबंधी शासनाने धोरण जाहीर करावे म्हणून मी मागणी करीत असतो. पवन चक्क्यांच्या उभारणीसाठी तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी हडप केल्या जातात. त्याचे जीवन उद्ध्वस्त होत असल्यामुळे त्याच्या जीवनामध्ये अंधाराचे साम्राज्य पसरते. याबाबत माझी सरकारला विनंती आहे की, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना प्रत्येक पंख्यामागे 25 हजार रुपयांचे भाडे ध्यावे. त्याचप्रमाणे त्या पंख्यावर काम करण्यासाठी शेतकऱ्याच्या घरामधील दोन मुलांना कायम स्वरुपी कामावर घ्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, जमीन व्यवहारामध्ये साडे तीन हजार घोटाळे झाले आहेत, त्याबाबत तक्रार करण्यात आली तरी अजूनही महाराष्ट्र सरकारने त्याबाबत मार्ग काढलेला नाही. तेव्हा या घोटाळयामधून आपण मार्ग काढावा अशी विनंती करतो. सभापती महोदय, राज्यातील 27 वन विभागांमध्ये अजूनही चराऊ कुरणे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. ती चराऊ कुरणे उपलब्ध करुन देण्यात यावीत अशी विनंती करतो. सभापती महोदय, वस्ती शाळांमधील शिक्षकांच्या बाबतीत देखील शासनाने विचार करणे गरजेचे आहे. या वस्ती शाळा कुणाच्या आहेत? आणि त्या कुठे असतात? गावाच्या बाहेर असतात, दऱ्या-खोऱ्यामध्ये, वाडया वस्त्यांमध्ये असतात. त्या विभागात कुणीही कुलकर्णी, देशपांडे किंवा देशमुख राहत नाही. त्या विभागात शेंडगे, बंडगर आणि गावित असे मागासवर्गीय लोक राहतात. या वस्ती शाळामधील मुलांना शिकविण्यासाठी असलेल्या शिक्षकांना एक ते दीड हजार रुपये महिना पगार दिला जातो. त्यामध्ये त्यांनी मुलांना काय शिकवावयाचे? आणि मुले सुध्दा काय शिकणार आहेत? भटक्या लोकांच्या वाडयामधील वस्ती शाळांमध्ये असलेल्या शिक्षकांना पोटभर पगार दिला जात नाही त्यामुळे तेथील मुलांना ते काय शिकविणार? अशा उपाशी असलेल्या शिक्षकाकडून मुले तरी कसे शिक्षण घेणार? म्हणून मी अशी मागणी करतो की, वस्ती शाळेतील शिक्षकांना सुध्दा इतर शिक्षकांप्रमाणेच पगार देण्यात यावा. मला याठिकाणी माझे विचार व्यक्त करण्यासाठी आपण संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

---------------

(यानंतर सौ. रणदिवे)

27-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3X-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना अशी विनंती करतो की, सन्माननीय सदस्य श्री.सुमंत गायकवाड हे पहिल्यांदाच या सदनामध्ये निवडून आलेले आहेत.त्यामुळे प्रथम त्यांना भाषणासाठी संधी द्यावी. आपल्याला सभागृहाचे कामकाज 7.00 वाजता संपवावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, या सदनातील कामकाज चालविण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे. ते काय करीत आहेत, ते करु देत. याठिकाणी कॅबिनेट मंत्री डॉ.विजयकुमार गावित उपस्थित आहेत आणि ते आपल्या जीवावर दगड ठेऊन बसलेले आहेत. जर आम्ही सभागृहाच्या बाहेर गेलो तर येथे कोरम होईल काय ? काल झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये स्वत:चे नाक कापून घेतलेले आहे. या सभागृहामध्ये निवडून येण्यासाठी धडपड करीत असतात. वर्तमानपत्रामध्ये सुध्दा गरीब लोकांसाठी जेवढे लिहिले जात नाही, तेवढे यांच्यासाठी रकानेच्या रकाने लिहिले जातात. या सदनामध्ये निवडून येण्यासाठी जेवढी धडपड असते, तेवढी ती येथे उपस्थित रहाण्यासाठी का केली जात नाही ? तुमच्या बाजूला दहा सन्माननीय सदस्य सुध्दा उपस्थित नाहीत. एवढा निष्काळजीपणा आला आहे की सत्तेची मस्ती आली आहे ? प्रत्येक वेळी ही बाब का सांगावी लागते हे कळत नाही. आता याठिकाणी नव्याने सन्माननीय सदस्य म्हणून नियुक्त झालेले श्री.सुमंत गायकवाड भाषण करणार आहेत. पण या परिस्थितीत त्यांच्या मनात एक खंत निर्माण होईल की, मी कोणासमोर भाषण करणार आहे. एवढेच मला सांगावयाचे आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुमंत गायकवाड यांचे भाषण संपेपर्यंत वेळ वाढविण्यात येत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुमंत गायकवाड यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .3एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, याठिकाणी सदनामध्ये जो अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे, त्यासंबंधात मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, अर्थतज्ञ नेहमी असे म्हणतात की, या अर्थसंकल्पाला मानवी चेहेरा आहे काय ? पण माझे म्हणणे असे आहे की, या अर्थसंकल्पाला निश्चितपणे मानवी चेहेरा आहे. पण मानवी चेहेऱ्यापेक्षा सुध्दा याला सामाजिक न्यायाचा चेहेरा असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने विचार करता मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. मी एवढेच म्हणेन की, या अर्थसंकल्पामध्ये मागासवर्गीय समाजासाठी ज्या गोष्टी अंतर्भूत केलेल्या आहेत, त्या निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. परंतु त्याचबरोबर अनुसूचित जाती आणि नवबौध्द यांच्यासाठी जी घरकूल योजना मांडण्यात आली आहे, त्यासाठी 300 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, अनुसूचित जाती व नवबौध्द यांची संख्या जवळपास साडेदहा टक्के आहे आणि त्या मानाने करण्यात आलेली तरतूद कमी आहे. मी आतापर्यंत पाहिलेले आहे की, या जातीने खाली वाकूनच मुजरा केला पाहिजे असे पध्दत आहे. याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, घरकूल योजनेअंतर्गत जी घरकुले बांधली जात आहेत, त्या घरांमध्ये प्रवेश करताना असे दरवाजे लावलेले आहेत की, खाली वाकूनच घरामध्ये प्रवेश करावा लागतो. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, जर अनुसूचित जाती व नवबौध्द लोकांसाठी घरकूले बांधावयाची असतील तर ती चांगल्या प्रकारची असली पाहिजेत. जेणेकरुन त्यांना घरामध्ये प्रवेश करताना वाकून जाण्याची वेळ येऊ नये.

सभापती महोदय, मध्यंतरी शासनाने कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची जन्मशताब्दी साजरी केली. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे जाहीर केले की, भूमीहीन शेतकऱ्यांना पाच एकर जमीन देऊ. पण माझ्या माहितीप्रमाणे हे काम अगदी हळूहळू, संथगतीने सुरु आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही



श्री. सुमंत गायकवाड .....

आपण उपजिल्हाधिकारी नेमलेले आहेत ते कोठे घरे वाटतात, कोठे जमिनी वाटतात माहीत नाही. ते काही वाटत नाहीत. माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले होते की, जर जमीन उपलब्ध झाली नाही तर आम्ही विकत घेऊ परंतु भूमिहन शेतमजूरांना जमीन वाटू. परंतु कोकणमध्ये एकालाही जमीन वाटलेली नाही. पुण्यामध्ये, सातार्‍यामध्ये कोणालाही जमीन वाटलेली नाही. असा हा प्रकार आहे. याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत जी 8 महामंडळे आहेत त्यांच्याकडून बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार करण्यासाठी भागभांडवल म्हणून कर्ज मिळते. परंतु सध्याच्या जागतिकीकरणाच्या वातावरणमध्ये आणि उदारीकरणाच्या धोरणमध्ये ज्या तरुणांनी हे कर्ज घेतलेले आहे ते जुने उद्योग असल्यामुळे आणि जुने साहित्य असल्यामुळे टिकत नाहीत आणि त्यामुळे त्यांचे कर्ज देखील ते फेडू शकत नाहीत. माझी अशी सूचना आहे की, महात्मा फुले महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ अशी जी महामंडळे आहेत त्यांनी लोकांना एकूण 650 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे. शासनाने अनेकांची कर्जे माफ केलेली आहेत. शेतकर्‍यांचे कर्ज माफ केलेले आहे. हे 650 कोटी रुपयांचे कर्ज गोरगरिबांच्या उत्थानासाठी, त्यांच्या स्वयंरोजगारासाठी दिलेले आहे. हे 650 कोटी रुपयांचे कर्ज सरकारने माफ करावी अशी मी या ठिकाणी सूचना करतो.शासनाने याची नोंद घ्यावी.

सभापती महोदय, चैत्यभूमी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पवित्र ठिकाण आहे. लाखो लोक त्या ठिकाणी दर्शनासाठी येतात. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, त्या ठिकाणी पैसे कमी पडू देणार नाही. त्या ठिकाणाचे सुशोभिकरण करु, विस्तारीकरण करु असे सांगितले होते. त्या ठिकाणी लागून असलेली इंडिया युनायटेड मिलची जागा सरकारने अद्यापही ताब्यात घेतलेली नाही. सरकारने ती जागा ताबडतोब ताब्यात घ्यावी आणि त्या स्थळाचे सुशोभिकरण आणि विस्तारीकरण त्वरित करावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय, आमच्या एका कार्यक्रमासाठी महालक्ष्मी रेसकोर्स मैदानावर आले होते. त्या ठिकाणी त्यांनी सांगितले की, सामाजिक न्याय मंत्री

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. सुमंत गायकवाड ......

श्री. चंद्रकांत हंडोरे यांच्या खात्याला 2 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सगळ्यात जास्त तरतूद त्यांच्या खात्याकडे आहे असे सांगितले. परंतु मला असे समजले आहे की, या खात्याचे पैसे इतर खात्याकडे वळविले जातात. या खात्याचे पैसे इतर खात्याकडे कशासाठी वळविता ? या महाराष्ट्रामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित करावयाचा असेल तर आणि महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे हे दाखवून द्यावयाचे असेल तर ज्या योजना आपण हाती घेतलेल्या आहेत त्या पूर्ण केल्या पाहिजेत. तरच खऱ्या अर्थाने हे राज्य पुरोगामी ठरेल. या दोन तीन सूचना करुन आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली तसेच माझे भाषण शांतपणे ऐकून घेतले त्याबद्दल धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 28 मार्च, 2008 रोजी सकाळी 10.00 वाजता वाजता पुन्हा भरेल. उद्या सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. त्या बैठकीत अर्थसंकल्पावरील चर्चा आणि माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण होईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 59 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 28 मार्च, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही